म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3219

# ।। मुक्तेश्वरांची कविता ।।
# वाङ्मयीन अभ्यास

खंड दुसरा
।। संक्षेपरामायण ।।

।। रत्नाकर बापूराव मंचरकर ।।

मराठी संशोधन मंडळ
मुंबई

REFBK-0025644

संदर्भ निबंध
३२७१
२५६४४
१२।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६



# मुक्तेश्वरांची कविता

## खंड दुसरा


## संक्षेपरामायण

# मुक्तेश्वरांची कविता

खंड दुसरा

## संक्षेपरामायण

रत्नाकर बापूराव मंचरकर




मराठी संशोधन मंडळ

१९८३

Mukteshwaranchi Kavita
II Sankshep-Ramayana
R. B. Mancharkar

मुक्तेश्वरांची कविता
खंड दुसरा ० संक्षेपरामायण

© सर्वाधिकार
सौ. शकुंतला र. मंचरकर

प्रथमावृत्ती
१९८३

प्रकाशक
प्रा. रमेश अ. तेंडुलकर
संचालक, मराठी संशोधन मंडळ
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
दादर, मुंबई ४०० ०१४


मुद्रक
अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप
४२ आंबेकर मार्ग, वडाळा
मुंबई ४०० ०३१

वितरक :
मौज प्रकाशन गृह
खटावबाडी, गिरगाव
मुंबई-४०० ००४

मूल्य पंचवीस रुपये

सौ. शकुंतलास





# भूमिका

प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप बहुपरिमाणात्मक आहे. त्यामुळे त्याची समीक्षाही भाषाभ्यास, समाजदर्शन, तत्त्वचिंतन, संशोधन, इतिहासलेखन, साहित्यविमर्श अशा अनेक क्षेत्रांना स्पर्श करणारी झाली आहे. तथापि या वाङ्मयाचे सौंदर्य व मूल्य यांच्या यथार्थ दर्शनासाठी वाङ्मयीन मूल्ये मध्यवर्ती ठेवून त्याचा अभ्यास व्हावयास हवा. या जाणिवेने प्राचीन मराठी वाङ्मयाकडे पाहू लागलो तेव्हा दृष्टी स्थिरावली ती कविवर मुक्तेश्वरांवर (इ. स. १५७४–१६४०). गेल्या शंभर वर्षांत मुक्तेश्वरांच्या चरित्रसंशोधनावर व तुलनाधिष्ठित अभ्यासावर भर दिला गेला. त्यामानाने त्यांच्या कवितेतील नवतेचा व सौंदर्यउन्मेषांचा विचार झाला नाही. महाभारताशिवाय त्यांची अन्य रचना काहीशी उपेक्षित राहिली. वस्तुतः काव्यविषयक जाणिवांचे सृजनशील कलावंताला असलेले सहज भान मुक्तेश्वरांच्या ठायी नांदत आहे. त्यांच्या श्रेणीच्या अन्य कविश्रेष्ठांपेक्षा त्यांची रचना वाङ्मयबाह्य प्रेरणा-परिमाणांनी तितकीशी भारावलेली नाही. तिचे रूप अधिक काव्यनिष्ठ आहे. नवनव्या दिशांचा धांडोळा घेत ती विकसित होत राहिली. आपल्या युगातील वाङ्मयीन संक्रमणांचे ध्वनी-प्रतिध्वनी तीत उमटले आहेत. तिने पूर्वपरंपरेला वेगळ्या वाटेने वाहते केले आणि उत्तरकालीनांवर प्रभाव गाजविला. प्राचीन मराठी काव्यपरंपरेत मुक्तेश्वरांची कविता अशी मोक्याच्या जागेवर उभी आहे. या विपुल (ओवीसंख्या सुमारे वीस हजार) व गुणसमृद्ध काव्यसृष्टीचे वाङ्मयीन भूमिकेवरून आकलन व मूल्यमापन करणे, हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. हा अभ्यास तीन खंडात मांडला आहे.

या वाङ्मयाभ्यासात प्रमाणसंहितेच्या अनुपलब्धीचे भान ठेवले आहे आणि शक्य तेथे हस्तलिखितांचा पुरावा विचारात घेतला आहे. आवश्यक तेथे पूर्वसूरींशी सप्रमाण संवाद-विरोध दर्शविला आहे. आकलनासाठी आवश्यक ते सारे स्वीकारले आहे. मूल्यमापन मात्र वाङ्मयीन भूमिकेवरून केले आहे. त्यामुळे मुक्तेश्वरांचे लौकिक जीवन, त्यांचा तत्त्वविचार किंवा त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झालेले समाजदर्शन यांचा स्वतंत्र विचार केलेला नाही. जेथे हे घटक त्यांच्या काव्यसृष्टीला अर्थ आणि आकार देतात तेथेच त्यांचा विचार केला आहे. कोणतेही पूर्वग्रह न बाळगता मुक्तेश्वरांच्या काव्यकृतींचा अनेकांगी विश्लेषक अभ्यास केला आहे. एकेका काव्यकृतीच्या संदर्भात अनेक संबद्ध दृष्टिकोण या वाङ्मयाभ्यासात अंतर्भूत आहेत. त्यांचे सूत्ररूप ग्रथन त्या त्या खंडाच्या संश्लेषक समारोपात व एकूण अभ्यासाच्या उपसंहारात केले आहे. प्रत्येक खंडाच्या आरंभी विस्तृत विषयानुक्रम व अखेरी त्या खंडापुरती मर्यादित

अशी वर्गीकृत संदर्भसूची दिली आहे. संक्षेपात, नवी दृष्टी आणि जुनी शिस्त यांचा एकमेळ साधून मुक्तेश्वरी कवितेचे नवदर्शन घडविण्याचा रसिकहृदयाने पण परिश्रमपूर्वक प्रयत्न केला आहे. मुक्तेश्वरांचे काव्यकर्तृत्व व मराठी काव्यपरंपरेतील स्थान निश्चित करण्यास त्यामुळे साहाय्य होईल. प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासासही तो उपकारक ठरावा.

पहिला खंड स्फुट कवितेचा; तिसरा खंड मुक्तेश्वरी भारताचा; तसा हा दुसरा खंड मुक्तेश्वरी संक्षेपरामायणाचा आहे. 'परिचया'त संहितेचे स्वरूप, रचनाकाल, रचनास्थल व रचनाक्रम यांची चर्चा करून ग्रंथस्वरूपाचा परिचय घडविला आहे. त्या संदर्भात मुक्तेश्वरांचा जन्मशक व नाथ-मुक्तेश्वर-संबंध यांची चर्चा केली आहे. 'घटना आणि परंपरा' या विभागात संस्कृत व मराठी रामकथांच्या संदर्भात संक्षेपरामायणाची जडणघडण स्पष्ट केली आहे. संक्षेपरामायणाचा आधारग्रंथ वाल्मीकिरामायण नसून भावार्थरामायण असल्याचे विस्तारपूर्वक दाखविले आहे. संक्षेपरामायणाची परंपरासापेक्ष नवता व प्रभाव मराठी रामकथांच्या संदर्भात विशद केला आहे. 'वाङ्मयीन पाहणी' या विभागारंभी मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी मांडली आहे. कथाबंध-व्यक्तिचित्रण-संवाद-वर्णन-अलंकार-निर्देशात्मकता-छंद-भाषा या काव्यांगांनी संक्षेपरामायणाची पाहणी केली आहे. विकासाच्या मधल्या टप्प्यात पंडिती वळण अनुसरल्याने संक्षेपरामायणास आलेला विदग्ध थाटघाट वर्णिला आहे. प्राचीन मराठी काव्यातील संक्षेपप्रवृत्तीचे आरंभस्थान म्हणून त्याचे महत्त्व विशद केले आहे. 'समारोपा'त सूत्ररूपाने निष्कर्ष दिले आहेत. 'परिशिष्टा'त 'ओवीरामायण' व 'उत्तरकांड' या विशेष्य रचनांचा विचार केला आहे आणि विवेचनाला आधार देणारे पूरक संदर्भ नोंदविले आहेत. आरंभी सविस्तर विषयानुक्रम व अखेरी संक्षेपरामायणापुरती मर्यादित वर्गीकृत संदर्भसूची दिली आहे.

पहिल्या खंडात निर्देशिलेल्या व्यक्ती आणि संस्था यांचा ऋणभार याही खंडावर आहे. या अभ्यासात मराठी संशोधन मंडळाचे साहाय्य झाले होते. आता त्यास प्रकाश लाभत आहे तोही मंडळामुळेच. मराठी संशोधन मंडळाचे संचालक प्रा. रमेश अ. तेंडुलकर यांनी मोठ्या जिव्हाळ्याने पाठराखण केली. तसेच प्रा. श्रीधर निमकर, श्री. प्रदीप कर्णिक, श्री. आत्माराम सापते आणि अक्षर प्रतिरूप मुद्रणालयाचे श्री. अरुण नाईक व श्री. राजीव नाईक यांचाही आवर्जून निर्देश करावा इतके त्यांचे या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या कामात विविध प्रकारचे साहाय्य झाले आहे. सर्वांच्या ऋणाचे कृतज्ञ स्मरण माझ्या मनी जागे आहे.

**डॉ. प्रा. र. बा. मंचरकर**
मराठी विभाग प्रमुख,
पदव्युत्तर केंद्र, बोरावके महाविद्यालय
श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर, ४१३ ७०९

# मुक्तेश्वरांची कविता

## खंड दोन : संक्षेपरामायण

*अनुक्रम*


**अ ॥ परिचय** १–१०

१. संक्षेपरामायण : प्रसिद्धी व संहिता १
२. संक्षेपरामायण : स्थूल परिचय २
३. संक्षेपरामायण : रचनास्थळ २
४. संक्षेपरामायण : रचनाक्रम २
५. संक्षेपरामायण : भारतपूर्व रचना ४
६. संक्षेपरामायण : रचनाकाळाची निश्चिती ६
   ६.१. मुक्तेश्वरांचा जन्मशक ७
   ६.२. मुक्तेश्वर-एकनाथ संबंध ८
   ६.३. रचनाकाळाची मर्यादा ९

**ब ॥ संक्षेपरामायण : घटना आणि परंपरा** ११–२७

१. प्रास्ताविक ११
२. संक्षेपरामायण आणि भावार्थरामायण ११
   २.१. भावार्थरामायण : परिचय व प्रभाव ११
   २.२. संक्षेपरामायणावरील भावार्थरामायणाच्या प्रभावाचे स्वरूप १२
   २.३. भावार्थरामायणाच्या अनुसरणाचा वाङ्मयीन परिणाम १५
   २.४. संक्षेपरामायण व भावार्थरामायण : काही भेद १५
३. संक्षेपरामायण आणि वाल्मीकिरामायण १७
४. संक्षेपरामायण आणि अध्यात्मरामायण १९
५. संक्षेपरामायण आणि आनंदरामायण २०
६. संक्षेपरामायण आणि महाभारतातील रामोपाख्यान २०

७. संक्षेपरामायण आणि जैमिनी अश्वमेध २१
८. "नानानाटकभावपद्यरचना . . ." २१
९. संक्षेपरामायणातील नवता २३
१०. संक्षेपरामायण आणि मराठी रामकथा २३
११. समारोप २६

**क ॥ संक्षेपरामायण : वाङ्मयीन पाहणी** २८–६९

एक ॥ मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी २८
१. समारोप २९
दोन ॥ संक्षेपरामायण : कथाबंध ३०
१. संक्षेपरामायण : कथासूत्रग्रथन ३०
२. मुक्तेश्वरांनी रामकथेला दिलेला नवार्थ ३२
२.१. मुक्तेश्वरी रामकथेच्या नवार्थाची सापेक्षता ३४
३. मुक्तेश्वरी कथाबंधाचे आणखी काही विशेष ३५
३.१. अद्‌भुतता ३५
३.२. "आनंदवाचा वदलो विनोदें" ३५
३.३. कालविपर्यास ३६
३.४. अश्लीलता ३६
४. संक्षेपप्रवृत्त रचनाबंधाचा पहिला आविष्कार ३७
५. निवेदनशैलीचे काही विशेष ४०
६. समारोप ४१
तीन ॥ संक्षेपरामायण : व्यक्तिचित्रण ४१
१. प्रास्ताविक ४१
२. काही व्यक्तिचित्रे ४१
३. पात्रसृष्टी : काही विशेष ४४
४. व्यक्तिचित्रणाच्या नाना परी ४६
५. समारोप ४९
चार ॥ संक्षेपरामायण : संवाद ४९
पाच ॥ संक्षेपरामायण : वर्णन ५१
सहा ॥ संक्षेपरामायण : अलंकार ५३
सात ॥ संक्षेपरामायण : निर्देशात्मकता ५५
आठ ॥ संक्षेपरामायण : वृत्तयोजना ५६

नऊ ।। संक्षेपरामायण : भाषा ५८
१. भाषेची प्रातिनिधिक पंडिती घडण ५८
२. शब्दयोजनेचे काही विशेष ५९
३. काही शैलीविशेष ६१
४. संस्कृत वळणाची विदग्ध शैली ६२
दहा ।। संक्षेपरामायण : एक विदग्ध काव्य ६५
१. विदग्ध महाकाव्याचा स्वरूपविचार ६५
२. संक्षेपरामायणाच्या विदग्ध अवताराची कारणमीमांसा ६६
३. संक्षेपरामायणाचे विदग्ध स्वरूप ६७

**ड ॥ समारोप** ७०–७१

**इ ॥ परिशिष्टें** ७२–८८

एक ।। ओवीरामायण व वनपर्वांतर्गत रामोपाख्यान ७२
दोन ।। मुक्तेश्वरकृत(?) भावार्थरामायणाचे उत्तरकांड ७५
तीन ।। बालकांड : तौलनिक पाहणी ८२
चार ।। संक्षेपरामायण : हस्तलिखित प्रती ८७

**फ ॥ संदर्भसूची** ८९–९२

# अ ।। परिचय

## १. संक्षेपरामायण : प्रसिद्धी व संहिता

पांधरीसारख्या रामदासी मठापासून ते कुंभकोणम्सारख्या सुदूर दक्षिणेपर्यंत मुक्तेश्वरी रामायणाच्या हस्तलिखित प्रती सापडतात. त्यांचा प्रसार सार्वत्रिक असला तरी संख्या अल्प आहे.[१] त्यातही कांडशः प्रती अधिक आहेत. त्यांच्या अपपाठग्रस्त प्रती पाहता चिकित्सक आवृत्तीची उणीव तीव्रतेने भासते.

मुक्तेश्वरांचे उपलब्ध महाभारत समग्र प्रसिद्ध होण्याच्या आधीच त्यांचे रामायण[२] प्रसिद्ध झाले. मात्र मुक्तेश्वरी भारताची पर्वे वेळोवेळी स्वतंत्रपणे प्रसिद्ध झाली. ते भाग्य त्यांच्या रामायणाला लाभले नाही. ते विरलत्वाने पुनःप्रकाशित[३] झाले. हस्तलिखित वाचनाच्या काव्यसंग्रहप्रतीतील चुका दुरुस्त करण्याच्या प्रयत्नात परांजपेप्रतीत काही अपपाठ नव्याने निर्माण झाले आहेत. विशेषनामातील बदल (६।३५६), अकारण पदच्छेद (६।४२०), श्लोकांचे चुकीचे क्रमांक (पृ. १००, १०४ इ.), अनुस्वार गळाल्याने होणारे अर्थभेद (७।४), शब्द गळाल्याने होणारे अर्थभेद (७।३९८), अर्थ बदलून टाकणारी अशुद्धता (६।१२५) असे त्यांचे स्वरूप आहे. काव्यसंग्रहातील अपपाठांचे शुद्धीकरण करताना प्रा. परांजपे हस्तलिखितांचा आधार घेत नाहीत. बालकांडातील 'मुखी राम त्या धाम कैवल्य लाभे– घरी नृत्य तो भृत्य होऊनि राबे' (१।१२१) ही ओळ त्यांनी काव्यसंग्रहप्रतीप्रमाणेच दिली आहे. या चरणाचा उत्तरार्ध अर्थदृष्ट्या सुसंगत नाही. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे येथील बाडांक तीनशेमध्ये तो 'घरी मृत्य तो भृत्य होऊनि राबे' असा दिला आहे. त्यावरून अर्थबोध स्पष्टत्वाने होतो आणि लयीचा ठेकाही कळतो. हस्तलिखितांच्या आधारे असे अनेक अपपाठ शुद्ध करता येणे शक्य होते. त्याऐवजी केवळ अर्थ-संदर्भावर विसंबल्याने परांजपे यांची पाठचर्चा 'खऱ्या' पाठापेक्षा 'बऱ्या' पाठाचा शोध घेणारी

---

१. अशा एकूण १८ हस्तलिखितांची नोंद परिशिष्टात केली आहे.

२. **मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटकरामायण (सर्वसंग्रह)**, संपा. माधव चंद्रोबा, मुंबई, १८६४.

३. **महाराष्ट्र कविवर्य मुक्तेश्वरकृत रामायण (काव्यसंग्रह)**, संपा. ज. बा. मोडक– वा. दा. ओक, मुंबई १८९१.
**मुक्तेश्वरकृत रामायण**, संपा. भा. श्री. परांजपे, सुविचार प्रकाशन, नागपूर-पुणे १९६९ (संरा.).

ठरली आहे. तरीही मार्मिक पदच्छेद (७ । ५२) व अर्थबोधक अवतरणचिन्हे (७। ३०८) यामुळे ती मार्गदर्शक ठरते. त्यामुळे उघड दिसणारी अशुद्धे काव्यसंग्रह-प्रतीप्रमाणे शुद्ध करून पुढील विवेचनात परांजपे-प्रतीप्रमाणे संहितेचे संदर्भ दिले आहेत. 'संरा' या संक्षेपाने तिचा सर्वत्र निर्देश केला आहे.

**२. संक्षेपरामायण : स्थूल परिचय**

बाल (१२२), अयोध्या (१२३), अरण्य (१२३), किष्किंधा (१०५), सुंदर (११६), युद्ध (४७५) आणि उत्तर (६६१) अशा सप्तकांडात विभक्त असलेले वृत्तबद्ध रामायण १७२५ श्लोकांचे आहे. संस्कृत श्लोकांचे नमन व युद्ध-उत्तरकांडान्ती येणारे ग्रंथसमाप्तिसूचक दोन उपसंहार हा त्यातील कुतूहलाचा भाग आहे. रामायण, कौतूहलनाटक रामायण, कौतूहलरामायण, संक्षेपरामायण अशा निरनिराळ्या नावांनी त्याचा उल्लेख होतो. तथापि "संक्षेपरामायण नाम याते, संक्षेपता ये श्रवणी भवाते" (६। ४६६) असा मुक्तेश्वरांनी स्वतःच त्याचा निर्देश केला आहे. त्यामुळे 'संक्षेपरामायण' याच नावाने ते ओळखले जाणे योग्य ठरेल. संक्षेपप्रवृत्ती व आध्यात्मिक फलश्रुती सुचविणारे हे नाव काव्यातील शब्दलाघवाची चुणूक दाखविणारे आहे. त्यामुळे ते जसे अधिकृत तसे अन्वर्थकही ठरते.

**३. संक्षेपरामायण : रचनास्थळ**

संक्षेपरामायणाची फलश्रुती सांगताना "काशीनिवासी जनतापहारी, तारी जगा केवळ नामधारी" (६। ४६६) असे मुक्तेश्वरांनी म्हटले आहे. येथील काशीनिवासी जनांचा उल्लेख म्हणजे संक्षेपरामायणाच्या श्रोत्यांचा उल्लेख असावा. त्याशिवाय त्याची दुसरी संगती लावता येत नाही. यापुढे महाराष्ट्र-पैठण-गौतमीतटाकीचा[४] सहवास यांचा अभिमानपूर्वक उल्लेख (६। ४६९–४७०) त्यांनी केला आहे. स्वतःचा स्थल-निर्देशासह करून दिलेला हा परिचय काशीसारख्या परस्थ ठिकाणच्या श्रोत्यांसाठी आलेला असावा. याचा अर्थ असा की मुक्तेश्वरांनी आपले रामायण-निदान युद्धकांडापर्यंत तरी काशी येथील वास्तव्यात रचले. संक्षेपरामायणावरील संस्कृत काव्यादर्शाची घनदाट छाप हा काशीतील पांडित्यपूर्ण वातावरणाचा परिणाम असण्याची शक्यता नाकारता येणारी नाही.

**४. संक्षेपरामायण : रचनाक्रम**

संक्षेपरामायणाच्या बाल-अयोध्या-अरण्य-किष्किंधा-सुंदर या कांडान्ती त्या त्या कांडाची

---

४. गौतमी म्हणजे काशीची गंगा, असे वि. ल. भावे सुचवितात. तथापि मुक्तेश्वरांनी 'गौतमी' हा शब्द 'गोदावरी' या अर्थाने याच रामायणात (३।९६) वापरला आहे.

समाप्ती झाल्याचे निर्देश येतात. युद्धकांडाच्या उपसंहारात (६।४६५–४७५) राममाहात्म्य, ग्रंथनाम, कवीचा स्थलनिर्देशासह परिचय आणि श्रोत्यांचे आभार एवढा भाग येतो. ही खरोखर ग्रंथपरिसमाप्तीच होय. यावरून युद्धकांडापर्यंतचीच रामायणरचना मुक्तेश्वरांना अभिप्रेत होती असे दिसते. उत्तरकांडाची प्रक्षिप्तता, वाल्मीकिरामायणातील युद्धकांडाचे कथासमाप्ती करणारे रूप, (वारा. ६।१२८।११७) नाथांच्या देहावसानाने युद्धकांडाच्या अखेरी समाप्त होऊ पाहणारे भावार्थरामायण आणि भारतीय वाङ्मयातील रामकथेची सुखान्त परंपरा लक्षात घेऊन मुक्तेश्वरांनी युद्धकांडाच्या अखेरीपर्यंत रामकथा लिहून त्याच्या उपसंहारात ग्रंथसमाप्ती केली. यादृष्टीनेच आपल्या रामायणाचा संक्षेपरामायण असा उल्लेख त्यांनी केला असावा.

"महाभारताची सर्व पर्वे आपल्या हातून आता लिहून पूर्ण होत नाहीत, हे लक्षात आल्यावर, आपला एक तरी ग्रंथ पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध व्हावा असे वाटून त्याने उत्तरकांड लिहून रामायण काव्य पूर्ण केले"[५] हे देशपांडे यांचे म्हणणे तितकेसे पटणारे नाही. एक तर, युद्धकांडापर्यंतची रचना ही आरंभीच्या संकल्पाप्रमाणे पूर्ण झालेलीच रचना होती. दुसरे म्हणजे, रामायण ही भारतपूर्व रचना असल्याचे देशपांडे स्वतःच मान्य करतात.

युद्धकांडापर्यंतच्या संक्षेपरामायणास, '.....पुढे याने किंवा दुसऱ्या कोणी आणखी उत्तरकांडाची भर घालून हे संपूर्ण रामायण केले'[६] असे उत्तरकांडाच्या मुक्तेश्वरत्वाविषयी भावे साशंक आहेत. तथापि उत्तरकांडाच्या अखेरी येणारी मुक्तेश्वर ही कविनाममुद्रा, विश्वंभरगुरूचा निर्देश, ग्रंथाच्या पूर्णत्वाचा उल्लेख (७।उप. १–३) आणि पूर्वरचनेशी समरूप शैली व वाङ्मयरूप लक्षात घेता त्याचे मुक्तेश्वरत्व स्पष्ट व्हावे.

युद्धकांडापर्यंत संक्षेपरामायण संपवून मुक्तेश्वर ग्रंथपूर्तीच्या आनंदात महाराष्ट्रात आले असतील. भावार्थरामायणाच्या परिपूर्तीचे प्रयत्न पाहून उत्तरकांडाची जोड आपल्याही रामायणाला देण्याची प्रेरणा त्यांना मिळाली असणे शक्य आहे. उत्तरकांडाची जोड देताना काही काळ मध्ये गेला असला पाहिजे. "विश्वंभराला आपला गुरु करण्यापूर्वी व दत्तसंप्रदायात शिरण्यापूर्वी"[७] संक्षेपरामायणाचा पहिला टप्पा पूर्ण झाला हे अंतर्गत पुराव्यावरूनही स्पष्ट दिसते. उत्तरकांडात आधीच्या भागातील भावार्थरामायणाचा प्रभाव कमी होऊन वाल्मीकिरामायणाचा प्रभाव वाढू लागतो. वर्णनस्थळी रेंगाळणे नसले तरी त्यात तपशील भरण्याची विस्तार प्रवृत्ती आरंभित झालेली दिसते. अलंकारांचे प्रमाण कमी होते. निवेदन अधिक धावते व गतिमान

---

५. अ. ना. देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग-४, पुणे १९७७, पृ. ३०५.

६. वि. ल. भावे, **महाराष्ट्र-सारस्वत**, आवृत्ती चौथी, पुणे, शके १८७६, पृ. ३३६.

७. बा. अ. भिडे, **मुक्तेश्वर**, आवृत्ती दुसरी, मुंबई १९२६, पृ. ११.

होते. सुभाषितात्मकता वाढते. निसर्गरसिकता काही अंशाने प्रकट होते. उत्तरकांडातील हे वाङ्मयीन विकसन उत्तरकालीन रचनेचे द्योतक आहे.

युद्धकांडापर्यंत लिहिलेल्या संक्षेपरामायणास नंतरच्या काळात उत्तरकांडाची जोड देण्यात आली. संक्षेपरामायणाचा रचनाकाळ ठरविताना हा रचनाक्रम लक्षात घेणे आवश्यक आहे.

### ५. संक्षेपरामायण : भारतपूर्व रचना

मुक्तेश्वरांचे संक्षेपरामायण भारतपूर्वकाळातील पहिली दीर्घ कृती असल्याचे सर्वश्री भावे, भिडे, आजगावकर, पांगारकर, पंगू, अ. ना. देशपांडे सांगतात. त्याचा प्रतिवाद करून ती भारतोत्तर काळातील अखेरची दीर्घ कृती असल्याचे भा. श्री. परांजपे[८] म्हणतात, या मताची चिकित्सा करणे आवश्यक आहे.

(अ) मुक्तेश्वरी भारत विस्ताराकडून संक्षेपाकडे झुकले. याच काळात संक्षेपशील रामायण अवतरले (पृ. ५), असा परांजप्यांचा पहिला मुद्दा आहे. पण मग हेच रामायण अखेरी विस्ताराकडे कसे झुकले ? खरे तर मुक्तेश्वरांचे संक्षेपप्रवृत्त रामायण अखेरी विस्ताराकडे झुकले आणि विस्तारप्रवृत्त महाभारत अखेरी संक्षेपाकडे झुकले. संक्षेप, विस्तार व पुनः संक्षेप असा मुक्तेश्वरांचा वाङ्मयीन प्रवास अधिक स्वाभाविक वाटतो. या दोन्ही समकालीन वाङ्मयवृत्तीत त्यांचे काव्य आंदोलत राहिले.

(ब) विदग्धतेला पोषक अशा वातावरणात अनंततनय, रामदास यांनी श्लोकरचना रुळविली होती. श्रोत्यांच्या या नव्या आवडीनुसार मुक्तेश्वरांनी श्लोकबद्ध रचना केली (पृ. ९–१०). परांजप्यांच्या या मीमांसेमुळे संक्षेपरामायण उत्तरकालीन ठरत नाही. अशा पंडिती रचनेचा पायरव नाथवाङ्मयातून येतो (पृ. ९) असे तेच सांगतात. याबाबतीत भोवतालच्या परिस्थितीने मुक्तेश्वर प्रभावित झाले असे म्हणण्यापेक्षा त्यांनी श्लोकरचना करून परिस्थितीला वळण लावले, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल.

(क) पंडित शास्त्राध्ययन व पुराणिक पुराणेतिहासांचे अध्ययन करीत. काव्यनाटकांचे अध्ययन निकृष्ट गणले जाई. त्यामुळे जातिवंत कवीही अशा अध्ययनाकडे उत्तरायुष्यात हौसेने वळत. महाभारताच्या नमनात कविवंदन नाही व कण्वाश्रमातील संस्कृताध्ययनाच्या दृश्यवर्णनात (मुभा १।१५) संस्कृत काव्यनाट्यांचा निर्देश नाही. यावरून मुक्तेश्वरांचे संस्कृत काव्यनाट्यांचे अध्ययन भारतोत्तर व रामायणपूर्व काळातील असून ते त्यांनी उत्तरवयात केले (पृ. ८) असा परांजप्यांचा तर्क आहे. तथापि मुक्तेश्वरकालीन अध्ययनपद्धतीत पंडित होण्यापूर्वी व्युत्पन्न व्हावे लागे आणि व्युत्प-

---

८. संरा. उपोद्घात, पृ. ५ ते १२.

त्यांना काव्यनाटकांचा परिचय आवश्यक असे.[९] त्यावरून शास्त्राध्ययन करणारांनाही काव्यनाट्यांचा परिचय असणे स्वाभाविक ठरते. मराठी पंडितकवींच्या प्रारंभिक रचनेत त्याचे संस्कार उमटलेले दिसतात. 'कुशलवाख्यान' या मोरोपंतांच्या पहिल्या दीर्घकृतीच्या पहिल्या चार अध्यायांवर रघुवंशाचा स्पष्ट ठसा उमटलेला आहे. ललित वाङमयाकडून तत्वचिंतनात्मक वाङमयाकडे मन वयोमानानुरूप झुकत जाते, या स्वाभाविक क्रमाच्या दृष्टीनेही परांजप्यांचे म्हणणे टिकणारे वाटत नाही. तसेच पाहू गेलो तर महाभारताप्रमाणे रामायणातही कविवंदन येत नाही. उलट रामायणात जसा संस्कृत काव्यनाट्यांचा उल्लेख आहे तसा महाभारतातही 'जीर्णकवीं'चा उल्लेख आहे. संस्कृताध्ययनवर्णनात मुक्तेश्वर व्यासानुसरण करीत आहेत व अनुल्लेख हा निर्णायक पुरावा नाही हे अ. ना. देशपांडयांचे[१०] म्हणणे बरोबरच आहे. शिवाय वरील प्रसंगात संस्कृत काव्य-नाटकांचा निर्देश कालविपर्यस्त ठरला असता हेही लक्षात घ्यावे. "नानानाटक-भाव पद्यरचना संदोहसांद्रीकृता" हे त्याने आपल्या रामायणी श्लोकबद्ध काव्याबद्दल काढलेले उद्‌गार त्याच्या भारतरचनेला जास्त समर्थतेने लागू पडतात.[११] हे परांजप्यांचे उद्‌गार त्यांच्या येथील तर्काला छेद देणारे आहेत. मुक्तेश्वरी भारतावर संस्कृत काव्यनाटयांच्या अध्ययनाच्या खुणा उमटलेल्या आहेत, असे मी तिसऱ्या खंडात साधार दाखविले आहे. पासष्ट वर्षांचे होईतो मुक्तेश्वरांसारख्या व्यासंगी व रसिक कविश्रेष्ठाला संस्कृत काव्यनाटकांचा परिचय नव्हता, हा तर्क न पटणारा तर आहेच पण निराधारही आहे.

(ड) वनपर्वात रामकथासंबद्ध संदर्भ येतात. जणू मुक्तेश्वर महाराष्ट्राच्या दुर्दशेवरील उतारा रामकथेत शोधीत होते. त्यावरून वनपर्वाच्या लेखनानंतर त्यांनी रामायण रचनेस आरंभ केला असावा. त्यास वेळ मिळावा म्हणून विराटपर्व त्यांनी अवघ्या आठ अध्यायात आटोपून घेतले, असे परांजपे (पृ. ११–१२) म्हणतात. वस्तुतः व्यासभारतातही रामकथेचे संदर्भ येतात. अशी पुराणसंदर्भसमृद्ध काव्यशैली मुक्तेश्वरांच्या पूर्वोत्तर रचनेत सर्वत्र दिसते. रामायणाला वनपर्वानंतर आरंभ केला असेल तर विराटपर्व तरी का लिहिले ? कोणताही कवी हातातली दीर्घ रचना अर्धवट सोडून दुसऱ्या नव्या दीर्घरचनेस उतारवयात आरंभ करील हे स्वाभाविक वाटत नाही.

---

९. बा. अ. भिडे, **मुक्तेश्वर**, आवृत्ती दुसरी, मुंबई, १९२६, पृ. २१.
के. ना. वाटवे, **प्राचीन मराठी पंडिती काव्य**, पुणे, १९६४, पृ. २०.
अ. ना. देशपांडे, **प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास**, भाग ४, पूर्वोक्त, पृ. ३२३ यांनी प्राचीन अध्ययनपद्धतीचे केलेले वर्णन पहावे.

१०. अ. ना. देशपांडे, **प्राचीन मराठी वाङमयांचा इतिहास**, भाग ४, पूर्वोक्त, पृ. ३३५.

११. भा. श्री. परांजपे, **रामदासांचे साहित्यशास्त्र**, नागपूर १९७३, पृ. ३५–३६.

म्हणून पूर्ण रामायण आधीचे, अपूर्ण भारत नंतरचे हेच खरे. परांजपे म्हणतात तसा, महाराष्ट्राच्या दुर्दशेचा उतारा रामायणात होता आणि महाभारतात नव्हता, हे खरे आहे काय? हा उतारा असलाच तर तो मुक्तेश्वरी रामायणापेक्षा मुक्तेश्वरी भारतात अधिक आहे, असे म्हटले पाहिजे.

(इ) मुक्तेश्वरांच्या प्रतिभेचे आवश्यक अंग म्हणून समजल्या जाणाऱ्या दांभिकांची चीड, देवता विडंबन, अश्लीलता यासारख्या आवडीनिवडींचा रामायणात अभाव आहे. हा बदल उतारवयाचा निदर्शक आहे, असे परांजपे (पृ. १५–१७) मानतात. अशी परिवर्तने मानण्यास आवश्यक असे काळाचे अंतर महाभारत-रामायण यांच्या रचना-काळात त्यांनी मानलेले नाही. मुक्तेश्वरांचे जुने विशेष लोपले असे म्हणण्या-ऐवजी रामायणात ते अविकसित अवस्थेत दिसतात, असे म्हणावे लागेल. सुभाषितात्मकता, कालविपर्यास, निसर्गरसिकता अशा आणखी काही विशेषांचा या संदर्भात पुढे विचार केला आहे. भारतोत्तर असल्याचे दाखविण्यासाठी रामायण हा मुक्तेश्वरांच्या परिणतप्रज्ञेचा विलास असल्याचे परांजपे (पृ. ५०–६७) भारत-सापेक्षतेने दाखवितात. ते न पटणारे आहे. मुक्तेश्वरी रामायण सापेक्षतेने साधारण असून महाभारत हा त्यांच्या प्रगल्भ प्रज्ञेचा उत्क्रांत आविष्कार आहे, हे रसिकमान्य आहे.

(ई) मुक्तेश्वरांनी सभापर्व (इ. स. १६३५), वनपर्व (इ. स. १६३६–३८) व नंतर विराटपर्व लिहिले. इ. स. १६४१–१६४३ मध्ये, म्हणजे वयाच्या ६८–७० या वर्षी त्यांनी रामायण लिहिले, असा परांजपे (पृ. ७) निष्कर्ष काढतात. तथापि राम-मंत्राची दीक्षा, नाथसदृश प्रेरणा, संस्कृत काव्यनाटकांचे अध्ययन, लेखनातील परा-वर्तित वृत्तिविशेष हे परांजपे यांनी दाखविलेले बदल ६५ ते ६८ या स्थिरवयात घडून आले, असा मानसशास्त्रविरोधी निष्कर्ष स्वीकारता येणारा नाही.

एतावता, संक्षेपरामायण ही महाभारतपूर्व रचना आहे. त्यातील रूपमुग्धा शैली कवीच्या तारुण्यकाळातील उमेदवारीची निदर्शक आहे.

### ६. संक्षेपरामायण : रचनाकाळाची निश्चिती

संक्षेपरामायण हे मुक्तेश्वरांचे पहिलेच काव्य असले तरी ते प्रौढ वयात लिहिले असावे, असे आजगावकर [१२] म्हणतात. तथापि मुक्तेश्वरांना उशिरा काव्यस्फूर्ती झाल्याची प्रसिद्धी नाही. तसेच नाथांच्या प्रेरणेने मुक्तेश्वरांनी काव्यलेखनाचे धडे गिरविले असा त्यांचा सूर आहे. तसे मानल्यास रामायणाचा रचनाकाळ मुक्तेश्वरांच्या पंचविशीच्या आसपास मानावा लागेल. त्याहून पुढे तो ताणता येणार नाही.

---

१२. ज. र. आजगावकर, **महाराष्ट्र-कविचरित्र** भाग –१, मुंबई १९०७, पृ. ४४–४५.

"हे रामायण कवीने भारतापूर्वी व आपल्या तारुण्यात काव्यनाटकादी ललित-वाङ्मयाचे संस्कार बुद्धीवर ताजे असताना लिहिलेले दिसते"[१३] असे म्हणून पांगारकरांनी हा काळ शके १५२५–३० (इ. स. १६०३–१६०८) असा दिला आहे. नाथमुक्तेश्वर सहवास व "कोण मुक्या हाती रामायण वदवी" हे मुक्तेश्वरांचे उद्‌गार पांगारकरांना ग्राह्य वाटतात. या गोष्टींचा एकत्रित विचार केला तर मुक्तेश्वरांनी रामायण नाथ असताना लिहिले असे मानावे लागते. तसे मानल्यास पांगारकरांनी सुचविलेला काळ नाथांच्या निर्याणकाळाइतका - म्हणजे शके १५२१ (इ.स. १५९९) पर्यन्त तरी मागे ओढावा लागतो. नेमक्या याच मुद्यांच्या आधारावर प्रा. पंगूंनी संक्षेपरामायण मुक्तेश्वरांनी वयाच्या पंचविसाव्या वर्षी म्हणजे शके १५२१ (इ. स. १५९९) मध्ये लिहिल्याचे[१४] सांगितले आहे.

यासंबंधातील विचार आणखी थोडा पुढे नेऊन त्यास नेमकेपणा देणे शक्य आहे.

**६.१ मुक्तेश्वरांचा जन्मशक :**

कोडितकर अळ्यांच्या दप्तरातील टिपणवही व सरंजामे जंत्री यांच्या आधारे भावे[१५] शके १५३१ (इ. स. १६०९) हा मुक्तेश्वरांचा जन्मशक मानतात. बा. अ. भिडे, दा. के. ओक, अ. का. प्रियोळकर त्यांचा पाठपुरावा करतात. तथापि मुक्तेश्वरांच्या जीवनाच्या संभाव्य आराखड्यात तो अडचणीचा ठरतो.[१६] मुक्तेश्वरांचा पणतू मुक्तेश्वरबुवा याने आपल्या प्रौढ वयात कोल्हापूरकर महाराजांकडून शके १६४९ (इ. स. १७२७) मध्ये तेरवाड गाव इनाम मिळविले, अशी सनद उपलब्ध आहे. रंगनाथस्वामी निगडीकर, जयराम यांच्या बहुशः कालानुक्रमे दिलेल्या संतमालिकेत मुक्तेश्वरांचा उल्लेख नाथकालीन संतांबरोबर करण्यात आलेला आहे. नाथांसारख्या दीर्घायुषी पुरुषाच्या पहिल्या कन्येचे मुक्तेश्वर पहिले अपत्य होते. मुक्तेश्वरांनी एकनाथांवर लिहिलेल्या पद-आरत्यात प्रत्यक्षानुभवाचा भाग असल्यासारखा वाटतो. फार्सीचा अव्हेर करणारी, संस्कृतचा स्वीकार करूनही मराठमोळे वळण टिकविणारी मुक्तेश्वरांची भाषाही नाथयुगाशीच आपले नाते जोडताना दिसते. मुक्तेश्वरांना उत्तरकालीन ठरविणारा माधवस्वामींशी कल्पिलेला त्यांचा अनुबंध[१७] आता

---

१३. ल. रा. पांगारकर, **कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन**, पुणे, १९२२, पृ १०५–१०६.

१४. द. सी. पंगू, **मुक्तेश्वरकृत महाभारत-विराटपर्व**, पुणे, पुनर्मुद्रण, १९६५, पृ. ३९

१५. वि. ल. भावे, **महाराष्ट्र-सारस्वत**, पूर्वोक्त, पृ. ३२८–३२९.

१६. संरा, उपोद्‌घात पृ. २२ व द. सी. पंगू, **विराटपर्व**, पूर्वोक्त, पृ. ५२–५३.

१७. दा. के. ओक, **मुक्तेश्वरकृत महाभारत विराटपर्व**, आवृत्ती दुसरी, मुंबई १९३९, पृ. १–२.

नवशोधनाने[१८] तुटला आहे. या सर्व मुद्यांचा विचार करता प्रा. पंगूंनी निश्चित केलेला शके १४९६ (इ. स. १५७४) हा मुक्तेश्वरांचा जन्मशक मानणे योग्य वाटते. ल. रा. पांगारकर, ज. र. आजगांवकर, पां. जि. सबनीस, पां. ना. कुलकर्णी, अ. ना. देशपांडे, भा. श्री. परांजपे यांसारखे नवेजुने अभ्यासकही तो मानतात. ह्या जन्मकाळाने मुक्तेश्वरांच्या जीवनाची संगती योग्य प्रकारे लाविता येते.

**६.२ मुक्तेश्वर–एकनाथ संबंध :**

शके १४९६ (इ. स. १५७४) मुक्तेश्वरांचा जन्मशक ठरविल्यास एकनाथ-मुक्तेश्वरांचा सहवास पंचवीस वर्षांचा (इ. स. १५७४–१५९९) मानावा लागतो.

तसा तो मानला तर "कोण मुक्याहाती रामायण वदवी?"[१९] या मुक्तेश्वरवचनाने त्यांच्या रामायण रचनेचा एकनाथी प्रेरणेशी संबंध जोडता येईल. निबंधचंद्रिकाकार[२०] व भावे[२१] अद्‌भुतत्व व कालविपर्यास यांमुळे मुक्या मुक्तेश्वरांना वाचा फुटली व त्यांनी रामायण रचिले ही दंतकथा ठरवितात. यातील कालविपर्यासाचा मुद्दा वरील जन्मशकाने निरस्त होतो. त्यातील चमत्कार खरा असो वा खोटा, मुक्तेश्वर तो खरा मानतात, असे वरील चरणावरून दिसते. पण त्याचा संबंध मुक्तेश्वरापेक्षा गावबाकडे लावावा, असे श्री. भिडे[२२] म्हणतात. यातील "मुका" या शब्दाचा मोरोपंतांच्या सन्मणिमालेच्या (३३) आधारे "अजाण व अस्फुटवाक्" असा अर्थ घेता येईल, असेही ते दाखवितात. तसा तो घेतला तर वरील उद्‌गारातील अद्‌भुतता निरस्त होते. याशिवाय मुक्या हे मुक्तेश्वर या नावाचे घरगुती लाडिक रूप मानले[२३] तर ती पूर्णपणे नाहीशी होऊन पुनः मुक्तेश्वरी रामायणाच्या संदर्भातच वरील चरणांचा अर्थ लावावा लागेल.

असा अर्थ घेण्यास रामायणात नाथांचा नामनिर्देश नाही, या अभावात्मक पुराव्याधारे भिडे[२४] विरोध दर्शवितात. तथापि "भवनिधि जळपारा पाविजे एकनामे" (६।४७१), "मोदें कीजे गूढ भावार्थ–बोधें" (१।१५), "सुखा पावला भक्त भावार्थखाणी" (२।११८) हे नाथ व त्यांच्या भावार्थरामायणाचे अप्रत्यक्ष निर्देश पाहिले तर भिडयांनी

---

१८. म. रा. जोशी, **युगवाणी**, नोव्हेंबर-डिसेंबर १९७१.

१९. दा. के. ओक, **महाराष्ट्र कविवर्य मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये**, मुंबई, १९०६, पृ. २९१.

२०. **निबंधचंद्रिका**, अंक ४० ,पृ. ३–५.

२१. वि. ल. भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, पूर्वोक्त, पृ. ३२८.

२२. बा. अ. भिडे, **मुक्तेश्वर**, पूर्वोक्त, पृ. ८–९.

२३. वसंत जोशी, **कविवर्य मुक्तेश्वरकृत भावार्थरामायण उत्तरकांड**, पुणे, १९६३ पृ. ९

२४. बा. अ. भिडे, **मुक्तेश्वर**, पूर्वोक्त, पृ. १०.

मांडलेला अभावात्मक पुरावा नाकारावा लागतो. "चरित्र देखोनि मुक्तेश्वर बोलिले देवभक्ताचा विचार", "नाना रूपी चालक व्यापक तू एक म्हणुनी एका नामे पाचारिती लोक, " "नाठवे देहभान प्रेमें करिता कीर्तन", "मुक्तेश्वर तेथे धरियला प्रेमा" या मुक्तेश्वरांच्या नाथविषयक उद्‌गारांना प्रत्यक्षानुभवाचा सुगंध आहे. तेव्हा नाथ-मुक्तेश्वरांच्या सहवासात संक्षेपरामायणाची निर्मिती संभाव्य ठरण्यासारखी आहे.

मुक्तेश्वरांचे बालपण व प्रारंभिक अध्ययन "मातृजनक" नाथांच्या देखरेखीखाली घडले. भारतात नाथांना केलेली वंदने (मुभा १।१।७७, ३।१।४), एकनाथ-चरित्रातून तन्मयतेने गायिलेली नाथांची भक्तिकथा, आरत्या व पदरचना यातून नाथांविषयीचा आपला श्रद्धाभाव त्यांनी उत्कटतेने व्यक्तविला आहे.

मुक्तेश्वरांच्या या नाथप्रीतीने त्यांच्या मनात रामायण-प्रीती रुजविली असावी. बालपणापासून ते तारुण्याच्या ऐन उमेदीपर्यन्त मुक्तेश्वरांच्या मनावर नाथांनी गायिलेल्या गोड रामकथेचे संस्कार होत होते. "सर्वांसी असे तुळणा। परी उपमा नाही रामायणा" (हनुमंताख्यान, ओवी ६१) असा श्रद्धाभाव मुक्तेश्वरांच्या मनी प्रकटत होता. भावार्थरामायणातील गजेंद्रमोक्षाचे आख्यान त्यांनी आधीच आळविले होते. शतमुखरावणवधाख्यान लिहून शैलीचे विदग्ध वळण गिरविले होते. भावार्थरामायणाच्या निर्मितीच्या निमित्ताने घरात आलेल्या संस्कृत रामकथापर काव्य नाट्यांचे सहज अध्ययन त्यांना घडले असेल. आपल्या पहिल्या सलग ग्रंथरचने-साठी रामकथेची निवड त्यांना करावीशी वाटली ती यासाठीच. अजाणत्या वयापासून झालेले संस्कार जाणत्या वयात कृतिप्रवण होऊ पाहत होते. अभ्यासलेले संस्कृत काव्यादर्श, नाथप्रीती व रामायणप्रीती यांचे एकवट फल मुक्तेश्वरांच्या संक्षेपरामा-यणाच्या रूपाने आपल्याला लाभलेले आहे.

### ६.३ रचनाकाळाची मर्यादा :

काशी हे संक्षेपरामायणाचे रचनास्थळ व नाथनिर्याण ही मर्यादा मानून मुक्तेश्वरांचा काशीनिवासाचा काळ ठरवायचा तर तो ऐन तारुण्यातील विद्याध्ययनाचा काळ मानावा लागेल. नाथ, त्यांचे पुत्र हरिपंडित दोघेही काही काळ काशीत होते. त्यांचे काही वंशज काशीक्षेत्री पंडित म्हणून आजही प्रतिष्ठेने राहत आहेत. काशी आणि दक्षिण काशी असलेले पैठण या दोन्ही विद्याकेन्द्रातील दळणवळणाच्या माध्यमाने भावार्थरामायणाचे अध्याय जसजसे लिहून होत असतील तसतसे ते मुक्तेश्वरांना पोहोचत असतील. नाथांचे भागवत पूर्ण होण्याआधीच असे काशीला पोहोचले होते, हे प्रसिद्धच आहे. अशा तऱ्हेने काशीत राहूनही तरुण मुक्तेश्वराचे मन पैठणी आकारत असलेल्या भावार्थ रामायणाभोवती घोटाळत असले पाहिजे. त्यातून इ. स. १५९८ च्या आगेमागे त्यानी संक्षेपरामायणाच्या लेखनास आरंभ केला असावा. नाथांच्या रूपाने पैठणात निर्भय धर्मनिष्ठा नांदत होती. पैठण प्रतिष्ठेच्या संदर्भात

मुक्तश्वरांनी योजलेले "नामिकारित" (६।४७०) हे रीतिवर्तमानकालवाचक रूप या दृष्टीने सूचक आहे. "जिही सादरें शेवटा ग्रंथ नेला, मतीहीन तो आदरे थोर केला" (६।४६८) हा कृतज्ञ उल्लेख आणि "कोण मुक्याहातीं रामायण वदवी?" हा आरतीतील निर्देश यांच्या आधारे इ. स. १५९९ मध्ये नाथनिर्याणापूर्वी युद्धकांडा-पर्यन्तची रचना पूर्ण झाली होती असे म्हणता येईल.

युद्धकांडाला त्यांनी नंतर उत्तरकांडाची जोड दिली हे संक्षेपरामायणाच्या रचना-क्रमावरून स्पष्ट झालेच आहे. काशीतील अध्ययनसमाप्ती, महाराष्ट्री आगमन, प्रापंचिक व्याप, गुरूपदेश, भावार्थरामायणपरिपूर्ती प्रयत्नांचे निरीक्षण व विकसित वाङ्मयजाणीवा या सगळया गोष्टींसाठी दहा-अकरा वर्षांचा कालावधी मानला तर इ. स. १६०९–१० च्या आसपास उत्तरकांडलेखनाने संक्षेपरामायण रचनेचा दुसरा टप्पा पूर्ण झाला असे मानता येईल.

चोवीस ते पस्तीस या वयात मुक्तेश्वरांनी ही रामकथा गायिली. तारुण्यकाळातील लेखनाचे सारे गुणदोष त्यांच्या संक्षेपरामायणात प्रतिबिंबित झाले आहेत.

* * *

# ब ।। संक्षेपरामायण : घटना आणि परंपरा

## १. प्रास्ताविक

संक्षेपरामायणाची कथावस्तु "कल्पित" वा "उत्पाद्य" कथावस्तु नव्हे. ती "ख्यात" किंवा "अनुत्पाद्य" कथावस्तु आहे. माणसाच्या मनाला अपार्थिव प्रकाश देणाऱ्या रसोत्कट रामकथेने मुक्तेश्वरांना आकर्षित केले आहे. महाभारताप्रमाणे रामायणाच्या अनुसरणाची भाषा मात्र ते बोलत नाहीत. कोणत्याही ग्रंथाशी स्वतःला बांधून न घेण्याचा त्यांचा मनोदय त्यातून जाणवतो. रामकथेच्या संस्कृत-मराठी परंपरांतून आवश्यक ते शोषून आपली रामकथा घडविण्याचे कलावंताचे स्वातंत्र्य त्यांनी येथे घेतले आहे. मुक्तेश्वरी भारत जसे व्यासभारताबरोबर आपण वाचू शकतो तसे मुक्तेश्वरी रामायण आणखी कशाबरोबर वाचता येत नाही. संक्षेपरामायणाच्या स्वतंत्र रचनाबंधाची ही पहिली खूण आहे. उपलब्ध रामकथांतून हा स्वतंत्र रचनाबंध मुक्तेश्वरांनी कसा सिद्ध केला? त्यांच्या रामकथेने या परंपरेवर आपला असा काही ठसा उमटविला काय? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आधार ग्रंथांचा आणि संक्षेपरामायणाने प्रभावित झालेल्या ग्रंथांचा धांडोळा घ्यावयास हवा आणि सविस्तर तुलना करता आली नाही तरी त्यातील अधिक-उणें शोधावयास हवे. असा एक शोध येथे घ्यावयाचा आहे.

## २. संक्षेपरामायण आणि भावार्थरामायण

### २.१ भावार्थरामायण : परिचय व प्रभाव :

भावार्थरामायण[१] हा २९७ अध्यायात विभागलेल्या ४०,००० ओव्यांचा सप्तकांडात्मक ग्रंथ आहे. काशीच्या मनकर्णिकातीरावर आरंभिलेल्या या ग्रंथाच्या पंचवीससहस्र ओव्या लिहून (इ. स. १५९९) नाथ निजधामास गेले. त्यांच्या शिष्यांनी त्याच तोलामोलाने ग्रंथाची परिपूर्ती केली. वाल्मीकिरामायण 'यथार्थ' दाखविण्याचा या 'भावार्थ' रामायणाचा उद्देश नाही. त्यामुळे या रामपर भक्तिप्रधान कथाकोशात नाथकाळापर्यंतच्या रामकथेतील स्थित्यंतराचे प्रातिनिधिक रूप आढळते. ही बहुरंगी रामायणरचना स्वयंप्रज्ञेबरोबरच नाथांच्या व्यासंगाचीही साक्ष देणारी झाली आहे. "श्रीराम संचरोनि पोटी। दाटीवाटी लिहवीत" अशा तन्मयतेच्या तंद्रीत त्याचे लेखन झाले आहे. रामचरिताच्या सार्वकालिक आदर्शाची व्यापकता आणि समकालीन

---

१. श्रीसंतएकनाथमहाराजकृत श्रीभावार्थरामायण, न. वि. पणशीकर (संपा.) पुणे १९६८.

परिस्थितीतील त्याच्या अनुसरणाची निकड ध्यानी घेऊन, दाशरथी रामाच्या सगुण स्वरूपात प्रकटलेल्या निर्गुण परब्रह्माचे गायन व विवरण नाथांनी जाणीवपूर्वक केले. त्याद्वारे ज्ञान, कर्म व उपासना यांचा समतोल साधून धर्मजीवनाची अंगे परिपुष्ट केली 'प्रपंच-परमार्थी सावधान' करण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या भावार्थरामायणात 'समर्थ-युगाची चाहूल' लागते. सीतारामांची ही कथा जशी 'प्रापंचिक' तशी 'पारमार्थिक' आहे. तिच्यात समकालीन युगमानसाचे हुंकार प्रतिध्वनित झाले आहेत. भावार्थ-रामायण हे एकनाथांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचा आणि परिणतप्रज्ञेचा पूर्णाविष्कार करणारे महापुराण आहे. त्यांच्या विविध भूमिकांचे व काव्यविशेषांचे समन्वित रूप त्यात एकवटले आहे. भावार्थरामायणाच्या रचनेनंतर रामोपासनेला बहर आला आणि रामचरितविषयक काव्यपरंपरेला बळ लाभले. आर्षग्रंथांच्या मराठीकरणाला चालना देणारा आणि त्या परंपरेवर प्रभाव गाजविणारा असा हा ग्रंथ आहे. गावबा, मुक्तेश्वर (?), अनाम, कोनेरीसुत शेष या कवींनी भावार्थरामायणाची परिपूर्ती करून नाथांना भावांजलि वाहिली. भावार्थरामायणाच्या रूपाने प्रदीर्घ कथाकाव्याचा एक नवा रचनाबंध सिद्ध झाला होता. रामदासांचे दुकांडी रामायण, जनी जनार्दनांचे जानकीसैवर, विठ्ठल बीडकर-वेणाबाईची सीतास्वयंवरे, रंगनाथस्वामी निगडीकरांचा रामजन्म, अनंत मेथवडकरांचे कुशलवाख्यान, श्रीधरांचा रामविजय यावर भावार्थ-रामायणाचे कमीअधिक ठसे उमटलेले आहेत. मुक्तेश्वरांचे संक्षेपरामायणही त्याच्या प्रभावकक्षेतून सुटलेले नाही.

**२.२ संक्षेपरामायणावरील भावार्थरामायणाच्या प्रभावाचे स्वरूप :**

कांडांचे आद्यंत, एका कांडातील कथाभाग दुसऱ्या कांडात सांगणे, दूरतः संबद्ध असणाऱ्या आख्यानांचे वर्जन करणे, विस्तारशील वर्णने व तपशीलाचा भरगच्चपणा टाळणे, मूळातील विसंगती दूर करून मेळ घालणे इत्यादी प्रकारांनी नाथांनी वाल्मीकि-रामायणावर केलेले संस्करण मुक्तेश्वर स्वीकारतात.

रामकथेतील प्रसंगभाव मुक्तेश्वर भावार्थरामायणावर विसंबून रंगवितात. विशेषतः जेथे मतभेद होतो किंवा तपशिलाचा फेरफार आढळतो तेथे वाल्मीकि-रामायणाऐवजी ते भावार्थरामायणासच अनुसरताना दिसतात. वाल्मिकिरामायणा-प्रमाणे शत्रुघ्न हा सुमित्रेचा पुत्र (वारा १।१८।१४). नाथ तो कैकयीपुत्र असल्याचे सांगतात. (भारा १।७।१२२–१२४). मुक्तेश्वर संक्षेपरामायणात नाथांनुसारी (संरा १।५६) पण वनपर्वांतर्गत रामकथेत (मुभा ३।१५।५९) यथामूल वर्णितात. रामायणकाळी गडद असलेला मुक्तेश्वरांवरील नाथांचा प्रभाव पुढे भारत-काळी क्षीण झाला, असा याचा अर्थ आहे. अहल्येच्या वर्तनाविषयी मुळात (वारा (१।४८, ७।३०) शंकेला जागा आहे. अहल्या निर्दोष होती व ती शिलारूप असताना रामाने पदस्पर्शाने तिचा उद्धार केला असे मुक्तेश्वर नाथांना अनुसरून (भारा

१।१४ संरा १।७९–८७) सांगतात. मुळातील दशरथाऐवजी वसिष्ठांनी यज्ञ-पायसाचे विभाजन करणे, रामलक्ष्मणांनी विश्वामित्रासह मुळाप्रमाणे धनुर्मखासाठी न जाता सीतास्वयंवरासाठी जाणे, मायामृग नीलरंगी असण्याऐवजी सुवर्णकांतीचा असणे, त्याने केवळ लक्ष्मणालाच हाकारणे, मार्जाररूपाऐवजी मशकरूपाने हनुमंताने लंकाप्रवेश करणे, यासारखे किती तरी बारीकसारीक तपशील मुक्तेश्वरांनी वाल्मीकि-रामायणाविरुद्ध पण भावार्थरामायणानुसारी दिले आहेत.

भावार्थरामायणाने पुरविलेला तपशील मुक्तेश्वर कधी किंचित बदलतात. वल्कला-वृत सीतेची वस्त्रे कैकयी उचलते (भारा २।८।११५) असे नाथ वर्णितात तर सीतेने त्यागलेले वस्त्रालंकार कुब्जेने म्हणजे मंथरेने घेतले व कैकयीने सावरले (संरा २।४०) असा अधिकचा बारकावा मुक्तेश्वर देतात. भावार्थरामायणात परशुरामाची दिव्यशक्ती रामाच्या भात्यात प्रवेश करते (भारा १।२६।३४–३५) तर त्याचे बाण रामचरणावर पडतात (संरा १।११२) असे अद्‌भुतापेक्षा भक्तीशी सलगी करणारे निवेदन मुक्तेश्वर करतात. नाथांनी दिलेला तपशील मुक्तेश्वर कधी कांड बदलून वापरतात. रावणाने बिभीषणास लाथ मारल्याचा नवा तपशील नाथ सुंदर-कांडात तर मुक्तेश्वर युद्धकांडात देतात.

वाल्मीकिरामायणात नसलेला पण भावार्थरामायणात असलेला भाग मुक्तेश्वर आदरपूर्वक स्वीकारतात. उपलब्ध वाङ्मयपरंपरा, लोकमानसाचा कल आणि युग-धर्माचे स्फुरण यांचा आदर करून नाथांनी समकाळाशी संवाद साधणारे रामकथेचे स्पंदनशील रूप घडविले. मुक्तेश्वरांनी ते जपण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात राम-सीतेचा विवाह असताना नाथ-मुक्तेश्वरांनी सीता-स्वयंवराचा थाट उडवून दिला आहे. वाल्मीकिरामायणात सीता विवाहप्रसंगी रावण उपस्थित नाही. पण नाथांप्रमाणे मुक्तेश्वरांनीही त्यास उपस्थित ठेवले आहे (भारा १।१८ संरा १।९२). राम-रावण यांच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा कसच या प्रसंगात लागतो. त्यांच्या भावी संघर्षाचे बीज रुजते ते येथेच. हास्यरसाची खुलावट साधण्यासही येथे अवसर आहे. त्यामुळे नाथ, मुक्तेश्वर, जनी जनार्दन, गिरिधर, श्रीधर, नागेश, वेणाबाई, विठ्ठल, आनंदतनय, गोसावीनंदन यांनी रावणाची उपस्थिती व फजिती चवीने रंगविली आहे. तथापि त्यामुळे रामायणाच्या एकूण संविधानकावर होणारा परिणाम मात्र त्यांनी लक्षात घेतला नाही. गुहकाने रामचरणस्पर्शाने नौकेची स्त्री होण्याची व्यक्तविलेली भीती (भारा २।९।७३–७४ संरा २।५८) मराठी कवींची आवडती असून विनोदास अवसर देणारी ठरली आहे. घारीने पायस पळविणे, कौसल्यादी राण्यांचे डोहाळे, वसिष्ठांच्या अनुज्ञेने रामाने सीतेला वनात नेणे, यासारखे नवे तपशील मुक्तेश्वर नाथांनुसारी देतात. विकल्पप्रेषण, शांबवध, लक्ष्मणरेषा, तुकाई कथा, हनुमंत-राम पिडैक्याची कथा, हनुमंताचे सागरोल्लंघन व लंकेतील धुमाकूळ, औषधिआनयन, मुलोचनाख्यान अशा मूळ घटनाप्रसंगांना नवा रंग देणाऱ्या कथोपकथा नव्या तप-

शिलासह मुक्तेश्वरांनी भावार्थरामायणाला वाट पुसत सांगितल्या आहेत.

एकूणच मुक्तेश्वरांच्या कथनावर भावार्थरामायणाचा ठसा जाणवतो. वाल्मीकि-रामायणाची मूलकथा ते भावार्थरामायणाच्या वळणाने सांगतात. कथारंभ, यक्ष, पायसविभाजन, रामादी पुत्रांचे जन्म, ताटकावध, अहल्योद्धार, सीतास्वयंवर, राम-परशराम संघर्ष या बालकांडातील प्रसंगचित्रांवर भावार्थरामायणाची छाया आहे. अयोध्याकांडातील विकल्पप्रेषण, वनगमन, गुहकमेट, राम-भरतभेट वर्णनेही त्यापासून मुक्त नाहीत. शांबकथा, शूर्पणखाविडंबन, खरदूषणवध, सीताहरण या अरण्यकांडातील भागात मुक्तेश्वर वाल्मीकीपेक्षा नाथांवर अधिक विसंबतात. राम-हनुमंत भेट हनुमंताचे सागरोल्लंघन या किष्किंधाकांडातील भागावर भावार्थ-रामायणाची प्रभा पसरली आहे. सुंदरकांड भावार्थरामायणाने सर्वाधिक झाकाळलेले आहे. सेतुबंध, कुंभकर्ण-सुग्रीवाचे द्वंद्व, सर्पबंधन, इंद्रजितवध, सुलोचनाख्यान, हनुमंताचे औषधि-आनयन, रावणाचा अभिचारयज्ञ, वानरांनी केलेली मंदोदरीची विटंबना, रावणाला पुनश्च शिरे लाभणे हा युद्धकांडातील भाग भावार्थरामायणाच्या ढंगात मुक्तेश्वरांनी वर्णिला आहे. नाथांनी न लिहिलेल्या उत्तरकांडाचा प्रभाव मात्र जाणवत नाही.

अहिमहिआख्यानाचे भावार्थरामायणातील चार अध्याय (भारा ६।५१–५४) गहाळ झाल्याचे जयरामसुत सांगतो. मुक्तेश्वरांसमोरच्या भावार्थरामायणातही ते नसावेत, ही संक्षेपरामायणातील अहिमहिआख्यानाच्या अभावाची मीमांसा[२] स्वीकार्य आहे. जो भाग नाथांनी लिहिलेला नाही त्याचे मुक्तेश्वर अनुसरण करीत नाहीत असेही या संदर्भात म्हणता येईल. याचे एक प्रमाण म्हणजे उत्तरकांडात अशी साम्य-स्थळे कमी होत जातात, हे आहे.

नाथांनी गायिलेली विस्तृत रामकथा बहुवर्थसूचक पदबंधात गुंफून विदग्ध रसिकां-साठी मुक्तेश्वर संक्षेपात सांगत आहेत. तशी ती सांगताना कधी भावार्थरामायणाच्या संदर्भाचे भान सुटून त्यांचे कथन विस्कळीत होते. विश्वामित्राच्या मागणीवर दशरथाने व्यक्तविलेली चिंता (भारा १।८।३९–४४) मुक्तेश्वरांनी गाळल्याने 'राजा बोली बोधिला श्रीवसिष्ठें' (संरा १।६४) या भागाची आवश्यकता संपुष्टात येते. भावार्थ-रामायणातील रावण आपले मरण आंगठ्यात असल्याचे खोटेच सांगतो, हा भाग वगळल्याने मुक्तेश्वरांचा रावण 'कापट्यकर्मी' कसा ते लक्षात येत नाही. अशा ठिकाणी भावार्थरामायणाचा संबंधित भाग वाचून संक्षेपरामायणाचा बोध होतो. हाही भावार्थ-रामायणाच्या प्रभावाचा भाग म्हणावा लागेल. भावार्थरामायण अशाप्रकारे संक्षेपरामायणाचा आधारग्रंथ ठरतो. अशा परिस्थितीत "भारती आख्यानात मुक्ते-श्वरांनी ज्या प्रमाणात नाथांचे अनुसरण केले तेवढे मुक्तेश्वरी रामायणात केलेले दिसत

---

२. शैलजा करंदीकर, **वाल्मीकिरामायणाचे छंदोबद्ध मराठी अवतार**, पदवीप्रबंध (टंलि), मुंबई विद्यापीठ, मुंबई १९६० पृ. ३११.

नाही"[३] हे विधान स्वीकारणे कसे कठीण आहे, ते स्पष्ट व्हावे.

**२.३ भावार्थरामायणाच्या अनुसरणाचा वाङ्मयीन परिणाम :**

वाल्मीकिरामायणापेक्षा भावार्थरामायणावर अधिक विसंबल्याने संक्षेपरामायणाच्या वाङ्मयरूपावरही परिणाम झालेला आहे.

वाल्मीकिरामायणातील निसर्गरसिकता भावार्थरामायणात उतरलेली नाही. सर्वसंचारी अध्यात्माने त्यातील निसर्ग पुरेसा प्रत्ययोत्पादक होऊ शकलेला नाही. भावार्थरामायण समोर ठेवल्याने मुक्तेश्वरांची संवेदनशील निसर्गाभिरुचीही येथे पुरेशा प्रमाणात प्रकटली नाही. त्यांच्या भारतात वैपुल्याने आढळणारी निसर्गाची ऐंद्रिय संवेदनाचित्रे संक्षेपरामायणात विरलत्वाने आढळतात. संक्षेपरामायणाच्या प्रारंभकालीन रचनेची व भावार्थरामायणानुसरणाची ती एक खूण आहे.

भावार्थरामायणाच्या रूपाने नाथांनी प्रदीर्घ कथाकाव्याचा एक नवा रचनाबंध घडविला. त्यातील मूलकथेत अनेक प्रवाह मिसळलेले असतात. लौकिक व अलौकिक अशा दोन्ही पातळ्यांवर ती एकाच वेळी वावरत असते. कथेतील प्राचीनकाळाशी स्वकाळ जोडण्याचा त्यात प्रयत्न असतो. भक्तीला कथेत केंद्रवर्ती स्थान असते. लौकिक घटकांनाही रूपकांनी अध्यात्माचा रंग दिलेला असतो. उपदेश,तत्त्वचर्चा प्रसंगानुरोधाने येते. त्या जोडीला रंजनपर घटकही उपस्थित असतात. अलंकारांनी सजलेली वर्णने, अतिशयोक्ती, अद्‌भुतरम्यता, विनोद, लेखकाच्या बहुश्रुततेचे डोळे दिपविणारे दर्शन हे असे काही घटक होत. भावार्थ-रामायणाच्या रचनाबंधाचे हे विशेष मुक्तेश्वरी रामायणाप्रमाणे भारतातही उतरले आहेत. खरे तर मध्ययुगीन मराठी प्रदीर्घ काव्यबंध या रचनाबंधाने प्रभावित झालेले आहेत. मुक्तेश्वरांनी त्याला अधिक आकर्षक रूप दिले असले तरी त्याच्या प्रभावातून तेही सुटलेले नाहीत.

काही शब्द-कल्पनांची पुसट छाया, लोकव्युत्पत्ती देण्याची लकब यासारखे नाथांचे काही शैलीविशेषही मुक्तेश्वरी लेखनात आले आहेत.

**२.४ संक्षेपरामायण व भावार्थरामायण : काही भेद :**

वाल्मीकींनी आपली श्लोकबद्ध रचना सर्गबद्ध कांडात विभागली आहे. नाथांनी आपली ओवीबद्ध रचना अध्यायबद्ध कांडात विभागली आहे. मुक्तेश्वरांनी आपल्या वृत्तबद्ध रचनेकरिता केवळ कांड विभाजन स्वीकारले आहे.

उत्तरकांडातील रामकथासंबद्ध भाग नाथांनी पूर्वकांडात यथास्थानी—जसे, सीता जन्मकथा (बालकांड), वालीकृत रावणपराभव (किष्किंधाकांड)—समाविष्ट केला आहे. तसा मुक्तेश्वर करीत नाहीत.

---

३. संरा, उपोद्‌घात, पृ. ४५.

भावार्थरामायणाचे अध्यात्मनिरूपक रूप संक्षेपरामायणात तितक्या ठसठशीतपणे प्रकटलेले नाही. रामाची तीर्थयात्रा, त्याचे वैराग्यनिरूपण, जनक–शुक, वसिष्ठ-श्रीराम संवादातून उलगडलेले अध्यात्म हा नाथवर्णित भाग मुक्तेश्वरांनी वगळला आहे. तत्वनिरूपणापेक्षा भक्तीचा भावस्पर्श त्यांना अधिक भावतो असे दिसते.

रामकथा सांगताना गृहस्थाश्रमातील स्वानुभवाची जोड देऊन नाथांनी कुटुंब-नीतीचा आदर्श स्पष्ट केला आहे. परमार्थाप्रमाणे प्रपंचाच्या रंगाने रंगलेल्या या कथेत कौटुंबिक माधुर्याचा गोड आविष्कार होतो. हा कौटुंबिक गोडवा मुक्तेश्वरांच्या रामायणातच काय पण अन्य रचनेतही विशेषत्वाने आढळत नाही.

भूतकालीन परंपरेतून भविष्यकालीन प्रेरणा देण्याचे सामर्थ्य नाथांच्या भावार्थ-रामायणात आहे. समाजमनाशी स्पंदन पावण्याचे हे सामर्थ्य मुक्तेश्वरी भारतातही उत्कटत्वाने वसत आहे. तथापि संक्षेपरामायणात मात्र ते तितक्या तीव्रतेने प्रकटलेले नाही. भावार्थरामायणातील 'सामाजिक' येथे क्षीणपणे प्रकटले आहे.

भावार्थरामायण विस्तारप्रवृत्तीचे तर संक्षेपरामायण नावापासूनच संक्षेपवृत्ती दाखविणारे आहे. "रे रे वानर को भवान्" या हनूमन्नाटकातील (६ । २२) शार्दूलवि-क्रीडितातील चतुश्चरणी श्लोकाचे स्पष्टीकरण नाथ अकरा ओव्यातून (भारा ५ । ३२ । १११ – १२१) करतात. तत्सम शब्दांपेक्षा तद्भव शब्दांचा वापर, सामा-सिक पदे न वापरणे, ध्वन्यर्थ वाच्यार्थाच्या रूपात उलगडून दाखविणे, सुलभतेसाठी स्पष्टीकरण करणे आणि साध्याभोळ्या श्रोत्यांच्या आकलनक्षमतेचे सदैव भान ठेवणे यामुळे हा विस्तार झाला आहे. हाच श्लोक मुक्तेश्वर एकाच श्लोकात (संरा ५ । ८०) आणतात. तत्सम व सामासिक शब्द, वृत्तयोजना, शैलीचे पंडिती वळण व विदग्ध श्रोते समोर ठेवून केलेली रचना यामुळे मुक्तेश्वरी रचनेत सारगर्भता आली आहे. या दोन्ही ग्रंथांच्या वरवरच्या अवलोकनातून त्यांच्या निवेदनातील या पर-स्परविरुद्ध प्रवृत्ती स्पष्टत्वाने जाणवतात. त्यांची ग्रंथसंख्या या संदर्भात पुरेशी बोलकी आहे.

भावार्थरामायणाची प्रकृती महापुराणाच्या थाटाघाटाची आहे तर संक्षेपरामा-यणाची प्रकृती विदग्ध महाकाव्याची आहे.

संक्षेपरामायणावरील भावार्थरामायणाचा प्रभाव घनदाट आहे. तरीही संक्षेप-रामायण ही भावार्थरामायणाची निर्जीव नक्कल नव्हे, हे कटाक्षाने ध्यानी घ्यावयास हवे. नाथांची दृष्टी अध्यात्मनिष्ठ आहे तर मुक्तेश्वरांची दृष्टी अधिक काव्यनिष्ठ आहे. अद्भुत व अलौकिक यांचा स्वीकार करूनही रामकथेतील मानवी भावप्रसंगांची उत्कटता त्यांनी जपली आहे. या शिवाय भावार्थरामायणाबरोबरच अन्य ग्रंथांचा घेतलेला आधार, स्वकृत भर, वृत्तयोजनेचा स्वीकार, संक्षेपप्रवृत्तीचा आश्रय, सुबक मांडणी आणि शैलीचा पंडिती थाटघाट यामुळे मुक्तेश्वरांच्या संक्षेपरामायणाला त्याचे असे खास वैशिष्टय लाभले आहे.

एकनाथांचे संस्कार मुक्तेश्वरी कवितेच्या अंगावर फुटलेले नाहीत. ते तिच्या अंगांगांत मुरलेले आहेत.

### ३. संक्षेपरामायण आणि वाल्मीकिरामायण

वाल्मीकिरामायण[४] हा २४००० श्लोकांचा ग्रंथ पाचशे सर्गात व सप्तकांडात विभक्त आहे. मूलरूपावरील संस्करणातून सिद्ध झालेले हे रूप इ. स. पू. ५०० च्या आधीचे मानण्याकडे बहुंवंश अभ्यासकांचा[५] कल आहे. वाल्मीकींनी प्रथम पंचकांडात्मक राम-अयन म्हणजे रामाचा प्रवासच वर्णन केला व नंतरच्या काळात बाल-उत्तरकांड जोडून रामाच्या पूर्वोत्तर आयुष्याची जोड त्यास देण्यात आली. राम, हनुमंत व रावण या भिन्नप्रदेशस्थ, भिन्नवंशीय तीन नायकांच्या कथा एकत्र आणून रामायणाने आपल्या काळातील समग्र संस्कृतीचे प्रतीकात्मक दर्शन घडविले. असामान्य पात्रांतून आकारणारी रामायणाची कथावस्तु साहजिकच भव्योदात्त झाली आहे. त्यातील वस्तुनिष्ठ चित्रणामुळे या दिव्य-मानुष कथेला वास्तवतेचे परिमाणही लाभले आहे. उदात्त व्यक्तिरेखा, भव्योत्कट कथावस्तु, निवेदनातील वस्तुनिष्ठा, व्यापक सहानुभूती व भावमंथर सालंकृत शैली ही या आदिकाव्याची भूषणे आहेत. मानवी परस्परसंबंधांचे आदर्श चित्र रामायणात इतक्या भव्यत्वाने प्रकटले आहे की ती केवळ रघुकुळाची कथा न राहता साऱ्या मानवकुळाचीच कथा बनली आहे.

संक्षेपरामायणात मुक्तेश्वर वाल्मीकिरामायणाचे सोल्लेख अनुकरण करीत नाहीत. तरी त्यांच्या कथेचे मूलसूत्र तेच असल्याने वाल्मीकिराामायण संक्षेपरामायणाचा स्रोतग्रंथ ठरतो.

वाल्मीकिरामायणावर काही संस्करण ते करतात. वाल्मीकिरामायणाच्या सारकथनापेक्षा संपूर्ण वर्जनावर त्यांनी अधिक भर दिला आहे. मध्यवर्ती कथाप्रवाहाशी संबंधित नसणारी अशी आख्याने वगळून कथेला एकेरी पण केंद्रीय रूप देण्याचा प्रयत्न ते करतात. विश्वामित्रवंशकथा (वारा १। सर्ग ३२–३४, ५१–६४), गंगावतरण कथा (वारा १। सर्ग ३५–४४), समुद्रमंथनकथा (वारा १। सर्ग ४५–४७) यासारख्या नाथांनी वगळलेल्या कथा मुक्तेश्वरही गाळताना दिसतात.

वाल्मीकिरामायणातील विस्तारशील वर्णने, वेधक निसर्गचित्रे, तपशीलाचा बारकावा व भरगच्चपणा नाथांप्रमाणे मुक्तेश्वरही टाळताना दिसतात. ऋष्यशृंगाकडून अश्वमेधयज्ञ (वारा १। सर्ग १२ ते १४), विश्वामित्राने रामास दिलेली शस्त्रास्त्रें

---

४. महामुनी आदिकवी वाल्मीकिप्रणीत **रामायण**, (संपा.) श्री. दा. सातवळेकर, पारडी, १९६५—(वारा)

५. ए. मॅक्डोनल, **ए हिस्ट्री ऑफ संस्कृत लिटरेचर**, दुसरी आवृत्ती, दिल्ली, १९६१, पृ. ३००.

(वारा १। सर्ग २७–२८), अयोध्यावर्णन (वारा १। सर्ग ५–७) अशी वर्णने व तपशील ते गाळतात. संपातीची पूर्वकथा, बिभीषणाविषयीचा वानरवीरांचा विचार-विनिमय, सुग्रीव-रावण द्वंद्व असा पुष्कळच भाग त्यांनी वगळला आहे. मुळात अयोध्या-कांडात कैकयी, दशरथ, कौसल्या, लक्ष्मण, सीता यांच्याशी वनगमनापूर्वी रामाची झालेली संभाषणे संपूर्ण प्रसंगाला भावात्म व मूल्यात्म परिमाण देणारी आहेत. ही मर्मवेधी व हृदयस्पर्शी संभाषणे मुक्तेश्वरांच्या गतिशील निवेदनात वगळली गेली आहेत.

वाल्मीकिरामायणातील पुष्कळशा भागाचे मुक्तेश्वर सारकथन करतात. मुळा-तील भूगोलवर्णन गाळून दक्षिणेतर दिशांचे वानर अयशस्वी होऊन परतले एवढीच मुद्याची गोष्ट ते (संरा ४। ४७) सांगतात. नागपाशबंधन व गरुडास्त्रमुक्तता (वारा ६। सर्ग ४७–५०), द्रोणाचल औषधी शल्यनिरसन (वारा ६। सर्ग ७२–७३), मायासीतावध व लक्ष्मणइंद्रजित युद्ध (वारा ६। सर्ग ८०–९०) ही इंद्रजिताची तिन्ही युद्धे मुक्तेश्वर एकत्रच (संरा ६। २००–२४१) सांगतात.

वाल्मीकिरामायणातील काही ठिकाणी आढळणाऱ्या विसंगतीचा नाथांनी केलेला परिहार स्वीकारून मुक्तेश्वर तो भाग रंगवितात. सीताशोधासाठी वानरांना बोल-विण्याच्या प्रसंगात प्रक्षेपामुळे वाल्मीकिरामायणात विसंगती व पुनरुक्ती आढळते. नाथांनी त्यातील तपशीलाचा मेळ घालून तो सुसंगत व सविस्तर वर्णिला (भारा ४ अ ११–१२) आहे. मुक्तेश्वरांनी तो नाथांनुसारी पण संक्षिप्त (संरा ४। ६९–७८) वर्णिला. रावणाचा अभिचारयज्ञ, मंदोदरीची वानरकृत विटंबना, रावणाला पुन्हा शिरे लाभणे या युद्धकांडातील भागात फेरफार आढळतात. नाथांनी त्यातील वैचि-त्र्याचा परिहार करून, प्रसंगी स्वकृत भर घालून मेळ घातला व मुक्तेश्वरांनी तो अनुसरला.

बाल-अयोध्या-किष्किधा या कांडांची अखेर वाल्मीकीऐवजी नाथांना अनुसरून ते करतात. अरण्य-युद्ध-उत्तर या कांडांची अखेर तिघांचीही सारखीवारखी आहे. सुंदरकांडाची अखेर तिघांनीही वेगवेगळ्या प्रकारे केली आहे. एकूण, कांडांच्या आद्यंताबाबत मुक्तेश्वर वाल्मीकिरामायणापेक्षा भावार्थरामायणावर अधिक विसंबून राहतात.

श्रावणवध व कैकयीस वरप्राप्ती या कथा वाल्मीकी अयोध्याकांडात दशरथमुखाने सांगतात. मुक्तेश्वर नाथांना अनुसरून त्या बालकांडात सांगतात. यात कालक्रमाच्या अनुलोमपद्धतीस दिलेले प्राधान्य लक्षात येते. वानरांनी लंका वेढल्यावर रावणाने हल्ल्याचा दिलेला आदेश (वारा ६।४२। ३३ संरा ६। ८८–८९) वाल्मीकी निवेदनात्मक पद्धतीने तर मुक्तेश्वर संवादात्मक पद्धतीने मांडून त्यात प्रत्यक्षता आणण्याचा प्रयत्न करतात. असे काव्यप्रयुक्तीतील ( literary device ) बदल त्यांच्या रामायणात विरळ असून भारतात मात्र वैपुल्याने दिसतात. रामायणाच्या

भारतपूर्व रचनेचा हाही एक पुरावा आहे.

तपशीलाच्या बाबतीत बहुधा भावार्थरामायणावर विसंबणारे मुक्तेश्वर कधी त्याविरुद्ध वाल्मीकिरामायणाला अनुसरताना दिसतात. श्रावणाने पाण्यासाठी जाताना मातापित्यांना वृक्षातळी ठेवले 'हे तंव समूळ अबद्ध कथा। तो मातापिता न विसंबे' (भारा १।१।५७) असे नाथ ठासून सांगतात. पण मातापित्यांना आश्रमात ठेवून श्रावण एकटाच जलस्थलाकडे आल्याचे मुक्तेश्वर वाल्मीकीनुसार (वारा २।६३। ४४–४५ संरा १। २०) सांगतात. भावार्थरामायणाला सोडून वाल्मीकिरामायणाला अनुसरल्याची अशी स्थळे अत्यल्प आहेत.

अनेक ठिकाणी संक्षेपरामायण वाल्मीकिरामायणापेक्षा भिन्न तपशील देते. श्रावण-वधप्रसंगी गजभास होऊन दशरथ बाण सोडतो, असे मुळात असताना 'मृगभासशंके' (संरा १। २०) अशा उल्लेखाने मुक्तेश्वर अधिक स्वाभाविकता आणतात. मुळात रामाने वालीवधाचे केलेले समर्थन बचावात्मक व अपुरे आहे. हे जाणून की काय अटळ प्राप्तव्याच्या भूमिकेतून अवघ्या एका ओळीत (संरा ४। ६२) मुक्तेश्वरांनी ते आटोपते घेतले आहे. येथे प्रसंगाच्या आकलनातील फरक महत्वाचा आहे.

मरुत्तऐवजी मारुती, अनरण्य ऐवजी शंतनू (संरा ७। ८१) अशा नामांतरातील फरकांचे मूळ मुक्तेश्वरांसमोर असलेल्या रामायणसंहितेच्या स्वरूपात असावे. या संदर्भात मुक्तेश्वरांसमोर वाल्मीकिरामायणाची उत्तरीय आवृत्ती असावी, हा शैलजा करंदीकरांचा तर्क योग्य वाटतो.

रामायणातील काही वेचक सौंदर्यस्थळे मुक्तेश्वरांनी टिपली आहेत. सीतादिव्याचा करुणोत्कट भाग (वारा ७।९७।१५–१७ संरा ७।५६४–५६६) पुनरुक्त पद-बंधाची गोडी कायम ठेवून त्यांनी वर्णिला आहे. वनगमनानंतरचा अयोध्येतील वृत्तांत अरण्यकांडातील वनप्रवास, युद्धकांडातील सागरसूचना यासारख्या ठिकाणी मुक्तेश्वराचे कथन प्रायः वाल्मीकिरामायणाशी जुळणारे आहे. उत्तरकांडात हे प्रमाण वाढते.

भौगोलिक दंतकथा, नामव्युत्पत्ती, नवलकथा, शस्त्रास्त्रादि वस्तूंचे अद्‌भुत महिमान, अवतारकथा, भक्तिमहिमा, भविष्यकथन, स्पष्टीकरण, समर्थन व कलात्मक संस्करण असा वाल्मीकिरामायणात नसलेला पुष्कळसा अधिकचा भाग संक्षेपरामायणात आढळतो.

या सर्वांचा विचार करता वाल्मीकिरामायण संक्षेपरामायणाचा आधारग्रंथ ठरत नाही, केवळ स्रोतग्रंथ ठरतो.

### ४. संक्षेपरामायण आणि अध्यात्मरामायण

अध्यात्मरामायण[६] या सप्तकांडात्मक ग्रंथाचे ६५ सर्ग व ४३९९ श्लोक आहेत.

---

६. **सार्थ श्री अध्यात्मरामायण,** (प्रका.) के. भि. ढवळे, प्रथमावृत्ती, मुंबई, १९२८. (अरा)

हे सांप्रदायिक रामायण रामकथेचे आध्यात्मिक मर्म उलगडण्यात रमल्याने भक्तीच्या भावधारेत भिजून चिंब झाले आहे. नाथांप्रमाणे मुक्तेश्वरांनी कथेच्या खुलावटीसाठी त्याचा वापर केला आहे. भरत-शत्रुघ्न शंखचक्रावतारी होते (अरा १ । ४ । १८ संरा १ । ५६), मायासीता (अरा ३/७ । २–३ संरा ६ । ४३२), कैकयीने रथाचा अक्ष हाताने सावरला (अरा २ । २ । ६९ संरा १ । २७), असे भक्ती आणि अद्‌भुताला उठाव देणारे त्यातील तपशील वेचण्याकडे मुक्तेश्वरांचे विशेष लक्ष आहे धुळीत उमटलेल्या रामचरणाच्या खुणा पाहून भरत गडबडा लोळतो (अरा २ । ९। २८ संरा २ । १०९), अशा कल्पना स्वीकारताना मुक्तेश्वर त्यातील भावच्छटा पुष्ट करून त्यांना कथासूत्राशी बांधतात. अध्यात्मरामायणातील शब्दबंध, कल्पना व दृष्टां तादी अलंकारांनी मुक्तेश्वरी शैली संस्कारित झाली आहे. अवतारवाद, दैवीसूत्र यामुळे होणारी पूर्वनियोजनाची जाणीव हा अध्यात्मरामायणाचा संक्षेपरामायणावरील सर्वाधिक महत्त्वाचा पण अप्रत्यक्ष असा परिणाम आहे. संक्षेपरामायणाच्या जडण घडणीत अध्यात्मरामायणाचा वाटा असा दुर्लक्षिता न येणारा आहे.

### ५. संक्षेपरामायण आणि आनंदरामायण

आनंदरामायण ९ कांडे, १०९ सर्ग व १२,२५२ श्लोकांचे आहे. संवादात्मक मांडणीची ही रामकथा वाल्मीकिरामायणापेक्षा पुष्कळच वेगळी असून अध्यात्मरामायणा प्रभावित झालेली आहे. भविष्यकल्पनेच्या अतिरेकाने येथे अद्‌भुतता व विसंगत आली आहे. वेदांतनिरूपण, मंत्रतंत्रोक्त उपासना व सर्वपरिचित रामरक्षास्तोत्र यांमुळे ते काहीसे महत्त्वाचे ठरते. स्फुटकाव्यासाठी आनंदरामायणाचा आधार घेणाऱ्या मुक्तेश्वरांनी त्यातील काही तपशील संक्षेपरामायणासाठीही वापरला आहे. सीतेच्या "पडत्या फळाच्या" आज्ञेचा फायदा घेऊन हनुमंताने केलेला अशोकवनविध्वंस (आरा सारकांड ९।१२२–१२३ सैरा ५।४३–४९), सीतास्वयंवरप्रसंगी रावणाची उपस्थिती (आरा, सारकांड ३।६९–७९, भारा १।अ. १८, संरा १।९२), सेतुबंधसमयी रा लिहिताच शिळा तरल्या (आरा, सारकांड । सर्ग १०, भारा ५। अ–४०, संरा ६।३९), सुलोचनाख्यान (आरा, सारकांड ११।१६५–२१६ भारा ६। अ. ४१, संरा ६।२४२ २५४), यासारखा पुष्कळच वैचित्र्यपूर्ण तपशील मुक्तेश्वर आनंदरामायणातू उचलतात.

### ६. संक्षेपरामायण आणि महाभारतातील रामोपाख्यान

महाभारतातील सर्वाधिक विस्तृत रामकथा वनपर्वातील "रामोपाख्याना"त ७० श्लोकात आलेली असून तपशीलदृष्टचा महत्त्वाची आहे. वालीसुग्रीव युद्ध एकदम होणे, ब्रह्मदेवाने कुबेराला लंका देणे असे थोडे तपशील मुक्तेश्वरांनी वाल्मीकिरामायण विरुद्ध पण रामोपाख्यानानुसारी दिले आहेत. रामोपाख्यानात नसलेला भाग मुक्तेश्व

वर्णितात, त्यात असलेला भाग गाळतात, तपशीलाची मतमतांतरे दुर्लक्षितात आणि त्यातील कलात्मक निवेदनपरीही लक्षात घेत नाहीत. भारती रामोपाख्यानाचा संक्षेपरामायणावरील ठसा पुसट आहे, हाही त्याच्या भारतपूर्व रचनेचा अभावात्मक पुरावा आहे.

### ७. संक्षेपरामायण आणि जैमिनी अश्वमेध

जैमिनी अश्वमेधाचा मुख्य विषय युधिष्ठिराच्या अश्वमेधाचे वर्णन करण्याचा आहे. पण अर्जुन-बभ्रुवाहन या पितापुत्रांच्या युद्धाच्या संदर्भात रामायणातील कुशलवोपाख्यान (अ. २५ व २६) येथे सांगण्यात आले आहे. कुशलवोपाख्यानाच्या समारोपात "असे हे कथा भारती जैमिनीच्या" (संरा ७/५२८) असा निर्देश मुक्तेश्वरांनी केला आहे. पण सीतात्यागाचा भाग त्यांनी वाल्मीकीनुसार रंगविला. अशोकवनातील सीता-रामांचा संचार हे मुक्तेश्वरी प्रतिभेने निर्मिलेले एक हृद्य व काव्यात्म स्थळ आहे. जैमिनीचा राम कुशबाणांनी मूर्च्छित होतो तर मुक्तेश्वरांचा राम कुशाच्या वाक्ताडनाने मूक होतो. जैमिनीच्या कथासूत्राची खुलावट स्वतंत्र कल्पनाशक्तीने व बदलत्या तपशीलाने त्यांनी साधली आहे. तरीही मुक्तेश्वरांनी स्वीकारलेल्या वाल्मीकि-रामायणाच्या कथाचौकटीत या भागाच्या समावेशामुळे कथासूत्राची ओढाताण, पुनरुक्ती व तर्कविसंगती आली आहे. कुशलवोपाख्यानाच्या कथासूत्रापुरताच जैमिनी अश्वमेधाचा परिणाम दिसतो.

### ८. नानानाटकभावपद्यरचना

संस्कृत रामायणाप्रमाणे रामकथापर संस्कृत नाटकांचीही स्पष्टास्पष्ट छाया संक्षेप-रामायणावर पडली आहे. बा. अ. भिडे, के. ना. वाटवे आणि विशेषत: भा. श्री. परांजपे यांनी ती शोधपूर्वक दाखविली आहे. रामाबरोबर लक्ष्मणाला वनात पाठवावे असे मंथरा सुचविते (अनर्घ. ४।६६ संरा २।२०), यासारखे काही तपशील मुक्तेश्वर मुरारिकृत अनर्घराघवातून वेचतात. दशरथालाही रामाचे दंडकारण्यगमन अभिप्रेत होते (संरा २।६४), यावर अनर्घराघवाप्रमाणे भवभूतीच्या महावीरचरिताची छाप आहे. जयदेवाच्या प्रसन्नराघवातील काही श्लोकांचा अनुवाद (प्ररा १।२५ संरा १।११४ हनु. १।४०, प्ररा ५।१८ संरा २।८३ हनु. ३।८, प्ररा ६।१ संरा ३।१०१ हनु. ५।१८, प्ररा ५।२४ संरा ३।५) त्यांनी केला आहे. पण त्यापैकी काही हनुमन्नाटकात आढळत असल्याने नेमका आधार निश्चित करता येत नाही. प्रसन्नाराघवातील नाटचपूर्ण संवादांची धाटणीही त्यांनी गिरविलेली दिसते.


हनुमन्नाटकाचा प्रभाव अधिक गडद आहे. हनुमंताच्या नावामुळे आलेली अद्भुत, रम्य पावनता, संकलनामुळे एकवटलेले संस्कृत काव्यनाटकातील वेचक सौंदर्य. रामकथेचा कोणताही भाग लिहिताना उपयोगी पडावे असे स्वरूप आणि लोकप्रियते-

मुळे मिळालेली समाजमान्यता यांमुळे एकनाथ, विठ्ठल, श्रीधर, मोरोपंत यांनी निर्देशासह तर वामनपंडित, नागेश, निरंजनमाधव यांनी स्पष्टोल्लेख न करता हनुमन्नाटकाचा उपयोग करून घेतला आहे. मुक्तेश्वरांनी येथे जरी त्याचा उल्लेख केला नसला तरी शतमुखरावणवधात (ओवी १३३) मात्र केला आहे.

मुक्तेश्वरांनी हनुमन्नाटकातील ३४–३५ श्लोकांचा अनुवाद केल्याचे भिडे, वाटवे व परांजपे साधार दर्शवितात. सीतास्वयंवर, परशुरामगर्वहरण, वनप्रवेश, हनुमंत-रावण संवाद, अंगदशिष्टाई, मंदोदरी-रावण व राम-रावण संभाषणे अशी ही बहुशः खटकेबाज संवादस्थले व मोजकी शृंगारस्थले आहेत. त्यातील उत्तरप्रत्युत्तरांची चमत्कृती आवेशासह जपण्याची धडपड मुक्तेश्वर करतात. वृत्तयोजना, संस्कृतप्राचुर्य व समासघटित पदावली यामुळे संस्कृतसरस्वतीचा डौल त्यांनी संभाळला आहे. तथापि कधी मुळातील संकुल अर्थच्छटा त्यांच्या हातून निसटतात. लक्ष्मणरेषा (हनु. ४।२७ संरा ३।६१), हनुमंताला पाहून सीतेने भूषणे खाली टाकणे (हनु. ४।१५ संरा ३।८२), हनुमंत औषधिपर्वत घेऊन येताना सूर्योदयाचा भास होणे (हनु. अंक, १३, संरा ६। ३२५) या तपशीलानांही हनुमन्नाटकाचा आधार आहे. रामचरित्र द्वादशराशिन्यासात (संरा ६।४७३–४७६) मांडण्यातील चमत्कृतीचा उगम हनुमन्नाटकात भिन्न संदर्भात आलेल्या श्लोकात (हनु. ११।१०) पां. ना. कुलकर्णी शोधतात. अनुवाद, तपशीलाची उचल, भाषेची प्रासमय लयबद्धता, संवादांची खटकेबाज मोडणी आणि चमत्कृतीची नवी वळणे यांबाबत संक्षेपरामायण हनुमन्नाटकाने संस्कारित झाल्याचे दिसते.

संस्कृत काव्यांची पुसट छाया संक्षेपरामायणावर आहे. ताटकावर्णनातील (१।६९) "प्रेतवस्त्रांग", "कुंडलाकार" हे शब्द "प्रेतचीवरवसा", "चलकपालकुंडला" (रघुवंश ११।१५–१६) या कालिदासीय शब्दबंधांचे स्मरण देतात. रामराज्याच्या चमत्कृतिपूर्ण वर्णनावर (संरा ६।४५६–४६०) बाणभट्टाच्या कादंबरीतील वर्णनांची छाप आहे. सीताविरहाने शोकाकुल झालेल्या रामाच्या चित्रणावर (३।९६–१०६) "विक्रमोर्वशीया" तील पुरूरव्याची छाया भासमान होते. याशिवाय भर्तृहरीची "शतके", कालिदासाचे "कुमारसंभव", जगन्नाथाचे "भामिनीविलास" यांच्या काही श्लोकांची भाषांतरे मुक्तेश्वरांनी केल्याचे भावे सांगतात.

एकूण आपल्या "पोथ्या-पुस्तकांवर नुसत्या अक्षता न टाकता" मुक्तेश्वरांनी त्यांचा मनःपूर्वक अभ्यास केला व पद्धतशीर उपयोग केला, असे दिसते. काव्यनाट्यांचा तपशीलापेक्षा कल्पनाप्रचुर लेखनासाठी त्यांनी अधिक उपयोग केला. त्यांच्या व्यासंगाबरोबर वैदग्ध्याची ओढही त्यातून प्रकटते. संक्षेपरामायणाच्या रूपाने जे विदग्ध वळण मुक्तेश्वर गिरवू पाहत होते त्याचा एक वळसा संस्कृत काव्यनाट्यांच्या या प्रतिबिंबात आहे.



### ९. संक्षेपरामायणातील नवता

रामकथेची संस्कृत-मराठी परंपरा आत्मसात करताना मुक्तेश्वर तिला स्वकृत नवतेची जोडही देतात.

भक्तीच्या वाटेने काही नवी भर मुक्तेश्वर रामकथेत टाकतात. त्यांचा हनुमंत सुग्रीवाबरोबर न राहता रामाबरोबर पुवर्षण पर्वतावर राहतो (४।६४). त्यातून त्याची भक्तभूमिका दाखविण्याचा प्रयत्न आहे. 'रा' व 'म' जोडल्यावर सेतू सिद्ध झाल्याचे (६।३९) ते भक्तिभावानेच सांगतात. सर्वत्र रामदर्शन घडवून रावणाला पळवून लावण्याची बहारदार कल्पना (६।२७५–२८२) या भक्तिप्रेमापोटीच त्यांना सुचली आहे. मंथरेच्या गळ्यातील रत्नहाराच्या स्पर्शाने कैकयी मत्सराने प्रेरित होणे (२।११–१२,१८) वा इंद्रजित पुन्हा सांधणे (६।२३२) अशी अद्‌भुताकडे झुकणारी भर ते रामकथेत घालतात. भविष्यवाणीचा वापर करण्याची त्यांची लकब नव्या घटितांना जन्म देणारी ठरली आहे. प्रसंगचित्रांची समृद्धी वाढविण्यासाठी अधिक तपशील वा नव्या घटनांची ते जोड देताना दिसतात. रावणाच्या मायास्त्रक्षेपणाचा प्रसंग हा असा नवा आहे. रामाच्या अभिषेकासाठी शौनकादी ऋषी व इंद्रादी देव पाचारून त्या प्रसंगाचे महिमान त्यांनी ठसविले आहे. श्रावण मातापित्यांना काशीयात्रेसाठी नेत होता (१।१९), असे सांगून श्रावणाच्या पुत्रधर्माला त्यांनी धर्मनिष्ठेची जोड दिली आहे. कैकयीचा मानभावीपणा (२।३०–३१), भूषणत्यागातील सीतेची दूरदर्शिता (३।८२) किंवा राम–भरत प्रेम पाहून सुग्रीव-बिभीषणांचे लाजणे (६।४४९) यांतून रामायणी पात्रांना त्यांनी नव्या स्वभावच्छटा दिल्या आहेत. पण अशा नवतेची नोंद अन्यत्र करणे अधिक योग्य ठरेल. येथे फक्त संक्षेपरामायणाच्या घडणीच्या संदर्भात कथासूत्रातील नवता तेवढी लक्षात घेतली आहे.

परंपरेचे बळ शोधून मुक्तेश्वरांनी घडविलेला संक्षेपरामायणाचा नवीन रूपबंध मराठी रामकथेत कितपत रुजला ते मराठी रामकथेच्या संदर्भात पाहिले पाहिजे.

### १०. संक्षपरामायण आणि मराठी रामकथा

सहस्रावधी वर्षे भारतवर्षाचे हृदय रामायणाच्या अनुष्टुभ छंदात स्पंदन पावत आहे. परंपरेच्या गाभ्यातून स्रवणाऱ्या या श्रेयस्स्रोताला मराठी कलावंतांनी पुनः पुनः स्पर्श केला आहे. रामकथेची प्रेरकता व कवींची भक्तिप्रधान दृष्टी यांमुळे संस्कृतातील संस्कारित व अनेकरूपी रामकथा आध्यात्मिक, सामाजिक व कलात्मक परिमाण घेऊन मराठीत अवतरली. धर्ममान्य आर्षकाव्यांच्या मराठीकरणाची ही परंपरा आहे. मूलाचे स्थूलसूत्र संभाळून समावेशक व लवचिक रचनाबंध स्वीकारण्याची प्रवृत्ती तीत आधिक्याने आढळते. कविवृत्ती आणि युगधर्म यांनी तिला आपले रंग दिले आहेत. या कवींची भूमिका परपुष्ट भाषांतरकाराची नसून पारंपरिक कथावस्तूला काल आणि कला यांनी संस्कारित करणाऱ्या पुनर्निर्माणिक लेखकाची आहे. पुराणकथेच्या विकसनाची

एक उत्क्रांत अवस्था त्यातून प्रतीत होते.

ज्ञानदेवांनी रामावताराचे मर्म नेमकेपणे सांगितले असले, सालकवीच्या नावावर रामायणाचा उल्लेख आढळत असला आणि नामदेवांनी रामकथेचे अंश स्फुट आख्यानातून तन्मयतेने आळविले असले तरी समग्र रामकथा महापुराणाच्या थाटाघाटात अवतरली ती एकनाथांच्या भावार्थ-रामायणातून. पौरणिक कथाकाव्याचा रचनाबंध निर्मिणारा, उत्तरकालीनांना प्रभावित करणारा असा नाथांच्या प्रज्ञेचा तो पूर्णाविष्कार आहे. नाथांनी वाल्मीकिरामायणावर केलेले संस्करण, रामकथांचे संकलन आणि भक्तिकेन्द्रित रचनाबंध मुक्तेश्वर स्वीकारतात. तथापि सुबक मांडणी, काव्यनिष्ठ कथन, पंडिती शैलीचा थाट यांमुळे संक्षेपप्रवृत्त मुक्तेश्वरी रामायण पृथगात्म झाले आहे.

समर्थ रामदासांनी जणू उपासनेचा भाग म्हणून पूर्ववयात रचलेले "लघुरामायण"[७] म्हणजे प्रमाणिका छंदातील १२५ श्लोकांचे केवळ युद्धकांड आहे. नादानुकरणात्मक शब्दांनी भरलेली युद्धवर्णने, संकुलयुद्धाची धाटणी व देवांची दयनीय दशा (लरा ११–१८, भारा ६।५५–६४, संरा ६।६८–७१) यावर नाथमुक्तेश्वरांची छाप जाणवते. रामदासांचे "दुकांडी रामायण" म्हणजे सुंदर व युद्ध या दोन कांडांवरील भुजंगप्रयाताचे १४६३ श्लोक आहेत. राजकारण, समाजकारण आणि अध्यात्माधिष्ठित प्रयत्नवाद यांची सप्रचीत शिकवण रामदास या रामकथेच्या रूपाने देत आहेत. वीर-करुणाचे कल्लोळ उसळीत त्यांची धावती निवेदनशैली रामकथेचा पट उलगडीत पुढे जाते. सीतेची "पडत्या फळाची" आज्ञा लक्षात घेऊन हनुमंताने केलेला अशोकवनविध्वंस, सेतुपार जाताना कडेचा वानर पडला तर त्याने उडणे, सुलोचनाख्यान, द्रोणागिरी आणताना हनुमंताने केलेला काळनेमीचा वध व भरतभेट, रावणाचा यज्ञ, मंदोदरीची विटंबना, रावणवध अशा तपशीलात हे दुकांडी रामायण नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहे. मुक्तेश्वरांप्रमाणे रामदासही युद्धवर्णनासाठी भुजंगप्रयाताचा वापर करतात. मुक्तेश्वरी रामायणातील शब्द–कल्पना रामदासांच्या इतरही वाङ्मयात सापडतात.

१) मुखीं शब्द एकू, करीं बाण एकू। जगीं पत्नि एकू, व्रतें काम एकू।
प्रतापी महीमंडळी राम एकू। म्हणे सोडिजे ना कधी नेम एकू॥ - संरा २।११६
भजाया जनीं पाहतां राम एकू। करीं बाण एकू मुखीं शब्द एकू।
क्रिया पाहता उद्धरी सर्व लोकू। धरा जानकीनायकाचा विवेकू॥
मनाचे श्लोक-१३१

२) ते कौत्सल्या कामधर्मी निशल्या, ब्रह्मानंदे दैव साफल्यवल्या। –संरा १।५४

---

७. **श्रीरामदासाचे समग्र ग्रंथ**, चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२ पृ. ७१९–७२७.

८. तत्रैव, पृ. ३५४–४४२.

साफल्या निजवल्या कौत्सल्यामाता – रामदासकृत रामाची आरती.

३) कौत्सलेचा राम कैवल्यदानी – संरा १।५६

राम कैवल्याचा दानी – रामदास

अशी काही साम्यस्थळे, तपशील आणि "लवथव" सारखे शब्द पाहिले म्हणजे समर्थांनी मुक्तेश्वरी रामायण काळजीपूर्वक वाचले असल्याची साक्ष पटते.

गिरिधरस्वामी (अब्द - मंगल - छंद - संकेत - सुंदर अशी पाच रामायणे) व माधवस्वामी (ओवीबद्ध व श्लोकबद्ध) यांची रामायणे भक्तिप्रधान दृष्टीने केलेली शुष्क निवेदने वाटतात. त्यांतील वृत्तात्मकता व संक्षेपदृष्टी मुक्तेश्वरी रामायणाशी मिळतीजुळती आहे. रंगनाथस्वामी निगडीकरांच्या "रामजन्म" मधील श्लोकरचना व कथाभाग (३७ ते ६६) यावर संक्षेपरामायणाच्या बालकांडाची छाप आहे. अवचितसुत-काशींच्या श्लोकबद्ध द्रौपदीस्वयंवरात मुक्तेश्वरी काव्यशैलीचे अनुकरण[९] आहे. विठ्ठल बीडकरांच्या 'सीतास्वयंवरा'वरही संक्षेपरामायणाचा प्रभाव आहे.[१०]

श्रीधरांचे सप्तकांडात्मक रामविजय ४० अध्यायांत विभक्त असलेल्या ९१४७ ओव्यांचे आहे. कुटुंबवत्सल सश्रद्ध कथाप्रिय मनाशी संवाद साधल्याने त्याला लोकप्रियता लाभली आहे. रामसंबद्ध कथांचे आकर्षक संकलन, आनुषंगिक नीतिबोध, परिमित वेदांत, सरळ मांडणी, सुभाषितात्मकता, चतुरालाप, समर्पक सांसारिक दृष्टांत, संक्षेपचातुर्य, प्रासादिक वाणी ही श्रीधरांची बलस्थाने येथेही आहेत. "भानुदासकुल-भूषण" एकनाथ व "चातुर्यराजधानीचा कळस" असलेले मुक्तेश्वर यांना वंदन करून श्रीधरांनी त्यांचे ऋणही स्वीकारले आहे. कल्पना, विचार, वर्णनपद्धती, शब्दयोजना यावर नाथांची इतकी छाप आहे की भावार्थरामायणाचा नवावतार म्हणूनही राम-विजयाचे वर्णन करता येईल. भरत-शत्रुघ्न हे कैकयीचे पुत्र म्हणून सांगणे, सीतास्वयंवर प्रसंगी रावणाची फजिती, शांबवध, हनुमंताने प्रथम पडलंकेत जाणे, पुच्छदहनार्थ लंकावासियांचे कपडे जमा करणे, त्या प्रयत्नात सीता नग्न होण्याची वेळ येताच हनुमंताने पुच्छ आखडणे, गजेंद्रोद्धारण, कालनेमी कथा, हनुमंत-भरत भेट, सुलोचनाख्यान अशा किती तरी तपशीला बाबत श्रीधर नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहेत. मुक्तेश्वरांप्रमाणे श्रीधरांनीही श्रावणवधापासून कथारंभ केला आहे. दशरथास पाठविलेले पत्र व वसिष्ठकृत उलगडा (संरा-१।१०३–१०६ रावि ८।१५९–१६२) हा मुक्तेश्वरांच्या कूटशैलीचा नमुना श्रीधरांनी अनुसरला आहे.

मोरोपंतांचे पहिले समग्रक सप्तकांडात्मक रामायण १८४० आर्यांचे आहे. यात "गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि पाहता थोडी" आहे. यमकसाधना व मंत्रबंधन यांमुळे कथानिवेदनही सुकरतेने झालेले नाही. मंत्र, देव, स्तोत्र, ऋषी, राजे, तीर्थे

---

९. ज. र. आजगावकर, **महाराष्ट्र कविचरित्र**, पूर्वोक्त, पृ. २९३–२९४.

१०. पां. ना. कुलकर्णी, **संशोधन धारा**, पुणे, १९६७ पृ. ११–१४.

# क॥ संक्षेपरामायण : वाङ्मयीन पाहणी

## एक ॥ मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी

कवीची काव्यदृष्टी त्याच्या काव्याकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण उपलब्ध करून देते. "संसारसागरसमुत्तरणैकमंत्र" (१।३) म्हणूनच मुक्तेश्वर श्रीरामाकडे पाहतात. "श्राविल्याचे अधांतकु" (७।२७०) अशी ही रामकथा आत्मोद्धाराबरोबर (१।४–५) लोकोद्धार (६।४६६,४७२,७ । उप २) साधण्यासाठी त्यांनी सांगितली आहे. "विश्वंभरश्रीगुरुच्या प्रसादे" (७।उप ३) ती पूर्ण झाली. ज्ञानवृद्ध, नीरक्षीर-विवेकी अशा संतश्रोत्यांच्या संदोहाने ती शेवटास नेऊन गोड करून घेतली. (१।१४, १५, २।१२३, ३।१२२, ६।४६८, ४७०. ७।६०३ व उपसंहार). भवाला संक्षेप देणारे हे रामायण अतूट भजनपंथाने चालताना (६।४७०) स्फुरले. म्हणून येथे मुक्तेश्वर बोलत नसून भक्तीच बोलत आहे (७। उप ३), अशी त्यांची श्रद्धा आहे. भक्त मुक्तेश्वरांना जाणवणारे रामायणातील अध्यात्म त्यांच्या रचनेला भक्तिप्रधान स्वरूप देते.

कवी मुक्तेश्वरांना रामायणाची रमणीयता, गोडवा, गानमाधुर्य, आकर्षित करते. त्याच्या वेधवंती व महाकाव्यात्म रूपाची त्यांना जाणीव आहे. (६।४६५, ४७०. ७।३५६, ५४७,५४९,५५०.) "शतकोटी" ही रामायणाच्या विस्ताराची पारंपरिक समजूत ते श्रद्धापूर्वक स्वीकारतात आणि म्हणून वाल्मीकिरामायणात नसलेल्या नाना ठिकाणच्या कथा गोळा करून ते निःसंकोचपणे गुंफतात. रामायणाची गानमधुरता ते नादलुब्ध शब्दबंधांनी टिकवू पाहतात. त्याचा महाकाव्यात्म बाज संभाळू पाहतात.

कथा जशी "अधांतकु" (७।२७०) तशी "आल्हादकारिणी मातू" (७।२५३) असल्याचे ते सांगतात. त्यामुळे त्यांच्या रचनेत भक्ती आणि काव्य एकरस होतात. कविजनांना धातूमातू शिकविणारा त्यांचा गणेश नवरसमदधारी (१।६–७) आहे. त्यांची शारदा ज्ञानमंदाकिनीतीरवासी (१।११,१४) आहे. त्यांच्या वंदनातून ज्ञानशीलता आणि रसमयता, शब्द व त्याची चातुर्यपूर्ण गुंफण यातून लाभणाऱ्या शोकापहारी परतत्त्वाचा ते निर्देश करतात, वाचाकवित्व-रसिकत्व-परतत्त्वस्पर्श यांची सोपानपरंपरा मांडणाऱ्या ज्ञानदेवांशी त्यांचे नाते जुळते. त्यामुळे उदात्तविषयाची गंगा, अमोघवाणीची यमुना व परतत्त्वस्पर्शाची सरस्वती आपल्या काव्यप्रयागात एकवटल्याचे (१।१६) ते सांगतात.

छंदोमयता, पदलालित्य, आशयातील अभिनवता, गूढ उकलन दाखविणारा भावार्थ

आणि क्रीडावृत्तीने केलेले कथन हे आपल्या रचनेचे त्यांनीच सांगितलेले विशेष[१]. "श्रावि काने मनाचिया" (७।१६४)अशी वर्णनातील दृक्‌मयतेची त्यांना जाणीव आहे. "हेमपत्र सुरत्नेसीं अर्थतेसी सुमंडित" (७।४०५) असे म्हणून वाङमयाचे वैभव अर्थाने सुमंडित होण्यात – अर्थवत्तेत, अर्थपूर्णतेत – आहे, याचे ते सूचन करतात. "छंदी पदी वंदित प्रासबंदी" असे सुलोचनेच्या रामवंदनाचे वर्णन त्या डौलातच (६।२४६–२५१)ते करतात. त्यावरून "छंदोयुक्त, प्रासबद्ध पदांनी केलेले भक्तिवर्णन" हे रामायण रचनाकाळी मुक्तेश्वरांना अभिमत असलेले काव्यलक्षण निष्पन्न होते. भक्तिभावशील, क्रीडालाघवी, उपदेशगर्भ आणि पूर्वपरंपरेतील सत्त्वांश शोषून रुचिर व मनोहर झालेली (१।१,७।४७१), असे आपल्या वाणीचे त्यांनी सांगितलेले विशेष त्यास पूरक आहेत.

### १. समारोप

आपल्या आशय-आविष्कारातील नाविन्याची मुक्तेश्वरांना जाणीव होती. गुरु-ईश्वरकृपा हे काव्यकारण आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धार हे काव्यप्रयोजन हे त्यांच्या काव्यदृष्टीत परंपरेने आलेले घटक. परंपरामान्य पावनकथा रसमयतेने विशेषतः भक्तिरसाने खुलवावी व तिला परतत्त्वस्पर्श लाभावा हा त्यांचा ध्यास. पण त्यासाठी पदबंधाला काव्यत्व देणाऱ्या छंदोमयता, पदलालित्य, माधुर्य, गूढाची उकलण, चित्रशैलीतील वर्णने आणि कथानकातील क्रीडावृत्ती या घटकांची मातब्बरी त्यांना विशेष वाटली. त्या मागील जाणीवपूर्वकता ही त्यांच्या काव्यदृष्टीतील नवता होती.

भक्ती-अध्यात्मविषयक जिव्हाळा असला तरी काव्यशैलीचे हे प्रेम ध्यानी घेऊन मुक्तेश्वरी रामायणाकडे पहावे लागते. तसे पाहिले तर छंदोरचनेचे वैविध्य व प्रयोगशीलता, प्रासयुक्त शब्दांचे आधिक्य, नादगर्भ शब्दयोजनेचा आग्रह, रेखीव पदरचना म्हणजे खास कवितेची समजली जाणारी संस्कृतप्रचुर शब्दकळा–या संक्षेपरामायणाच्या वैशिष्ट्यांचे अधिक नेमके आकलन होते.

तारुण्यातील ही काव्यदृष्टी आशयदृष्टया समकालीन वाङमयाने भारलेली आणि अभिव्यक्तीदृष्टया विदग्ध शैलीने वेडावलेली होती. त्यामुळे संक्षेपरामायण ही स्वतःच्या बाह्यरूपाकडे लक्ष देणारी, काटयाकाळजीने साजशृंगार करणारी, नीटस होऊ पाहणारी रचना झाली आहे. ती भावमुग्धा असण्यापेक्षा रूपमुग्धा अधिक आहे. तिच्यामध्ये

---

१. छंदोभंगी पदलालित्यरंगी मुद्रासंगी श्लोकश्लोक प्रसंगी ।
नाही ते ते सूनि संतीं विनोदें मोदें कीजे गूढ भावार्थबोधे ॥ १।१५.
येथील "गूढ" ऐवजी "गोड" असा पाठ केवळ "अर्थदृष्टया प्रशस्त" म्हणून परांजपे (संरा, पृ. १४६) सुचवितात. या "गूढ"चा "गुप्त" हा काव्यसंग्रहकारांनी (पृ. २) दिलेला अर्थ योग्य वाटतो. गूढार्थाचे विशदीकरण, भावार्थाच्या रूपातील स्पष्टीकरण हा मध्ययुगीन कवितेचा विशेष आहे. तोच मुक्तेश्वरांना येथे अभिप्रेत असावा.

एक उत्क्रांत अवस्था त्यातून प्रतीत होते.

ज्ञानदेवांनी रामावताराचे मर्म नेमकेपणे सांगितले असले, सालकवीच्या नावाव रामायणाचा उल्लेख आढळत असला आणि नामदेवांनी रामकथेचे अंश स्फुट आख्याना तून तन्मयतेने आळविले असले तरी समग्र रामकथा महापुराणाच्या थाटाघाटा अवतरली ती एकनाथांच्या भावार्थ-रामायणातून. पौरणिक कथाकाव्याचा रचनाबंध निर्मिणारा, उत्तरकालीनांना प्रभावित करणारा असा नाथांच्या प्रज्ञेचा तो पूर्णाविष्का आहे. नाथांनी वाल्मीकिरामायणावर केलेले संस्करण, रामकथांचे संकलन आणि भक्तिकेन्द्रित रचनाबंध मुक्तेश्वर स्वीकारतात. तथापि सुबक मांडणी, काव्यनिष्ठ कथन, पंडिती शैलीचा थाट यांमुळे संक्षेपप्रवृत्त मुक्तेश्वरी रामायण पृथगात्म झाल आहे.

समर्थ रामदासांनी जणू उपासनेचा भाग म्हणून पूर्ववयात रचलेले "लघुरामायण" म्हणजे प्रमाणिका छंदातील १२५ श्लोकांचे केवळ युद्धकांड आहे. नादानुकरणात्मक शब्दांनी भरलेली युद्धवर्णने, संकुलयुद्धाची धाटणी व देवांची दयनीय दशा (लर ११–१८, भारा ६।५५–६४, संरा ६।६८–७१) यावर नाथमुक्तेश्वरांची छाप जाणवते रामदासांचे "दुकांडी रामायण" म्हणजे सुंदर व युद्ध या दोन कांडांवरील भुजंगप्रयाताचे १४६३ श्लोक आहेत. राजकारण, समाजकारण आणि अध्यात्माधिष्ठित प्रयत्नवा यांची सप्रचीत शिकवण रामदास या रामकथेच्या रूपाने देत आहेत. वीर-करुणाचे कल्लोळ उसळीत त्यांची धावती निवेदनशैली रामकथेचा पट उलगडीत पुढे जाते सीतेची "पडत्या फळाची" आज्ञा लक्षात घेऊन हनुमंताने केलेला अशोकवनविध्वंस सेतुपार जाताना कडेचा वानर पडला तर त्याने उडणे, सुलोचनाख्यान, द्रोणागिरी आणताना हनुमंताने केलेला काळनेमीचा वध व भरतभेट, रावणाचा यज्ञ, मंदोदरीचे विटंबना, रावणवध अशा तपशीलात हे दुकांडी रामायण नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहे. मुक्तेश्वरांप्रमाणे रामदासही युद्धवर्णनासाठी भुजंगप्रयाताचा वापर करतात मुक्तेश्वरी रामायणातील शब्द–कल्पना रामदासांच्या इतरही वाङ्मयात सापडतात

१) मुखीं शब्द एकू, करीं बाण एकू। जगीं पत्नि एकू, व्रतें काम एकू।
प्रतापी महीमंडळी राम एकू। म्हणे सोडिजे ना कधी नेम एकू।। - संरा २।११६
भजाया जनीं पाहतां राम एकू। करीं बाण एकू मुखीं शब्द एकू।
क्रिया पाहता उद्धरी सर्व लोकू। धरा जानकीनायकाचा विवेकू ।।
मनाचे श्लोक-१३१

२) ते कौत्सल्या कामधर्मी निशल्या, ब्रह्मानंदे दैव साफल्यवल्या। –संरा १।५४

---

७. **श्रीरामदासाचे समग्र ग्रंथ,** चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२ पृ. ७१९–७२७.

८. तत्रैव, पृ. ३५४–४४२.

साफल्या निजवल्या कौत्सल्यामाता – रामदासकृत रामाची आरती.

३) कौत्सलेचा राम कैवल्यदानी – संरा १।५६

राम कैवल्याचा दानी – रामदास

अशी काही साम्यस्थळे, तपशील आणि "लवथव" सारखे शब्द पाहिले म्हणजे समर्थांनी मुक्तेश्वरी रामायण काळजीपूर्वक वाचले असल्याची साक्ष पटते.

गिरिधरस्वामी (अब्द - मंगल - छंद - संकेत - सुंदर अशी पाच रामायणे) व माधवस्वामी (ओवीबद्ध व श्लोकबद्ध) यांची रामायणे भक्तिप्रधान दृष्टीने केलेली शुष्क निवेदने वाटतात. त्यांतील वृत्तात्मकता व संक्षेपदृष्टी मुक्तेश्वरी रामायणाशी मिळतीजुळती आहे. रंगनाथस्वामी निगडीकरांच्या "रामजन्म" मधील श्लोकरचना व कथाभाग (३७ ते ६६) यावर संक्षेपरामायणाच्या बालकांडाची छाप आहे. अवचितसुत-काशींच्या श्लोकबद्ध द्रौपदीस्वयंवरात मुक्तेश्वरी काव्यशैलीचे अनुकरण[९] आहे. विठ्ठल बीडकरांच्या 'सीतास्वयंवरा'वरही संक्षेपरामायणाचा प्रभाव आहे.[१०]

श्रीधरांचे सप्तकांडात्मक रामविजय ४० अध्यायांत विभक्त असलेल्या ९१४७ ओव्यांचे आहे. कुटुंबवत्सल सश्रद्ध कथाप्रिय मनाशी संवाद साधल्याने त्याला लोकप्रियता लाभली आहे. रामसंबद्ध कथांचे आकर्षक संकलन, आनुषंगिक नीतिबोध, परिमित वेदांत, सरळ मांडणी, सुभाषितात्मकता, चतुरालाप, समर्पक सांसारिक दृष्टांत, संक्षेपचातुर्य, प्रासादिक वाणी ही श्रीधरांची बलस्थाने येथेही आहेत. "भानुदासकुल-भूषण" एकनाथ व "चातुर्यराजधानीचा कळस" असलेले मुक्तेश्वर यांना वंदन करून श्रीधरांनी त्यांचे ऋणही स्वीकारले आहे. कल्पना, विचार, वर्णनपद्धती, शब्दयोजना यावर नाथांची इतकी छाप आहे की भावार्थरामायणाचा नवावतार म्हणूनही राम-विजयाचे वर्णन करता येईल. भरत-शत्रुघ्न हे कैकयीचे पुत्र म्हणून सांगणे, सीतास्वयंवर प्रसंगी रावणाची फजिती, शांबवध, हनुमंताने प्रथम पडलंकेत जाणे, पुच्छदहनार्थ लंकावासियांचे कपडे जमा करणे, त्या प्रयत्नात सीता नग्न होण्याची वेळ येताच हनु-मंताने पुच्छ आखडणे, गजेंद्रोद्धारण, कालनेमी कथा, हनुमंत-भरत भेट, सुलोचनाख्यान अशा किती तरी तपशीला बाबत श्रीधर नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहेत. मुक्तेश्वरांप्रमाणे श्रीधरांनीही श्रावणवधापासून कथारंभ केला आहे. दशरथास पाठविलेले पत्र व वसिष्ठकृत उलगडा (संरा-१।१०३–१०६ रावि ८।१५९–१६२) हा मुक्तेश्वरांच्या कूटशैलीचा नमुना श्रीधरांनी अनुसरला आहे.

मोरोपंतांचे पहिले समंत्रक सप्तकांडात्मक रामायण १८४० आर्यांचे आहे. यात "गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि पाहता थोडी" आहे. यमकसाधना व मंत्रबंधन यांमुळे कथानिवेदनही सुकरतेने झालेले नाही. मंत्र, देव, स्तोत्र, ऋषी, राजे, तीर्थे

---

९. ज. र. आजगावकर, **महाराष्ट्र कविचरित्र**, पूर्वोक्त, पृ. २९३–२९४.

१०. पां. ना. कुलकर्णी, **संशोधन धारा**, पुणे, १९६७ पृ. ११–१४.

एक उत्क्रांत अवस्था त्यातून प्रतीत होते.

ज्ञानदेवांनी रामावताराचे मर्म नेमकेपणे सांगितले असले, सालकवीच्या नावावर रामायणाचा उल्लेख आढळत असला आणि नामदेवांनी रामकथेचे अंश स्फुट आख्यानातून तन्मयतेने आळविले असले तरी समग्र रामकथा महापुराणाच्या थाटाघाटात अवतरली ती एकनाथांच्या भावार्थ-रामायणातून. पौरणिक कथाकाव्याचा रचनाबंध निर्मिणारा, उत्तरकालीनांना प्रभावित करणारा असा नाथांच्या प्रज्ञेचा तो पूर्णाविष्कार आहे. नाथांनी वाल्मीकिरामायणावर केलेले संस्करण, रामकथांचे संकलन आणि भक्तिकेन्द्रित रचनाबंध मुक्तेश्वर स्वीकारतात. तथापि सुबक मांडणी, काव्यनिष्ठ कथन, पंडिती शैलीचा थाट यांमुळे संक्षेपप्रवृत्त मुक्तेश्वरी रामायण पृथगात्म झाले आहे.

समर्थ रामदासांनी जणू उपासनेचा भाग म्हणून पूर्ववयात रचलेले "लघुरामायण"[७] म्हणजे प्रमाणिका छंदातील १२५ श्लोकांचे केवळ युद्धकांड आहे. नादानुकरणात्मक शब्दांनी भरलेली युद्धवर्णने, संकुलयुद्धाची धाटणी व देवांची दयनीय दशा (लरा ११–१८, भारा ६।५५–६४, संरा ६।६८–७१) यावर नाथमुक्तेश्वरांची छाप जाणवते. रामदासांचे "दुकांडी रामायण" म्हणजे सुंदर व युद्ध या दोन कांडांवरील भुजंगप्रयाताचे १४६३ श्लोक आहेत. राजकारण, समाजकारण आणि अध्यात्माधिष्ठित प्रयत्नवाद यांची सप्रचीत शिकवण रामदास या रामकथेच्या रूपाने देत आहेत. वीर-करुणाचे कल्लोळ उसळीत त्यांची धावती निवेदनशैली रामकथेचा पट उलगडीत पुढे जाते. सीतेची "पडत्या फळाची" आज्ञा लक्षात घेऊन हनुमंताने केलेला अशोकवनविध्वंस, सेतुपार जाताना कडेचा वानर पडला तर त्याने उडणे, सुलोचनाख्यान, द्रोणागिरी आणताना हनुमंताने केलेला काळनेमीचा वध व भरतभेट, रावणाचा यज्ञ, मंदोदरीची विटंबना, रावणवध अशा तपशीलात हे दुकांडी रामायण नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहे. मुक्तेश्वरांप्रमाणे रामदासही युद्धवर्णनासाठी भुजंगप्रयाताचा वापर करतात. मुक्तेश्वरी रामायणातील शब्द–कल्पना रामदासांच्या इतरही वाङ्मयात सापडतात.

१) मुखीं शब्द एकू, करीं बाण एकू। जगीं पत्नि एकू, व्रतें काम एकू।
प्रतापी महीमंडळी राम एकू। म्हणे सोडिजे ना कधी नेम एकू॥ - संरा २।११६.
भजाया जनीं पाहतां राम एकू। करीं बाण एकू मुखीं शब्द एकू।
क्रिया पाहता उद्धरी सर्व लोकू। धरा जानकीनायकाचा विवेकू॥
मनाचे श्लोक-१३१.

२) ते कौत्सल्या कामधर्मी निशल्या, ब्रह्मानंदे दैव साफल्यवल्या। –संरा १।५४

---

७. **श्रीरामदासाचे समग्र ग्रंथ,** चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२ पृ. ७१९–७२७.

८. तत्रैव, पृ. ३५४–४४२.

साफल्या निजवल्या कौत्सल्यामाता – रामदासकृत रामाची आरती.

३) कौत्सलेचा राम कैवल्यदानी – संरा १।५६

राम कैवल्याचा दानी – रामदास

अशी काही साम्यस्थळे, तपशील आणि "लवथव" सारखे शब्द पाहिले म्हणजे समर्थांनी मुक्तेश्वरी रामायण काळजीपूर्वक वाचले असल्याची साक्ष पटते.

गिरिधरस्वामी (अब्द - मंगल - छंद - संकेत - सुंदर अशी पाच रामायणे) व माधवस्वामी (ओवीबद्ध व श्लोकबद्ध) यांची रामायणे भक्तिप्रधान दृष्टीने केलेली शुष्क निवेदने वाटतात. त्यांतील वृत्तात्मकता व संक्षेपदृष्टी मुक्तेश्वरी रामायणाशी मिळतीजुळती आहे. रंगनाथस्वामी निगडीकरांच्या "रामजन्म" मधील श्लोकरचना व कथाभाग (३७ ते ६६) यावर संक्षेपरामायणाच्या बालकांडाची छाप आहे. अवचितसुत-काशींच्या श्लोकबद्ध द्रौपदीस्वयंवरात मुक्तेश्वरी काव्यशैलीचे अनुकरण[९] आहे. विठ्ठल बीडकरांच्या 'सीतास्वयंवरा'वरही संक्षेपरामायणाचा प्रभाव आहे.[१०]

श्रीधरांचे सप्तकांडात्मक रामविजय ४० अध्यायांत विभक्त असलेल्या ९१४७ ओव्यांचे आहे. कुटुंबवत्सल सश्रद्ध कथाप्रिय मनाशी संवाद साधल्याने त्याला लोकप्रियता लाभली आहे. रामसंबद्ध कथांचे आकर्षक संकलन, आनुषंगिक नीतिबोध, परिमित वेदांत, सरळ मांडणी, सुभाषितात्मकता, चतुरालाप, समर्पक सांसारिक दृष्टांत, संक्षेपचातुर्य, प्रासादिक वाणी ही श्रीधरांची बलस्थाने येथेही आहेत. "भानुदासकुल-भूषण" एकनाथ व "चातुर्यराजधानीचा कळस" असलेले मुक्तेश्वर यांना वंदन करून श्रीधरांनी त्यांचे ऋणही स्वीकारले आहे. कल्पना, विचार, वर्णनपद्धती, शब्दयोजना यावर नाथांची इतकी छाप आहे की भावार्थरामायणाचा नवावतार म्हणूनही राम-विजयाचे वर्णन करता येईल. भरत-शत्रुघ्न हे कैकयीचे पुत्र म्हणून सांगणे, सीतास्वयंवर प्रसंगी रावणाची फजिती, शांबवध, हनुमंताने प्रथम पडलंकेत जाणे, पुच्छदहनार्थ लंकावासियांचे कपडे जमा करणे, त्या प्रयत्नात सीता नग्न होण्याची वेळ येताच हनु-मंताने पुच्छ आखडणे, गजेंद्रोद्धारण, कालनेमी कथा, हनुमंत-भरत भेट, सुलोचनाख्यान अशा किती तरी तपशीला बाबत श्रीधर नाथ-मुक्तेश्वरांचे ऋणी आहेत. मुक्तेश्वरांप्रमाणे श्रीधरांनीही श्रावणवधापासून कथारंभ केला आहे. दशरथास पाठविलेले पत्र व वसिष्ठकृत उलगडा (संरा-१।१०३–१०६ रावि ८।१५९–१६२) हा मुक्तेश्वरांच्या कूटशैलीचा नमुना श्रीधरांनी अनुसरला आहे.

मोरोपंतांचे पहिले समंत्रक सप्तकांडात्मक रामायण १८४० आर्यांचे आहे. यात "गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि पाहता थोडी" आहे. यमकसाधना व मंत्रबंधन यांमुळे कथानिवेदनही सुकरतेने झालेले नाही. मंत्र, देव, स्तोत्र, ऋषी, राजे, तीर्थे

---

९. ज. र. आजगावकर, **महाराष्ट्र कविचरित्र**, पूर्वोक्त, पृ. २९३–२९४.

१०. पां. ना. कुलकर्णी, **संशोधन धारा**, पुणे, १९६७ पृ. ११–१४.

यांची नावे साधणारी त्यांची विविधवृत्तात्मक रामायणरचना बाह्यांगाच्या दृष्टीने वैचित्र्यपूर्ण असून अंतरंगदृष्ट्या एकविध आहे. काव्यसाधनेपेक्षा भक्तिसाधना, कलात्मकतेपेक्षा कारागिरी येथे प्रधान ठरली आहे. वृत्तात्मकता, वैदग्ध्य, चमत्कृतिपूर्ण रचना व संक्षेपदृष्टी हे मुक्तमयूरांच्या रामायणरचनेतील समानधर्म आहेत.

संक्षेपरामायणाच्या संदर्भात मराठी रामकथेची स्थितिगती ही अशी आहे.

### ११. समारोप

संक्षेपरामायणाची कथावस्तु "ख्यात" वा "अनुत्पाद्य" आहे. वाल्मीकिरामायणातून रामकथेचे स्थूलसूत्र तेवढे मुक्तेश्वर उचलतात, त्याचा फुलोरा मात्र भावार्थरामायणाने उपलब्ध करून दिलेल्या रामकथेच्या तपशीलाने करतात. वाल्मीकिरामायण हा संक्षेपरामायणाचा स्रोतग्रंथ आहे तर भावार्थरामायण हा आधारग्रंथ आहे. भक्ती व अद्‌भुत यांना उठाव देणारे, वैचित्र्य व नावीन्य यांचे समाराधन करणारे तपशील मुक्तेश्वर अध्यात्मरामायण, आनंदरामायण, जैमिनी अश्वमेध व भारती रामोपाख्यान यांतून घेतात. अवतारवाद, दैवीसूत्राची जोड यांमुळे जाणवणारे पूर्वनियोजन हा मुक्तेश्वरी कथाबंधाचा विशेष अध्यात्मरामायणाने अप्रत्यक्षतया प्रभावित झालेला आहे. भारती रामोपाख्यानाचा संक्षेपरामायणावरील ठसा क्षीण आहे. हनुमन्नाटक, मुरारीचे अनर्घराघव, जयदेवाचे प्रसन्नराघव, भवभूतीचे महावीरचरित, कालिदासाचे विक्रमोर्वशीय, कुमारसंभव व रघुवंश, बाणभट्टाची कादंबरी, भर्तृहरीची शतके, जगन्नाथाचे भामिनीविलास या संस्कृत काव्यनाट्यांचे साद-पडसाद संक्षेपरामायणात ऐकू येतात. तपशीलापेक्षा आलंकारिक कल्पनाविलास व अभिव्यक्तीच्या तंत्रविशेषांसाठी त्यांचा कौशल्यपूर्ण वापर करण्यात आला आहे. आधुनिक कविदृष्टीला यात अनुकरणशीलता वाटेल. पण प्राचीन काव्यदृष्टीने त्यात कवीची विदग्धता, रसिक पांडित्य व पूर्वकवींविषयीचा आदर अभिव्यक्त झाला आहे.

रामकथा–परंपरेचा असा अनेकांगी प्रभाव असूनही तो संक्षेपरामायणाच्या स्वतंत्रतेला मारक ठरलेला नाही. मुक्तेश्वरांनी त्यातून आपल्या रामकथेचा रचनाबंध सिद्ध करून त्यास स्वकृत नवतेचीही जोड दिली. प्रसंगचित्रात नवे बारकावे योजणे, नव्या तपशीलाने व नवप्रसंगाने ते अधिक समृद्ध व अर्थगर्भ करणे असा स्वतंत्र भाग संक्षेपरामायणात येतो. अद्‌भुताच्या अनिवार आकर्षणाने त्याला उठाव देणारी भर ते घालतात, भविष्यवाणीचा त्यांनी केलेला वापर एका बाजूने अद्‌भुताचे समाराधन करतो तर दुसऱ्या बाजूने सूचकतेचे तत्त्व संभाळून श्रोत्याला आश्वासकता देतो. नवतेचा एक आविष्कार भक्तीच्या भावधारेतही आहे. या नवतेने ते सुसंगती साधतात. व मूल्यात्मक संस्कारही करू पाहतात.

संस्कृत-मराठी परंपरेतून उपलब्ध झालेल्या रामकथेची मुक्तेश्वरांनी तारतम्याने संक्षेपप्रवृत्त स्वतंत्र मांडणी केली व कल्पनाप्रचुर पंडिती शैलीत तिचे पुनःकथन केले.

कोणत्याही ग्रंथाशी स्वतःला बांधून न घेता परंपरेतून आवश्यक ते शोषून त्यांनी रामकथा घडविली व तिला नवतेने नटविले. यामुळे त्यांचे संक्षेपरामायण भाषांतर-अनुवाद-रूपांतर ठरत नसून रामकथेची पुनर्निर्मिती ठरते.

सीतारामांची कथा पारमार्थिक व प्रापंचिक दृष्टीने नाथांनी पौराणिक महाकाव्याच्या थाटाघाटात सांगितली व तिला परिस्थितीजन्य परिमाणही मिळवून दिले हे परिस्थितीजन्य परिमाण रामदासी रचनेत रोकडचा आर्षबोलांनी अधिक ठसठशीत झाले. श्रीधरांनी रामकथेला सुबोध व रंजनात्मक रूप देऊन अधिक लोकाभिमुख केले. मोरोपंतांनी भक्तिसाधना म्हणून रामकथेकडे पाहिले आणि विदग्ध अभिरुचीत अनुस्यूत नसलेल्या पण तत्कालीनांना अभिमत असलेल्या क्लृप्ति-प्रचुर कारागिरीचा अवलंब करून तिचे गायन केले. संस्कृत-मराठी परंपरेतून उपलब्ध झालेली रामकथा भावार्थरामायणाला वाट पुसत मुक्तेश्वरांनी संक्षेपात साक्षेपाने सांगितली. वृत्तबद्धता संक्षेपप्रवृत्ती, शैलीचा पंडिती थाटघाट व संस्कृत काव्यादर्शानुसरण यामुळे त्यांच्या रामायणाला पार्थक्य आले आहे. मुक्तेश्वरी रामायणात भक्ती केन्द्रवर्ती असली तरी कवीचे कथन काव्यनिष्ठ अधिक आहे. त्यामुळे संक्षेपरामायण विदग्ध महाकाव्याच्या घाटाशी जवळीक साधते. रामदास, गिरिधर, माधवस्वामी, मोरोपंत यांची रामायणे वृत्तबद्ध रूपात अवतरली, हा संक्षेपरामायणाचा अप्रत्यक्ष परिणाम आहे. रामदास, रंगनाथस्वामी निगडीकर, अवचितसुत काशी, विठ्ठल बीडकर, श्रीधर यांच्या रामकथेवर संक्षेप-रामायणाचे स्पष्टास्पष्ट ठसे आहेत. संक्षेपप्रवृत्ती, वृत्तबद्धता आणि विदग्धता या संक्षेपरामायणाच्या ठळक विशेषांनी मराठी रामकथा कमी अधिक प्रमाणात प्रभावित झाली आहे.

* * *

# क॥ संक्षेपरामायण : वाङ्मयीन पाहणी

## एक ॥ मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी

कवीची काव्यदृष्टी त्याच्या काव्याकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण उपलब्ध करून देते.

"संसारसागरसमुत्तरणैकमंत्रं" (१।३) म्हणूनच मुक्तेश्वर श्रीरामाकडे पाहतात. "श्राविल्याचे अधांतकु" (७।२७०) अशी ही रामकथा आत्मोद्धाराबरोबर (१।४–५) लोकोद्धार (६।४६६,४७२,७ । उप २) साधण्यासाठी त्यांनी सांगितली आहे. "विश्वंभरश्रीगुरुच्या प्रसादे" (७।उप ३) ती पूर्ण झाली. ज्ञानवृद्ध, नीरक्षीर-विवेकी अशा संतश्रोत्यांच्या संदोहाने ती शेवटास नेऊन गोड करून घेतली. (१।१४, १५, २।१२३, ३।१२२, ६।४६८, ४७०. ७।६०३ व उपसंहार). भवाला संक्षेप देणारे हे रामायण अतूट भजनपंथाने चालताना (६।४७०) स्फुरले. म्हणून येथे मुक्तेश्वर बोलत नसून भक्तीच बोलत आहे (७। उप ३), अशी त्यांची श्रद्धा आहे. भक्त मुक्तेश्वरांना जाणवणारे रामायणातील अध्यात्म त्यांच्या रचनेला भक्तिप्रधान स्वरूप देते.

कवी मुक्तेश्वरांना रामायणाची रमणीयता, गोडवा, गानमाधुर्य, आकर्षित करते. त्याच्या वेधवंती व महाकाव्यात्म रूपांची त्यांना जाणीव आहे. (६।४६५, ४७०. ७।३५६, ५४७,५४९,५५०.) "शतकोटी" ही रामायणाच्या विस्ताराची पारंपरिक समजूत ते श्रद्धापूर्वक स्वीकारतात आणि म्हणून वाल्मीकिरामायणात नसलेल्या नाना ठिकाणच्या कथा गोळा करून ते निःसंकोचपणे गुंफतात. रामायणाची गानमधुरता ते नादलुब्ध शब्दबंधांनी टिकवू पाहतात. त्याचा महाकाव्यात्म बाज संभाळू पाहतात.

कथा जशी "अधांतकु" (७।२७०) तशी "आल्हादकारिणी मातू" (७।२५३) असल्याचे ते सांगतात. त्यामुळे त्यांच्या रचनेत भक्ती आणि काव्य एकरस होतात. कविजनांना धातूमातू शिकविणारा त्यांचा गणेश नवरसमदधारी (१।६–७) आहे. त्यांची शारदा ज्ञानमंदाकिनीतीरवासी (१।११,१४) आहे. त्यांच्या वंदनातून ज्ञानशीलता आणि रसमयता, शब्द व त्याची चातुर्यपूर्ण गुंफण यातून लाभणाऱ्या शोकापहारी परतत्त्वाचा ते निर्देश करतात, वाचाकवित्व-रसिकत्व-परतत्त्वस्पर्श यांची सोपानपरंपरा मांडणाऱ्या ज्ञानदेवांशी त्यांचे नाते जुळते. त्यामुळे उदात्तविषयाची गंगा, अमोघवाणीची यमुना व परतत्त्वस्पर्शाची सरस्वती आपल्या काव्यप्रयागात एकवटल्याचे (१।१६) ते सांगतात.

छंदोमयता, पदलालित्य, आशयातील अभिनवता, गूढ उकलन दाखविणारा भावार्थ

आणि क्रीडावृत्तीने केलेले कथन हे आपल्या रचनेचे त्यांनीच सांगितलेले विशेष[१]. "श्रावि काने मनाचिया" (७।१६४)अशी वर्णनातील दृक्मयतेची त्यांना जाणीव आहे. "हेमपत्र सुरत्नेसीं अर्थतेसी सुमंडित" (७।४०५) असे म्हणून वाङमयाचे वैभव अर्थाने सुमंडित होण्यात – अर्थवत्तेत, अर्थपूर्णतेत – आहे, याचे ते सूचन करतात. "छंदी पदी वंदित प्रासबंदी" असे सुलोचनेच्या रामवंदनाचे वर्णन त्या डौलातच (६।२४६–२५१)ते करतात. त्यावरून "छंदोयुक्त, प्रासबद्ध पदांनी केलेले भक्तिवर्णन" हे रामायण रचनाकाळी मुक्तेश्वरांना अभिमत असलेले काव्यलक्षण निष्पन्न होते. भक्तिभावशील, क्रीडालाघवी, उपदेशगर्भ आणि पूर्वपरंपरेतील सत्त्वांश शोषून रुचिर व मनोहर झालेली (१।१,७।४७१), असे आपल्या वाणीचे त्यांनी सांगितलेले विशेष त्यास पूरक आहेत.

### १. समारोप

आपल्या आशय-आविष्कारातील नाविन्याची मुक्तेश्वरांना जाणीव होती. गुरु-ईश्वरकृपा हे काव्यकारण आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धार हे काव्यप्रयोजन हे त्यांच्या काव्यदृष्टीत परंपरेने आलेले घटक. परंपरामान्य पावनकथा रसमयतेने विशेषतः भक्तिरसाने खुलवावी व तिला परतत्त्वस्पर्श लाभावा हा त्यांचा ध्यास. पण त्यासाठी पदबंधाला काव्यत्व देणाऱ्या छंदोमयता, पदलालित्य, माधुर्य, गूढाची उकलण, चित्रशैलीतील वर्णने आणि कथानकातील क्रीडावृत्ती या घटकांची मातब्बरी त्यांना विशेष वाटली. त्या मागील जाणीवपूर्वकता ही त्यांच्या काव्यदृष्टीतील नवता होती.

भक्ती-अध्यात्मविषयक जिव्हाळा असला तरी काव्यशैलीचे हे प्रेम ध्यानी घेऊन मुक्तेश्वरी रामायणाकडे पहावे लागते. तसे पाहिले तर छंदोरचनेचे वैविध्य व प्रयोगशीलता, प्रासयुक्त शब्दांचे आधिक्य, नादगर्भ शब्दयोजनेचा आग्रह, रेखीव पदरचना म्हणजे खास कवितेची समजली जाणारी संस्कृतप्रचुर शब्दकळा–या संक्षेपरामायणाच्या वैशिष्ट्यांचे अधिक नेमके आकलन होते.

तारुण्यातील ही काव्यदृष्टी आशयदृष्टचा समकालीन वाङमयाने भारलेली आणि अभिव्यक्तीदृष्टचा विदग्ध शैलीने वेडावलेली होती. त्यामुळे संक्षेपरामायण ही स्वतःच्या बाह्यरूपाकडे लक्ष देणारी, काटचाकाळजीने साजशृंगार करणारी, नीटस होऊ पाहणारी रचना झाली आहे. ती भावमुग्धा असण्यापेक्षा रूपमुग्धा अधिक आहे. तिच्यामध्ये

---

१. छंदोभंगी पदलालित्यरंगी मुद्रासंगी श्लोकश्लोक प्रसंगी ।
नाही ते ते सूनि संतीं विनोदें मोदें कीजे गूढ भावार्थबोधें ॥ १।१५.

येथील "गूढ" ऐवजी "गोड" असा पाठ केवळ "अर्थदृष्टचा प्रशस्त" म्हणून परांजपे (संरा, पृ. १४६) सुचवितात. या "गूढ"चा "गुप्त" हा काव्यसंग्रहकारांनी (पृ. २) दिलेला अर्थ योग्य वाटतो. गूढार्थाचे विशदीकरण, भावार्थाच्या रूपातील स्पष्टीकरण हा मध्ययुगीन कवितेचा विशेष आहे. तोच मुक्तेश्वरांना येथे अभिप्रेत असावा.

परिपक्ववृत्तीची शांत सुषमा असण्यापेक्षा नवथर तारुण्यातील झगमगीतपणाचे आकर्षण अधिक आहे.

## दोन ।। संक्षेपरामायण : कथाबंध

### १. संक्षेपरामायण : कथासूत्रग्रथन

पूर्ववाङ्मय परंपरेतून उपलब्ध झालेली पुण्यपावनी रामकथा मुक्तेश्वर संक्षेपात साक्षेपाने सांगत आहेत.

मंगलाचरण, विषयप्रस्ताव आणि भूमिकाकथन करून त्यांनी कथानकाचे सूत्र उचलले आहे. रामजन्माच्या रोखाने घडणाऱ्या पूर्वघटना, रामजन्म आणि शुक्लेंदुवत् वाढत गेलेला रामपराक्रम चितारीत त्यांनी बालकांड संपविले आहे. कैकयीला मिळालेल्या वराची आणि दशरथाला मिळालेल्या शापाची पूर्वपीठिका सांगून पुढील घटनांची बीजे त्यांनी पेरली आहेत. राममातांच्या डोहाळ्यांवरही ही भविष्याची छाया पसरली आहे. ताटका, मारीच यांच्या वधांतून रामाचा पराक्रम आणि अहल्योद्धारातून त्याची पावनता प्रतीत होते. या पार्श्वभूमीवर सीतास्वयंवराचा सोहळा त्यांनी रंगविला आहे. येथेच रावणाला उपस्थित ठेवून नायक प्रतिनायकांची सामोरी साधली जाते. रामाचा अतुलनीय पराक्रम, सीतेची रामप्रीती आणि रावणाची अभिलाषा व विफलता या प्रधानपात्रांच्या ठळक विशेषांचे दर्शन ते घडवितात. त्यामुळे हा प्रसंग रामकथेची चिमुकली प्रतिकृती ठरतो, परशुराम गर्वहरणातून रामाच्या पराक्रमाची कमान आणखी उंचावत असतानाच बालकांडाची अखेर होते.

बालकांडात सूक्ष्मपणे जाणवणारे अलौकिक शक्तीचे अस्तित्व अयोध्याकांडात आरंभीच जाणवते आणि कथानक घडविणारा आणखी एक क्रियाप्रेरक घटक दृष्टिपथात येतो. देवांनी पाठविलेला विकल्प मंथरेकडून कैकयीचा मनोभाव नासवितो. आणि वचनबद्ध पित्यासाठी पितृभक्त राम सीता लक्ष्मणासह वनाची वाट चालू लागतो. राजप्रासादातील नागडा स्वार्थ आणि उदार चारित्र्य या दोहोंचे येथे एकात्मदर्शन घडते. या शोककल्लोळाच्या आवर्तात विव्हळ दशरथ मृत्युमुखी पडतो आणि शोक अधिक गडद होत जातो. या शोकात्म वातावरणावर रामसीतेची परस्परप्रीती, भरत-लक्ष्मणांची बंधुनिष्ठा, सुमंतगुहकाचा भक्तिभाव यांच्या छटा पसरत असतानाच अयोध्याकांडाची अखेर होते.

अरण्यकांडाचा आरंभ होतो तो विजनवासी रामाच्या वनप्रवासाने. निसर्गाच्या रूपसुंदर पार्श्वभूमीवर रामसीतेच्या दांपत्यप्रीतीला येथे बहर आला आहे.विराधवधातून सीतेला अरण्यात कोणत्या धोक्याला तोंड द्यावे लागणार आहे याची सूचना मिळते. शांबवध, शूर्पणखाविडंबन, खरदूषणवध या स्फोटक अग्निबाणमालिकेसारख्या तप्त प्रसंगांची परिणती रावणकृत सीताहरणात होते. या केन्द्रवर्ती घटनेभोवती सूड,

वंचना, मोह आणि शोक अशा भावनांचे जाळे पसरले आहे. जटायू-रावण युद्ध, भूषण-त्यागातील सीतेचे चातुर्य, हनुमंताची झेप अशा घटनाही त्यासंगती येतात. तुकाईची कथा कथाबंधाशी संलग्न झाल्यासारखी वाटत नाही. जटायू, कबंध व शबरी यांच्या भटीने कथानक मंदगतीने पुन्हा सरकू लागत असतानाच अरण्यकांड विराम पावते हे अरण्यकांड कठोर आणि कोमल घटनांची रंगस्थळीच आहे. रावणाचा स्मरसंचार, जानकीचा शोक आणि राघवाचा विलाप यांनी एक विदग्ध भावसृष्टी येथे निर्मिली आहे.

किष्किधाकांड हे या रामकथेतील उद्योगपर्व आहे. राम-हनुमंत भेट, राम-सुग्रीव सख्य, वालीवध, सुग्रीवास राज्यदान आणि सीताशोधार्थ लंकेत झेपावणारा हनुमंत असा भाग आला आहे. घटनास्थळ बदलल्यावर कथेचे केन्द्रही रामाकडून त्याच्या सहाय्यकांकडे सरकत गेले आहे. किष्किधाकांडात घटनाक्रमाचा वेग मंदावला आहे म्हणून वाल्मीकीने संथ वर्णनांच्या मंथर शैलीने ते वर्णिले आहे. मुक्तेश्वरांनी त्याचा संक्षेप केल्यामुळे निवेदनाची गतिमानता टिकविली आहे.

किष्किधाकांडामुळे सरकलेले घटनाकेंद्र सुंदरकांडात लंकेत स्थिरावते. हनुमंताचा लंकाप्रवेश, सीताशोध, लंकादहन आणि रामास संदेशकथन या कथाभागापैकी बहुवंश भाग लंकेच्या परिसरात घडतो. घटनास्थलाप्रमाणे घटना केन्द्रही येथे बदलले आहे. हनुमंताच्या रूपाने वीर-अद्भुताबरोबर हास्याची मनसोक्त उधळण येथे झाली आहे. विरही सीतेच्या कोमल भावनांच्या नाजूक छटा त्यावर पसरतात. रामकथेवरील संकटांचे मळभ सुंदरकांडापासून दूर होऊ लागते.

युद्धकांडात ते पूर्णपणे नाहीसे होते. सेतुबंधाच्या निमित्ताने पुरुष-प्रयत्नांची पराकाष्ठा आणि भक्तिमाहात्म्य आले आहे. युद्धकांडाचा पुढील भाग तडफदार संवादांनी आणि आवेशपूर्ण युद्धवर्णनांनी भरलेला आहे. संकुलयुद्ध, द्वंद्वयुद्ध अशा युद्धाच्या खण-खणाटाने आणि वीरांच्या वाग्युद्धाने हाभाग पुरेपूर भरलेला आहे. शस्त्रास्त्रांचे क्षेपण डावास प्रतिडाव, अपरिमित सामर्थ्य, तोडीस तोड देण्याची चतुराई यांनी विजयश्री सारखी आंदोलत राहते. अद्भुत, रौद्र आणि वीर या रसांना येथे केवळ उधाण आले आहे. सुलोचनाख्यान, हनुमंताचे द्रोणाचल आनयन या भागाने युद्धाच्या तप्त वातावरणातही विसावा लाभतो. अखेरी रावणाचा वध होऊन हे धर्माधर्माचे, नीतिअनीतीचे नि सुष्टदुष्टांचे सनातन युद्ध संपते. युद्धकांडात सुरबंधमोचक रामाचा पराक्रम झळ-झळत्या रंगात प्रकटला आहे तसे सीतेचे पावित्र्य अग्निदिव्याने लखलखत्या रूपात प्रकटले आहे. या कृतार्थ आनंदावर रामराज्यातील सुखाचे चांदणे पसरत राहते. येथे युद्धकांड विराम पावते.

नायकनायिकांचे उत्तरायुष्य चितारणारे उत्तरकांड आता आरंभित होते. प्रतिनायकाचे पूर्ववृत्त आणि नायकाचे उत्तरवृत्त यांची विरोधात्मक गुंफण येथे होते. रावणाच्या पूर्ववृत्ताच्या निमित्ताने भरगच्च तपशीलाने भरलेला एक चित्रविचित्र

पट धावत्या निवेदनातून आपल्यासमोर उलगडत राहतो. रामाने साक्षीवृत्तीने अनुभवलेल्या भागाचाही पुष्कळसा तपशील येथे येतो. आतापर्यन्त एकेरी वाटणारी रामकथा येथे संबद्ध-असंबद्ध धाग्यांच्या वीणीमुळे अनेकरूपी होते. या साऱ्या तपशीलात्मक भागाला तोलून धरणारा भागही येथे आहे. त्यात सीतेला काव्यन्याय (poetic justice) मिळवून देणारे, वीर-हास्य-वत्सल धाग्यांनी गुंफलेले लवांकुशाख्यान आहे. पण उत्तरकांडाची खरी हृद्यता सीतात्याग, सीतेने केलेला रामाचा परित्याग, लक्ष्मणाचे आत्मसमर्पण आणि रामादिकांचे निजधामागमन या भावनेने भिजलेल्या भागात आहे. येथील कारुण्याचे रंग गहिरे आहेत आणि त्यावर उदात्ततेचे पाणी पसरले आहे. एका उदात्तगंभीर शांत मनोऽवस्थेने रसिकमनाचा गाभारा भरून टाकीत मुक्तेश्वरांची सुरुचिरा वाणी स्थिरावते.....

### २. मुक्तेश्वरांनी रामकथेला दिलेला नवार्थ

पुराणप्रसिद्ध कथावस्तूच्या आधाराने जन्म घेणारी संक्षेपरामायणासारखी कृती कलावंताची दृष्टी आणि काळ यांनी प्रभावित झालेली असते. जुन्या कथावस्तूचा अंत आणि पुनर्जन्म तिला एकदमच साधावयाचा असतो. अशा वेळी जुन्या नव्याचा एक परस्परपूरक ताळमेळ साधावा लागतो. त्यातील परिचित परिचिताच्याच पातळीवर राहिल्यास संकेतांच्या भाराखाली ते गुदमरते. आणि परिचिताच्या खुणा पुसल्या तर पुरातनातील अभिमंत्रित सामर्थ्य लोप पावते. अशा वेळी पूर्वसंचिताचे परंपरेने दिलेले बळ टिकवून त्याला नवार्थाचे परिमाण देण्यातच कलावंताचे सारे कौशल्य असते.

रामकथा सांगताना मुक्तेश्वरांनीही ते प्रकट केले आहे. आपल्या कथेतील घटनांमागे आणि पात्रांच्या कृतिउक्तीत दैवाची प्रेरणा अनुस्यूत असल्याचे मुक्तेश्वर दाखवितात. "होणार ते हो। न टळे त्रिवाचा" (७।२८३) हे कवीचे भाष्य किंवा "न लोटे कदां दांडगी काळसत्ता" (७।३२१) हे लक्ष्मणाचे सांत्वनपर उद्गार सीतात्यागाच्या संदर्भात दैवाची दुर्निवारताच चित्तावर ठसवीत आहेत. माणसाला अकारण भोगाव्या लागणाऱ्या सुखदुःखांचा स्वीकार मुक्तेश्वर या दैव कल्पनेनेच करतात. दैवकल्पनेचेच एक वेगळे रूप वर (१।२७, २९–३०, ४।४२–४३, ७।५२–५६, १२७,१७६, १८४–१९१, २४७–२५०,३६३) आणि शाप (१।२४,२९,८४, ३।६०, ४।१४, ६।२६,७।७,७२–७३,१७९,३७१,३७२,३८६) यांच्या विपुल निर्देशातून डोकावते. दैव-कल्पनेत अकारणता आहे तर शाप-वरामध्ये एक भाबडी, स्पष्टीकरणशील सकारणता आहे, एवढेच.

कर्मफलाच्या विचाराने भारलेले घटनांचे अन्वयार्थ मुक्तेश्वर आपणासमोर मांडतात. श्वानकथा (७।३२४–३३२) पूर्वकर्माच्या जन्मांतरी मिळणाऱ्या फलाचे स्पष्टीकरण करते. रामाच्या हल्ल्याने रावण रथात कोसळतो तेव्हा "जटायू मारिला पाप त्याचे"

(६।६३८) असे पूर्वकर्मांशी बांधणारे स्पष्टीकरण वानरमुखाने केले जाते. रामकथेतील घटनांचे असे कर्मवादी आकलन त्या कथेची एक निराळीच संगती आपल्यापुढे उभी करते.

मुक्तेश्वरी रामकथेत पूर्वनियोजन जाणवत राहते "दिसे विश्व हे तूंचि कर्ता अशेषी । जना वाडगें गोविसी भ्रांतिपाशी॥"(७।५७८)या ब्रह्मदेवकृत रामसांत्वनात सीतारामांचे जीवन हे पूर्वनियोजित ईश्वरी लीलानाट्य असल्याचे सूचित होते. येथील जीवन अलौकिक शक्तींनी नियंत्रित झालेले आहे. व्यक्तीच्या कृती-वृत्ती इतक्याच बाह्य प्रेरणा त्याला आकार देतात. ही दैवनिर्भर पात्रे नियतीची अटळ गती जाणतात. कर्माच्या फलभोगातून येथे कोणाचीच सुटका नाही आणि म्हणून त्याबद्दल तक्रारही नाही. त्यामुळे येथील घटिताला पूर्वनियोजनाचा वास अपरिहार्यपणे येतो. जणू जे घडले ते तसे घडणार होते म्हणूनच घडले. अटळ प्राप्तव्याच्या स्वीकाराची ही भूमिका येथे जागी आहे.

अवतारकल्पनेने वाल्मीकिरामायणातील मर्यादापुरुषोत्तमाचे चित्र अलौकिक छटांनी रंगले आणि त्यातील घटनांचे अन्वय आणि अर्थ बदलून गेले. "राम वैकुंठराणा" (४।१०) असे रामाच्या अवतारित्वाचे निर्देश येथे वैपुल्याने विखुरलेले आहेत. रामाबरोबरच लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न, लवकुश, हनुमंत, सीता याही व्यक्ती अवतारी ठरल्या. या सर्वकष अवतारकल्पनेने प्रसंगांचे रूप काही ठिकाणी बदलले आहे. अवतारी सीता रावणाच्या तावडीत सापडेलच कशी, या श्रद्धेने मायासीतेची कल्पना (६।४३२) येते आणि त्यानुषंगाने सीताहरण करणाऱ्या रावणाचे व्यक्तिमत्त्व कामातुरतेकडून विरोधभक्तीकडे झुकत जाते.

अवतारकल्पनेच्या अनुप्रवेशाने भक्तीला येथे मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. मुक्तेश्वरी रामायणाची प्रेरणा, प्रयोजन व फलश्रुती आध्यात्मिक वळणाची असल्याने त्याचे अंतरंग भक्तिप्रवण झाले आहे. कधी प्रसंगांचे आकलनही मुक्तेश्वर भक्तीने भिजवून मांडतात. हनुमंताच्या पुनरागमनाच्या संदर्भात "प्रिया कंचनी प्रेम जाळूनि लंके तरे मोह, तो राम साचार देखें" (५।१०३) असे भक्तीचे मर्म ते सांगतात. सेतुबंधप्रसंगी (६।३९) जलसागर आणि भवसागर तरण्याची एकच युक्ती सांगून ते जडाचा व जीवनाचा संबंध जोडतात. कधी या भक्तिप्रवणतेतून ते नवप्रसंगनिर्मिती करतात. सर्वत्र होणाऱ्या रामदर्शनाने भांबावलेल्या रावणाचे चित्र (६।२७५–२८२) या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. मुक्तेश्वरांचे गतिमान कथन अशा प्रसंगी रेंगाळताना दिसते.

भक्तीच्या लोलकातून मुक्तेश्वर रामकथेकडे पाहात असल्याने त्यांचा राम अवतारी उपास्यदैवताचे रूप घेऊन आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. त्यामुळे राम व अन्य पात्रे यातील लौकिक संबंध पुसट होऊन त्यांना देव-भक्त संबंधाचे रूप येते. अवतारकल्पनेमुळे देवकोटीतील नायक व अन्य पात्रे यांच्यामध्ये जे अंतर निर्माण होते ते मुक्तेश्वरांनी असे भक्तीच्या वाटेने भरून काढले आहे. रामाच्या वैऱ्यांना येथे साहजिकच

पट धावत्या निवदनातून आपल्यासमोर उलगडत राहतो. रामाने साक्षीवृत्तीने अनुभवलेल्या भागाचाही पुष्कळसा तपशील येथे येतो. आतापर्यन्त एकेरी वाटणारी रामकथा येथे संबद्ध-असंबद्ध धाग्यांच्या वीणीमुळे अनेकरूपी होते. या साऱ्या तपशीलात्मक भागाला तोलून धरणारा भागही येथे आहे. त्यात सीतेला काव्यन्याय (poetic justice) मिळवून देणारे, वीर-हास्य-वत्सल धाग्यांनी गुंफलेले लवांकुशाख्यान आहे. पण उत्तरकांडाची खरी हृद्यता सीतात्याग, सीतेने केलेला रामाचा परित्याग, लक्ष्मणाचे आत्मसमर्पण आणि रामादिकांचे निजधामागमन या भावनेने भिजलेल्या भागात आहे. येथील कारुण्याचे रंग गहिरे आहेत आणि त्यावर उदात्ततेचे पाणी पसरले आहे. एका उदात्तगंभीर शांत मनोऽवस्थेने रसिकमनाचा गाभारा भरून टाकीत मुक्तेश्वरांची सुरुचिरा वाणी स्थिरावते.....

### २. मुक्तेश्वरांनी रामकथेला दिलेला नवार्थ

पुराणप्रसिद्ध कथावस्तूच्या आधाराने जन्म घेणारी संक्षेपरामायणासारखी कृती कलावंताची दृष्टी आणि काळ यांनी प्रभावित झालेली असते. जुन्या कथावस्तूचा अंत आणि पुनर्जन्म तिला एकदमच साधावयाचा असतो. अशा वेळी जुन्या नव्याचा एक परस्परपूरक ताळमेळ साधावा लागतो. त्यातील परिचित परिचिताच्याच पातळीवर राहिल्यास संकेतांच्या भाराखाली ते गुदमरते. आणि परिचिताच्या खुणा पुसल्या तर पुरातनातील अभिमंत्रित सामर्थ्य लोप पावते. अशा वेळी पूर्वसंचिताचे परंपरेने दिलेले बळ टिकवून त्याला नवार्थाचे परिमाण देण्यातच कलावंताचे सारे कौशल्य असते.

रामकथा सांगताना मुक्तेश्वरांनीही ते प्रकट केले आहे. आपल्या कथेतील घटनांमागे आणि पात्रांच्या कृतिउक्तीत दैवाची प्रेरणा अनुस्यूत असल्याचे मुक्तेश्वर दाखवितात. "होणार ते हो। न टळे त्रिवाचा" (७।२८३) हे कवीचे भाष्य किंवा "न लोटे कदां दांडगी काळसत्ता" (७।३२१) हे लक्ष्मणाचे सांत्वनपर उद्‌गार सीतात्यागाच्या संदर्भात दैवाची दुर्निवारताच चित्तावर ठसवीत आहेत. माणसाला अकारण भोगाव्या लागणाऱ्या सुखदुःखांचा स्वीकार मुक्तेश्वर या दैव कल्पनेनेच करतात. दैवकल्पनेचेच एक वेगळे रूप वर (१।२७, २९–३०, ४।४२–४३, ७।५२–५६, १२७,१७६, १८४–१९१, २४७–२५०,३६३) आणि शाप (१।२४,२९,८४, ३।६०, ४।१४, ६।२६,७।७,७२–७३,१७९,३७१,३७२,३८६) यांच्या विपुल निर्देशातून डोकावते. दैव-कल्पनेत अकारणता आहे तर शाप-वरामध्ये एक भाबडी, स्पष्टीकरणशील सकारणता आहे, एवढेच.

कर्मफलाच्या विचाराने भारलेले घटनांचे अन्वयार्थ मुक्तेश्वर आपणासमोर मांडतात. श्वानकथा (७।३२४–३३२) पूर्वकर्माच्या जन्मांतरी मिळणाऱ्या फलाचे स्पष्टीकरण करते. रामाच्या हल्ल्याने रावण रथात कोसळतो तेव्हा "जटायू मारिला पाप त्याचे"

(६।६३८) असे पूर्वकर्माशी बांधणारे स्पष्टीकरण वानरमुखाने केले जाते. रामकथेतील घटनांचे असे कर्मवादी आकलन त्या कथेची एक निराळीच संगती आपल्यापुढे उभी करते.

मुक्तेश्वरी रामकथेत पूर्वनियोजन जाणवत राहते "दिसे विश्व हे तूंचि कर्ता अशेषी। जना वाडगें गोविसी भ्रांतिपाशी॥"(७।५७८)या ब्रह्मदेवकृत रामसांत्वनात सीतारामांचे जीवन हे पूर्वनियोजित ईश्वरी लीलानाट्य असल्याचे सूचित होते. येथील जीवन अलौकिक शक्तींनी नियंत्रित झालेले आहे. व्यक्तीच्या कृती-वृत्ती इतक्याच बाह्य प्रेरणा त्याला आकार देतात. ही दैवनिर्भर पात्रे नियतीची अटळ गती जाणतात. कर्माच्या फलभोगातून येथे कोणाचीच सुटका नाही आणि म्हणून त्याबद्दल तक्रारही नाही. त्यामुळे येथील घटिताला पूर्वनियोजनाचा वास अपरिहार्यपणे येतो. जणू जे घडले ते तसे घडणार होते म्हणूनच घडले. अटळ प्राप्तव्याच्या स्वीकाराची ही भूमिका येथे जागी आहे.

अवतारकल्पनेने वाल्मीकिरामायणातील मर्यादापुरुषोत्तमाचे चित्र अलौकिक छटांनी रंगले आणि त्यातील घटनांचे अन्वय आणि अर्थ बदलून गेले. "राम वैकुंठराणा" (४।१०) असे रामाच्या अवतारित्वाचे निर्देश येथे वैपुल्याने विखुरलेले आहेत. रामाबरोबरच लक्ष्मण-भरत-शत्रुघ्न, लवकुश, हनुमंत, सीता याही व्यक्ती अवतारी ठरल्या. या सर्वकष अवतारकल्पनेने प्रसंगांचे रूप काही ठिकाणी बदलले आहे. अवतारी सीता रावणाच्या तावडीत सापडेलच कशी, या श्रद्धेने मायासीतेची कल्पना (६।४३२) येते आणि त्यानुषंगाने सीताहरण करणाऱ्या रावणाचे व्यक्तिमत्त्व कामातुरतेकडून विरोधभक्तीकडे झुकत जाते.

अवतारकल्पनेच्या अनुप्रवेशाने भक्तीला येथे मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. मुक्तेश्वरी रामायणाची प्रेरणा, प्रयोजन व फलश्रुती आध्यात्मिक वळणाची असल्याने त्याचे अंतरंग भक्तिप्रवण झाले आहे. कधी प्रसंगांचे आकलनही मुक्तेश्वर भक्तीने भिजवून मांडतात. हनुमंताच्या पुनरागमनाच्या संदर्भात "प्रिया कंचनी प्रेम जाळूनि लंके तरे मोह, तो राम साचार देखे" (५।१०३) असे भक्तीचे मर्म ते सांगतात. सेतुबंधप्रसंगी (६।३९) जलसागर आणि भवसागर तरण्याची एकच युक्ती सांगून ते जडाचा व जीवनाचा संबंध जोडतात. कधी या भक्तिप्रवणतेतून ते नवप्रसंगनिर्मिती करतात. सर्वत्र होणाऱ्या रामदर्शनाने भांबावलेल्या रावणाचे चित्र (६।२७५–२८२) या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. मुक्तेश्वरांचे गतिमान कथन अशा प्रसंगी रेंगाळताना दिसते.

भक्तीच्या लोलकातून मुक्तेश्वर रामकथेकडे पाहात असल्याने त्यांचा राम अवतारी उपास्यदैवताचे रूप घेऊन आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. त्यामुळे राम व अन्य पात्रे यातील लौकिक संबंध पुसट होऊन त्यांना देव-भक्त संबंधाचे रूप येते. अवतारकल्पनेमुळे देवकोटीतील नायक व अन्य पात्रे यांच्यामध्ये जे अंतर निर्माण होते ते मुक्तेश्वरांनी असे भक्तीच्या वाटेने भरून काढले आहे. रामाच्या वैऱ्यांना येथे साहजिकच

अभक्तांचे स्वरूप येते. त्यामुळे त्यांच्या रामकथेला भक्त-अभक्तांच्या संघर्षाचे रूप आले आहे. दुष्टदलन करून आर्तपरित्राण करणाऱ्या सुरबंधमोचक रामाचे

**धराभार फेडूनियां रावणातें तुवां ओपिले विष्णुसायुज्य हातें ।**
**खळां दंडिले, पाळिले सत्य साधू, जगी कोंदला येश निर्दोष नादू ।।** (७।५९७)

असे ठसठशीत वर्णन कालपुरुषाच्या मुखाने त्यांनी केले आहे. मूलतः रामरावणांच्या उग्र संघर्षाची असलेली ही पार्थिव कथा भक्ती-अवतारकल्पना यांच्या अनुप्रवेशाने धर्माधर्माची व न्यायान्यायाची अलौकिक संघर्षकथा बनली आहे. ती केवळ लौकिक कथा राहिली नसून लौकिक-अलौकिकाचा एकात्म वेध घेणारी कथा झाली आहे. तिचे मानुष रूप पुसले जाऊन तिला येथे दिव्यमानुष कथेचे रूप लाभले आहे. त्यामुळे व्यक्तीचे मनोभाव आणि प्रसंगांची घडण यावर भक्तीची शांत सुषमा पसरली आहे.

मुक्तेश्वर भक्तिभावनेने रामकथेकडे पाहतात पण तिचा अतिरेक करीत नाहीत. त्यामुळे ती वैरस्यकारक होत नाही. कथेकडे पाहण्याच्या सश्रद्ध भूमिकेत ती अनुस्यूत असल्याने तिचा आविष्कारही स्वाभाविक झाला आहे. मुक्तेश्वरांची प्रगल्भ अध्यात्म-दृष्टी व चित्ताची भक्तिप्रवणता रामकथेला आवश्यक तो जिव्हाळ्याचा भावस्पर्श देते. त्यामुळे त्यांची रामकथा भक्तिकथा झाली आहे.

### २.१ मुक्तेश्वरी रामकथेच्या नवार्थाची सापेक्षता

वस्तुतः वाल्मीकिरामायण हे मौखिक संस्कृतीतील वीरकाव्य आहे. राम-रावण युद्धाच्या मूलसूत्राभोवती ते गुंफलेले आहे. वध, सूड, वचनपूर्ती, वनवास, आव्हान, अपहरण, जय-पराजय, त्याग-परित्याग अशा उग्र भावप्रसंगांनी त्याचा घाट घडविला आहे. उत्तरकालीन धर्मोपदेशकांनी या वीररसप्रधान काव्यात उपदेशपरतेची छटा मिसळली. जैन व बौद्ध धर्माच्या वर्चस्वकाळात रामायणाची संस्करणे झाली. त्यातून रामकथेत वीररसाबरोबरच शांत आणि करुण या रसांनाही स्थान मिळाले. कोदंड-धारी रामाच्या शांत करुण वृत्तीचा आविष्कार करण्यात आला. भागवताने मध्य-युगात भक्ती हे मूल्य प्रतिष्ठित केले. राजा रामाचे रूपांतर उपास्यदैवतात होत गेले. भागवत, स्कंदपुराण, पद्मपुराण यातून रामकथा तपशीलाने वाढली. रामभक्ती पल्लवित होऊ लागताच अध्यात्म–रामायण, अद्‌भुत–रामायण, आनंद–रामायण, तत्त्वसंग्रह–रामायण अशी किती तरी सांप्रदायिक रामायणे अवतरली. आदिकाव्य असलेले रामायण त्यामुळे धार्मिकतेकडे झुकले आणि भक्तीने भारले गेले. संस्कृत रामकथांचे हे भक्तिप्रवण रूप एकनाथांच्या भावार्थरामायणात मराठी थाटाधाटात अवतरले. मुक्तेश्वरी रामायण हे रामकथेचे याच भक्तिपरंपरेतील अवतरण आहे.

नाथ व रामदास या मुक्तेश्वरांच्या पूर्वोत्तर कवींनी समकाळाचा सांधा जुळवून सुरबंधमोचक रामाची कथा आवर्जून गायिली. मुक्तेश्वरांचा राम सुरबंधमोचक असला तरी त्यांच्या रामकथेला स्वकालाचे सामाजिक परिमाण मात्र लाभलेले नाही.

भक्तीच्या स्वानंदातच त्यांची रामकथा मग्न आहे.

त्यामुळे रामकथेला मुक्तेश्वरांनी दिलेला नवार्थ सापेक्ष आहे, असेच म्हटले पाहिजे.

## ३. मुक्तेश्वरी कथाबंधाचे आणखी काही विशेष

### ३.१ अद्‌भुतता:

'अद्‌भुत' या शब्दाचा पुन्हा पुन्हा झालेला वापर (जसे, ५।२८, ७।५२७,५६०) मुक्तेश्वरांचे तद्‌विषयक आकर्षण स्पष्ट करणारा आहे. रामायणात अशा अद्‌भुततेला पुष्कळ वाव आहे. त्यामुळे संक्षेपरामायणावर अद्‌भुताचा रंग पसरला आहे. राक्षस-वानर-पक्षी यांची चित्रविचित्र रूपे, त्यांची अलौकिक कृत्ये, पाण्यावर तरंगणारे दगड, औषधिपर्वत आणणे, श्वानाची फिर्याद, गृध्रउलूकांचे भांडण हा सारा अद्‌भुतांचा माल-मसाला मूलकथेतूनच घेतला गेला. विकल्पासारख्या अलौकिक शक्तींचा लौकिक जीवनातील हस्तक्षेप, शाप-वर यांनी बांधलेले जीवन आणि अद्‌भुत सामर्थ्य असलेल्या धनुष्य-मणी-भस्म अशा वस्तू अद्‌भुताचे पोषण करीत आहेत. सुंदरकांडातील हनुमंताचा पराक्रम किंवा युद्ध-उत्तर-कांडातील वीरांचे पराक्रम, त्यांनी प्रेरिलेल्या बाणांची संख्या, वापरलेली चित्रविचित्र अस्त्रे यांच्या वर्णनातील अत्युक्ती अद्‌भुताला उठाव देते. द्रोणाचल आनयनाच्या कथेत नाविन्याच्या आकर्षणाने मुक्तेश्वरांनी स्वीकारलेले तपशील अद्‌भुतरम्यता वाढविणारेच आहेत.

अशा तऱ्हेचे अद्‌भुत हा आर्ष महाकाव्यातील जीवनदर्शनाचा एक घटक असतो. संक्षेपरामायणात मूलानुसरण, अत्युक्ती, नाविन्य अशा अनेक वाटांनी तो आला आहे. त्याद्वारे सश्रद्ध श्रोतृमनाचे समाराधन मुक्तेश्वरांना करता आले आहे.

### ३.२ 'आनंदवाचा वदलो विनोदें' :

'नाही तें तें सूनि संती विनोदे' (१।१५) व 'आनंदवाचा वदलों विनोदें' (७।उप ३) या उपक्रमोपसंहारातून "विनोदशील क्रीडावृत्तीने केलेले कथन" हा संक्षेपरामायणाचा एक विशेष स्पष्ट होतो. 'विनोद' हा शब्द त्यांनी येथे प्राचुर्याने वापरला आहे. (जसे, १।१५; ६।२०९,२४०,२६८,२७१,२९८,४७१; ७।९९,३६७,४६९,५३७,५४६) विनोदवृत्तीचा इतका ठसठशीत आविष्कार त्यांच्या पूर्वोत्तर रचनेत दिसत नाही. कुंभकर्ण जागृती, त्याचे मागणे, बळीगृही फजित झालेला किंवा सर्वत्र झालेल्या राम-दर्शनाने भांबावलेला रावण, अशा किती तरी ठिकाणी मुक्तेश्वरांची कलावती वाणी विनोदाचे रुणझुणते पैंजण बांधून पदन्यास करीत आहे. तिचा अस्सल आविष्कार सुंदरकांडात आहे. लंकाराक्षसांच्या वर्णनात उपरोधाच्या अंगाने विनोद प्रकटतो. हनुमंत-देवता संवादात तो वास्तव व कथांतर्गत वास्तव यांच्या विरोधातून शब्द-पातळीवर आविष्कृत झाला आहे. हनुमंताने केलेल्या वनविध्वंसात तो शब्दनिष्ठ आहे.

त्यातील युद्ध प्रसंगावर त्याची छाया पसरते आणि प्रसंगनिष्ठ रूपात तो प्रकटतो.

शब्दनिष्ठ वा स्वभावनिष्ठ असण्यापेक्षा मुक्तेश्वरांचा विनोद प्रसंगनिष्ठ अधिक आहे. त्या भरात तो कधी अश्लीलता-ग्राम्यता यांच्याशीही सलगी करतो. हा विनोद शारीर, स्थूल व बालबुद्धीच्या श्रोत्यांना रमविणारा आहे. तो स्वैर आणि उघडा आहे. समूहाला आवाहक वाटेल असाच तो आहे. संक्षेपरामायणातील पदलालित्य, यमकानुप्रासांची रंगत, चित्रबंधातील कौशल्य व कूटरचनेतील लाघव यांच्याकडेही कवीच्या क्रीडावृत्तीचा आविष्कार म्हणून पाहणे शक्य आहे. मुक्तेश्वरांच्या विदग्ध क्रीडावृत्तीचा आल्हाददायक आविष्कार त्यातील विनोदाला पुष्ट करणारा असाच आहे.

### ३.३ कालविपर्यास :

पुराणकथेला नवरूप देऊ पाहणारे मुक्तेश्वर कधी नकळत कथाकाळातून स्वकाळात उतरताना दिसतात. विरूपाक्षलिंग, चंडिका, रेणुका, मणिमल्ल, भद्रकाळी, सटी, क्षेत्रपाळी, मल्हारी या देवतांचे निर्देश रामायणकालीन असण्यापेक्षा मुक्तेश्वरकालीन लोकश्रद्धेशी अधिक संबद्ध आहेत. तुकाई कथा (३।१०७–११२), रामगमनप्रसंगी क्षपणिकांचा (१।६५) निर्देश, सैनिकांची शस्त्रे (६।९१–९४) व जयजयकार करीत हल्ला करण्याची पद्धती (६।१०२) कालविपर्यासात्मक आहे. रामाने मीच केशव असल्याचे सांगणे (६।३६–३७) कथांतर्गत कालविपर्यासाचे आहे.

अशी कालविपर्यासात्मक उदाहरणे येथे विरळ असून ती विशेष गंभीर स्वरूपाची नाहीत. सामाजिक व राजकीय वेदनेच्या संदर्भात रामकथेचा घांडोळा घेणाऱ्या नाथांच्या भावार्थरामायणात असे विपुल कालविपर्यस्त निर्देश त्या रामकथेला एक सामाजिक परिमाण देतात. तसे परिमाण मुक्तेश्वरी रामायणाला प्राप्त होत नाही. अर्थात् कथासंगत कालचित्र उभारण्याच्या श्रेयाचे मात्र ते वाटेकरी होतात. आपल्या स्वतःच्या मर्यादेत रामायणकालाचे एक चैतन्यपूर्ण भासचित्र मुक्तेश्वरांनी सादर केलेआहे

### ३.४ अश्लीलता :

बीजरूपाने प्रारंभापासून मुक्तेश्वरी रचनेत आढळणारी अश्लीलता येथे सौम्यरूपात दिसते. अपहरण आणि बलात्कार हेच सूत्र असणाऱ्या बऱ्याच कथा उत्तरकांडात येतात. वेदवती (७।७६–७८), रंभा (७।२०१–२०२), पद्मा (७।२३१), अरजा (७।३८४–३८७) अशा स्त्रियांच्या संदर्भात कामवासनेची चित्रणे येतात. मिटक्या मारीत वाचावी अशी ही वर्णने नाहीत. ती प्रायः संक्षिप्त, स्थूल, घटितनिष्ठ व शक्य तेथे घृणा निर्माण करणारी आहेत. कथावस्तूची मागणी म्हणून अनावर कामवासनेची चित्रे जेथे येतात तेथे तिची निषिद्धता शाप वा स्त्रियांच्या प्रतिक्रियांच्या रूपाने मुक्तेश्वरांनी प्रसंगसंदर्भातच गुंफली आहे. कधी मात्र हा अपेक्षित परिणाम नेमकेपणे साधला जात नाही. रंभा बलात्कारप्रसंगी रावणाचे कामोद्दीपन व्हावे अशा

पद्धतीने धुंदावणाऱ्या निसर्गाचे मंदिर वर्णन (७।१९६–१९८) येते. मध्येचउफाळून आलेल्या रसिकतेमुळे या प्रसंगाचे निंद्य व निषिद्ध रूप एकसंघपणे उभे राहत नाही.

रत, सुरत, संभोग, मैथुन, भोगकाज अशा शारीरक्रीडावाचक स्पष्ट शब्दांचा मुक्तेश्वर पुष्कळच वापर करतात. तो काव्याच्या विदग्ध डौलाला न शोभेसा वाटतो. या स्पष्टोल्लेखामागे स्त्रीकडे पाहण्याची पार्थिव मध्ययुगीन दृष्टी आहे.

स्थूलबुद्धी श्रोत्यांना सुखविण्यासाठी आलेला त्यांचा शरीरनिष्ठ विनोद ग्राम्यतेकडे झुकला आहे. हनुमंताने लंकेमध्ये उडविलेल्या गोंधळाच्या संदर्भात येणारे शारीरचेष्टा व नग्नता यांचे मोकळे उल्लेख (५।२३,२५,३२,७३,९०,१००) याप्रकारचे आहेत.

मुक्तेश्वरांच्या प्रकृतीत एक मिस्किल रसिकता आहे. रामाच्या वज्रवक्षाच्या काठिण्यासाठी सीतेच्या कुचयुगुलाची साक्ष (६।३६०) त्यांनी काढली आहे "विजय-हरिखतोषे रातला हावयोषे" (६।३४०) असे वीरवर्णन शृंगारिक उपमानांनी ते करतात. अलंकारसाधनेच्या प्रयत्नात पुढे ही अश्लीलच्छटा मुक्तेश्वरी रचनेत वाढत गेली.

कथावस्तु-व्यक्तिचित्रण यांची मागणी, कथनातील स्पष्टता, स्त्रीकडे पाहण्याची मध्ययुगीन दृष्टी, विनोद, अलंकारयोजना, वृत्तीतील लैंगिक मोकळेपणा व मिस्किल रसिकता यांमुळे संक्षेपरामायणात अश्लीततेच्या छटा भासमान होत असल्या तरी तिचे स्वरूप भडक नाही. मात्र परांजपे[1] म्हणतात तसा हा संयम नाही. हा उमेदवारीच्या काळातील संकोच आहे, परिपक्व अवस्थेतील संयम नाही.

### ४. संक्षेपप्रवृत्त रचनाबंधाचा पहिला आविष्कार

संक्षेप हे मुक्तेश्वरी रामायणाच्या रचनाबंधाचे नियामक तत्त्व आहे. त्यामुळे संक्षेप-रामायणास पार्थक्य आले आहे.

मुक्तेश्वरकाळ तसा विस्तारप्रवृत्तीचा[2] काळ आहे. स्वतः मुक्तेश्वरांचे भारत विस्तारप्रवृत्तीचे आहे. एकनाथ-दासोपंत तिचे ठळक प्रतिनिधी आहेत. विस्तार-प्रवृत्तीच्या त्या उत्कर्षकाळात ग्रंथ अतिदीर्घ झाले आणि वाचकांच्या आटोक्याबाहेर जाऊ लागले. तेव्हा वाचक वर्गाची निकड म्हणून विस्तारित ग्रंथांच्या संक्षिप्त आवृत्त्या आवश्यक ठरू लागल्याचे दिसते. "न वचेचि कवणा उलंघिले। शब्दार्णव" अशी 'गीतार्णवा' ची स्थिती झाल्याने 'गीतार्थबोधचंद्रिके'च्या रूपाने दासोपंतांना 'लघुटीके'चा

---

१. संरा, उपोद्घात, पृ. १७.

२. विस्तारप्रवृत्ती व संक्षेपप्रवृत्ती यांचे सूचन ह. श्री. शेणोलीकरांनी (**प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप**, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, १९७५ (प. आ. १९५६) पृ. १०६) व स्पष्टीकरण शि. अ. गऊळकरांनी (**प्राचीन मराठी आख्यानक कवितेच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास**, पदवीप्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६९) केले आहे.

'आयास' करावा लागला. नाथ कृष्णदास मुद्गलांनी विस्ताराने सांगितलेली रामकथा या भूमिकेवरून मुक्तेश्वरांना संक्षेपाने सांगावीशी वाटली असावी. आर्षग्रंथांच्या मराठीकरणाच्या परंपरेत संक्षेपरामायणाच्या रूपाने संक्षेपप्रवृत्तीचा उगम झाला. पुढील काळात (इ. स. १६५० ते १८१८) पुराणांच्या व आर्षकाव्यांच्या विस्तारित संस्करणपरंपरेला समांतर अशा पद्धतीने संक्षेपप्रवृत्ती वाढत गेली. श्रीधरांच्या हरिविजयात अस्पष्टपणे जाणवणारी संक्षेपप्रवृत्ती कृष्णकौतुक (रघुनाथ शेष), लीलाभागवत (जनपंडित), कृष्णविजय (मोरोपंत) या स्वयंपूर्ण काव्यांतून स्पष्टपणे जाणवते. गिरिधरांची रामायणे, श्रीधरांचा पांडवप्रताप, मोरोपंतांचे आर्याभारत व अष्टोत्तरशत रामायणे ही संक्षेपप्रवृत्तीची ठसठशीत उदाहरणे होत. ज्या संक्षेपप्रवृत्तीचा उत्कर्ष मोरोपंतात दिसतो तिचा आरंभ मुक्तेश्वरांत आहे. मुक्तमयूरांना सांधणारा हा लक्षणीय अनुबंध आहे.

कोणत्याही ग्रंथाला बांधून न घेता रामकथेचे परिचित सूत्र संस्कृत-मराठी परंपरेतील संस्करणांचे भान ठेवून संक्षेपात सांगण्याचे मुक्तेश्वरांचे धोरण आहे. त्यामुळे येथील संक्षेप ग्रंथनिष्ठ असण्यापेक्षा सूत्रनिष्ठ अधिक आहे. ग्रंथनिष्ठ संक्षेप रसापकर्ष टाळणारा तर सूत्रनिष्ठ संक्षेप रसोत्कर्ष साधणारा असतो, याचे भान ठेवून मुक्तेश्वरी रामायणातील संक्षेपाचे स्वरूप पाहिले पाहिजे.

धर्ममान्य ग्रंथांचे मराठीकरण, पूर्वकवींचे ऋण, भक्तीची प्रेरणा या प्रवृत्ती संक्षेप आणि विस्तार या दोन्ही आविष्कारांना समान आहेत. विस्तारित संस्करणातील समावेशकता अर्थातच संक्षिप्त संस्करणात नसते. स्वतःचे असे वेगळे सांगावयाचे नसल्याने संक्षेपप्रवृत्त कवीत रचनास्वातंत्र्याची प्रवृत्ती कमी दिसते. वृत्तबद्धता, अलंकारप्राचुर्य, पदलालित्य, शब्दसौष्ठव, सारगर्भता, कोरीव कुसरीची मांडणी, रचनेचा आटोप अशा मार्गांनी त्याचे कविकौशल्य प्रकटते. संक्षेपप्रवृत्तीची ही वैशिष्टये कमीअधिक प्रमाणात मुक्तेश्वरी रामायणात जाणवतात.

संक्षेपदृष्टीमुळे मुक्तेश्वर घटनाचित्रणाऐवजी कधी केवळ घटनानिर्देश करतात. दक्षिणेशिवाय अन्य दिशांचा सीताशोध त्यांनी एकाच ओवीत(४।७६) आटोपला आहे. कविप्रकृतीला मानवणारे भाव फुलवण्यास त्यांना जणू वेळ नाही. काही वेळा मूलघटनांचाही ते संक्षेप करतात. मुळात वाली-सुग्रीव युद्ध दोन वेळा होते. मुक्तेश्वरांनी ते एकदाच वर्णून रामाविषयीची साशंकता टाळली आहे. कथानुसंधान संभाळणारा हा संक्षेप आहे.

केवळ संक्षेप हेच सूत्र धरून पाहिले तर मुक्तेश्वरांच्या भाषेचे काही विशेष स्पष्ट होतात. अर्थपूर्ण संस्कृत शब्दांचे प्राचुर्य तीत स्वाभाविकच आहे. "दंभोपाधिक-नेममायिकसुखा" अशी समासघटित पदावलीही येथे येते. शब्द अनुक्त ठेवून अर्थबोध संदर्भावर निर्भरित ठेवण्याचा प्रकार ते कधी करतात. कधी क्रियापदे टाळून विशेषणांच्या आधिक्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त अर्थ सांगण्याचा ते प्रयत्न करतात.

स्पष्टीकरणाऐवजी संदर्भ पेरीत जाणारी अर्थसमृद्ध शैली त्यांनी वापरली आहे. इंद्र, इड यांच्या संदर्भाने (७।३९७) अश्वमेधाची महती स्पष्ट होते. काही वेळा निवेदनाला अर्थघन, ठाशीव करण्याच्या भरात त्यांची भाषा जड व क्वचित् दुर्बोध झाली आहे.

सारगर्भ प्रतीती हे त्यांच्या सूत्रनिष्ठ संक्षेपाचे ठळक वैशिष्ट्य आहे. ऋष्यशृंगानयन (१।३३) मध्ये विविध क्रिया व प्रलोभने यांच्या केवळ निर्देशातून कामलोलुपतेचे चित्र उभे राहते. राजकुमारांचा विकास पहुडणे, रांगणे, खेळणे, चालणे, बोलणे या क्रियासूचक अवस्थांनी (१।६०) प्रत्ययास येतो. अर्थघन शब्दांनी विपुल आशय सुचविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे "हेमरत्नमयी लंका शत्रूशंकाविनाशिनीं" (७।१६) अशी रेंगाळावयास अवकाश नसल्याने एकेका ओळीत सुबकपणे रेखलेली विशेषणबहुल चित्रे मुक्तेश्वरांच्या संक्षेपकौशल्याची ग्वाही देत आहेत. दशरथाची मृगया व श्रावणवध (१।१८–२४), हनुमंताचे सागरोल्लंघन (४।९२–९८) येथे एकामागून एक येणाऱ्या घटनांचे धावते चित्रण मूळ अनुभवातील गतिमानतेचा प्रत्यय देते. प्रसंगाचा एकेक टप्पा एकेका चरणात गाठीत हे श्लोक समृद्ध घटनांचे गतिचित्र डोळ्यापुढे उभे करतात.

त्यांच्या संक्षेपदृष्टीने रामकथेचा रचनाबंध प्रभावित झाला आहे. प्रसंगभावांना स्पर्श करीत पुढे झेपावत जाणारी ही गतिशील संक्षेपशैली आहे. त्यामुळे काही वेळा प्रसंगापुढे प्रसंग ठेवल्यासारखे वाटतात. त्यांना जोडणारे धागे अध्याहृत राहतात. श्रावणवधानंतर ते शुक्रयुद्धाचे वर्णन करतात. केवळ दशरथाच्या आयुष्यात घडलेल्या घटना एवढाच त्यातील जुळणीचा सांधा. पण लक्षपूर्वक पाहिले तर मुक्तेश्वर त्यातून एक सलग संगती साधताना दिसतात. श्रावणवधामुळे मिळालेल्या "पडो पुत्रशोकानळी शीघ्र काया" (१।२४) या शापात पुत्रप्राप्तीचा वरही पुत्रहीन दशरथाच्या दृष्टीने अनुस्यूत आहे. या शापातील शोकानलाचा संबंध शुक्रयुद्धसमयी दशरथाने कैकयीस दिलेल्या वरात (१।२७) आहे. अशाप्रकारे श्रावणवध-पुत्रलाभ - शुक्रयुद्ध- कैकयीवर-लाभ-भावी शोकानल या घटितांनी दशरथाची भवितव्यता निश्चित होते. या ठळक घटना शेजारीशेजारी चितारून मुक्तेश्वर जणू दशरथाच्या जीवनपटाच्या मर्यादा आखतात. रामकथेचे वाचक-श्रोत्यांचे पूर्वज्ञान गृहित धरून संक्षेपामुळे निकट येणाऱ्या घटितांच्या न्यासातून आपल्या रामायणाचा रचनाबंध त्यांनी घडविला आहे. त्यामुळे त्यांच्या रामायणाला रांगोळीच्या ठिपक्यांचा रूपबंध लाभला आहे.

संक्षेपकथनाच्या भूमिकेतून लिहिलेल्या त्यांच्या रामायणात आवेगी भावना व ओघवती वाणी हा त्यांच्या भारताचा गुण अभावाने आढळतो. संक्षेपशील कवीजवळ जो संयम असावा लागतो तो त्यांच्या कविप्रकृतीत मुळातच कमी होता. संक्षेपबंधनामुळे त्यांची प्रतिभा जखडल्यासारखी वाटते. संक्षेपासाठी त्यांनी स्वीकारलेली वृत्तयोजना व जोपासलेले भाषेचे विशिष्ट रूप हेच त्याचे कारण आहे. त्यामुळे संक्षेपाकडून विस्ताराकडे ते नंतर झुकत गेल्याचे दिसतात. रामायणी कांडांची क्रमशः वाढत गेलेली वाढती श्लोकसंख्या हा त्याचा स्पष्ट पुरावा आहे. तरीही मुक्तेश्वरांनी उपयोजिलेल्या संक्षेप-

दृष्टीचे ऐतिहासिक महत्त्व नाकारता येणार नाही. वृत्त, भाषा, निवेदन, रचनाबंध संक्षेपदृष्टीने वाकवून मुक्तेश्वरांनी रामकथेचे सुबक लेणे निर्मिले, असेच म्हटले पाहिजे. त्यामुळे त्यांचे रामायण वेगळ्या घाटाचे उतरले आहे.

### ५. निवेदन शैलीचे काही विशेष

व्यक्तिप्रसंगांची गर्दी उसळलेल्या महाकाव्यासारख्या वस्तुनिष्ठ वाङ्मय प्रकारास उपयुक्त अशी त्रयस्थ निवेदनपद्धती मुक्तेश्वरांनी यशस्वीपणे वापरली आहे. या निवेदनाच्या पोटात कधी निवेदकाची जागा सुग्रीव (४।२७–४३), अगस्ती (७।६–२५२) यांसारख्या कथांतर्गत व्यक्ती घेताना दिसतात. काळ-व्यक्ती व घटनास्थल यातील परिवर्तन सुचविण्यासाठी ते कधी प्रस्ताव करतात. "येरीकडे" (३।९३) असे म्हणून सीताहरणानंतरचा रामाचा विलाप ऐकविण्यासाठी ते आपल्याला पुन्हा पंचवटीत घेऊन जातात. सीताहरणापासून रावणाच्या कामातुरतेपर्यंत सलग वृत्तकथन केल्यावर त्याशेजारी वियुक्त रामाचे वर्णन ठेवून ते विरोध साधतात. घटनांच्या न्यासातून रामायणाचा रूपबंध आकारतो तो असा. सलग कथेच्या संदर्भात येणारा तपशील-वर्णन - कथा असा आनुषंगिक भाग सांगून झाल्यावर "असो" या शब्दाचा वापर करून मुक्तेश्वर मूलकथेचे सूत्र उचलतात. ही लकब मुक्तेश्वरांच्या पूर्वोत्तर रचनेत आढळणारी असून ती निवेदकाची जाणीव करून देणारी आहे. रामाविषयीच्या अतीव प्रीतीने मुक्तेश्वर कधी आपले ताटस्थ्य विसरतात. राक्षसाच्या आवेशाचे वर्णन करताना "रणीं ग्रासिला देव हो। राम राखा" (६।९७) अशी ते रामाची चिंता करू लागतात. वर्ण्यविषयाविषयी बोलता बोलता वर्ण्यविषयाचाच भाग बनतात. संबोधनांचा वापर, घटनांवरचे भाष्य, उद्देशून बोलण्याचा ढंग यामुळे त्यांच्या निवेदनाला वक्तृत्वगुण लाभला आहे.

अनुलोमपद्धतीच्या निवेदनामुळे कथांतर्गत आभासात्म वर्तमान जणू सजीव होतो. अनुलोम निवेदनपद्धतीच्या पोटात आवश्यकतेनुसार पूर्वनिवेदनाचे तंत्र (७।६–२५२) त्यांनी खुबीने वापरले आहे.

उत्सुकतावर्धनाचे तंत्र ते कुशलतेने कसे हाताळतात ते लवकुशाख्यानात दिसते. कथांतर्गत व्यक्तींची उत्सुकता गूढता निर्मून त्यांनी खेचली आहे तर विश्वासात घेऊन वाचकाची रहस्योद्घाटनाविषयीची उत्सुकता चाळविली आहे. कथाबंधाची औत्सुक्यवर्धक गुंफण करताना कुतूहल चाळविणारे सूचक निर्देशही ते करतात. कथेच्या विकासातील वळणे प्रत्यक्षाप्रत्यक्ष पद्धतीने नोंदविण्याची त्यांची लकब आहे. कांडांचे उपसंहार व पात्रांच्या उक्तीकृतीवरील भाष्य यांचा त्यासाठी ते क्वचित वापर करतात. प्रत्यक्ष भविष्यकथन, उत्पातवर्णने, सूचक प्रसंग, शकुनापशकुनाच्या श्रद्धा आणि स्वप्न यांचा कलात्मक वापर करून ते भावी घटनांचे सूचन करतात.

घटितावर सूत्रात्मक भाष्य करून कथासूत्र व अध्यात्म यांची एकरसता ते साधतात.

प्रसंगभावांची क्रमबद्ध मांडणी, साक्षी व्यक्तीच्या प्रतिक्रिया टिपणे आणि एकाच घटनेचे अनेकांगी परिणाम चितारणे त्यांना प्रिय आहे. संक्षेपदृष्टीमुळे रसस्थळी रेंगाळण्यास येथे फारसा वाव नाही. तरी आहे त्या अवकाशात आपले निवेदन ते भाव-प्रतीतीक्षम करतात. अर्थघन शब्द, विशेषणबाहुल्य व संदर्भ पेरीत जाणारी शैली यांमुळे थोडक्यात ते ठसठशीत भावचित्रे रेखाटतात. घटनांचा वेग, वर्णनातील बारकावा, अलंकारांचा प्रयोजक वापर व उपरोक्त शैलीविशेष यामुळे त्यांचे नवेदन भरगच्च झाले आहे. चित्रविचित्र गोष्टींचा एक धावता पटच त्यामुळे आपल्यासमोर उलगडत जातो.

### ६. समारोप

रामकथेचे पूर्वज्ञान गृहीत धरून निकट येणाऱ्या घटनाप्रसंगांच्या न्यासातून मुक्तेश्वरांनी घडविलेली संक्षेपरामायणाची रूपाकृती रांगोळीच्या ठिपक्यांसारखी आहे. सूत्रनिष्ठ संक्षेप या रचनाबंधाच्या नियामक तत्त्वामुळे त्यांच्या रामायणास पार्थक्य आले आहे. त्यामुळे आर्षकाव्यांच्या मराठी संस्करणात संक्षेपप्रवृत्तीचा उदय झाला. दैव,कर्म,अवतार व भक्ती या मूल्य स्वीकाराने वास्तव व वीररसात्मक रामकथेला त्यांनी दिव्यमानुष व भक्तिरसात्मक बनविले. रामकथेच्या भक्तिपरंपरेतील हे अवतरण असल्याने त्यातील नवार्थ सापेक्ष आहे. अश्लीलता, कालविपर्यास हे आरंभापासून बीजरूपाने असणारे मुक्तेश्वरी कथाबंधाचे विशेष येथे सौम्यरूपात दिसतात.समकालीन वास्तवाचे भान त्यात कमी आहे. त्यांचे अद्‌भुताचे आकर्षण व विनोदबुद्धी मात्र ठसठशीतपणे प्रकटली आहे. तंत्रकुशल प्रतीतीक्षम निवेदनपद्धतीमुळे रामकथा येथे सुघडपणे आविष्कृत झाली आहे.

## तीन ॥ संक्षेपरामायण : व्यक्तिचित्रण

### १. प्रास्ताविक

व्यक्तिरेखन ही कथा विकासाचीच दुसरी बाजू असल्याने महाकाव्यासारख्या कथाप्रधान वाङ्मयबंधात त्याला अधिकच महत्त्व येते. रामायणी पात्रे जनमानसाच्या गाभाऱ्यात स्थिर झालेली पात्रे आहेत. लोकमानसाने आपले असे रंग त्यांना दिले होते. पूर्ववाङ्मय-परंपरेत त्यांचे चित्रण विशिष्ट प्रकारे झाले होते. त्यांच्या चित्रणात कविकालीन संस्कृती व जीवनमूल्ये यांचा अनुप्रवेश अपरिहार्य होता. या साऱ्यांमुळे मुक्तेश्वरी रामायणातील व्यक्तिरेखाना विशिष्टता आली आहे. या विशिष्टतेचे भान ठेवून त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

### २. काही व्यक्तिचित्रे

मर्यादापुरुषोत्तम राजा राम येथे देवावतार म्हणून नांदत आहे.पितृभक्त सत्यनिष्ठ पुत्र,

पत्नीवर उत्कट प्रीती असणारा पती, प्रजाहितदक्ष आदर्श राजा, शत्रूला यथोचित धडा शिकविणारा मानधन क्षत्रिय, भक्त-अभक्तांचा उद्धार करून आर्तपरित्राण करणारा सुरबंधमोचक देवावतार अशा लौकिक-अलौकिक रूपांची मिसळण त्याच्या व्यक्तिमत्त्वात झाली आहे. आपापल्या भूमिकेवरून साऱ्या पात्रांचा मोहरा त्याच्याकडेच वळलेला आहे. राम ही अशी केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. सुग्रीवाचा मंत्री, अरिकुळवनदाही रामभक्त हनुमान त्याच्या श्रद्धानिष्ठा व बलचातुर्यासह येथे उठावदारपणे आविष्कृत झाला आहे. वृक्षाला बिलगलेल्या वेलीसारखा बंधुनिष्ठ लक्ष्मण, भक्तीच्या भगव्या छटेने रंगलेला निरिच्छ भरत, स्वार्थी कैकयी, व्याकुळ दशरथ, बलशाली मातृभक्त लवकुश या अन्य व्यक्तिरेखाही मुक्तेश्वरांनी त्यांच्या स्थूल बाह्यरेषा संभाळून ठोसरपणे रंगविल्या आहेत.

कथा घडविणाऱ्या ठळक व्यक्तींबरोबर गौण व्यक्तीही मुक्तेश्वर काळजीपूर्वक रंगवितात. शूर्पणखेची रामलक्ष्मणांनी केलेली क्रूर चेष्टा वाल्मीकिरामायणात अन्यायकारक वाटते. मुक्तेश्वरांनी पुत्रवधाचा सूड व दुष्टभाव या प्रेरणा तिच्या कृतीमागे उभ्या करून रामलक्ष्मणांच्या कृतीस समर्थनीय बनविले आहे. शूर्पणखाविटंबनेत त्यांनी हास्याचे रंगही भरले आहेत. बोलताना लाजणारी आणि "पाळिजे स्वामी। या बंधुभाजे . . ." (३। २६) असे म्हणून गळचात पडणारी ही शूर्पणखा लक्षात राहते. तिचे तर्कचातुर्य, 'वनिताविद्या' वापरण्यातील आत्मविश्वास, मुखातील शब्दमाधुर्य आणि अंतरंगातील हलाहल, तिने केलेले लाघवी नाटक आणि तिला मिळालेले कुबुद्धीचे भीषण फळ यांतून तिचे व्यक्तिचित्र (३। २०–३०) चांगले उभे राहते. विकल्प (२। ८–१०), अहल्या (१। ७९–८६), वाली (४। ५८–६२), नारद (७। ११४-११५) अशी कथौघात येऊन जाणारी व्यक्तिचित्रे लेखणीच्या फटकाऱ्याने त्यांनी समूर्त केली आहेत.

समर्पणमयी सीता हे मुक्तेश्वरांनी रेखलेले वेल्हाळ चित्र आहे. येथे ती प्रथम दिसते ती यौवनाच्या देहलीवर उभी असलेली स्वयंवरातील राजकन्या म्हणून. बलशाली राम जेव्हा धनुष्य उचलतो तेव्हा प्रत्यंचाच नव्हे तर सीतेचे हृदयही तो ओढून घेतो. या प्रेमापोटीच वनगमन करणाऱ्या रामाबरोबर 'तुम्हा वेगळी आन विश्रांति नाही' (२। ३६) अशा पतिव्रतेच्या निष्ठेने ती वनाची वाट तुडविते. रामाची ती "प्रिया मानसतापहर्ती" (३। २) आहे. मृगाच्या कनकचर्माचा स्त्रीसुलभ मोह, दानवी माया न कळल्याने लक्ष्मणाला दुखविण्याची उताविळी, यांमुळे ती रावणाच्या तावडीत सापडते. याप्रसंगीच्या व्याकुळ हाका, हताश प्रश्न आणि मीलनाच्या आठवणी यांनी विव्हल झालेल्या सीतेचा ब्रह्मकटाह जागविणारा विलाप हृदयस्पर्शी उतरला आहे. त्यातून प्राप्तकर्माचे अंतर्मुख होऊन केलेले आत्मपरीक्षणात्मक अवलोकन, कार्यकारणभावाची लावलेली संगती, खूण म्हणून दागिने धरेवर टाकण्याचे चातुर्य असे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकांगी दर्शन घडते.

रावणाच्या उग्र बंदिवासात लोभ-प्रलोभन आणि छलकपट यांना निर्भयतेने टक्कर देत तिची रामनिष्ठा अविचल राहते. हनुमंताने रामाची कुशलवार्ता सांगताच ती एकाच वेळी आनंदित आणि व्याकुळ होते. राममुद्रिकेशी हितगुज करणारी विरही सीता वाचकाला विव्हल करते. हनुमंताला वाचविण्यासाठी ती आपल्या पावित्र्याची पुण्याई कृतज्ञतेने त्याच्या पाठी उभी करते.

रावणवधानंतरच्या अग्निदिव्यात तिचे पावित्र्य लखलखीतपणे तळपत राहते. आता सोनेरी पावलांनी सुख रामसीतेच्या आयुष्यात येते. रामसीतेच्या परस्पर-प्रीतीची उत्कटता दोहदपृच्छेसारख्या नाजूक प्रसंगातून मुक्तेश्वरांनी फुलविली आहे. (७। २७५–२८३). रामाच्या मनाला जाणवणारे सीतेचे उत्कट सौंदर्याकर्षण आणि सीतेची रामाच्या ठायी असणारी अनन्यनिष्ठा असे दोनच रंग वापरून मुक्तेश्वरांनी हे प्रीतीचित्र सजीव केले आहे. या पार्श्वभूमीवर प्रजानुरंजनार्थ रामाने केलेल्या सीतात्यागास विलक्षण कठोरपणाचे परिमाण प्राप्त होते. सीतेची निरपेक्ष प्रीती, प्रसंगातील नाटचछद्म, वर्तमान वेदनेशी भूतकालीन सुखाचा जोडलेला धागा, संवादी निसर्गचित्रण यातून सीतात्यागाचे क्षोभकारी भावतांडव आकार घेते.

"बरें त्याजिलें ते मनी क्लेश कोटी, जया देखतां सांडिलें सर्व पोटीं" (७। ४३०) असे लवकुश आता तिच्या जीवाचा आधार बनतात. ज्यांच्याकडे पाहून अश्रू गिळावयाचे ते संकटात पडल्याचे पाहून ती आपल्या दुर्दैवाला दोष देते. पण ही मुलेच रामासह सैन्याचा पराभव करून तिच्यावरील अन्यायाचे अंशतः परिमार्जन करतात. परित्यक्ता सीतेचे मातारूपातील हे रेखाटन समाधानाचे चांदणे पसरविणारे आहे.

वाल्मीकीच्या आश्रमात राहणारी कांतध्यानधरा, रामवियोगतप्तहृदया सीता अबोल कारुण्याची प्रतिमा आहे. थरथरल्या कायेने, दाटल्या कंठाने, झरत्या नेत्रांनी वल्लभाच्या प्रेमरंगात बुडालेली ती काषायवासिनी शुभानना यज्ञसभेत येते. पण या अखेरच्या स्वीकाराच्या क्षणीही तिला दिव्याची अट घालण्यात येते. तेव्हा मात्र "त्वरे वाट दे, वीवरी माधवीये" (७। ५६४) अशा आर्त आळवणीतून तिचे पिळवटलेले हृदय आविष्कृत होते. स्त्रीच्या पावित्र्याचा मानदंड उभारीत सीता अंतर्धान पावते.

उत्कट प्रणयिनी, निर्भय पतिव्रता, वत्सल माता अशी ही सीता दुःखाचे घुटके गिळते आणि आपल्या प्रीतीचे निर्मळ चांदणे तेवढे रामावर पसरीत राहते. तिच्या रूपाने स्त्रीजीवनाची परिपूर्ण आदिप्रतिमा आपल्यासमोर उभी राहते. लक्ष्मीचा अवतार (६। २५), मायासीतेची कल्पना (७। ४३२) यामुळे तिच्या व्यक्तिरेखेला अलौकिकाचा रंग मुक्तेश्वरांनी दिला आहे. वेदवतीचा पूर्वजन्म (७। ७५–७९) किंवा तिच्या जीवनातील ठळक घटनांचे कर्मवादी स्पष्टीकरण करून स्वतःला अभिप्रेत असलेल्या सांस्कृतिक मूल्यव्यूहात मुक्तेश्वरांनी सीतादर्शन घडविले आहे. त्यामुळे त्या घटितांमागील मानसक्रियांचे चित्रण त्यांनी केलेले नाही. अलौकिकाचा अतिरेकी वापर टाळल्याने सीताचित्रात मानवी सजीवतेचे रंग त्यांनी भरले आहेत. घटितां-

मागील मानसक्रियांची गुंतागुंत त्यांनी चितारली नसली तरी घटनांचे भावानुभव उत्कटतेने रंगविले आहेत. त्यामुळे मुक्तेश्वरांची सीता लक्षणीय झाली आहे. त्यांच्या अन्य व्यक्तिचित्रांबद्दलही हेच म्हणता येण्यासारखे आहे.

### ३. पात्रसृष्टी : काही विशेष

नानाविध वृत्तिप्रवृत्तीची माणसे आणि त्यांची मने यांचे जिवंत चित्रण रामायणात आहे. भव्योदात्त घाटाची, अद्‌भुताशी जवळीक करणारी, भिन्न संस्कृती, वंश व स्तर असलेली ही पात्रसृष्टी आहे. अनेक पात्रांची येथे गर्दी उसळलेली असली तरी प्रत्यक्ष कथा घडविणारी पात्रे मोजकीच आहेत. ही उच्चकुलीन, उच्चपदस्थ पात्रे समाजाच्या सर्व थरांच्या संपर्कात येतात. या व्यक्तींच्या रूपाने सकल समाजाचीच सुखदुःखे त्यात एकवटलेली आहेत. त्यामुळे रामायणातील व्यक्तिरेखांना प्रतीकात्मकता व आदर्शात्मकता यांचे परिमाण लाभले आहे. आदिकवी वाल्मीकीने कल्पिलेल्या पात्रसृष्टीचे स्थूल स्वरूप मुक्तेश्वरांनी कायम ठेवले आहे. त्यामुळे रामायणी पात्रसृष्टीचे हे विशेष संक्षेपरामायणातील पात्रसृष्टीलाही लाविता येतील.

देवांनी पाठविलेला विकल्प, रामपरीक्षा पाहणारी तुकाई, इंद्रजितपत्नी सुलोचना यांसारखी वाल्मिकिरामायणात नसलेली पात्रे संक्षेपरामायणात आहेत. पण हे नाविन्य सापेक्ष आहे. भावार्थरामायणात ही सारी पात्रे आहेत. त्यामुळे स्वतंत्र पात्रनिर्मितीचे श्रेय मुक्तेश्वरांना देता येण्यासारखे नाही.

इतिहास-पुराणातील मूलद्रव्य घेऊन जेव्हा उत्तरकालीन कलावंत त्याची पुनर्निर्मिती करतो तेव्हा बदलत्या काळातील जीवनमूल्ये आणि वाङ्मयमूल्ये यांनी ती अपरिहार्यपणे संस्कारित होते. रामायणी पात्रे मुक्तेश्वरांच्या हातून अशी कळत नकळत बदलली गेली आहेत. मुळात रावणाच्या मृत्यूनंतर मंदोदरी बिभीषणाची पत्नी होते. मुक्तेश्वरांचा बिभीषण मात्र "जननिसम समस्ता पाठवी धामधामा" (६।४१९) असा रावणस्त्रियांना घरोघर पाठवितो. हे बदललेल्या संस्कृतीचे निदर्शक आहे. मर्यादापुरुषोत्तम रामाची केन्द्रवर्ती व्यक्तिरेखा देवावताराच्या पातळीवर गेल्यामुळे तिच्या बरोबरचे अन्य पात्रांचे लौकिक संबंध पुसले जाऊन त्यांना प्रायः देव-भक्त-संबंधांचे रूप येते.

लौकिक आणि अलौकिक अशा उभयविध पातळीवर वावरणारी व्यक्तिचित्रे हे मुक्तेश्वरांचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. राम-लक्ष्मण, भरत-शत्रुघ्न, सीता या साऱ्या व्यक्तिरेखा अवतारी आहेत. त्यांचे एक टोक असे अलौकिकाशी बांधलेले आहे. पण त्यांना वागावे लागते ते लौकिकात. साहजिकच त्यांच्या व्यक्तिरेखांना लौकिक-अलौकिकतेचे दुहेरी परिमाण प्राप्त होते.

रामाच्या वनगमनसिद्धतेचे "कृपासागरा नागराज्या निवासा नसे काम तो राम पोशी सुराशा" (२।३४) असे वर्णन मुक्तेश्वर करतात. येथे अवतार प्रयोजन जागे आहे.

व रामही ते बोलून दाखवितो (६।३६–३७). अशा वेळी अलौकिकाची जाण ठेवूनही त्यांच्या लौकिकातील वागण्याबोलण्याला संगती प्राप्त होते. कधी त्यांच्या कृती-उक्तीचे त्यातून स्पष्टीकरण मिळते. या दोन्ही पातळयांच्या संघातातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वला कधी अर्थपूर्णता येते. या दुहेरी पातळीमुळे कधी सौम्य विनोदाचा आविष्कार होताना दिसतो. ज्याचे नाम भवसागर तारते त्या रामाने जान्हवी तरून जाण्यासाठी नावाडयाची प्रार्थना करावी (२।५७), अशा निर्देशातील गंमतीदार विरोधाभास गालाला खळी पाडणारा आहे. कधी मात्र या दुहेरी जाणीवा विरस करतात. मायासीतेच्या कल्पनेमुळे (६।४३२) सीतेच्या व्यक्तिरेखेतील जिवंतपणावरच आघात होतो. कांचनमृग हा मायामृग असल्याची रामसीतेची जाणीव (३।५३) मानवी अंशाचे सहजचित्रण पुसून टाकते. लवकुशाख्यान वर्णिताना एका बाजूला लौकिक राजा रामापासून लवकुशांचे रहस्य मुक्तेश्वर दडवू पाहतात तर दुसऱ्या बाजूला अलौकिक रामप्रभूला सारे ठाऊक असल्याचा भासही निर्माण करतात. परिणामतः येथील रामाचे चित्र दोन पूर्ण वेगळया पातळीवर किवा एकात्म रूपात चित्रित करता आलेले नाही. दोन्ही पातळयांचा सांधा जेव्हा जुळत नाही तेव्हा मात्र त्यांच्या व्यक्तिरेखा विसंध होतात आणि त्या विसंगत वाटू लागतात.

लौकिक-अलौकिकाची ही सरमिसळ आणखी एका प्रकारे त्यांच्या व्यक्तिरेखांवर परिणाम करते. जेथे लौकिक व्यक्तींच्या जीवनात देवांसारख्या अलौकिक शक्ती ढवळाढवळ करताना दिसतात (१।७१,७७,११९, २।७–८, ६।३५१, ७।३६३, ५२५–५२६, ५४३–५४४,५५५,५६३,५६९ इ.) असे अलौकिकही येथे लौकिकाच्या रंगानेच रंगते. राज्याभिषेकाला अडथळा करण्याची विकल्प टाळाटाळ करीत आहे. तो शोकसंतप्त झाला आहे आणि केवळ ब्रम्हदेवाच्या भिडेने निघाला आहे (२।७–१२.) अलौकिकाचे चित्रणही मुक्तेश्वरांनी असे लौकिकाच्या भावच्छटांनी केले आहे.

मंथरा (२।१२) व कैकयी (२।१८) यांचे कौटिल्य देवांनी प्रेरिलेल्या विकल्पामुळे आले आहे. याचा अर्थ असा की त्या खऱ्या कुटिल नव्हेत. अलौकिकत्वाचे सूत्र धरल्यामुळे व्यक्तिरेखांना दुहेरी परिमाण लाभते व सर्वांचे बचावात्मक समर्थन शक्य होते. खलपात्रांचे उदात्तीकरण होते.

अलौकिकाचा लौकिकात अनुप्रवेश, अलौकिकाचे लौकिक छटांनी चित्रण, व्यक्तीचे समर्थन व बचाव अशा अनेक दृष्टीनी लौकिक-अलौकिकाची ही सरमिसळ महत्त्वाची ठरते. तथापि अशा प्रकारच्या बाह्यनियोजनाने व्यक्ती आपल्या कर्माला जबाबदार राहत नाहीत. कृती आणि स्वभाव यांचा सांधा असा निखळल्यामुळे व्यक्तिचित्रणाच्या मूलभूमिकेवरच आघात होतो.

कदाचित मानवी जीवनाचे बाह्यनियंत्रित व पूर्वनियोजित रूप मुक्तेश्वरांना त्यातून उभे करावयाचे असावे. दैवाची अटळता, अलौकिक शक्तीचा हस्तक्षेप, शाप आणि वराने येणारी बद्धता आणि भविष्यवाणीचा ऐकू येणारा पायरव यामुळे येथील व्यक्तीचे

जीवन नियंत्रित होत आहे. परिणामतः कृती व स्वभाव यांच्या संबंधावरच आघात होतो. अशा वेळी मूल्यकल्पना, संस्कृतिव्यूह आणि अभिप्रेत जीवनानुभवाचे कल्पित रूप साकल्याने लक्षात घेऊन व्यक्तिचित्रणाकडे पहावे लागते. कर्मफलाच्या विचाराने व्यक्तिस्वभाव व कृती यांचा सांधा वेगळ्या पद्धतीने सांधला जातो, हेही या संदर्भात नमूद करावयास हवे.

अलौकिकत्वाच्या या धाग्यामुळे वाल्मीकिरामायणातील व्यक्तिचित्रणाच्या वास्तवच्छटा पुसट झाल्या आहेत. राम (वारा २।५३) किंवा अंगद (वारा ४।५५) यांची मानवसहजता व त्यातील तीव्रता येथे नाही. व्यक्तिरेखांचे असे वास्तव बारकावे मुक्तेश्वर दुर्लक्षितात.

व्यक्तिरेखांना तीव्रतेचा पीळ भरणे मुक्तेश्वरी रचनेत सर्वत्र दिसते. येथेही नारद (१।५१), दशरथ (१।१०६) आनंदाने नृत्य करतात. रामलक्ष्मणांना पाहून सुग्रीव भीतीने पळतो (४।२). रावण बिभीषणाला तर लाथच मारतो (६।१५). उत्कटता या वाङ्मयीन मूल्याचे पर्यवसान मुक्तेश्वरी काव्यसृष्टीत कधी अशा अतिरेकात होते. अर्थात् त्यामुळे मुक्तेश्वरांच्या पात्रसृष्टीवर मनस्वीपणाचे रंग चढतात, हेही खरे.

पात्रांना भावी घटना ज्ञात असल्याचे मुक्तेश्वर दाखवितात (३।११८,१२०. ६।२८५–२८६. ७।२३२), हातातून निसटलेल्या रावणाला उद्देशून "पुढा लौकरी येतसे याचि काजा" (३।८६) असे त्यांचा हनुमंत सरळ सांगून टाकतो. यामुळे मुक्तेश्वरी कथाबंधात भविष्यकल्पनेचा शिरकाव होतो.

या पात्रांना एक मूल्यात्मक परिमाण आहे. लक्ष्मणाच्या त्यागप्रसंगी (७।६११–६१४) डोळे झाकणारा, अश्रू ढाळणारा राम व्याकुळ झाला आहे "न संडी कदा आपुला नेम राजा। विचारू नको 'तू वधीं देह माझा" असे म्हणणारा लक्ष्मण मात्र मूल्यनिष्ठेने उजळून निघतो. "अहो ! सत्य संरक्षिजे प्राणमोले" (७।६१२) अशी वसिष्ठांनी गायिलेली सत्यप्रतिष्ठाही त्याला पूरक आहे. येथे मनुष्यसुलभ भावना आणि अलौकिक मूल्यनिष्ठा या दोन्हीचे पीळ मुक्तेश्वर यथार्थपणे दाखवित आहेत. रामायणी व्यक्ति-रेखाही अशाच मूल्यगर्भ आहेत. सीतेची पतिनिष्ठा, लक्ष्मण-भरताची वचननिष्ठा आणि मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्राची मूल्यनिष्ठा त्यातून आविष्कृत होते. अत्युत्तम सद्गुणांचा मूल्यगर्भ संस्कार करण्याचे रामायणाचे सामर्थ्य केवळ अतुलनीय आहे. रामायणी व्यक्तिरेखांचे हे मूल्यगर्भ रूप जाणून मुक्तेश्वरांनी ते जोपासले आहे आणि मुळात अस्पष्ट असलेल्या भक्तीसारख्या मूल्यांची जोड देऊन ठसठशीतपणे चितारले आहे.

### ४. व्यक्तिचित्रणाच्या नाना परी

व्यक्तिरेखांना सजीव करण्यासाठी मुक्तेश्वर नानाविध चित्रणतंत्रांचा वापर करतात.

कृती आणि स्वभाव यांचा सांधा पक्का जुळलेला असणे हे यशस्वी व्यक्तिरेखनाचे

गमक असते. उपलब्ध कथासूत्रातील ही जुळणी मुक्तेश्वरांनी कायम ठेविल्याने त्यांच्या रामायणात हे वैशिष्टय आपोआपच आले आहे. कर्मफल कल्पनेने हा सांधा ते कधी प्रत्यक्षपणे जुळविताना दिसतात. त्याबरोबर दैववाद आणि अलौकिकाचा हस्तक्षेप यामुळे त्यावर आघात होतानाही दिसतो. अशा वेळी या व्यक्तिरेखा दुभंगल्यासारख्या वाटतात. मुक्तेश्वरांनी उभी केलेली लौकिक-अलौकिक पात्रसृष्टी, त्याच्या भोवतीचा सांस्कृतिक व्यूह, त्यास आधारभूत असणारा तत्त्वविचार व धार्मिक प्रेरणा लक्षात घेऊनच अशा व्यक्तिरेखांचे यथार्थ आकलन शक्य आहे.

कृतीप्रमाणे उक्तीतूनही मुक्तेश्वर स्वभावदर्शन घडवितात. भरत-कैकयी संवादात (२।८३–९२) कैकयीचा उत्तरोत्तर वाढत गेलेला उघडावागडा स्वार्थ आणि त्याचे निर्लज्ज समर्थन आहे. भरताचे पितृप्रेम-बंधुनिष्ठा, लौकिक वैभवापेक्षा अलौकिक सद्गुणावरची त्याची प्रीती आणि दुष्कृत्यांविषयीचा सात्त्विक संताप प्रकटला आहे मुक्तेश्वरांचे संवाद असे स्वभावप्रकाशक असतात.

कधी त्यांची पात्रे स्वमुखाने स्वत:विषयी सांगतात. "मुखी शब्द एकू, करी बाण एकू। जगी पत्नि एकू, व्रते काम एकू। प्रतापी महीमंडळी राम एकू, म्हणे, "सोडिजेना कधी नेम एकू"।।" (२।११६) असे रामाच्या श्रद्धानिष्ठांचे राममुखाने वर्णन आले आहे. सीता (५।९१), वाली (४।५८–६२) यांसारख्या व्यक्तींच्या स्वकथनातून त्यांच्य जीवननिष्ठा आणि स्वभावविशेष मुक्तेश्वरांनी आविष्कृत केले आहेत.

कधी त्यांची पात्रे दुसऱ्याविषयी बोलतात आणि त्यातून अप्रत्यक्षपणे पात्रचित्रण होते (२।८. ३।७०, ५।८०–८१. ६।५६–५९, २०८–२०९, ४१७–४१८). भरताला पाहून मत्सर लाजतो असे कैकयी (२।१६) मंथरेला सांगते. बिभीषणमुखाने (६।२०८–२०९) उभे केलेले लक्ष्मणाचे सात्त्विक चित्र या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. सीता, हनुमंत, अंगद, अगस्ती अशा किती तरी व्यक्तींच्या मुखातून रामाचे स्वभाव-विशेष स्पष्ट झाले आहेत.

आपल्या पात्रांच्या कृतीवर भाष्य करूनही मुक्तेश्वर त्यांचे आरेखन करतात मरीचीला नापसंत असूनही रावण सीताहरणाचा हेका सोडीत नाही. "परि मूढ काही नेघे" (३।४८) असे भाष्य करून मुक्तेश्वर त्याच्या कृतीची अनिष्टता स्पष्ट करतात.

कधी अशा प्रकारचे भाष्य त्या व्यक्तीवर अन्याय करणारेही ठरले आहे. सीतेचे वनगमनाचे दोहद सात्त्विक व कृतज्ञतादर्शक आहेत. त्याचा तृष्णेची अनिवारता व अटळ फळभोग यांच्याशी मुक्तेश्वरांनी लाविलेला संबंध (७।२८३) तिच्यावर अन्याय करणारा आहे.

कधी वाच्य शब्दाऐवजी सूचक उपमानांनी ते आपला अभिप्राय कलात्मकतेने सूचित करतात. रामबाण संत सन्मार्गवर्ती तर रावणशर वाम कौळिकपंथी (६।२७४), अशा उपमानांनी रामरावणांची श्रेष्ठकनिष्ठता त्यांनी सुचविली आहे.

कधी त्रयस्थ निवेदनातून विधानात्मक पद्धतीने ते व्यक्तींच्या मनोभावाची ओळख

करून देतात. रामभक्त भरत (२।३), मतिनिर्मळ भावशील सुमंत (२।४४), कापट्यशील इंद्रजित (६।२००), विरक्त दशरथ (१।१८) त्यांनी ठोसरपणे चित्रिले आहेत. मंदोदरी (१।५८, ६।१६०), रामदर्शनासाठी आतुरलेला भरत (६।४४५) अशी व्यक्तींची रूप व भाव दाखविणारी चित्रे त्यांनी नाजूक हातांनी रेखाटली आहेत.

रूपवर्णने व्यक्तिरेखांना हाडामांसाच्या रूपात आपणासमोर उभी करतात. अशी विस्तृत व सलग रूपवर्णने करण्याची प्रवृत्ती मुक्तेश्वरी रामायणात दिसत नाही. आविर्भावचित्रण मात्र ते वैपुल्याने करतात (४।४३, ५।१०७, ११०–११२, ६।७८, ७९,८१,१९९,२६६,२७५,२८१,२९३,३५३,३७५,३८२,३८८, ७।३२०,५०८). करकरा दाढा खात शत्रूवर चालून जाणारा (६।२६६), दंड ठोकणारा (६।१९९), हाती धनुष्य घेऊन गरजणारा (६।३५४), अशा आविर्भावांनी रणभूमीवरील राम सजीव होतो. रागाने तरवार उपसणारा (५।७९), डोळे पुसून (६।२७५) मन स्थिर करून शत्रूकडे पाहणारा (६।३७५), हात रगडीत दातओठ खाणारा (६।३५३) रावण या आविर्भावातील बारकाव्यांनी लक्षात राहतो. आविर्भाववर्णनांनी त्यांची पात्रे स-रूप व जिवंत होतात. या आविर्भावांना अनुभवाची पातळी लाभल्याने त्यातून त्यांनी भावदर्शनही साधले आहे.

व्यक्तींच्या प्रतिक्रिया अचूकपणे टिपून ते यथोचित स्वभावदर्शन घडवितात. रामाला अरण्यात पोहोचवून आलेल्या सुमंताला पाहुन लोकांच्या डोळयात पाणी तर राजाच्या मनात लज्जा उभी राहिली (२।६१), असे जेव्हा ते सांगतात तेव्हा त्यातून जनांची रामप्रीती आणि राजाची अपराध-जाणीव एकदमच व्यक्त होते. राम-भरताचे प्रेम पाहून सुग्रीव-बिभीषण मनोमन लाजले (६।४४९) असे त्यांनी मोठ्या मार्मिकतेने दाखविले आहे.

कधी मुक्तेश्वर एकाच घटनेविषयी दोन व्यक्तींच्या प्रतिक्रियांमधील भिन्नतेने त्यांच्या स्वभावातील पृथक्त्व स्पष्ट करतात. वृक्षशाखा टाकणाऱ्या हनुमंताला पाहून लक्ष्मण रागाने धनुष्याला हात घालतो पण राम मात्र "बाळकौतुक" (४।७) पाहतो. भरताला पाहून तो वैरभावाने आला असे लक्ष्मणाला वाटते तर तो स्नेहकाजा आला (२।१०८) असे रामाला वाटते. या उलट सीताविरहाने व्याकुळ झालेल्या रामाचे सांत्वन लक्ष्मणच करतो. आपले वेगळे मत विसरून तो नेहमीच रामाच्या बाजूने उभा आहे. एकाच घटनेच्या या दोघांच्या प्रतिक्रिया त्यांच्या स्वभावाची दोन टोके दाखवून जातात.

प्रत्यक्ष वर्तन व सुप्त प्रतिक्रिया वेगळया दाखवून व्यक्तिस्वभावातील गुंतागुंत दाखविण्याचा लक्षणीय प्रयत्न मुक्तेश्वर करतात. वनगमनाचा हट्ट धरणाऱ्या सीतेची राम समजूत काढतो, पण त्याच वेळी "प्रिया बोलता, अंतरी तोष रामा" (२।३६) असा अंतरात कोठे तरी तो सुखावतो. परशुरामाच्या (१।११७) बाह्यांतराचेही असेच नेमके चित्र त्यांनी रेखाटले आहे.

व्यक्तिरेखन ज्या शब्दमाध्यमाने करावयाचे त्याकडे मुक्तेश्वर लक्षपूर्वक अवधान देताना दिसतात. "अरिकुळवनदाही" अशा विशेषणाने हनुमंताचा पराक्रम साकार होतो. "रे रे राघव । शब्दलाघवधरा" (६।३५७) अशा संबोधनाने रामाविषयीची रावणाची सारी तुच्छता प्रकट होते. सीतारामांच्या चित्रणात त्यांच्या मानसक्रिया टिपल्या असून त्याभोवती शब्दचित्रे उभारली आहेत. त्यामुळे त्या व्यक्तिरेखांना भावात्मकतेचे परिमाण लाभले आहे. विशेषणे, संबोधने, द्विरुक्त क्रियापदे, पर्यायी शब्द या सगळ्यांची छिन्नी काळजीपूर्वक चालवून मुक्तेश्वर स्वभावशिल्पे घडविताना दिसतात. पात्रांचे मनोभाव वक्रोवितविलासाने आविष्कृत केल्याने त्यांच्या संक्षेपरामायणात विदग्ध मानसभावसृष्टी आकारली आहे.

### ५. समारोप

वाल्मीकिरामायणातील पात्रे जनमानसात स्थिर झालेली होती. लोकमानसाने त्यांना दिलेले रंग, पूर्ववाङ्मयपरंपरेतील त्यांचे चित्रण आणि स्वकालीन संस्कृतीशी होणारा त्यांचा संवाद लक्षात घेऊन आपल्या रामायणाच्या प्रकृतीशी सुसंवादी पद्धतीने मुक्तेश्वरांनी व्यक्तिरेखाटन केले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रांना विशिष्टता आली आहे. प्रतीकात्मकता व आदर्शात्मकता हे वाल्मीकिरामायणातील व्यक्तिचित्रणाचे विशेष त्यांनी जपले आहेत. त्यांनी रामकथेला दिलेल्या नवार्थामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांना बदलते रंग व मूल्यात्मक परिमाण लाभले आहे. व्यक्तिरेखांना तीव्रतेचा पीळ देणे त्यांना प्रिय आहे. त्यांच्या पात्रांना लौकिक व अलौकिक असे दुहेरी परिमाण प्राप्त होते व त्याचा त्यांच्या चित्रणपद्धतीवर मोठा परिणाम होतो. उक्ती-कृती-संवाद-भाष्य-प्रतिक्रिया-आविर्भावचित्रण अशा व्यक्तिचित्रणाच्या नाना परी शब्दमाध्यमाचे अवधान बाळगून ते वापरतात. बाह्यांतरचित्रणाने व्यक्तिस्वभावातील गुंतागुंत ते स्पष्ट करतात. दैव, कर्म, अवतार, भक्ती या मूल्यव्यूहातही व्यक्तिचित्रण निर्जीव होऊ न देता वास्तव व जिवंत प्रत्यय देण्याची मुक्तेश्वर उल्लेखनीय धडपड करतात.


## चार ॥ संक्षेपरामायण : संवाद

वृत्तकथन व वृत्तिद्योतन करून काव्यात जिवंतपणा आणणारे माध्यम म्हणून संवादाचे पुरेपूर माहात्म्य कळल्याची खूण मुक्तेश्वरी रामायणात आहे. हनुमंत-रावण (५।८०–८६) हा संपूर्ण संवाद अतिशय चमकदार, प्रसंगोचित व स्वभावदर्शक झाला आहे. "कवण तू रे! मर्कटा मृत्युकामी ?" (८०) या रावणाच्या प्रश्नात तुच्छता ठासून भरली आहे. तर हनुमंताच्या उत्तरात (८०–८१) डौल, गांभीर्य व आत्मविश्वास आहे. हनुमंतमुखाने रामाच्या पराक्रमाचे केलेले वर्णन रावणपक्षीयांच्या पराभवाच्या मालिकांतून उभे केल्यामुळे रंगदार झाले आहे. परस्परसंवाद एकाच श्लोकात गुंफण्याची

लकब (८३–८४), स्वगत उद्‌गाराचा वापर (८३), मानसक्रियेचे दर्शन (८२), संवादारंभीच्या आविर्भावातून होणारे वृत्तिद्योतन (७९), प्रश्नात्मकता (८०,८४) व उद्‌गार (८०,८३,८४) यांच्या वापराने आलेली सहजसरणी असे विशेष या संवादात एकवटले आहेत. भाषेचा डौल संस्कृत वळणाचा असूनही बोलण्याची सहज-सरणी तीत उतरली आहे. रावण-हनुमंतांचे स्वभाव, त्यांच्या परस्परविरोधी भूमिका आणि प्रसंगसंदर्भ यांनी या संवादाला धारदारपणा दिला आहे. रावण-मंदोदरी संवादातून (६।१३६–१६०) मुक्तेश्वरांच्या संवादयोजनेचे परिणत रूप दिसते तुच्छता आणि गुर्मी, आढचता आणि आत्मविश्वास, चतुर वक्रोक्ती आणि सरळ निर्भयता या भावनांचा चढतावाढता संघर्ष अंगद-रावण संवादातून (६।५६–७८) रसरशीतपणे अभिव्यक्त झाला आहे.

संवादयोजनेची निरनिराळी रूपे मुक्तेश्वर येथे हाताळीत आहेत. विरही राम व लक्ष्मण यांच्या संवादात (३।१००,१०३–१०५) दुःखाच्या जबरदस्त आघाताने स्मृतिभ्रांत राम दिसतो. त्याच्या भ्रमजन्य प्रश्नाला लक्ष्मणाने दिलेल्या उत्तरात कोठे तरी सीतेचे नाव येते आणि त्या नावाबरोबर रामाला त्याचे वेदनामय स्मरण जणू परत येते. रामाला दिसणारी दृश्ये, होणारी भ्रांती, लक्ष्मणाच्या उत्तरामुळे येणारे भान सारे सारे वियुक्त सीतेच्या स्मृतीशी बांधण्यात कवीचे कौशल्य प्रकटले आहे. विस्मृतीतून स्मृतीकडे, बधिरतेकडून तीव्र दुःखावेगाकडे हे चमत्कृतिपूर्ण संवाद झुलत राहतात. अर्थात् सारेच संवाद असे नाहीत. एकाच श्लोकात येणारे पण वैशिष्टचहीन व वृत्तात्मक संवादही येथे आहेत.

दीर्घ आणि लघु, परस्परसंवाद आणि स्वगत, खटकेबाज संवाद आणि अनुत्तरित संवाद अशा साऱ्या प्रकारचे संवाद मुक्तेश्वर सफाईने हाताळतात. निवेदन व आविर्भाववर्णनातून ते संवादारंभीची मनःस्थिती दाखवितात. संवादातील भाव-आविर्भाव उक्ती व वर्णनातून प्रकट करतात. संवादाचा परिणाम दाखविण्यासाठी व्यक्तीच्या शारीरमानसप्रतिक्रिया टिपतात. त्यामुळे त्यांचे संवाद सर्वांगांनी पूर्ण होतात. मुद्यांची क्रमवार व तर्कशुद्ध मांडणी जशी ते करतात त्याप्रमाणे भावनांचे खळाळही आविष्कृत करतात. भाषेच्या संस्कृत वळणाचा डौल कायम ठेवून ते बोलण्याचा ढंग साधू पाहतात. जेव्हा तो साधत नाही तेव्हा त्यात कृत्रिमताही येते. उद्‌गारवाचके, संबोधने, विशेषणे यांचा प्रयोजक वापर ते करतात. क्रियापदांची पुनरुक्ती, चरणाचे आवर्तन, शब्द तोडून केलेली मांडणी, निवेदनाच्या ओघात गुंफलेले उद्‌गार, प्रश्नात्मकता, उद्देशून बोलण्याचा ढंग, वाक्प्रचाराचा उपयोग ही त्यांच्या संवादशैलीची आणखी काहीवैशिष्टचे. त्यामुळे त्यांच्या संवादांना एक प्रकारची प्रत्यक्षता व सजीवता येते. भावानुसारी व भूमिकेप्रमाणे बदलणारे लवचिक संवाद ते लिहितात. आवश्यक त्या सजावटीने नटलेले संवाद हे रामायणी संवादांचे एक वैशिष्टच आहे. वक्रोक्तीची तिर्थक् गती अनुसरणारे, चमत्कृतीने नटलेले, कल्पनाविलासाने फुलारलेले हे संवाद मोठे आकर्षक आहेत.



संस्कृत काव्यनाटचांतील चतुरालापाचे सौंदर्य त्यांनी रूपान मुक्तेश्वरांनी मराठीला प्राप्त करून दिले आहे. त्यांचे संवाद कृतीला चालना देतात. आणि व्यक्तप्रसंगांना उठाव देतात. एकूण मुक्तेश्वरी रामायणातील संवाद चमकदार, प्रसंगोचित,स्वभाव-प्रकाशक व कल्पकतेने नटलेले आहेत. मुक्तेश्वरी भारतात या वैशिष्टचांसह ते अधिक स्वाभाविक होत गेलेले दिसतात.

## पाच ॥ संक्षेपरामायण : वर्णन

नानाविध वर्णनांनी मुक्तेश्वरांची रामकथा फुलारलेली आहे. महाकाव्यासारख्या निवेदनप्रधान दीर्घ रचनेत वर्णनांना असलेले महत्त्व त्यांना जाणवले असावे.

सोळाव्या शतकात महाराष्ट्रीयांचे क्षात्रतेज फाकू लागले होते "संत सरावे परते वीर पूजावे आरुते" ही महाराष्ट्राची नवी अभिरुची होती. तिची पूर्ती करणारा वीर-रसाचा साक्षात्कार येथल्या युद्धवर्णनात आहे. मुक्तेश्वराना प्रिय असलेले मल्लयुद्ध येथे विरलत्वाने (४।४८–५७) आले आहे. संकुलयुद्धे मात्र विपुल आहेत. वानर-राक्षसांच्या संकुल युद्धात (६।८२–८९) समूहदर्शनाने युद्धाचा आवाका व परस्परयुद्धाने त्यातील विशिष्टता यांचे दर्शन घडते. युद्धातील कृती, तिच्यातील गती, ती टिपणारी चित्रे, परिणामातील अत्युक्ती, अलंकारांनी दिलेली प्रत्यक्षता, द्विरुक्त क्रियापदांनी निर्मिलेला जोष व ध्वनिगर्भ शब्दांतून प्रकटलेला नादप्रत्यय यांमुळे या संकुलयुद्धाची रणधुमाळी प्रत्ययक्षम झाली आहे. रामाच्या काही युद्धवर्णनात (१।७१, ७४–७८) प्रतिस्पर्धी सहजतया निरस्त होताना दिसतात. समबल प्रतिस्पर्ध्याच्या परस्परद्वंद्वाचा प्रत्यय त्यातून येत नाही. नायक देवावतार असला की प्रतिस्पर्ध्याचा केवळ पाडाव होत नाही तर उद्धारही होतो. अशी निस्तेज, सपाट युद्धवर्णने अपवादात्मक आहेत. एरव्ही वीरांच्या शस्त्रास्त्रवर्णनात अत्युक्ती, अद्‌भुतरम्यता, आविर्भावचित्रण, भव्यता, साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रिया, तोडीस तोड संवाद, कल्पक अलंकारविन्यास आणि चित्रशैली यांनी ते रोमांचक नाटच निर्मितात. सुंदरकांडातील युद्धवर्णनावर (५।५०–५६,६७–७७) विनोदाची आल्हादक छटा पसरली आहे. उत्तरकांडातील लवकुशांच्या पराक्रमाला (७।४२५–४९८) वात्सल्याची हृदयस्पर्शी पार्श्वभूमी लाभलेली आहे. "रणधाईस रणवाद्याप्रमाणे खुलणाऱ्या" आणि "चवताळलेल्या घोड्या-प्रमाणे थयथयाट" करणाऱ्या भुजंगप्रयात वा मालिनीसारख्या वृत्तांची योजनाही युद्धवर्णनाना अनुरूप ठरलेली आहे.

रामायणातील भावोत्कट व रसपूर्ण प्रसंगांचे आव्हान मुक्तेश्वरांनी झेलले आहे. धनुर्भंगाचे वर्णन (१।८८–१००) या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. जनकाचा दुर्धर पण, वीरांच्या होडा सांडणारे धनुष्याचे भव्य रूप, रूपसुंदर जानकी आणि तिची प्रेमविव्हल स्थिती, गर्विष्ठ रावणाची फजिती, जनकाची तीव्र प्रतिक्रिया, रामाचा वीरावेश,

धनुष्याची सज्जता व धनुर्भंगाचे परिणाम - असे हे अनेक घटकयुक्त प्रसंगचित्र आहे. पौराणिक संकेतांचा, कल्पनाविलासात्मक व भावस्पर्शी वापर येथे केला आहे. दिशागोळ, उष्णमाळी, ठकारूनिया, होडा अशी शब्दकळेतील नवाई प्रसंगचित्रास उठाव देते. अत्युक्ती, कल्पकता, भव्य परिमाण, संकेताचा वेगळा वापर, नेमकी शब्दयोजना वीर-शृंगार-हास्य अशा रसांचा संन्निकर्ष यांमुळे धनुर्भंगाचे प्रसंगचित्र आकर्षक झाले आहे. मुक्तेश्वरांच्या अन्य रचनेपेक्षा रामायणी रचनेचा विशेष असा की त्यातील प्रसंगचित्रणे अनेकांगी, प्रतीतिक्षम व जिवंत साधली आहेत.

स्थलवर्णनात रावणाच्या अंतरिक्षविजयाच्या निमित्ताने (७।१६३–१७९) वैचित्र्य, वैविध्य व अद्‌भुतरम्यता यांचा धावता पट चितारला आहे. ',बहु रंग अंगी मुखे चारु चेष्टा', (६।७५) करणाऱ्या वानरांचे वर्णन (४।६९–७५) देखणे आहे तथापि, मुक्तेश्वरी रामायणात व्यक्ती-स्थल-वर्णने संख्येने कमी व गुणांनी सामान्य उतरली आहेत, असे वाटत राहते.

उत्सव (१।५०–५२), भोजन (७।६०८–६१०), सैन्य वा वीरांचे गमनागमन (६।८९–१०१) यांची वर्णने सापेक्षतया संक्षिप्त आहेत. पण ती वर्ण्यविषयाचा डौल व झोकदारपणा संभाळणारी आहेत.

लेखणीचा कुंचला करून एकेका फटकाऱ्यात व्यक्ती, त्यांचे मनोभाव व वस्तु यांना गोचर करणारी आकर्षक लघुवर्णनेही येथे वैपुल्याने विखुरलेली आहेत.

निसर्गाचे निर्देश येऊनही त्यांची रमणीयता दाखविण्यासाठी मुक्तेश्वर रेंगाळत नाहीत. कैलासपर्वतावरची चांदणीरात्र (७।१९५–१९८) तेवढी त्यांनी तन्मयतेने रंगविली आहे. वसंताने नटलली वनश्री, फुलणारी फुले, झुंकारणारे भृंग, नर्तनरत मयूर, पंचमालापा छेडणारे कोकिल, चकोर-चातक-कपोत असे निशासौंदर्यसंबद्ध पक्षी, हे सारे सांकेतिक निसर्गकवितेतील घटक येथे उपस्थित आहेत. पण त्यांचा उपयोग केवळ सांकेतिक निसर्गचित्र उभे करण्यासाठी केलेला नाही. त्यातून मुक्तेश्वरांनी एक धुंद, मदिर वातावरण यशस्वीपणे उभे केले आहे. ही धुंदी वियोगतप्तांना व्याकुळ करणारी आणि कामीजनांना उत्तेजित करणारी आहे. "वसंत वल्लभालोभे येत शोभे वनश्रिया" किंवा " कोकिला पंचमालाप करी ताप वियोगिया" ही उपमाने तिची दिशादर्शके आहेत. रावणाची कामातुरता वाढविणारे हे निसर्गवर्णन भावप्रतीतिदर्शक उतरले आहे. असे आलंबनात्मक निसर्गचित्रण संक्षेपरामायणात विरल असून उत्तरकांडातच काय ते दिसते. वस्तुतः निसर्गाची रेखीव वर्णने हे वाल्मीकिरामायणाचे ठळक वैशिष्ट्य आहे. मुक्तेश्वरांची निसर्गरसिकता निकोप आहे. असे असूनही त्यांची निसर्गप्रीती रामायणातून अभिव्यक्त होऊ शकली नाही, हे सत्य मोठे गूढ वाटणारे आहे. कृष्णदास मुद्‌गलाचा अपवाद वगळता मराठी रामायणरचनेत निसर्गचित्रणाचा अभाव जाणवतो, हेही या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. मुक्तेश्वरापुरते सांगावयाचे तर वाल्मीकि-रामायणापेक्षा भावार्थरामायणाला अधिक अनुसरल्याचा हा परिणाम असावा.

"गिरी तरु दाटी रम्य कासार" (७।३६१) यांची रमणीयता या रामायणापासून—विशेषतः उत्तरकांडापासून—त्यांना मोहवू लागल्याचे दिसते. तिचे विकसित रूप त्यांच्या भारतात आहे. निसर्गाभिरुचीचा विचार करता रामायणानंतर व भारतपूर्व काळात त्यांनी उत्तरकांड लिहिल्याच्या अनुमानास पुष्टी मिळते.

मुक्तेश्वरांची वर्णनशैली प्रत्ययक्षम आहे. एका घटनेचे साद-प्रतिसाद टिपून ते तिची बहुविधता वा व्यापकता दाखवितात. अप्रत्यक्ष पद्धतीने वस्तुवर्णन ते उठावदार करतात साक्षी व्यक्तींच्या प्रतिक्रियांनी प्रसंग-भाव रंगवितात. अत्युक्ती, अद्‌भुतरम्यता व विनोद यांचे रंग त्यांच्या वर्णनावर पसरलेले असतात. वर्णनस्थळे हेरण्याची दृष्टी त्यांच्याजवळ असली तरी संक्षेपकथनाच्या स्वीकृत भूमिकेमुळे ते फारसे कोठे रेंगाळताना दिसत नाहीत. तरी आहे त्या मर्यादेत त्यांची संवेदनागर्भ शब्दकळा चित्रदर्शी वर्णन शैलीने वर्ण्य विषयांना आकार देते. संकुल व वत्सल विनोदाची छटा असलेली युद्धवर्णने हा नेहमीपेक्षा निराळा विशेष येथे आहे. प्रसंगचित्रे, गमनागमनवर्णने व आकर्षक लघुवर्णने आता त्यांना साधू लागलेली दिसतात. मात्र निसर्ग, भोजन, स्थल, व्यक्ती यांची वर्णने अविकसित अवस्थेत आहेत. भारती वर्णनाइतका तपशीलाचा बारकावा व व्यापक आवाका रामायणी वर्णनात नाही. वर्णनाचे तंत्रविशेष मात्र त्यांना पुरेसे परिचित झालेले दिसतात. रामायणी वर्णने मुक्तेश्वरी वर्णनशैलीच्या विकसनाचा एक टप्पा दाखवितात. या विविध वर्णनांनी त्यांच्या रामायणाला विदग्धकाव्याचा डौल आला आहे.

## सहा ॥ संक्षेपरामायण : अलंकार

आलंकारिकता हे मुक्तेश्वरी अभिव्यक्तीचे एक वैशिष्ट्य आहे. वानरसैन्याच्या भयाने समुद्राला सात फाटे फुटले (४।७३), असा उत्प्रेक्षेचा वापर त्यांनी वैपुल्याने नसला तरी कल्पकतेने केला आहे. आरंभापासून मुक्तेश्वरी रचनेत दृग्गोचर होणारे रूपकही येथे आहे. खुणेची मुद्रा पाहताच जानकीच्या भावचंद्राला स्मरणराहूने ग्रासले (५।४०) अशी भावसंवाहक परंपरित रूपके ते सहजतेने वापरतात. निरंग रूपके त्यांच्या लेखणीला लगडलेली आहेत. सांग रूपके मात्र येथे विरळ आहेत. लाह्या सांडाव्यात तशी नक्षत्रे पडत होती. (५।९९, ) अशा चमकदार उपमा अधूनमधून भेटतात. द्रोणाचलावरील औषधीने लक्ष्मणाबरोबर मृत वानरही उठल्याचे सांगताना वधूबरोबर वऱ्हाड्यांनाही मिळणाऱ्या सुखाचा दिलेला दृष्टांत (६।३३५) मार्मिक आहे. बोकडाने सिंह मारला तरच रामाच्या हातून रावण मरेल (६।१५७), अशा यद्यर्थातिशयोक्तीने रावणाची आत्मप्रौढी व्यक्त होते. "वन्ही गेही" (६।१४) हे इंद्रजिताने बिभीषणाचे केलेले वर्णन अध्यवसाय अतिशयोक्तीने खुललेले आहे. अत्युक्ती या सामान्य अर्थाने अतिशयोक्तीचा वापर मुक्तेश्वर पुष्कळदा करतात. "नव्हे चंचु हे, काळदंभोलिधारा" (३।७८)

अशा अपद्धुतीने जटायूचे सामर्थ्य प्रतीत होते. सैन्यामुळे "नभी दाटला रेणु तो मेघ शंकी" (५।६८). अशा संदेहाने युद्धवर्णनास रंग चढला आहे. "उदित हवनकुंडी दीठि लोपी रवी हो" (१।३६) अशा व्यतिरेकाने अग्नितेज अधिक झळाळत राहते. लंकेतील घरांसह रावणाचा गर्वही जाळला (५।९६), अशा सहोक्तीने हनुमंत पराक्रमाचा परिणाम ठसठशीत होतो. तेजस्वी पर्वतासह येणाऱ्या हनुमंताला पाहून कपी व राम यांना सूर्याची भ्रांती होते. (६।३२६). या भ्रांतिमान अलंकाराने त्या प्रसंगाचा खुसखुशीतपणा वाढला आहे. "नंदीपतीमानसमंदिरीचा तो दीप वंदी वर इंदिरेचा" (६।२४६), असा रामाचा पर्यायोक्तीने निर्देश केला जातो. "अशोकावटी आटिला शोक लंका" (५।३४) किंवा "सुता अक्षयाने क्षयालागी देख" (५।३४),अशा चमत्कृतिपूर्ण कोटचा मुक्तेश्वर लीलया करतात. परिसंख्या हा प्राचीन मराठी कवितेत दुर्मीळ असलेला अलंकार योजून रामराज्य वर्णनात (६।४५६–४६०) त्यांनी बहार केली आहे.

मुक्तेश्वरी रामायणात शब्दालंकाराचे भारतसापेक्षतेने अधिक अवधान आहे. त्यांचे श्लेष सुबोध असतात व स्वाभाविक वाटतात. "वधूनाम तूझे जगी रूढ रामा" (६।३७०) अशा श्लेषाने रावणाची रामाविषयीची तुच्छता प्रकटते. "म्हणे, का हरी। मारिसी मेलियाते? करी साह्य आता हरी बंधनाते" (५।१६) अशा पुनरुक्तवदाभासान देवांची व्याकुळता ठसविली जाते.

क्वचित निर्यमक रचना असली (६।२३०–२३१, ४३६) तरी ती विरळ असून यमकसाधना सर्वत्र दिसते. "शोकी अशोकी" (७।२८३) असे संयुतावृत्ती चरणमध्ययमक "प्राणांतकर्मी झगटे सुवर्मी, निर्वाण उर्मी न पवे कपींद्रा" (५।३६२) असे असंयुतावृत्ती चरणमध्ययमक व पुष्पयमक (१।५४) ते साधताना दिसतात. यमकाचा हा छंद कधी वैरस्यकारक ठरतो. पुष्पयमक साधण्यासाठी रामजन्माचे वर्णन करतानाच अहल्योद्धाराचा प्रसंग त्यांना मदतीस घ्यावा लागला आहे. यमकासक्तीने "कुदारा" (७।२९३) असा व्यक्तिमत्त्वावर आघात करणारा सीतेचा निर्देश आला आहे. यमकाच्या हव्यासाने विरस झाल्याची अशी उदाहरणे त्यांच्या पूर्वोत्तर रचनेत कमी आहेत. अर्थात् रामायणातही ती विपुल आहेत असे नव्हे. हठाकृष्टता ही मुक्तेश्वरांची प्रकृती नव्हे. त्यांची यमके दीर्घ नसून सुटसुटीत आहेत, बहुंवशी स्वाभाविक आहेत. त्यातील गोडवा जाणवण्यासारखा असून त्यामुळे श्रवणमधुरता आली आहे.

या श्रवण मधुरतेत अनुप्रासांचाही वाटा आहे. धराधीशपत्नी धरानंदिनी (७।२९९) काळरूपा कराळी (२।२२), समरस सुखगोष्टी (२।५३), वनिता वनिची (१।८०), सुरपतिरतिरंगे (१।८३), मधुहर मधुमासी (१।५३), असे नादगर्भ अनुप्रास त्यांच्या लेखणीतून सहजगत्या अवतरतात. "लिळा राउळी देउळी गीत गाती" (७।५४८) अशा अनुप्रासात्मक शब्दांनी त्यांचे श्लोक गुंफलेले असतात. त्यात निव्वळ हौसेने आलेले शब्दांची उधळण करणारे आणि हटातटाने साधलेले अनुप्रासही असतात.

द्वादशकमलबंध (२।१००, ५।६५), अष्टदलकमलबंध (६।२००,३२४) यांसारखे चित्रबंध योजून त्यांनी अशा रचनेला काव्यात प्रतिष्ठेचा पाट मिळवून दिला. त्यांच्या पूर्वोत्तर रचनेत ते उठून दिसतात. अशा रचनेत एका बाजूने चमत्कृती आणि दुसऱ्या बाजूने कृत्रिमता येणे अपरिहार्य असते.

अध्यात्म, पुराणकथा, निसर्ग, प्राणिसृष्टी, कविसंकेत व दैनंदिन व्यवहार अशा अनेक क्षेत्रांतून सिद्ध झालेली त्यांची उपमानसृष्टी बहुरंगी आहे. पण ती पुरेशी व्यापक मात्र नाही. त्यामुळे त्यांची पुनरुक्ती होते व ती वैरस्यकारक वाटते. पुनरुक्ती, विसंगती व एकाच उपमेयावर दोन उपमानांचा आरोप असे काही दोष त्यांच्या उपमानयोजनेत असले तरी त्यांचा प्रयोजक वापरही ते करताना दिसतात.

युद्धप्रसंगी शृंगारिक उपमाने वापरणे (६।३४०) व स्वतःचा कल सुचविणारी उपमाने योजणे (६।१९५), या त्यांच्या काही लकबी होत.

मुक्तेश्वरांच्या अलंकारसृष्टीत प्रकारवैविध्य कमी आहे. साम्याधिष्ठित अर्थालंकारांवर त्यांचा अधिक भर आहे. भारतासापेक्षतेने शब्दालंकाराकडे येथे त्यांनी अधिक लक्ष पुरविले आहे. शब्दालंकारातील नादमाधुर्य व चित्रबंधातील चमत्कृती याची त्यांना येथे भुरळ पडली आहे. अलंकाराच्या काव्यपोषकतेवर श्रद्धा असल्याने त्यांची प्रसंग-भावचित्रे कधी पूर्ण आलंकारिक होताना दिसतात. उत्तरकांडात अलंकारांचा विलास काहीसा कमी झालेला दिसतो. अलंकारविन्यासाचे प्रमाण पूर्वकाळातील स्फुटकाव्यापेक्षा वाढलेले असले तरी उत्तरकाळातील भारताइतके ते नाही. व्यापकता, सूक्ष्मता, विविधता व प्रयोजकता या अंगाने भारती अलंकारसृष्टी जितकी पक्व आहे तितकी रामायणातील अलंकारसृष्टी नाही. ती विकासाच्या मधल्या टप्प्यावर स्थिरावलेली आहे. मुक्तेश्वरांची कल्पकता व वैदग्ध्य यांची मात्र ती निदर्शक आहे. त्यामुळे मुक्तेश्वरी रामायणावर विदग्धतेची कांती पसरली आहे.

## सात ॥ संक्षेपरामायण : निर्देशात्मकता

वर्ण्य विषयाच्या जोडीला अन्यक्षेत्रीय संदर्भ उभा करून त्याला अधिक अर्थपूर्ण करणारी निर्देशात्मकता ( Allusiveness ) महाकाव्याच्या अभिव्यक्तीचे एक अंग असून मुक्तेश्वरांच्या भारताप्रमाणे रामायणातही ते जाणवते.

"चतुःषष्टि संख्या कळा" (१।६१) असल्या तरी नृत्य-गान या कलांचे निर्देश मुक्तेश्वर आवृत्तीने करतात. गाण्यातल्या ताना (६।१६२), रागमाळा (३।९), वीणा, ताळ, तंत्रीश्रुतीतानमान (७।३५५), घंटा, मृदंग (७।४७१) यांच्या साथीने होणारे आणि "किन्नराचेनि कंठे" गायिले जाणारे मधुर गान (७।३५६) व त्यामुळे जीवजातींना लागणारा वेध (७।५४८) त्यांनी साक्षेपाने उल्लेखिला आहे. "पदे नृत्यरंगी मनोभाव मोडी, कळाभिन्नभेदा गतिताल तोडी" (१।८) असा त्यांचा

गणेश नृत्यमग्न आहे. वाद्यघोष, गीतनृत्य, यांनी कपिलाचार्यांचे वसतिस्थान (७।२२६, २२८) व रामाचा रसिक दरबार (७।२६२) गजबजून गेला आहे. लवांकुशाचे मधुर गायन ऐकताच "तया यज्ञिचे काज सारूनि रामे तया आणवी सन्मुखीं गीतप्रेमे" (७।५५०) असा त्यांचा गानप्रेमी राम रसिक आहे. नृत्यगानाचे (७।५३७, ७।५४९, ५।११३) असे निर्देश काव्यातील सुसंस्कृत, कलापूर्ण व विदग्ध वातावरणाचे पोषण करतात.

चौदा विद्या (१।६२), साही शास्त्रे (१।६२), धनुर्वेद (१।६१), न्यायसूत्र (६।६), मुहूर्ताचा ज्योतिषी तपशील (६।१), यातून वर्णनांना एकप्रकारची अधिकृतता येते. "लपवुनि जनदृष्टी" (६।३३१) औषध तयार करणारे वैद्य, वधूवरांबरोबर मौज भोगणारे येर जन (६।३३५), दांभिक धर्माचरणी (५।४–८) कवीच्या निरीक्षणातील बारकावा दाखवितात. वृक्ष विशेष (५।४५–४७), शस्त्रविशेष (५।५१, ६।९४), चतुरंगदल (६।९८–१००), बाणाचे प्रकार (६।३६०, ६।३८०, ७।४६९), अस्त्रवर्णने (७।४५७–४७५) या तपशीलामुळे वर्णने भरगच्च होतात. साखर वाटणे (५।७६, ६।१७३), निंबलोण उतरणे (७।४३३) यासारख्या चालीरीतीतून सामाजिक जीवन समूर्त होते.

इंद्र (१।२६,३१,५९,३।११ इ.), शिव (१,८६, ९२, ९८, १०१, १०३, १११, २।६२, ३।२२, ३।३१, ६।३४), शक्ती (३।१०७–११२, ४।१५) अशा देवदेवता, पौराणिक व आध्यात्मिक निर्देश काव्यातील संस्कृतीचा पारंपारिक अनुबंध व्यक्त करतात.

भारतात संदर्भसमृद्ध निर्देशांचे मुक्तेश्वर स्पष्टीकरण करताना दिसतात. त्या पद्धतीचे स्पष्टीकरण ते रामायणात करीत नाहीत. त्यामुळे महाभारताचे भाष्यात्म वळण रामायणात येत नाही. ही रामायणाच्या काव्यनिष्ठ रूपाची खूण आहे.

प्रत्यक्ष व आलंकारिक अशा दुहेरी रूपात अवतरणारी ही निर्देशात्मकता वर्णनांना उठाव देऊन वातावरणनिर्मिती करते. मुक्तेश्वरांचे निरीक्षण व अन्यशास्त्रव्यासंग असा काव्यपोषक ठरला आहे.

## आठ ॥ संक्षेपरामायण : वृत्तयोजना

मुक्तेश्वरी कवितेने अनुसरलेले विदग्ध वळण संक्षेपरामायणातील वृत्तयोजनेवरूनही समजण्यासारखे आहे. या वृत्तयोजनेला प्राचीन मराठी कवितेच्या संदर्भात एक ऐतिहासिक मूल्य आहे. मुक्तेश्वरपूर्व महानुभाव कवींनी वृत्तबद्ध रचना केली होती. पण सांकेतिक लिपीत कोंडले गेलेले त्यांचे ग्रंथ मराठी काव्यप्रवाहाची अभिव्यक्तिकक्षा विस्तारू शकले नाहीत. महानुभावांच्या बंद वाङ्मयव्यवहाराबाहेरील खुल्या वाङ्मयव्यवहारात मराठी कवितेची दृष्टी ओवी-अभंग या दोन पद्यप्रकारांच्या बाहेर फारशी

गेलेली दिसत नाही. या आवर्तातून सुटण्याची धडपड एकनाथकाळात सुरू झाली. एकनाथांचे वृत्तात्मक अभंग, दासोपंताचा प्रबंध, मुक्तेश्वरांचे रामायण, विठ्ठल कळपूरकरांची रासक्रीडा, लोलिंबराजाचे रत्नकलाचरित्र, ह्या त्या धडपडीच्या खुणा आहेत. त्यात मुक्तेश्वरांची रचना अनेकवृत्तात्मक आहे. उपलब्ध वाङ्मयात पहिली प्रदीर्घ वृत्तबद्ध रचना हीच आहे. महानुभावांची वृत्तरचना संस्कृतप्रमाणे निर्यमक होती. पण सयमक व सानुप्रास रचना रुळली ती मुक्तेश्वरांच्या रामायणामुळे. अशा प्रकारे वैचित्र्य, विस्तार आणि सयमक रचना या तीन वैशिष्ट्यांमुळे महानुभावेतर खुल्या मराठी वाङ्मयव्यवहारात मुक्तेश्वरांची वृत्तबद्ध रचना महत्त्वाची ठरते. मुक्तेश्वरांनी रुळविलेल्या या वाटेने पुढील पंडित कवींनी आपल्या रसात्मक कवितेस वृत्तबद्धतेचा साज चढविला.

"छंदी-पदीं वंदित प्रासबंदी" (६।२४६) असा छंदप्रासांचा ते उल्लेख करतात. छंदाची गायनानुकूलता वीणा, तंत्री, श्रुती, तान, ताळ यांच्या साहाय्याने अमृतमधुर होते (७।३५५) असे त्यांनी साभिप्राय उल्लेखिले आहे. ओवी-अभंगाच्या ठरीवपणाचा कंटाळा, गानानुकूलता, नाविन्याचे आकर्षण आणि संस्कृत काव्यादर्शाची ओढ या कारणांमुळे ते अक्षरगणवृत्तांकडे वळले असावेत. संक्षेपकथनाच्या दृष्टीमुळेही त्यांनी वृत्तांचा आश्रय घेतला असावा. कमी शब्दांत जास्त आशय पेलण्याची शक्ती जशी श्लोकरचनेत असते तशी ओवीच्या पसरटपणात नसते. सारगर्भता, ठाशीवपणा, ठसठशीतपणा या गुणधर्मांसाठी श्लोकरचनेचा पुरेपूर वापर त्यांनी केला आहे.

भुजंगप्रयातासारख्या लहान, अनुष्टुभासारख्या परंपरापुष्ट, स्रग्धरा-शार्दूलविक्रीडितासारख्या अनावर्तनी व प्रशस्त, द्रुतविलंबितासारख्या शीघ्र लयीच्या, मालिनीसारख्या लघुप्रचुर वृत्तांनी आपल्या काव्यरचनेला त्यांनी सजविले आहे. भुजंगप्रयात, मालिनी यांचा पहिल्या सहा कांडात आधिक्याने वापर केला आहे. उत्तरकांडात अनुष्टुभ वैपुल्याने वापरला आहे. पादाकुलकासारखी जाती व शालिनी, उपजाती, इंद्रवज्रा, शिखरिणी व पृथ्वी यांचाही वापर केलेला आहे.

वर्णनाला साजेसा थाट आणि निवेदनाला शोभेलशी लय त्यांच्या श्लोकरचनेत आढळते. मध्ययमकाचा डौल मिरविणारे श्लोक उत्तरकांडात विपुल आहेत. ओवी प्रमाणे त्रिचरणी यमक साधणारी श्लोकरचना (५।६१–६२) ओवीबरोबरच श्लोकरचनेवरील प्रभुत्वाचीही साक्ष पटविते. विशिष्ट भाव आणि छंद याचे नाते ढोबळपणेच लक्षात घेता येईल. अशी रसानुकूल वृत्तयोजना काही ठिकाणी दिसते. युद्धप्रसंगीच्या रणधाईस रणवाद्याप्रमाणे खुलणाऱ्या भुजंगप्रयात–मालिनीसारख्या वृत्तांचा समयोचित वापर त्यांनी केला आहे. श्रीरामवर्णनासाठी (७।६४४–६५१) वापरलेल्या पादाकुलकासारख्या गेय जातीमुळे त्यास एखाद्या आरतीचा वा स्तोत्राचा घाट आला आहे.

मुक्तेश्वरी वृत्तयोजनेचे हे गुणविशेष मान्य करूनही तिच्या उणीवा डोळ्यात भरल्याशिवाय राहत नाहीत. त्यांनी योजलेली वृत्ते अनेक असली तरी ठराविक पाच-

दहा वृत्तांपलीकडे ते जात नाहीत. त्यातही अनुष्टुभाखेरीज सलग दीर्घ रचनेसाठी वापरलेले दुसरे वृत्त दाखविता येणार नाही. अनुष्टुभाचे ओवीशी असलेले साम्यही येथे लक्षात घ्यावे. रचनेच्या सोयीसाठी स्वीकारलेले विसंधी (भरतअनुज), ऱ्हस्व वर्ण दीर्घ (प्रीय, भूजग) व दीर्घ वर्ण ऱ्हस्व (सितेते) करणे, अशुद्धता (धलीसी). संस्कृत शब्दांची ओढाताण (वैकल्प), मात्रादोष (३।७६,) आवश्यक शब्द अध्याहृत धरणे व अनावश्यक शब्दांचा भरणा करणे इत्यादी रचनादोषांनी त्यांची वृत्तयोजना डागाळली आहे. कोणत्याही वृत्तात हुकमी, विपुल आणि निर्दोष रचना करू शकणारे वृत्तप्रभुत्व मुक्तेश्वरांजवळ नाही.

पद्यप्रकारांच्या आवर्तातून बाहेर पडण्याची धडपड म्हणून अक्षरगणवृत्तांचा प्रयोग मुक्तेश्वरांनी केला. पण वृत्तबद्ध रचनेची परंपरा मराठीत पुरेशी रुळलेली नसल्याने त्यांना तिचा सफाईने वापर करता आला नाही. वृत्तबंधनात त्यांची मुक्त प्रतिभा जखडल्यासारखी वाटते. त्यांच्या आवेगी भावशीलतेला आणि वाणीच्या वाहत्या ओघाला वृत्तात्मकतेतील बंदिस्तपणा मानवण्यासारखा नव्हता. त्यामुळे या रचनानाविन्याचा मोह दूर सारून ते पुन्हा ओवीछंदाकडे वळले, हे योग्यच झाले. अनेक संमिश्र प्रवृत्ती ज्याच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेल्या असतात असा मुक्तेश्वरांसारखा कवी विविध माध्यमांचा वापर आशयसन्मुखतेच्या कसोटीवरच करीत असतो, हे छंदोरचनेतील या स्थित्यंतरावरूनही पटावे.

## नऊ ॥ संक्षेपरामायण : भाषा

### १. भाषेची प्रातिनिधिक पंडिती घडण

शब्दांनीच एखादी वाङ्मयकृती कलाकृती ठरत असल्याने भाषेची चिकित्सा कवितेच्या मूल्यमापनाशी निकटत्वाने संबद्ध असते. निवेदनशैली, संवादशैली, वर्णनशैली अलंकारविन्यास व निर्देशात्मकता यांच्या संदर्भात भाषाविचार पूर्वी केला आहे. त्याशिवाय अन्य भाषाविशेषांचाच विचार येथे प्रस्तुत आहे.

समकालीन भाषिक शब्दसंग्रहाच्या फार्सी प्रभावापासून मुक्तेश्वर अलिप्त आहेत. रामायणासारखा विषय, तदनुषंगिक संस्कृत काव्यादर्श यांच्या चौकटीत फार्सी शब्दांना अवसर नव्हता. त्यामागे त्यांची स्वभाषारक्षणाची व तिच्या शुद्धतेची जाणीवपूर्वक दक्षता असावी.

फार्सीला टाळून आणि संस्कृतचा स्वीकार करून भाषेचे शुद्ध व डौलदार रूप त्यांनी घडविले. मेदिनीचक्र, निर्झरनीर, रम्यराजीवरामा, सारसारंगनेत्रा, नीलधम्मिल्ल असे नाद व अर्थ यांची गोड मिळणी असलेले सुंदर संस्कृत पदबंध येथे भेटतात. या संस्कृत शब्दप्राचुर्याने भावप्रसंगांना रोमँटिक रंग चढतो व काव्यांतर्गत भावाशयाला संस्कृतीचे वलय लाभते. संक्षेपकथनही त्यामुळे शक्य झाले. त्याप्रमाणात दुर्बोधताही आली आहे.

अध्वान, क्ष्वेडोदक, कुलिश यांसारखे अपरिचित वाटणारे संस्कृत शब्दही पुष्कळच आहेत. त्याप्रमाणात मुक्तेश्वरी भाषा बोलभाषेपासून दुरावली आहे. त्यांच्या अन्य रचनेतील भावनिर्भरता, ताजेपणा व आवेग रामायणात तुलनेने कमी आढळतो याचे हेही एक कारण आहे. तत्सम शब्दांच्या तुलनेने तद्भव शब्दांचे प्रमाण कमी आहे. रुख, प्राण-नाहो, जुत्पती, रायरंभा अशा तत्सम शब्दांच्या तद्भव रूपांमुळे त्यांच्या भाषेला गोडवा आला आहे. सीवणा, सौदणी, हडबड, चामके अशा देशी शब्दांनी समकालीन श्रोत्यांशी त्यांनी जवळीक साधली आहे. या शब्दांना आज अपरिचिततेमुळे एक अनोखा सुगंध प्राप्त झाला आहे. या भिन्न प्रकारच्या शब्दांची वैरस्यकारक भेसळ ते सहसा करीत नाहीत. त्यांची गुंफण त्यांनी बहुशः समप्रमाणात केली आहे.

जुने मराठी, तत्सम, तद्भव, फार्सी "या चार प्रकारच्या शब्दांचे प्रमाण सम (even) असेल तेव्हा ती भाषेची घडण आकर्षक होते. शब्दांचे समप्रमाण याचा अर्थ वर दिलेल्या चार प्रकारच्या शब्दांपैकी एका जातीच्या शब्दांचीच शक्यतो एकत्र गुंफण . . . पंडित काव्यात इतर दोन प्रकारच्या शब्दांपेक्षा तत्सम शब्द व त्यांचे समास यांचे प्राचुर्य असते. खालोखाल तद्भव व थोडे देशी असतात. परकी शब्द विरळ असतात. अशा घडणीस मी प्रातिनिधि घडण म्हणतो"[१] या कसोटीवर संक्षेपरामायण पुरेपूर उतरते.

### २. शब्दयोजनेचे काही विशेष

व्यक्ति-वस्तु-कल्पना यांसाठी एकाहून अधिक पर्यायी शब्द वापरण्याची मुक्तेश्वरी लकब येथे ठसठशीतपणे प्रकटली आहे. सीता, लक्ष्मण व रावण यांच्यासाठी प्रत्येकी बारा, हनुमंतासाठी सतरा तर प्रभु रामचंद्रासाठी अठ्ठेचाळीस पर्यायी शब्द येथे उपस्थित आहेत. शब्दांचे हे वैविध्य व वैचित्र्य मुक्तेश्वरांच्या शब्दप्रभुत्वाची साक्ष देणारे आहे. वस्तु-व्यक्तीचे वैशिष्ट्य ओळखून, घटक शब्दांचे पर्याय बदलून (दशमुख, दशकंधर, दशग्रीव), व्यक्तीचे अन्यव्यक्तीसंबंध जाणून (निष्केषानुज), वस्तु-विषयक संकेताचे भान बाळगून (पद्मिनीवल्लभ), स्वरूपवर्णनात्मक (रामासाठी 'नीलराजीवरंगी') किंवा प्रसिद्ध पर्याय स्वीकारून (अग्नीसाठी 'जातवेद,' 'चित्रभानु') ते आपल्या पर्यायी शब्दांची घडण करतात. मुक्तेश्वरांसारख्या शब्दप्रभूला अशी किमया सहजसाध्य असते. त्यातून कधी "वसुमतिपतिजाया जानकी क्षोणिपुत्री" (५।१) अशी पर्यायांची उधळमाधळही होते. पण बहुंवशी मुक्तेश्वर त्यांचा प्रयोजक वापर करताना दिसतात. रमाप्राणनाथ (राम) व रुमानायक (सुग्रीव) या पर्यायांमुळे (४।२६) हृतस्त्रीप्राप्तीसाठी प्रयत्न हा त्यांच्या मैत्रीचा समान धागा स्पष्ट होतो. "वातात्मजे जाउनि वातसंगें वार्ता वदे वानरनाथ वेगें" (४।२२) अशा ठिकाणी

---

१. के. ना. वाटवे, **प्राचीन मराठी पंडिती काव्य,** पुणे, १९६४, पृ. १९४.

हे पर्याय अनुप्रास साधून अर्थसंगतीला उठाव आणताना दिसतात. भक्तिभावामुळे काही पर्याय वारंवार वापरले जातात. "मुनिहृदयमराळ" मध्ये भक्तीचा भावस्पर्श आहे. सागराला "कल्लोळमाळी" म्हणण्यात चित्रमयता आहे "मैथिलीप्राणरंगा" मध्ये माधुर्य आहे. यमाला "जगांतक" म्हणण्यात समर्पकता आहे. अग्नीला "हरनयन–विलासी" संबोधण्यात पौराणिक संदर्भाचे कल्पक भान आहे. कल्पकता, चित्रमयता, माधुर्य, भाव-स्पर्शित्व आणि पुराणसंदर्भाचे भान यामुळे त्यांची पर्यायी शब्दांची योजना आल्हादक झाली आहे. व्यक्तिवैशिष्टचे लक्षात घेऊन पर्याय काही वेळा सिद्ध होत असल्याने त्यातून व्यक्तिचित्रणही होते. आरंभकाळातील उत्साह आणि अतिरेक पर्यायी शब्दांच्या योजनेत येथे जसा जाणवतो तसा त्यांच्या वापरातील साक्षेपही जाणवतो. मुक्तेश्वरांच्या श्रीमंत मराठीचे हे अंग उत्तरकालीन रचनात अधिक प्रयोजक बनत गेले.

पाजळा-उजळे, फोडिती - फाडिती, ढासळे-कोसळे, तोडिती-वेंचिती अशी जोड क्रियापदे मुक्तेश्वरांनी प्राचुर्याने वापरली आहेत. ती श्लोकांच्या मध्यस्थानी शेजारी-शेजारी येतात. नाम-क्रियापद-क्रियापद-नाम अशा शब्दक्रमाचा हा परिणाम आहे. ती जेव्हा समानार्थी वा सदृश असतात तेव्हा क्रियेला उठाव देतात. ती भिन्नार्थी असतात तेव्हा दोन भिन्न क्रियांचा एकत्रित वेध घेतात. त्यामुळे श्लोकातील चरण एकमेकांशी बद्ध होतात. युद्धवर्णनात या क्रियापदांनी वेग-आवेग व कृतिशीलता ठसठशीत होते. शोकेविषादे, शिखरशृंगे अशा जोडशब्दांनी अर्थाला ठाशीवपणा येतो. यापद्धतीने स्वभाषेतील जुन्या शब्दांचे रक्षण करण्याची किमया त्यांनी करून दाखविली आहे. नतग्रीव सुग्रीव, सुचिर सहजबास, भीम कोल्हाळ अशी नाद व अर्थ यांनी संपन्न असलेली त्यांची समर्पक विशेषणे वर्ण्य विषयाला उठाव देतात मासमासे, धामधामा असे द्विरुक्त शब्द ते वापरतात. नादगर्भ शब्द वेचून वापरण्याची त्यांना आवडच आहे. थरारे, झडाडे, रुंडमुंडे, कडकडीत अशा नादानुकरणात्मक शब्दांनी त्यांची कृतिचित्रे रेखीव होतात. राहे साहे, पडे तो उडे अशी क्रियापदे किंवा सानसमर्थ खळदळ, गिरागर्जने, ताळहिंताळ असे अंतर्गत अनुप्रास असलेले शब्द ते वापरतात. बोधूनि बोले जाचणी जीव जाचे, घरामंडळी धूळपंकी असे हे शब्दबंध माधुर्याचा प्रत्यय देतात. "पिपासार्दिता तोय पाजूनि वेगे। विनीतोत्तरी वर्तले वृत्त सांगे" (१।२२) असे साधे कथनही नादमधुर करून ते सांगतात. असे माधुर्योत्पादक नादशब्द एखाद्या पार्श्वसंगीतासारखे संक्षेपरामायणात झंकारत आहेत.

मुक्तेश्वरी रचनेतील काही व्याकरणिक विशेष लक्षणीय आहेत. नाठवे, नाणि अशी नकारार्थी संधिरूपे ते इतक्या वैपुल्याने वापरतात की ती मुक्तेश्वरी शैलीची खूण समजावी लागते. लोक आकांता, ऋषीअंगना असे विसंधी त्यां या सर्व रचनेत सापडतात त्यात नियमभंगापेक्षा तयार होणारे संधीरूप कर्णकटू व लयबद्ध रचनेला विक्षेप आणणारे असू नये अशी दृष्टी दिसते. संक्षेपकथनासाठी त्यांनी वापरलेली समासघटित पदावली अर्थघन व सहजतया आलेली वाटते. अंतु, मातु अशी उकारान्त रूपे किंवा रचनेला

मृदुत्व देणारी जेऊते तेऊते, केऊता अशी रूपे यादवकालीन मराठीचे ठसे जपताना दिसतात. "आईक" सारखी वर्णागमाची वा "अकंपन्न" सारखी अर्थगौरवाची उदाहरणे येथे आढळतात, "राधवापे" असे द्वितीयेचे जुनाट प्रत्यय ते वापरतात. नामधातू (आकांतला), सजातीय कर्माची योजना (कामितकाम) किंवा "मंदला" असे विशेषणापासून बनलेले क्रियापद त्यांच्या भाषासरणीचे वेगळेपण दाखवितात. लंकराजे धलीसी अशी शब्दरूपातील अशुद्धताही आहे. पण मुक्तेश्वरांबरोबर वृत्तयोजना, प्रतलेखक, संपादकांचे अनवधान व मुद्रणदोष हेही तीत वाटेकरी असले पाहिजेत. "झणी" (२।१५) या शब्दाचा वापर यादवकालीन "नको" या अर्थाने त्यांनी केला आहे. "गदापाणि" (६।१७) हा विष्णुवाचक रूढ शब्द साधारणार्थी घेऊन त्यांनी बिभीषणा-साठी वापरला आहे. "वधूवर" (६।३३९) या शब्दाचा श्रेष्ठ स्त्री-पट्टराणी - या अर्थाने होणारा वापर असाच चमकून टाकणारा आहे. "वधू" हा शब्द मुक्तेश्वर स्त्री या अर्थानेही वापरतात. अर्थप्रक्रियेचे असे रूप मुक्तेश्वरी कवितेच्या आकलनावर परिणाम करते.

### ३. काही शैलीविशेष

पणजोबा भानुदास (६।२५२), मातृजनक एकनाथ (६।४७१), वडिल चिंतामणी (१।७), आई गंगा (१।१६), मामेभाऊ राघव (६।४७) अशा आपल्या आप्तांची नावे मुक्तेश्वरांनी वाच्यार्थमूल शाब्दी व्यंजनेने गुंफली आहेत. प्रिय व्यक्तींची नावे आपल्या काव्यात सूचकतेने गुंफण्याची ही नवलेखकाची उत्साही लकब आहे. व्यक्ति-स्थल-नामाचे ते सोपपत्तिक स्पष्टीकरण (४।९२, ३।११२) करतात. अर्थविवरणाची ही पुराणिकाची भूमिका एकनाथाशी नाते सांगणारी आहे.

प्रसंगानुरोधाने सूत्रात्मक वा निष्कर्षात्मक भाष्य करण्याची लकब आणि शैलीतील नेमकेपणा यामुळे त्यांच्या काव्यात सुभाषितात्मकता अवतरते. "घडे योग तो एक भोगा-चिलागीं", "दिसे मोद तो हेतु खेदासि होय" (७।३२२) अशा वचनांतून मुक्तेश्वर आपल्याला भावलेली जीवनसत्ये आविष्कृत करतात. त्यातून प्रकटणारी जीवनदृष्टी त्यांच्या काव्याला मौलिकतेचे परिमाण देऊन जाते.

क्रमबद्ध मांडणीने ते अपेक्षित परिणाम साधताना दिसतात. शून्य राजधानी, रोदिताचा महाशब्द, भंगलेले छत्र, तैलद्रोणात ठेवलेल्या पित्याचे दर्शन आणि प्राणहा-हानिकारक शोक अशा क्रमाने भरताला जाणवलेली दशरथमृत्यूची घटना (२।८२) ते वर्णितात. दृक्-श्राव्य-प्रत्यक्ष या क्रमाने होणारे हे दर्शन क्रमशः अस्वस्थ हुरहुर वाढवीत नेते आणि प्राणहानी करणाऱ्या शोकात परिणत पावते. विविध अवस्थांची क्रमानुसारी मांडणी करून मुक्तेश्वर योग्य तो परिणाम करतात तो असा.

शब्दांच्या निवडीपासून त्याच्या प्रयोजक वापरापर्यंत मुक्तेश्वरांचे अवधान जागे असते. यतीच्या कपटवेषाने सीतेचा हात धरून ओढणाऱ्या रावणाचा "कामाचारी"

असा निर्देश करण्यात समर्पकता आहे. "मदनपंकी" या शब्दाने लोकदृष्टीला जाणवणारी सीतेची मलिनता व्यक्त होते "अळिनीळ वाली" मधून भ्रमरासारखा नीलवर्णाचा वाली डोळ्यासमोर उभा राहतो. "रम्यराजीवरामा" मधून पुष्पकोमला कामिनीचे रमणीय रूप जाणवू लागते. प्राणनाथापेक्षा "प्राणनाहो" मध्ये अधिक गोडवा जाणवतो. "लवथव" मधील चैतन्य मनाला स्पर्श करते. "स्मरे दानवी मोहनी मंत्रमाया" (३।४९) या शब्दबंधातून गूढतेचे आकर्षक वलय निर्माण होते. चंडशैलांग, निर्झरनीर, पादपनीळ छाया अशा शब्दांतून निसर्गाचे रूपलावण्य खुणावत राहते. क्वचित् "पुत्र व्याली बळेश्वरा" (७।६९) असा शब्दाचा अनुचित वापरही त्यांच्या हातून होतो. तथापि शब्दांचा प्रयोजक वापर करण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच जाणवतो.

एका घटनेचे अनेकांगी चित्रण, साक्षी व्यक्तीच्या प्रतिक्रियांनी प्रसंगभावांना लाभणारी सजीवता व उपरोधाचा फणत्कार अशा अनेकानेक विशेषांनी मुक्तेश्वरांची शैली भावसंक्रामक झाली आहे. रामाच्या वनगमन-प्रसंगीचा दशरथाचा शोक ते अयोध्याकांडात असा सांगतात ——

**वना राम गेला, जनी हाक वाजे, पडे शोक जाळीं, रडे, राव लाजे**
**चढे गोपुरीं, चांचरे, गात्रभंगी, म्हणे, "केउता नीळराजीव रंगी"? ॥४५॥**
**प्रभा बाणली चिद्घनानंदरंगे, जगन्नाथ, विद्युल्लता भाज, संगे**
**गुणी गौरचाफेकळी शेष बंधू म्हणे, "पैल जातो घराजीवकंदू" ॥४६॥**
**दिठी देखतां अंतरें रूप गेलें, रथीं डोलले भावना भृंग झाले.**
**रथू लोपता, लागली दृष्टि केली, बुडे केतु, पाहे पुढा धूळि, पंथीं ॥४७॥**
**रजू लोपतां मूर्छनापात तो हो, पुरी ओळला शोक संताप मोहो**
**महागर्जना माजली शंखनादी, रथू धांवता नावरे लोकमांदी ॥४८॥**

चाचरणे, रडणे, लज्जित होणे, गात्रभंग अशा दशरथाच्या शारीर अवस्था, त्याचे उत्सुक-व्याकुळ हताश उद्गार, रामगमनाचे त्याला झालेले दर्शन मुक्तेश्वरांनी चित्र-शैलीने टिपले आहे. राम-रथ-केतू-धूली या क्रमाने दशरथाची दृष्टी रेंगाळत राहते. जणू शेवटच्या आशातंतूवर विसंबते आणि अखेरी ही ताणलेली अवस्था बेहोषीच्या सीमेला भिडते. क्रियापदे, पर्यायी नामे, वाक्प्रचार, अलंकार, भाषेची सम योजना यांचा नेमका वापर त्यांनी केला आहे. भाषेचा प्रयोजक वापर, भावनांना क्रमाने आलेले तीव्र रूप, अनुभवांची भावसंवादी रेखाटने आणि कल्पक चित्रवर्णने यांमुळे येथील शोकविषाद समूर्त होतो. मुक्तेश्वरांची शैली अशी आशयोन्मुख आहे. त्यामुळे ती भावसंक्रामक झाली आहे.

### ४. संस्कृत वळणाची विदग्ध शैली

संस्कृत वळण अनुसरीत विदग्ध डौल मिरविणारी मुक्तेश्वरी रामायणाची शैली त्यांच्या पूर्वोत्तर रचनेत उठून दिसणारी आहे. संस्कृत काव्यादर्शाने ती प्रभावित झाल्याच्या

खुणा वेगवेगळ्या रूपात सामोऱ्या येतात.

संस्कृताने प्रभावित झालेली, पांडित्यप्रचुर आणि विदग्ध डौल मिरवू पाहणारी ही रचना आहे याची नांदी उपक्रमाच्या तीन संस्कृत श्लोकांनीच (१।१–३) झडली आहे. "नीलघम्मिल्ल रामा" सारखे पदबंध किंवा "मुखी अस्तु वाचा" (५।३१) सारख्या वाक्यात तत्सम शब्दांच्या योजनेने संकृतचा ठसा गडद होतो. "जयति रघुवरिष्ठो रामचंद्र प्रतापी" (४।८८) अशी संस्कृत वाक्ये-वाक्यांशही येथे आढळतात. "मनकमळ-निवासी लोचना गोड झाला" (६।४५१), "नयनवदनमेळे पावसी सौख्य तेव्हा" (७।३०५) अशा वाक्यरचनेवर संस्कृतच्या मोडणीचा ठसा स्पष्टपणे जाणवतो. "वन्हि गेही", "नयन भरुनि पाहे". "शीघ्र त्याते विलोकणे," "मही दंड तैसे नमस्कार केले" यासारख्या ठिकाणी मराठी वाक्प्रचारांच्या संस्कृतीकरणाची प्रक्रिया दिसते. एकषष्टी नियूतके, चत्वार अशी संस्कृत संख्याविशेषणे ते वापरतात. एकवीससाठी "ऋषित्रिगुणे", सहस्रासाठी "दिनकरकरसंख्या" अशा आडवळणी निर्देशात संस्कृतचेच अनुसरण आहे. केवळ संस्कृत शब्दच नव्हे तर त्यांची रूपेही ते वापरतात. यादसां (७।१३४) हे संस्कृतप्रमाणे षष्ठीचे अनेकवचन त्यांनी तसेच ठेवले आहे. संस्कृत शब्दांचे प्राचुर्य, विशेषणबहुलता, समासघटित पदावली यांमुळे मुक्तेश्वरी भाषेला संस्कृतचा पुरेपूर डौल आला आहे.

"संस्कृत कवींच्या गोड कल्पना, त्यांचे सुंदर श्लोक, त्यांचे गोडस शब्द हे काळजी-पूर्वक वेचून याने आपल्या कृतीत ओवून टाकले आहेत . . . साध्या कल्पना व नित्यातले दाखले देखील याने पुरातन कवींच्या शब्दांनी सांगितलेले दिसतात."[२] हे सारस्वत-कारांचे म्हणणे खरेच आहे. "नानानाटकभावपद्यरचनासंदोहसान्द्रीकृता" (१।१) हा त्यांच्या गुणग्राहिणी वाणीचा विशेष संस्कृत परंपरेशी असलेला अनुबंध दर्शवितो. चकोर-चंद्र, कमल-भृंग असे संस्कृत कविसंकेत व सांकेतिक उपमाने ते वापरतात. सुमित्रेच्या पुत्राचा जो मुख्य अमित्र त्याचा पिता (६।२५८) अशा वळणावळशांनी होणारा रावणाचा निर्देश संस्कृतानुसारी आहे.

संस्कृत पंडितकवीना प्रिय असणारी रचनाचमत्कृती येथेही आहे. 'जे राजकन्या-सहदेवधन्या जे कामशून्या सुखवर्यमान्या' (५।४२) असा भारदस्तपणा त्याच्या रचनेत आहे. 'त्रिभुवनबळिया त्रिकुटपुरतल्हारी आला' (४।९९) यातील तीनचा खेळ लंकेच्या संदर्भात वस्तुस्थितिदर्शक व हनुमंताच्या संदर्भात गौरवपर ठरतो. 'अशोकावटी आटिला शोक लंकासुता अक्षयातें क्षयालागीं देख' (५।३४) अशी शब्दांची विरोधन्यासात्मक ठेवण 'धराधीशपत्नी धरानंदिनी' (७।२९९) अशी अंतर्गत यमकानुप्रासाची योजना संस्कृतपद्धतीची सजावट करणारी आहे.

या सजावटीचे अतिशय ठळक रूप श्लेष, रूपक, परिसंख्या यांसारख्या कुसरीच्या

---

२. वि. ल. भावे. **महाराष्ट्र सारस्वत**, पूर्वोक्त पृ. ३३५.

अलंकारांत दिसते. कूट पत्र (१।१०३–१०६). द्वादशकमलबंध (२।१००, ५।६५), अष्टदलकमलबंध (६।२००, ३२४), रामबाणावरील दशावताराचे रूपक (६।४०२–४०४), द्वादशराशीन्यासात (६।४७३–४७५) मांडलेले रामचरित्र या सगळ्यात भाषा वाकविण्याचे कसब आणि रचनाचमत्कृतीची आवड प्रतिबिंबित झाली आहे.

ओवीरचनेचा रुळलेला मार्ग सोडून अनेकवृत्तात्मक रचनेचा स्वीकार करण्यातही संस्कृत काव्याच्या तोडीस तोड रचना करण्याची ईर्ष्या प्रकटली आहे.

मुक्तेश्वरांची कल्पकता व वैदग्ध्य त्यांच्या भाषेला एकाच वेळी आकर्षक आणि अर्थपूर्ण करते. 'तरू लागले, नेणवे सूर्य दाटी' (४।८०) असे म्हटल्याने अरण्य अधिक घनगर्द होते. वानरांच्या गर्दीने धरा दाटली, वारा वाहीनासा झाला. त्याच्या गर्जनेने मेघ आटले आणि भयाने सागराला सात फाटे फुटले (४।७३). जळत्या नगराचा धूप आणि पुच्छानलाचा दीप दाखवून हनुमंताने सीतेस वंदन केले (५।१०२). लंकादहनाच्या अग्नीने आकाश काळेपांढरे झाले. सूर्य तापून त्याचा रंग लाल झाला. चंद्र पोळला आणि त्याच्या अंतरीची काया श्याम झाली. लाह्या सांडाव्या तशी नक्षत्रे सांडू लागली. (५।९९), अशी प्रसंगभावांना प्रतीतिक्षम करीत त्यांची कल्पकता प्रकटते. त्यांचे वैदग्ध्यही भावस्पर्शी आहे.

**धरुनि कर पतीचा पूर्वद्वारप्रदेशी–पुसत जनकबाळा "देवरा गूणराशी ।**
**निकट पुढिल पेणें मागिल्याहूनि सांगा"––रघुविर नयनीं तें लोटली अश्रुगंगा ।।**
(२।४३)

येथे सीतेचा प्रश्न नवा अनुभव घेताना येणाऱ्या असहायतेतून आला आहे. तिच्या कोमल शरीरमनाच्या वेदनाची त्यावर छाया आहे. तिने विचारले ते लक्ष्मणाला पण पाणी डोळ्यात आले ते रामाच्या ! कर्तव्याशी बांधलेल्या रामाच्या वज्रकठोर व्यक्तिमत्त्वाला येथे मानवसहज कोमलतेचा स्पर्श होतो. 'स्वामींचा शत्रु त्याशी चतुरनरवरे सख्य कैसें करावें?' (६।१३७) येथे कामक्रोध त्यागावे, हे सांगताना शिवभक्तीचा संदर्भ आणून रावणाच्या हृदयाची तार छेडण्याचा मंदोदरीचा प्रयत्न किती मार्मिक आहे ! मुक्तेश्वरांची विदग्धता त्यांच्या संवादांना चतुरालापाचे रूप देते. राम सर्वांना भेटला पण जना-सज्जनांना कसा भेटला ? तर तो सुखानंद देणारा व संदेहसंताप हरण करणारा राम लोचनपंथाने त्यांच्या मनात थांबला (६।४५२)., रामसीताविवाह, राम-परशराम संघर्ष, भरत-कैकयी संवाद, रामसीतेचा वनप्रवास रावणाची मदनव्यथा, सीतेचा विलाप, रामाचा शोक, हनुमंत-सीता संवाद व संदेश-कथन, रामराज्यवर्णन अशा किती तरी ठिकाणी संस्कृताच्या तोडीस तोड अशी कल्पकता व वैदग्ध्य मुक्तेश्वरांनी प्रकट केले आहे.

अशा अनेक अंगांनी मुक्तेश्वरांची भाषा संस्कृत काव्यभाषेचा आदर्श गिरवू पाहते काव्याची म्हणून वेगळी भाषा असते अशी समजूत त्यांच्या रामायणी भाषेच्या वापरा

तून दिसते. आशयाच्या रूपापेक्षा भारदस्त शब्दांमधून तो गुंफला की त्याचे काव्यात रूपांतर होते, असे त्यांना वाटत असावे. रामाने लक्ष्मणासह मातापित्यांना वंदन केले, असा वृत्तात्मक आशयही 'सौमित्रेशी सांगकंदर्पधामें प्रेमे माता वंदिजे तात पद्में' (२। ३९) अशा अकारण भारदस्तपणे ते सांगतात. त्यामुळे त्यांची शैली कधी कृत्रिम व शब्दमुग्ध झाल्याचे जाणवते (२। १००–१०१, ३। ९७, ६। १४५) पण अशी उदाहरणे विरळ आहेत. अन्यत्र मात्र या शैलीने त्यांच्या काव्यास डौल दिला आहे. पंडिती थाटाघाटाच्या घोटीव रचनेचे नमुने (५। ३७, ३९, १०३–१०६, ३। ६३, ५। १–३, ६। १९–२४, १४४–१४५ इ.) पुष्कळच दाखविता येतील.

संस्कृत शब्द, कविसंकेत, वाग्विशेष यांनी घडविलेली वृत्तबद्ध, अलंकारप्रचुर, नादलुब्ध, सारगर्भ, संदर्भसमृद्ध शैली संक्षेपरामायणात दिसते. वक्रोक्तीचा विलास दाखविणारी आणि कल्पकतेने नटलेली ही पंडिती थाटाघाटाची शैली पंडिती काव्य-शैलीची प्रातिनिधिक घडण दाखविणारी आहे. विठ्ठल, नागेश, सामराज, रघुनाथ पंडित, वामनपंडित आणि मोरोपंत या उत्तरकालीन पंडितकवींच्या काव्यातून तिचेच दर्शन घडते. महानुभावेतर खुल्या मराठी वाङमयव्यवहारात पंडिती काव्याला त्याची काव्यभाषा मिळवून देण्याचे श्रेय मुक्तेश्वरांचे आहे. त्यांनी घडविलेल्या युगप्रवर्तनाची ती एक खूण आहे.

## दहा ॥ संक्षेपरामायण : एक विदग्ध काव्य

आतापर्यंतच्या वाङमयीन पाहणीतून प्रतीतीस आलेले संक्षेपरामायणाचे विदग्ध वाङमयरूप येथे एकत्रित न्याहाळायचे आहे.

### १. विदग्ध महाकाव्याचा स्वरूपविचार

महाकाव्य अनेकघटकयुक्त आणि विकसनशील असा वाङमयप्रकार असल्याने कालसापेक्ष अशा अनेक रूपात तो अवतीर्ण होतो. आर्ष (एपिक ऑफ ग्रोथ) आणि विदग्ध (एपिक ऑफ आर्ट) ही त्याची दोन ठळक रूपे. त्यात श्रेष्ठकनिष्ठता नसते. पारंपरिक सामग्रीची पुनर्रचना करून तिला नवार्थ देण्याची महाकवीची मूलभूत भूमिका व कार्य दोन्ही प्रकारात समान असते. कालानुरूप एकाच वाङमयप्रकाराने धारण केलेली ही दोन वेगळी रूपे असतात एवढेच.

राष्ट्रजीवनातील महत्त्वपूर्ण प्रक्रियांचे स्वरूप समजून देता-घेता विदग्ध काव्य त्यांची प्रतीकात्मक मांडणी करीत असते. त्यामुळे मानवी घटक व कल्पनाघटक यांचे एकात्म दर्शन त्यातून घडते व काव्यविषय समृद्ध होतो. आर्ष महाकाव्यातील उपलब्ध सामग्री वापरून विदग्ध महाकाव्य अवतरते. त्यामुळे तुलनेने ते अर्वाचीन असते. कविस्वभावाचा म्हणजे एका व्यक्तीच्या दृष्टीचा स्पष्ट ठसा त्यावर उमटलेला असतो.

अलंकारांत दिसते. कूट पत्र (१।१०३–१०६). द्वादशकमलबंध (२।१००, ५।६५), अष्टदलकमलबंध (६।२००, ३२४), रामबाणावरील दशावताराचे रूपक (६।४०२–४०४), द्वादशराशीन्यासात (६।४७३–४७५) मांडलेले रामचरित्र या सगळ्यात भाषा वाकविण्याचे कसब आणि रचनाचमत्कृतीची आवड प्रतिबिंबित झाली आहे.

ओवीरचनेचा रुळलेला मार्ग सोडून अनेकवृत्तात्मक रचनेचा स्वीकार करण्यातही संस्कृत काव्याच्या तोडीस तोड रचना करण्याची ईर्ष्या प्रकटली आहे.

मुक्तेश्वरांची कल्पकता व वैदग्ध्य त्यांच्या भाषेला एकाच वेळी आकर्षक आणि अर्थपूर्ण करते. 'तरू लागले, नेणवे सूर्य दाटी' (४।८०) असे म्हटल्याने अरण्य अधिक घनगर्द होते. वानरांच्या गर्दीने धरा दाटली, वारा वाहीनासा झाला. त्याच्या गर्जनेने मेघ आटले आणि भयाने सागराला सात फाटे फुटले (४।७३). जळत्या नगराचा धूप आणि पुच्छानलाचा दीप दाखवून हनुमंताने सीतेस वंदन केले (५।१०२). लंकादहनाच्या अग्नीने आकाश काळेपांढरे झाले. सूर्य तापून त्याचा रंग लाल झाला. चंद्र पोळला आणि त्याच्या अंतरीची काया श्याम झाली. लाह्या सांडाव्या तशी नक्षत्रे सांडू लागली. (५।९९), अशी प्रसंगभावांना प्रतीतिक्षम करीत त्यांची कल्पकता प्रकटते. त्यांचे वैदग्ध्यही भावस्पर्शी आहे.

**धरुनि कर पतीचा पूर्वद्वारप्रदेशी–पुसत जनकबाळा "देवरा गूणराशी ।**
**निकट पुढिल पेणें मागिल्याहूनि सांगा"––रघुविर नयनीं तें लोटली अश्रुगंगा ।।**
(२।४३)

येथे सीतेचा प्रश्न नवा अनुभव घेताना येणाऱ्या असहायतेतून आला आहे. तिच्या कोमल शरीरमनाच्या वेदनाची त्यावर छाया आहे. तिने विचारले ते लक्ष्मणाला पण पाणी डोळ्यात आले ते रामाच्या ! कर्तव्याशी बांधलेल्या रामाच्या वज्रकठोर व्यक्तिमत्त्वाला येथे मानवसहज कोमलतेचा स्पर्श होतो. 'स्वामींचा शत्रु त्याशी चतुरनरवरे सख्य कैसें करावें?' (६।१३७) येथे कामक्रोध त्यागावे, हे सांगताना शिवभक्तीचा संदर्भ आणून रावणाच्या हृदयाची तार छेडण्याचा मंदोदरीचा प्रयत्न किती मार्मिक आहे ! मुक्तेश्वरांची विदग्धता त्यांच्या संवादांना चतुरालापाचे रूप देते. राम सर्वांना भेटला पण जना-सज्जनांना कसा भेटला ? तर तो सुखानंद देणारा व संदेहसंताप हरण करणारा राम लोचनपंथाने त्यांच्या मनात थांबला (६।४५२)., रामसीताविवाह, राम-परशराम संघर्ष, भरत-कैकयी संवाद, रामसीतेचा वनप्रवास रावणाची मदनव्यथा, सीतेचा विलाप, रामाचा शोक, हनुमंत-सीता संवाद व संदेश-कथन, रामराज्यवर्णन अशा किती तरी ठिकाणी संस्कृताच्या तोडीस तोड अशी कल्पकता व वैदग्ध्य मुक्तेश्वरांनी प्रकट केले आहे.

अशा अनेक अंगांनी मुक्तेश्वरांची भाषा संस्कृत काव्यभाषेचा आदर्श गिरवू पाहते काव्याची म्हणून वेगळी भाषा असते अशी समजूत त्यांच्या रामायणी भाषेच्या वापरा

तून दिसते. आशयाच्या रूपापेक्षा भारदस्त शब्दांमधून तो गुंफला की त्याचे काव्यात रूपांतर होते, असे त्यांना वाटत असावे. रामाने लक्ष्मणासह मातापित्यांना वंदन केले, असा वृत्तात्मक आशयही 'सौमित्रेशी सांगकंदर्पधामें प्रेमे माता वंदिजे तात पद्में' (२। ३९) अशा अकारण भारदस्तपणे ते सांगतात. त्यामुळे त्यांची शैली कधी कृत्रिम व शब्दमुग्ध झाल्याचे जाणवते (२। १००–१०१, ३। ९७, ६। १४५) पण अशी उदाहरणे विरळ आहेत. अन्यत्र मात्र या शैलीने त्यांच्या काव्यास डौल दिला आहे. पंडिती थाटाघाटाच्या घोटीव रचनेचे नमुने (५। ३७, ३९, १०३–१०६, ३। ६३, ५। १–३, ६। १९–२४, १४४–१४५ इ.) पुष्कळच दाखविता येतील.

संस्कृत शब्द, कविसंकेत, वाग्विशेष यांनी घडविलेली वृत्तबद्ध, अलंकारप्रचुर, नादलुब्ध, सारगर्भ, संदर्भसमृद्ध शैली संक्षेपरामायणात दिसते. वक्रोक्तीचा विलास दाखविणारी आणि कल्पकतेने नटलेली ही पंडिती थाटाघाटाची शैली पंडिती काव्य-शैलीची प्रातिनिधिक घडण दाखविणारी आहे. विठ्ठल, नागेश, सामराज, रघुनाथ पंडित, वामनपंडित आणि मोरोपंत या उत्तरकालीन पंडितकवींच्या काव्यातून तिचेच दर्शन घडते. महानुभावेतर खुल्या मराठी वाङमयव्यवहारात पंडिती काव्याला त्याची काव्यभाषा मिळवून देण्याचे श्रेय मुक्तेश्वरांचे आहे. त्यांनी घडविलेल्या युगप्रवर्तनाची ती एक खूण आहे.

## दहा ॥ संक्षेपरामायण : एक विदग्ध काव्य

आतापर्यंतच्या वाङमयीन पाहणीतून प्रतीतीस आलेले संक्षेपरामायणाचे विदग्ध वाङमयरूप येथे एकत्रित न्याहाळायचे आहे.

### १. विदग्ध महाकाव्याचा स्वरूपविचार

महाकाव्य अनेकघटकयुक्त आणि विकसनशील असा वाङमयप्रकार असल्याने कालसापेक्ष अशा अनेक रूपात तो अवतीर्ण होतो. आर्ष (एपिक ऑफ ग्रोथ) आणि विदग्ध (एपिक ऑफ आर्ट) ही त्याची दोन ठळक रूपे. त्यात श्रेष्ठकनिष्ठता नसते. पारंपरिक सामग्रीची पुनर्रचना करून तिला नवार्थ देण्याची महाकवीची मूलभूत भूमिका व कार्य दोन्ही प्रकारात समान असते. कालानुरूप एकाच वाङमयप्रकाराने धारण केलेली ही दोन वेगळी रूपे असतात एवढेच.

राष्ट्रजीवनातील महत्त्वपूर्ण प्रक्रियांचे स्वरूप समजून देता-घेता विदग्ध काव्य त्यांची प्रतीकात्मक मांडणी करीत असते. त्यामुळे मानवी घटक व कल्पनाघटक यांचे एकात्म दर्शन त्यातून घडते व काव्यविषय समृद्ध होतो. आर्ष महाकाव्यातील उपलब्ध सामग्री वापरून विदग्ध महाकाव्य अवतरते. त्यामुळे तुलनेने ते अर्वाचीन असते. कविस्वभावाचा म्हणजे एका व्यक्तीच्या दृष्टीचा स्पष्ट ठसा त्यावर उमटलेला असतो.

साहजिकच ते अधिक सुसूत्र असते. विदग्ध महाकाव्य वाङ्मयीन तंत्राच्या विशेष जाणिवेतून निर्माण झालेले असते. एकूणच अशा काव्यात सफाई, जाणिवपूर्वक केलेली कलाकुसर व सजावट आढळते. त्यामागे कवीचा व्यासंग व तंत्रविशेषावरील पकड असते. कधीकधी त्यामुळे असे महाकाव्य पुस्तकी, अनुकरणात्मक व पंडिती होण्याची शक्यता असते. त्यातून कृत्रिम व व्याख्यागम्य महाकाव्याची पैदास वाढू लागते. अशावेळी त्यातील नीरस तांत्रिकता घालविण्याचा प्रयत्न वाङ्मयपरंपरेत सुरू होताना दिसतो.

**२. संक्षेपरामायणाच्या विदग्ध अवताराची कारणमीमांसा**

काव्याकडे भक्तिसाधन म्हणून पाहणारी काव्यदृष्टी आणि लोकभाषा-धर्मभाषा म्हणून मराठीचे झालेले विकसन यामुळे प्राचीन मराठी काव्यात विदग्ध महाकाव्य हा अपवादात्मक प्रकार आहे. अशा स्थितीत संक्षेप-रामायण विदग्ध महाकाव्याकडे झुकावे, याची थोडी मीमांसा करावयास हवी.

मुक्तेश्वरांच्या काळात महाराष्ट्रमहोदयाचा पूर्वरंग सुरू झाला होता. भौतिक समृद्धीबरोबर धर्म-भाषा-साहित्य या सांस्कृतिक क्षेत्रातही लोकजागृतीच्या नव्या लाटा उसळल्या. कलाविलासाला पोषक अशा या वातावरणाने विदग्ध अभिरुचीचे भरण-पोषण केले. सोळाव्या शतकाच्या अखेरीस राजाश्रयाने राहणारे पंडित कवी दिसू लागतात. असाच पंडित व व्युत्पन्न वर्ग श्रोत्यांच्या रूपाने पुराणिक-हरिदासांच्यापुढे येऊ लागलेला दिसतो. त्यामुळे संतांनी उपेक्षिलेली व्युत्पन्नता व कलात्मकता यांना पालवी फुटली. त्यांना उपकारक अशा संस्कृत काव्यादर्शाचा दृढ परिचय काशी-सारख्या विद्वत्क्षेत्री मुक्तेश्वरांना झाला असला पाहिजे. असा आदर्श गिरविणारे हिंदीतील रीतिकाव्य ज्या परिस्थितीच्या परिपाकातून अवतरले तिचे संस्कार उत्तरेकडील या वास्तव्यात मुक्तेश्वरांवर झाले असतील. स्वभावतःच महाकाव्यानुकूल असणारी त्यांची प्रतिभा त्या वातावरणात उत्तेजित झाली असेल. पुराणकथा घ्यावी पण तिला नवा अर्थ द्यावा, परंपरा स्वीकारावी पण तिला नवरूपाने नटवावे, माय-बोलीत लिहावे पण विदग्ध रसिकाचे समाराधन करावे अशी ऊर्मी त्यांच्या अंतरंगात उसळली असली पाहिजे.

त्यासाठी स्रोतग्रंथ म्हणून त्यांनी केलेली वाल्मीकिरामायणाची निवड अनुकूल ठरली. "It is a Mahakavya answering in every detail to the description by rhetoricians"[१] असे रामायणाचे सार्थ वर्णन केले जाते. धीरोदात्त नायक, सर्गबद्धता, युद्ध, प्रवास, नगर, चंद्रसूर्यांचे उदयास्त यांची वर्णने,

---

१. ए. कृष्णम्माचारीयर, **हिस्ट्री ऑफ क्लासिकल संस्कृत लिटरेचर**, मद्रास, १९३७ पृ. ८२.

यांसारखी महाकाव्याची लक्षणे उत्तरकालीन काव्यशास्त्रकारांनी रामायण समोर ठेवूनच सांगितलेली दिसतात. धर्म, नीती, तत्त्वविचार, ज्ञानसंग्रह आणि आख्यानोपाख्याने यांनी महाभारताइतके रामायण भारावलेले नाही. त्याची कथा काहीशी एकेरी व सुसूत्र आहे. तिचे कथन रसप्रफुल्ल व काव्यनिष्ठ आहे. आदिकाव्य असलेले रामायण असे आर्ष व विदग्ध महाकाव्यातील दुवा आहे. विदग्ध महाकाव्याचा तो आरंभ आहे, असेही म्हणता येईल. या साऱ्यामुळे महाकाव्यानुकूल प्रतिभेच्या मुक्तेश्वरांनी रामकथेला विदग्ध महाकाव्याचा घाट दिला असावा.

### ३. संक्षेपरामायणाचे विदग्ध स्वरूप

मुक्तेश्वरकालीन संस्कृत विदग्ध महाकाव्ये पूर्वमहाकाव्यानुगामी बनल्यामुळे केवळ तांत्रिक व नीरस बनली होती. मुक्तेश्वरी रामायणही क्वचित ठिकाणची कूट रचना, क्लिष्ट कल्पना, शब्दालंकारांचा सोस यांमुळे कृत्रिमतेकडे काहीसे झुकले आहे. पण ते पूर्णपणे कृत्रिम व केवळ व्याख्यागम्य महाकाव्य मात्र झाले नाही. एकीकडे संकेताचे काटेकोर व निर्जीव अनुकरण करणारी संस्कृत विदग्ध महाकाव्ये तर दुसरीकडे संकेत दुर्लक्षून धर्मनिष्ठ बनलेले भावार्थरामायणासारखे पौराणिक महाकाव्य मुक्तेश्वरांसमोर होते. त्यामुळे कोणत्याही एका बाजूला अधिक न झुकता आपल्या महाकाव्याचे विदग्ध रूप त्यांना जपता आले. वृत्तबद्धता, चित्रबंध, धीरोदात्त नायक, विविध वर्णनघटक हे महाकाव्याचे संकेत त्यांनी स्वीकारले. पण अन्य काही संकेत त्यांनी नाकारलेही. जसे, कांडविभाजन त्यांनी केले पण सर्ग-अध्याय विभाजन नाकारले. शृंगार-वीर-शांत यांपैकी एक रस अंगी असून अन्य रस अंग असावेत,[२] हा महाकाव्याचा संकेत झुगारून देऊन त्यांनी ते स्थान भक्तिरसाला दिले. यामुळे परंपरेचे अंधानुकरण वा उच्छेद न करता तिला नवरूप देण्याच्या श्रेयाचे ते वाटेकरी झाले.

संस्कृत विदग्ध महाकाव्यपरंपरा व इतर विदग्ध साहित्य यांचे कमीअधिक अध्ययन मुक्तेश्वरांनी केले होते. मुक्तेश्वरी रामायण वाचताना संस्कृत रामकथा, तन्निष्ठ काव्यनाटके व रामकथेची मराठी परंपरा यांचे साद-पडसाद ऐकू येतात. आजच्या वाङ्मयदृष्टीला त्यात अनुकरणशीलता जाणवेल. तथापि "प्राचीनकाळी काव्यपरंपरा, काव्यसंकेत, पूर्वसूरींचा आदर्श या साऱ्या गोष्टींना विशेष प्रतिष्ठा होती. पूर्वकवींच्या कल्पना, विचार व वर्णने यांचा स्वीकार करणे यात कमीपणाचा किंवा दुय्यमपणाचा भाव नसून त्यातून काव्यपरंपरेचे आकलन, पूर्वकवींविषयीचा आदर, विदग्ध रसिक पांडित्य इत्यादी गुणांचे दर्शन होते असे मानले जाई"[३] त्यामुळे मुक्तेश्वरांची साहित्य-

---

२. 'शृंगारवीरशांतानामेको अंगी रस इष्यते, अंगानि सर्वेऽपि रसाः"—विश्वनाथ, **साहित्यदर्पण** ६ । ३१७.

३. द. भि. कुलकर्णी, **महाकाव्य : स्वरूप व समीक्षा**, नागपूर, १९७५, पृ. १६०.

शास्त्रीय संकेतातील गती व रसिक पांडित्य त्यातून अभिव्यक्त होते, असे म्हटले पाहिजे. नृत्यसंगीतादी ललितकला, ज्योतिष-वैद्यकादी शास्त्रें, वृक्ष-शस्त्र इत्यादिकांचे विशेष यांचाही काव्याच्या सजावटीसाठी त्यांनी उपयोग केला आहे. एकंदरीत मुक्तेश्वरांनी अतिरेक टाळून पांडित्यदर्शनाचा संकेत उचित प्रमाणात पाळला आहे.

रामायणाच्या रमणीय, गानमधुर, वेधवंती व महाकाव्यात्म रूपाची मुक्तेश्वरांना जाणीव आहे.[४] संस्कृत-मराठी परंपरेतील रामकथा त्यांनीं स्वीकारली. तिच्यातील आख्यानोपाख्यानांचे जाळे कमी करून तिला सुसूत्र रूप दिले. पारंपरिक सामग्रीचे केवळ संकलन त्यांनी केले नाही तर तिला स्वकालानुरूप नवा अर्थही दिला. वीरयुगातील रामकथा त्यांनी भक्ती मध्यवर्ती ठेवून सांगितली. त्यांची उच्चकुलीन पात्रे आपले उत्कट मनोभाव, मानसप्रक्रिया वक्रोक्तीने अभिव्यक्त करतात. पाल्हाळ व कृत्रिमता टाळून आल्हाददायक व वेधक होणारी निवेदनशैली त्यांनी वापरली आहे. ही अलंकार-प्रचुर निवेदनशैली अनुपम कल्पना विलासाने नटलेली आहे. पौराणिक विषय, नवार्था-मुळे आलेली प्रतीकात्मकता, धीरोदात्त नायक, वर्णनविलास, अभिजात कल्पकता, चित्रबंध, वृत्तबद्धता, अलंकारप्रचुर काव्यात्म अग्राम्य भाषा यांमुळे संक्षेपरामायणाला विदग्ध महाकाव्याचे रूप लाभले आहे. लौकिक-अलौकिकांचा परस्परानुप्रवेश, अनुपम कल्पनाविलास, रसिक पांडित्य, परंपरेचा साचल, वृत्तबद्ध अलंकारप्रचुर विदग्ध शैली यांमुळे संक्षेपरामायणाचा वाचकाच्या मनावर होणारा संस्कार हा अभिजात साहित्य-वाचनाचा संस्कार आहे.

सर्व क्षेत्रात संस्कृतभाषेला मराठी भाषा पर्याय म्हणून उभी करण्याच्या ईर्ष्येने मुक्तेश्वरांनी संक्षेपरामायणाचे विदग्ध लेणे देशिकार भाषेत कोरले.

संक्षेपरामायण हे असे विदग्ध काव्य आहे. पण ही मुक्तेश्वरांची खरी प्रकृती आहे काय ? मुक्तेश्वरी भारतातील रसप्रफुल्ल आविष्कार संक्षेपरामायणात का दिसत नाही ? विदग्ध वाङमयाला आवश्यक असे संयत व सौम्यप्रकृती व्यक्तिमत्त्व त्यांचे नाही. जिवंत आणि उत्कट भावना, त्यांचा आवेगी आणि उद्रेकी आविष्कार, अनावर धावत्या गतीची चित्रदर्शी शैली या गुणविशेषांचा स्वाभाविक व सहज संघात हे मुक्तेश्वरी प्रतिभेचे खरे बळ आहे. विदग्धकाव्याच्या संयत आविष्कारात आणि तांत्रिक बंधविशेषात तिचा जीव गुदमरणे साहजिकच होते. त्याची प्रकृती विदग्ध महाकवीपेक्षा आर्ष महाकवीला अधिक जुळणारी आहे. त्यामुळे त्यांच्या रामायणाला त्यांच्या भारताची सर नाही.

प्रारंभिक स्फुटकाव्यात एकनाथी रचनेचे आख्यानात्मक वळण गिरवून पाहणाऱ्या या प्रतिभेने संक्षेपरामायणात विदग्ध वळणाचा डौल अनुसरून पाहिला. स्वतःच्या वाङमयीन प्रकृतीचा तो एक शोध होता. ओवीबंधाचे सामर्थ्य आणखी काही स्फुटका-

---

४. संरा., ७।३५६,५४७,५५०.

व्यातून जाणवत असतानाच या प्रतिभेला स्वतःची चित्रलिपी सापडली. स्वतःच्या खऱ्या सामर्थ्याचा साक्षात्कार आणि महाभारतासारखे अस्सल आर्ष महाकाव्य यांचा संयोग होताच त्यांच्या प्रतिभेने उत्तुंग झेप घेतली. तिचे दर्शन पुढील खंडातच घेतलेले बरे.

* * *

# ड ।। समारोप ।।

संक्षेपरामायणाच्या अभ्यासात हाती आलेले अत्यंत ठळक असे निष्कर्ष येथे सूत्ररूपाने मांडावयाचे आहेत.

(१) स्फुटकाव्यलेखनातून आलेला आत्मविश्वास आणि अध्ययनकाळातील संस्कृत काव्यादर्शाचा दृढ परिचय यामुळे मुक्तेश्वर दीर्घ काव्यलेखनासाठी उद्युक्त झाले. भावार्थरामायणाच्या गोड संस्कारामुळे त्यांनी रामकथेची निवड केली. त्यांच्या संक्षेपरामायणात नाथप्रीती आणि रामायणप्रीती एकवटली आहे. इ. स. १५९८ मध्ये प्रारंभ करून इ. स. १५९९ मध्ये पूर्वसंकल्पाप्रमाणे युद्धकांडापर्यंत लेखन करून त्यांनी ग्रंथ संपविला. हे लेखन त्यांच्या विद्याध्ययनकालातील काशीवास्तव्यात झाले. महाराष्ट्री आल्यावर भावार्थरामायणाच्या परिपूर्तीचे प्रयत्न पाहून त्यांनी आपल्या ग्रंथाला उत्तरकांडाची जोड दिली. यामधील संभाव्य चरित्रात्मक घटना व उत्तरकांडातील वाङ्मयीन विकसन लक्षात घेता इ. स. १६१० मध्ये संक्षेपराणायणाचे आजचे रूप सिद्ध झाले असावे. चोवीस ते छत्तीस या वयात दोन टप्प्यांनी भारतपूर्व काळात रचलेले मुक्तेश्वरांचे हे एकमेव पूर्ण दीर्घकाव्य आहे.

(२) वैचित्र्य आणि नावीन्य यांसाठी कथाबंधाचे घटक उपलब्ध स्रोतातून मुक्तपणे स्वीकारण्याची मुक्तेश्वरांची पद्धती आहे. वाल्मीकिरामायण हा संक्षेपरामायणाचा स्रोतग्रंथ आहे तर भावार्थरामायण हा आधारग्रंथ आहे. संक्षेपरामायणावर भावार्थरामायणाचा अनेकांगी प्रभाव असला तरी ती निर्जीव नक्कल नव्हे. भक्ती आणि अद्‌भुत यांना उठाव देणारे तपशील अध्यात्म रामायण, आनंदरामायण, जैमिनी अश्वमेध, भारती रामोपाख्यान यांतून त्यांनी वेचले आहेत. हनुमन्नाटक, मुरारीचे अनर्घराघव, जयदेवाचे प्रसन्नराघव, भवभूतीचे महावीरचरित, कालिदासाचे विक्रमोर्वशीय, कुमारसंभव व रघुवंश, बाणभट्टाची कादंबरी, भर्तृहरीची शतके, जगन्नाथाचे भामिनीविलास या संस्कृत काव्यनाट्यांतून आलंकारिक कल्पनाविलास व अभिव्यक्तीचे तंत्रविशेष त्यांनी आत्मसात केले. कोणत्याही एका ग्रंथाशी स्वत:ला बांधून न घेता परंपरेतून आवश्यक ते शोधून त्यांनी रामकथा घडविली. तिला स्वकृत नवतेची जोड दिली. त्यांनी रामकथेची संक्षेपप्रवृत्त मांडणी केली व कल्पनाप्रचुर पंडिती शैलीत तिचे पुन:कथन केले. त्यामुळे त्यांचे संक्षेपरामायण भाषांतर-अनुवाद-रूपांतर न ठरता रामकथेची पुनर्निर्मिती ठरते.

(३) संस्कृत-मराठी परंपरेतून उपलब्ध झालेली रामकथा मुक्तेश्वरांनी भावार्थरामायणाला वाट पुसत सांगितली. रामदास, रंगनाथस्वामी निगडीकर, विठ्ठल,

अवचितसुत काशी, श्रीधर यांच्या रामकथेवर मुक्तेश्वरांची काहीशी छाप आहे. संक्षेपवृत्ती, वृत्तबद्धता आणि विदग्धता या संक्षेपरामायणाच्या ठळक विशेषांनी मराठी रामकथा कमीअधिक प्रमाणात प्रभावित झालेली दिसते.

(४) अर्थवती भाषा व वृत्ते योजून मुक्तेश्वरांनी रामकथेचा सूत्रनिष्ठ संक्षेप केला. विस्तारप्रवृत्त काळातील संक्षेपप्रवृत्तीचा हा पहिलावहिला आविष्कार होता. संक्षेपवृत्ती हा मुक्तमयूरांना सांधणारा लक्षणीय अनुबंध आहे. संक्षेपवृत्तीनेच मुक्तेश्वरी रामायणाचा घाट घडविला आहे.


(५) प्राचीन मराठी पंडितीकाव्याच्या भाषेची प्रातिनिधिक घडण संक्षेपरामायणात दिसते. महानुभावेतर खुल्या मराठी वाङ्मयव्यवहारात मुक्तेश्वरांनी पंडितीकाव्याला त्याची काव्यभाषा मिळवून दिली.

(६) तारुण्यकालीन लेखनाचे गुणदोष संक्षेपरामायणात एकवटले आहेत. या काळातील मुक्तेश्वरांची काव्यदृष्टी आशयदृष्ट्या समकालीन वाङ्मयाने भारावलेली आणि अभिव्यक्तीदृष्ट्या विदग्ध शैलीने वेडावलेली होती. त्यामुळे संक्षेपरामायण ही स्वतःच्या बाह्यरूपाकडे लक्ष देणारी, काटचाकाळजीने साजशृंगार करणारी, नीटस होऊ पाहणारी रचना झाली आहे. तिच्यात परिपक्ववृत्तीची शांत सुषमा असण्यापेक्षा नवथर तारुण्यातील झगमगीतपणाचे आकर्षण अधिक आहे.

(७) संस्कृतला पर्याय म्हणून सर्व क्षेत्रात मराठीला उभी करण्याच्या ईर्ष्येने महाकाव्यानुकूल प्रतिभेच्या मुक्तेश्वरांनी संक्षेपरामायणास विदग्ध महाकाव्याचा घाट दिला.

(८) संक्षेपरामायणात मुक्तेश्वरी कवितेच्या विकसनाची एक अवस्था प्रतिबिंबित झाली आहे. पूर्वस्फुटकाव्यांतून आख्यानकाव्याचे एकनाथी वळण गिरविणाऱ्या मुक्तेश्वरांनी येथे विदग्ध वळण अनुसरले आहे. त्यांच्या मुक्त उत्कट व आवेगी प्रवृत्तीला हीरे बंदिस्त, संयत व संथ आविष्काराची पद्धती मानवणारी नव्हती, विदग्ध पद्धतीचे सा गुणविशेष पचवून त्यांची प्रतिभा अधिक अकृत्रिम, स्वाभाविक व जिवंत जोमदारपणाकडे उत्तरकाळात झुकलेली दिसते.

* * *



# इ ॥ परिशिष्टे ॥

## एक ॥ ओवीरामायण व वनपर्वांतर्गत रामोपाख्यान

मुक्तेश्वरकृत (?) ओवीरामायणाची हस्तलिखित प्रत श्री. गोपाळ रामचंद्र बडवे, पंढरपूर यांजकडून मिळवून पंढरपूर संशोधन मंडळाने सा. हिंदूमधून ती क्रमशः प्रसिद्ध केली. संतवाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक श्री.भा.पं. बहिरट यांनी तिची संपादित आवृत्ती[१] प्रसिद्ध केली. सप्तकांडात विभक्त असलेले हे ओवीरामायण ३५९ ओव्यांचे आहे. त्याचे मुक्तेश्वरी भारतातील वनपर्वांतर्गत रामोपाख्यानाशी (मुभा. ३।अ१५) अतीव सादृश्य आहे.

रामोपाख्यानातील २६७ ओव्यांपैकी ४४ ओव्या वगळून २२३ ओव्या ओवीरामायणाने स्वीकारल्या आहेत. रामोपाख्यानात नसलेल्या स्वतंत्र अशा १३६ ओव्या ओवीरामायणात आहेत.[२] या १३६ ओव्या मुक्तेश्वरांच्या आहेत काय, हाच खरा प्रश्न आहे. आधीच रचलेल्या या सप्तकांडात्मक ओवीरामायणाचा संकोच-विस्तार करून मुक्तेश्वरांनी वनपर्वातील रामोपाख्यान सिद्ध केले असावे, असे बहिरट (पृ. १) सुचवितात. परांजपे त्याचाच अनुवाद करतात.[३] वसंत जोशींनी मात्र ओवीरामायणाच्या मुक्तेश्वरकर्तृत्वाबद्दल शंका प्रकट केली आहे.[४]

ओवीरामायण मुक्तेश्वरांचे वाटत नाही, याची काही कारणे देता येतील.

(१) ओवीरामायणाचे एकुलते एक हस्तलिखित उपलब्ध झाले आहे. त्यावर लेखनकाल नाही. तरी ते १५० वर्षांपूर्वीचे असावे असा संपादकांचा (पृ. ३) तर्क आहे. मुक्तेश्वरानंतर जवळजवळ अडीचशे वर्षांनी लिहिलेली ही प्रत कितपत विश्वसनीय मानावी, याविषयी शंका आहे. अन्य प्रतीची अनुपलब्धी हा निर्णायक पुरावा नव्हे, पण अभावात्मक पुरावा म्हणून त्याची नोंद करता येईल.

(२) ओवीरामायण मुक्तेश्वरांचे, याबाजूचा एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे

---

१ कवि मुक्तेश्वरकृत **ओवीरामायण**, संपा. भा. पं. बहिरट, पंढरपूर संशोधन मंडळ पंढरपूर, १९५६.

२ ही गणना स्वतंत्रपणे केली आहे.

३ भा. श्री. परांजपे, **संरा**, उपोद्घात, पृ. ४०.

४ व. स. जोशी, **कविवर्य मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड**, पूर्वोक्त, पृ. ३२.

किष्किंधाकांड वगळता प्रत्येक कांडांती आलेली "मुक्तेश्वर" अशी कविनाममुद्रा. पुढील समाप्तिमुद्रा पहा —

(अ) **मार्गी जींकीला भृगुपती । जयेस्वी पातले अयोध्येप्रती ।**
**मुक्तेश्वर कवि यथामती । वर्णीले बाळकांड ॥ –ओवीरा. १।८६**
**मार्गी जिंकिला भृगुपती । जयश्वी पातले अयोध्येप्रति ।**
**रायें जाणोनी पुरुषार्थी । राजाभिषेक मांडिला ॥–वन १५।६३.**

(ब) **पंपे पातला रघुपती । तंव भेटला हारी मारुती ।**
**आरण्यकांड समाप्ती । म्हणे कवी मुक्तेश्वर ॥ ओवीरा. ३।५८**
**पुढे पंपे पातला रघुपती । तंव भेटला हरि मारुती ।**
**राम आलिंगूनी प्रीती । म्हणे, "हा अवतार हराचा" ॥ -वन १५।१२८**

याचा अर्थ असा की ओवीरामायणातील समाप्तिमुद्रा रामोपाख्यानातील ओव्यांची फिरवाफिरव करून तयार झालेल्या दिसतात. "अयोध्याकांड समाप्ती । करी मुक्तेश्वर कवी" (२।४६), "संपले कांड सुंदर । मुक्तेश्वर कवी म्हणे" (५।४२), "म्हणे मुक्तेश्वर कवी" (६।६५), "तेचि प्राकृत भाषेत । मुक्तेश्वर वदे संतासी" (६।३६) या स्वतंत्रपणे रचलेल्या समाप्तिमुद्रा वैशिष्टचहीन आहेत. विषयप्रस्ताव, पुढील विषयांचे सूचन, गुरुभक्ती, काव्यदृष्टी, काव्यभूमिका, श्रोतृविनवणी, ग्रंथदूषकांचा समाचार यांचा आलंकारिक शैलीने निर्देश करणाऱ्या मुक्तेश्वरी समाप्तिमुद्रा या नव्हेत. मुक्तेश्वरी रामोपाख्यानाची सप्तकांडात्मक मांडणी करणाऱ्याने आपल्या विभाजनाला अधिकृत मान्यता मिळावी म्हणून त्या रचलेल्या दिसतात. कांड व कवि-नाम यांचा गद्यप्राय उल्लेख करणाऱ्या या समाप्तिमुद्रांना त्यामुळे निर्णायक महत्त्व देता येत नाही.

(३) राज्यभ्रष्ट व हृतश्रीक युधिष्ठिराला आश्वस्त करण्यासाठी वनपर्वांतर्गत रामोपाख्यान आले आहे. त्याला स्वयंपूर्ण ग्रंथाचे रूप देऊ पाहणाऱ्याने ही पार्श्वभूमी टाळली तरी धर्मराज-मार्कंडेय ही श्रोता-वक्ता जोडी कायम ठेवली. त्यामुळे ग्रंथाच्या उपक्रमोपसंहाराला स्वतंत्र ग्रंथाची कळा आली नाही.

(४) मुक्तेश्वर सलग ग्रंथरचना करताना फक्त ग्रंथारंभी उपक्रम करतात, अन्य कांड -अध्याय यांच्या आरंभी करीत नाहीत. कथेच्या मध्यवर्ती प्रवाहात नेऊन सोडणारा आरंभ त्यांना आवडतो. ओवीरामायणाच्या प्रत्येक कांडारंभी येणारे उपक्रम (१।१, २।१, ३।१, ४।१, ५।१, ६।१, ७।१) ही रचना मुक्तेश्वरी नसल्याचे दाखवितात.

(५) स्वतःची सामान्य रचना मान्यताप्राप्त मुक्तेश्वरी रचनेत घुसडण्याचा प्रयत्न ओवीरामायणकाराने केला आहे. मुक्तेश्वरी रचनेचा आभास निर्माण करण्यासाठी रामोपाख्यानातील २२३ ओव्या त्याने स्वीकारल्या आहेत. त्यात क्वचित आढळणारे क्रमांतर व पाठांतर विशेष लक्षणीय नाही. सामान्यतः एकाच रचनेच्या कोणत्याही दोन हस्तलिखितांत तसे ते आढळते. ओवीरामायण आणि वनपर्व यात कोणतेही पौर्वा-

पर्यं मानल्यास सदृश ओव्यांच्या आधाराने मुक्तेश्वरांचा कोणताच विकास झाला नाही असे म्हणावे लागते. आणि ते अनुभवसंगत नाही.

(६) रामोपाख्यानातील ४४ ओव्या येथे गाळलेल्या आहेत. त्यातील ३० एकटचा बालकांडातील आहेत. ओव्या गाळण्याचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत जाते. कधी ओव्या गाळल्याने विसंगती येते. ब्रह्मदेवाचे वरदानवृत्त संपताच येणारे शिववरदान अचानक आल्यासारखे वाटते (१।३०–३१). वनपर्व १५।४०–४२ मधील शिव-प्रसन्नतेचे वृत्त गाळल्याचा तो परिणाम आहे. ओवीरामायण ७।२०–२१ व वनपर्व १५।२५२–२५४ तुळून पाहिल्यास ओवीरामायण वनपर्वोत्तर निर्माण झाल्याचे दिसते. राम-भरत बंधुप्रेम वर्णिताना मार्कंडेयाने पांडवांच्या बंधुप्रीतीचा उल्लेख केला. त्यास धर्माने उत्तर दिले (वन - १५।२५२–२५३). कथेच्या मध्येच येणारा हा संवाद "असो" या शब्दाने संपवून मुक्तेश्वरांनी वन. १५।२५४ मध्ये पुन्हा कथासूत्र उचलले आहे. "असो" शब्दाचा असा वापर ही मुक्तेश्वरी शैलीची एक लकब आहे. ओवी-रामायणकाराने मधील संवाद गाळला पण वन. १५।२५४ ही ओवी ७।२१ म्हणून "असो" सह स्वीकारली. त्यामुळे "असो" चा वापर निष्प्रयोजक बनला. ओवीरामा-यणावर संस्करण करून मुक्तेश्वरांनी रामोपाख्यान रचलेले नाही तर त्यांच्या रामो-पाख्यानाला स्वतंत्र ग्रंथरूप देण्याचा प्रयत्न उत्तरकालीनाने केला असे यावरून दिसते.

(७) रामोपाख्यानात नसलेल्या १३६ ओव्यांचे निरीक्षण या अंदाजाला पुष्टी देणारे आहे. "या मध्येमध्ये घातलेल्या ओव्या आणि मुक्तेश्वरांच्या तेथेच असणाऱ्या ओव्या यातील फरक निश्चित जाणवतो. मुक्तेश्वरांची नीटस आणि प्रमाणबद्ध ओवी ती नाही. चार चरणी विस्तार असलेली आणि मुक्तेश्वरांप्रमाणे संस्कृतप्रचुर नसणारी ती रचना आहे . . . "नकळत पद अग्नि पडे । न करी दाह कधी घडे ।" असे वामन-पंडिती चरणही यात घुसडण्यात आले आहेत."[५]

या ओव्या मुख्यतः नवप्रसंगाची जोड देणाऱ्या व तपशीलाची भर घालणाऱ्या आहेत. एकच आशय वेगळ्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न त्यात नाही.त्यामुळे त्या रामोपाख्यानाचे संस्करण करणाऱ्या नसून त्याला वाढीव भागाची जोड देणाऱ्या आहेत. त्यात घटिताचे निरलंकृत वृत्तात्मक कथन आहे. क्वचित् योजिलेल्या पर्यायी शब्दाशिवाय मुक्तेश्वरी शैलीची आणखी कोणतीही खूण त्यात नाही.

(८) एतावता, ओवीरामायणातील स्वतंत्र १३६ ओव्या मुक्तेश्वरांच्या नव्हेत. मुक्तेश्वरांच्या कवितेवर लोभावलेल्या कोणा रसिक रामभक्ताने त्यांच्या रामोपा-ख्यानाला स्वयंपूर्ण व सप्तकांडात्मक ग्रंथाचे स्वरूप देण्याचा केलेला तो एक प्रयत्न आहे एवढेच. मूळ ग्रंथात या प्रकारचा फेरफार केल्याची उदाहरणे प्राचीन मराठी

---

५. व. स. जोशी, **मुक्तेश्वरकृत भावार्थ रामायणाचे उत्तरकांड**, पूर्वोक्त पृ. ३३.

हस्तलिखितांचा परिचय असणाऱ्या अभ्यासकाला सहजी सापडणारी आहेत. नाथांचे नाव सांगणारे ओवीबद्ध श्रीकृष्णचरित्र नाथ-भानुदासांच्या स्फुट रचनेतून सिद्ध केल्याचे जोशींनी दाखविले आहे.[६] खुद्द मुक्तेश्वरांच्या वनपर्वांतर्गत भीम-हनुमान-संवादात अशी भर टाकण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सलग ओवीबंधातील त्यांच्या शुकरंभाख्यानाचे सहा अध्यायात विभाजन करू पाहणारा एक प्रयत्न उपलब्ध आहे. त्याच्याशी संवादी असाच हा रामोपाख्यानाचा सप्तकांडात्मक ओवीरामायण करणारा प्रयत्न कोणा उत्तरकालीनाने केला असल्याचे दिसते.

## दोन ॥ मुक्तेश्वरकृत (?) भावार्थरामायणाचे उत्तरकांड व संक्षेपरामायण

एकनाथाचे भावार्थरामायण पूर्ण करण्याचे एकूण चार प्रयत्न आतापर्यन्त उपलब्ध झाले आहेत. गावबा, कोनेरीसुत शेष, अनाम यांच्या बरोबरीने मुक्तेश्वरांनीही ओवीबद्ध उत्तरकांड लिहून भावार्थरामायणाची परिपूर्ती केली असा दावा प्रथम वि. अ. कानोले यांनी केला.[१] वसंत जोशींनी[२] त्याची संहिता विवेचक अभ्यासासह पुढे ठेवून त्यास पुष्टी दिली. हे उत्तरकांड मुक्तेश्वरांचे असावे[३] की नसावे[४] या विषयीची उलट सुलट आंदोलने अजूनही थांबलेली नाहीत.

---

६. तत्रैव, पृ. ३३–३४.

१. वि. अ. कानोले, **भावार्थरामायणाचे अज्ञात उत्तरकांड**, श्री एकनाथ-दर्शन, खंड१, एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद. १९५२, पृ. २९०–३२६.

२. व. स. जोशी, **कविवर्य मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड**, पुणे, १९६३. प्रस्तावना पृ. १–५८. (या प्रतीप्रमाणे संदर्भ दिले आहेत.)

३. ज. र. आजगांवकर, **प्राचीन मराठी संतकवी**, खंड १ मुंबई, १९५७, पृ. ४६१.
अ. का. प्रियोळकर, **मुक्तेश्वरकृत महाभारत आदिपर्व खंड २**, मुंबई १९५३, पृ. १९–२० पां. ना. कुलकर्णी, **संशोधनधारा**, पुणे, १९६६, पृ. ७८.
भा. श्री. परांजपे, **संरा**, उपोद्धात पृ. ४०.
शैलजा करंदीकर, **वाल्मीकिरामायणाचे छंदोबद्ध मराठी अवतार**, पदवी-प्रबंध (टं.लि.) मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६० पृ. ३२०.
अनिल बडवे, **मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड**, इंद्रायणी, जून १९६३., पृ. ३७–४२.

४. पंडित आवळीकर, **वाङ्मयदर्शन**, कोल्हापूर-सातारा, १९७५,. पृ. २०–२४.
अ. ना. देशपांडे, **प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**, भाग –४, पुणे- नागपूर १९७७. पृ. ३९५–३९७.

**१. मुक्तेश्वरकर्तृत्वाची संदिग्धता**

या उत्तरकांडाच्या लेखकाने आपला नामोल्लेख न करता "एका जनार्दन" या मुद्रेने लेखन करून नाथनिष्ठेचा संकेत व परंपरा पाळली आहे. त्यामुळे त्याचे कर्तृत्व वादग्रस्त ठरले आहे.

(१) **"ॐ नमो जनार्दनास्वामी । लिलाविश्वंभर गुरू नामी ।**
**तुझीये पवित्र पादपद्मीं । मनोभृंग विश्रामो ।।"–१।१**

असा ग्रंथोपक्रमातील लीलाविश्वंभराचा निर्देश व पादपद्म-मनोभृंग ही आवृत्त होणारी आवडती रूपके ग्रंथकर्ता म्हणून मुक्तेश्वराकडे बोट दाखवितात. या संदर्भात मुक्तेश्वर जनार्दनस्वामींना लीलाविश्वंभर म्हणून संबोधील काय, असा आवळीकरांचा (पृ. २२) प्रश्न आहे. त्याचे उत्तर होय असेच द्यावे लागेल. कारण मुक्तेश्वरकृत एकनाथ-चरित्रातील ओवी १,२,९१ व ९४ यां या एकत्रित विचारात तसा सूचक निर्देश आलेला आहे.

(२) युद्धकदना मिसळले, खंडविखंड केले, दिव्यसुमन वर्षले, हृदयस्फोट होतसे, स्वर्ग वाटे ठेंगणे, कोटी मदना निःसांडणी, अमरत्व निर्भयत्व । तिन्ही लोकीचे आधिपत्य, छपन्न देशीचे राजेश्वर । शाण्णव कुळीचे राजकुमार अशा रचना आणि जाश्वनीळ, ब्रह्मांडघट, वज्रमुष्टी, युद्धकदन, चामके यासारखे येथील शब्द मुक्तेश्वरी वाङमयात पुन्हा पुन्हा आढळतात.

(३) प्रस्तुत उत्तरकांड आणि मुक्तेश्वरी भारत यांमधील शैलीचे साम्य दाखविणारे अनेक उतारे पूर्वाभ्यासकांनी उद्धृत केले आहेत. निसर्गवर्णनाची बहार, भोजनवर्णनातील तपशील, स्त्रीवर्णनातील सौदर्य-पावित्र्यदर्शक दृष्टांत, प्रदेशवर्णनातील देशनामे व महाराष्ट्राभिमान, युद्धवर्णनातील तडफ, वर्णनातील कालविपर्यास, उत्पातवर्णने, आविर्भाववर्णने इत्यादी वर्णनशैलीविशेष मुक्तेश्वरी रचनेत आढळणारे आहेत. संवादातील पुनरुक्त पदबंध, पर्यायी नावे, डोळस निरीक्षणातून आकारलेली उपमानसृष्टी, व्युत्पती देण्याची लकब, विसंधी, सजातीय कर्माची योजना, संस्कृत संख्या विशेषणांचा वापर इत्यादी शैलीविशेष मुक्तेश्वरी थाटाचे आहेत. दांभिकांचा तिटकारा हरिहरैक्यभाव, सामाजिकतेचे भान, स्त्रीपुरुषसंबंध वर्णनातील उघडी स्पष्टता, तत्त्वविचार हे वृत्तिविशेष मुक्तेश्वरांशी अनुबंध जोडणारे आहेत. समान शब्दांनी केलेला व्यासगौरव, वैद्यकीय व आध्यात्मिक उपमाने ह्या विशिष्ट लकबीही मुक्तेश्वरी वाटतात. दोन्ही रचनांमध्ये शब्दसाम्यही दाखविता येण्यासारखे आहे. वाङमयीन प्रवृत्ती व विशेष यांची समरूपता यांमुळे हे उत्तरकांड मुक्तेश्वरांचे मानण्याकडे मनाचा कल झुकू लागतो.

(४) **"पवित्र सरिता कृष्णावेणी । पंचगंगा संगम श्छानीं**
**नृसिंव्ह सरस्वतीच्या चरणी । ग्रंथ प्रगट लाधला ।।**
**तेथे जाली देववाणी । ग्रंथ पावावा प्रतिष्ठानीं**

**यकनाथाचिये सदनी । विस्तारेल जनमुखे ।।१८।२०२–२०३.**

अशा उपसंहारातील ओळी नृसिंहवाडी हे ग्रंथरचना स्थल सांगतात. नृसिंहवाडीजवळील तेरवाड येथे मुक्तेश्वरांचे वास्तव्य होते. त्यांचे वृंदावन तेथे आहे. आजही त्यांचे वंशज तेथे राहतात. ग्रंथसमाप्तीचा पुण्यमुहूर्त साधण्यासाठी मुक्तेश्वर जवळच्या नृसिंहवाडीला जाणे शक्य व स्वाभाविक आहे. या ग्रंथाचे रचनास्थल पुन्हा मुक्तेश्वरांकडे बोट दाखविणारे आहे.

(५) मुक्तेश्वरांचे पणतू, तेरवाडग्रामसंपादक व गवई मुक्तेश्वरबुवा हे ग्रंथकर्ते असावेत, या शंकेचा परिहार जोशींनी केला आहे. तरीही देशपांडे व आवळीकर यांच्या मताचा सूचक कल या मुक्तेश्वरबुवांकडे झुकलेला दिसतो. तथापि उत्तरकांडातील राक्षसांच्या अत्याचारवर्णनातील तीव्रता, भाषेची धार व प्रतिबिंबित जीवन पाहता शाहूकालीन स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या मुक्तेश्वरबुवांपेक्षा स्वराज्यपूर्व पारतंत्र्याचा दाहक चटका अनुभवणाऱ्या मुक्तेश्वरांचेच हे बोल असावेत, असे वाटते. तेव्हा नाथांविषयीच्या आदराने भावार्थरामायणाची परिपूर्ती करू पाहणारा, नृसिंहवाडीच्या परिसरात राहून प्रतिष्ठानी ग्रंथप्रसाराची इच्छा करणारा, व मुक्तेश्वरी शैलीत लिहिणारा असा मुक्तेश्वरांशिवाय दुसरा कोणता समकालीन लेखक दाखविता येणार आहे?

तरीही या प्रश्नाचे निःसंदिग्ध उत्तर देणे कठीण आहे. नृसिंहसरस्वतीचा उल्लेख व "येकनाथाचिये सदनी" हा एकनाथांचा एकेरी व तिऱ्हाईतपणे केलेला नामोल्लेख मुक्तेश्वरांच्या एकनाथाविषयक आदराशी सर्वस्वी विसंगत आहे"[५] मुक्तेश्वरांच्या नाममुद्रेचा अभावही निर्णयाला दोलायमान करतो. केवळ साम्यस्थळे हा एककर्तृत्वाचा निर्णायक पुरावा नव्हे, हेही लक्षात घेतले पाहिजे.

त्यामुळे निश्चित प्रमाणाच्या अभावी उत्तरकांडाच्या मुक्तेश्वरकर्तृत्वाची निश्चिती करता येत नाही.

**२. उत्तरकांडाचे स्वरूप :**

हे उत्तरकांड जसे मुक्तेश्वरांचे आहे असे म्हणता येत नाही तसे ते नाही असेही म्हणता येत नाही. ते मुक्तेश्वरांचे मानल्यास त्याविषयी आणखी थोडा विचार करता येईल.

वृद्धापकाळी भारतरचनेनंतर मुक्तेश्वरांनी हे उत्तरकांड रचले असे कानोले व आजगांवकर म्हणतात. नृसिंहवाडीस मुक्तेश्वर वृद्धावस्थेत होते, या तर्काच्या आधारे देशपांडे त्यास पाठिंबा देतात. तथापि स्वतःचे भारत अपूर्ण ठेवून अन्य ग्रंथपरिपूर्तीचे काम मुक्तेश्वरांनी हाती घेतले नसावे. उत्तरकांडापेक्षा मुक्तेश्वरी भारत अधिक विकसित व म्हणून अधिक उत्तरकालीन आविष्कार मानला पाहिजे. "नाथनिर्याणाचा

---

५. पंडित आवळीकर, पूर्वोक्त, पृ. २३.

व ग्रंथपूर्णतेचा प्रसंग व प्रश्न ताजा असतानाच गावबा व मुक्तेश्वर या दोघांच्या भिन्न कृती निर्माण झाल्या असाव्या . . . . . "[६] हे कानोल्यांचे स्वमतविरोधी म्हणणे अधिक सुसंगत आहे. तेव्हा संक्षेपरामायणानंतर व भारतपूर्वकाळात उत्तरकांड रचना झाली असावी. भावार्थरामायण परिपूर्तीप्रयत्न पाहून मुक्तेश्वरांनीं इ. स. १६०९–१० मध्ये उत्तरकांड लिहून संक्षेपरामायण पूर्ण केले, हे लक्षात घेता जोशींनी सुचविलेल्या शके १५२५ पेक्षा शके १५३२ (इ.स. १६१०) हा उत्तरकांडाचा रचनाकाल मानणे योग्य ठरेल. "हे काम मुक्तेश्वरांनी स्वयंप्रेरणेने व नाथनिष्ठेने पार पाडले किंवा मतभेद व चुरस वाटून हा नवा उपक्रम केला याबद्दल निश्चितपणे काही सांगतायेत नाही".[७] पण मातृजनकाच्या कृतीला शोभेशा डौलाने त्यांनी ते पुरे केले एवढे मात्र खरे.

स्थान व व्यक्तिमाहात्म्य यांमुळे गावबाच्या रचनेला प्रसिद्धी लाभली. तुलनेने मुक्तेश्वरी रचना उपेक्षित राहिली. गावबाकृत उत्तरकांड सत्त्याहत्तर अध्यायांचे आहे. त्यातील ओवी नाथवळणाची म्हणजे साडेचारचरणी आहे. प्रमाण कमी असले तरी नाथांप्रमाणेच तेही संस्कृत श्लोक उद्धृत करतात. स्वैर रचनास्वातंत्र्य, कथोपकथांचे संकलन, व्यक्तिचित्रणातील विसंगती, जंत्रीवजा कालविपर्यस्त वर्णने व पाल्हाळ ही गावबांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा उपक्रम स्वतंत्र थाटाचा असून मुक्तेश्वरांचा मात्र कथासूत्र उचलणारा आहे. मुक्तेश्वरी उत्तरकांड १७ (वा १८) अध्यायांचे, साडेतीन चरणी ओव्यांचे[८] व संस्कृत श्लोकांचा अभाव असलेले आहे.

संक्षेपरामायणावर जसा नाथांचा परिणाम जाणवतो तसा तो या उत्तरकांडावरही जाणवतो. वेश्या-यती संवादासारखे प्रसंग, कल्पना, वर्णन, संकेत, दृष्टांत, शब्दप्रयोग व भाषासरणी यांवर नाथांचा ठसा आहे. सामाजिक परिमाण व रामकथेकडे पाहण्याची दृष्टी नाथसदृश आहे. गावबा व अनामिक यांच्या उत्तरकांडात रामसीतेच्या अश्वमेधोत्तर सुखी सहजीवनाचे चित्र आले आहे. तथापि एकनाथांना सीतेचे अखेरचे दिव्य अभिप्रेत होते.[९] त्यामुळे ही रचना एकनाथांना अभिप्रेत असलेल्या कल्पनेने झाली असे म्हणता येईल.

हे उत्तरकांड म्हणजे वाल्मीकीरामायणाच्या उत्तरकांडाचा धावता सारांश म्हणता येईल. कुशलवोपाख्यान तेवढे संक्षेपरामायणाप्रमाणेच जैमिनी अश्वमेधाच्या आधाराने रंगविले. कथाभाग, कल्पना व काही श्लोकांचा अनुवाद याबाबतीत मुक्तेश्वर जैमिनीचे ऋणी असले तरी दोहदपृच्छा, रामकुशसंवाद यासारख्या ठिकाणी त्यांनी केलेले बदल

---

६. वि. अ. कानोले, पूर्वोक्त, पृ. २३.

७. तत्रैव पृ. २९६.

८. डॉ.रा.चि. ढेरे यांच्या संग्रहातील प्रतीत आरंभीच्या दोन अध्यायातील ओव्यांना नाथवळणाच्या साडेचारचरणी ओव्यांचे रूप देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

९. पां. ना. कुलकर्णी, पूर्वोक्त, पृ. ८७–८८.

रसिक काव्यात्मतेचे द्योतक आहेत. गतिशील निवेदन, सविस्तर सालंकृत वर्णने, निसर्गरसिकतेचा आविष्कार, सामाजिक वास्तवाचे भान, उत्कट मनोभावांचे प्रकटीकरण या विशेषांनी नटलेले उत्तरकांड ही पुष्कळच वरच्या दर्जाची साहित्यकृती आहे.

### ३. उत्तरकांड व संक्षेपरामायणाचे उत्तरकांड

या उत्तरकांडाची आणखी एक हस्तलिखित प्रत पंढरपूर येथील रामायणे यांच्या घरी पाहण्यात आली. ९" × १६" आकाराची ७३½ पृष्ठे असून प्रत्येक पानावर १६ ओळी आहेत. उपलब्ध प्रतीत ही प्रत अधिक शुद्ध, संपूर्ण व सुवाच्य आहे. नांदेड, संकेश्वर व पंढरपूर अशा विविध ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या या ग्रंथाच्या प्रती त्याची विश्वसनीयता दाखवितात. उत्तरकांडाच्या विविध प्रतीतील ताळमेळ व संक्षेपरामायणाच्या उत्तरकांडाशी असलेले अतीव सादृश्य पुढीलप्रमाणे दाखविता येईल :—

| संक्षेपरामायण उत्तरकांड (श्लोक) | | मुक्तेश्वरकृत भावार्थ अध्याय | | रामायणाचे उत्तरकांड रामयणे प्रत | कानोले प्रत | जोशी प्रत |
|---|---|---|---|---|---|---|
| १–११ | –११ | १। | कुबेरजननं | ६८ | — | ७० |
| १९–३० | –१२ | २। | माळीसुमाळी निग्रह | १२५ | — | १२५ |
| ३१–७१ | –४१ | ३। | कुबेरनिर्वहण | १६७ | १६७ | १६७ |
| ७२–१०१ | –३० | ४। | रावणविटंबन | १४१ | १४१ | १४१ |
| १०२–१६१ | –६० | ५। | रावणमानभंग | १४३ | १४३ | १४३ |
| १६२–२१७ | –५६ | ६। | रावणइंद्रजय | १३० | १२९ | १३० |
| २१८–२७४ | –५७ | ७। | सुग्रीव-बिभीषण गमन | १०० | ९० | १०० |
| २७५–३०७ | –३२ | ८। | सीतापरित्याग | १६९ | १६८ | १७० |
| ३०८–३३२ | –२५ | ९। | श्वानउद्धरण | १७५ | १७४ | १७५ |
| ३३३–३५८ | –२६ | १०। | कुशलवजनन | १४६ | १४६ | १४५ |
| ३५९–३९३ | –३५ | ११। | दंडकारण्योपाख्यान | १५४ | १५६ | १५६ |
| ३९४–४३३ | –४० | १२। | लवनिग्रहण | १४१ | १४१ | १४१ |
| ४३४–४७५ | –४२ | १३। | सौमित्र पराभव | १७१ | १७० | १०९ |
| | | | | — | — | १४।६३ |
| ४७६–५२८ | –५३ | १४। | श्रीरामविजय | ११९ | १२० | १५।१२० |
| ५२९–५८० | –५२ | १५। | सीतापातालप्रवेश | १९६ | १९४ | १६।१९८ |
| ५८१–६१८ | –३८ | १६। | लक्ष्मण निर्याण | १२६ | १२५ | १७।१२८ |
| ६१९–६६१ | –४३ | १७। | रामनिजधामगमन | २०४ | २०४ | १८।२०४ |
| एकूण ६६१श्लोक | | १७ जोशी-प्रत १८ | | २४७५ | २२६८ | २४८५ |

संक्षेपरामायणाच्या उत्तरकांडातील श्लोकांचा ओवीबद्ध विस्तार या उत्तरकांडात झालेला दिसतो. आशय, क्रम आणि शब्दयोजना यांची इतकी साम्यस्थळे हे दोन्ही ग्रंथ एकमेकांबरोबर वाचणाराला दिसतात की ती उद्धृत करणे अनावश्यक ठरावे. सुमाळी ऐवजी सुमारी अशी नामांतरे, भरताआधी लक्ष्मणाने लवकुशांशी युद्ध करणे असे क्रमांतर, कुबेराकडून लंका हिरावण्यासारखे (उका ३।६१–९६) वेगळे वृत्तांत येथे येतात. पण त्यांचे प्रमाण मोठे नाही. ज्यांचा केवळ संदर्भ संक्षेपरामायणात येतो. त्यांचे विस्ताराने कथन येथे येते. (मरुत्त कथा संरा, ७।८०, उका. ४।४१–५१). देवांनी पक्षांना वरप्रदान केले (उका. ४।५९–६७) यासारखा संक्षेपरामायणात नसलेला भागही येथे पुष्कळच आहे. संक्षेपरामायणातील कथा भागाचा विस्तार, नवा तपशील नव्या प्रसंगांची भर, घटनांची संभाव्यता ठसविण्यासाठी केलेली स्पष्टीकरणे आणि ओवीबंध यांमुळे उत्तरकांडात विस्तार झाला आहे. संक्षेपरामायणातील कथाबंध प्रसंगन्यासातून साधल्यामुळे रांगोळीच्या ठिपक्यांसारखा झाला आहे. तेथे त्यांना जोडणाऱ्या वृत्तात्मक भागाचा विस्तार झाल्याने कथाबंधास एक सलगता प्राप्त झाली आहे.

संक्षेपरामायणाच्या उत्तरकांडात ओवीशी जुळणाऱ्या अनुष्टुभाचे आधिक्य व विस्तारशीलता जाणवते. या उत्तारकांडात मुक्तेश्वर वृत्ताकडून ओवीकडे व संक्षेपाकडून विस्ताराकडे वळलेले दिसतात. वृत्त आणि वृत्ती बदलताच त्यांची प्रतिभा अधिक मुक्तपणे आविष्कृत होऊ लागलेली दिसते. यमपुरीदर्शनाची वर्णने (संरा ७।११७–१२० उका ५।६३–६८) दोन्ही ठिकाणी पुराणाधारित व सांकेतिक आहेत. पण संक्षेपरामायणात ते केवळ स्थलवर्णनाच्या पातळीवर राहिले आहे तर उत्तरकांडात रावणाच्या सुप्त सद्बुद्धीला स्पर्श करण्याची धडपड आहे. प्रसंगांना व्यक्तिदर्शनाशी बांधण्याचे हे चातुर्य आहे. राम-रावण संघर्षाला दोन व्यक्तींऐवजी दोन कुळांच्या संघर्षाचे रूप देण्यासाठी येथे रावण-मांधाता संघर्षाचा (उका ६।६) उपयोग करून घेतला आहे. कथाबंध व व्यक्तिदर्शन यांची पुढील अवस्था उत्तरकांडातून अशी जाणवत राहते. संक्षेपरामायणाचा कवी विदग्ध शैलीच्या रूपविभ्रमात रमलेला आहे तर उत्तरकांडाचा कर्ता भोवतालच्या समाजवास्तवाचे जिवंत प्रतिबिंब आपल्या कृतीत पकडणारा संवेदनशील कवी आहे. समकालाचे इतके तीव्र प्रतिबिंब मुक्तेश्वरांच्या अन्य रचनेत नाही. भक्ती-अवतारकल्पना व नीत्युपदेश यांचा येथे वाढता व अधिकारवाणीने केलेला पुरस्कार आहे. ही उपदेशपरता व समन्वयशीलता वाढत्या वयाची, अधिकाराची व जाणिवेची द्योतक आहे. निसर्गवर्णन, स्त्रीवर्णन, वर्णनस्थळी रेंगाळणे, प्रसंगाचा सारार्थ सुभाषितात्मक शैलीत सांगण्याची रीत, रामस्तवने, उपमानांची विविधता व अलंकारप्राचुर्य यांचे प्रमाण येथे वाढलेले दिसते. या उलट संक्षेपरामायणातील शब्दचमत्कृतीचा सोस व संस्कृतप्राचुर्य येथे क्षीण झालेले दिसते. हे उत्तेरकांड मुक्तेश्वरांचे ठरले तर त्यांच्या विकसनशील

प्रतिभेचा तो एक टप्पा मानावा लागेल. ते मुक्तेश्वरांचे नसेल तर मुक्तेश्वरी रचनेचे अनुकरण करून तिचा उत्क्रांत आविष्कार घडविणाऱ्या नव्या प्रतिभावंत कवीचा शोध घ्यावा लागेल.

| वाल्मीकिरामायण सातवळकर – प्रत | | एकनाथकृत भावार्थरामायण पणशीकर प्रत | | मुक्तेश्वरकृत संक्षेप-रामायण परांजपे प्रत | |
|---|---|---|---|---|---|
| वाल्मीकिमुनींच्या प्रश्नावर नारदाचे रामचरित्रकथन- १।१–१०० | –१०० | —— | | —— | |
| श्लोकोत्पत्ती व ब्रह्मदेवाची रामचरित्र रचण्याची आज्ञा–२।१–४३ | –४३ | —— | | —— | |
| रामायणाचे संक्षिप्त निरूपण ३।१–४० | –४० | —— | | —— | |
| लवकुशांचे रामायणगायन-४।१–३६ | –३६ | —— | | —— | |
| अयोध्यावर्णन सर्ग ५, ६ व ७ श्लोक | –७९ | —— | | —— | |
| —— | | मंगलचरण १।१–३७ | –३७ | मंगलाचरण १–१७ | –१७ |
| —— | | दशरथवृत्त व श्रावणकथा १।३८–८० | –४३ | दशरथवृत्त व श्रावण कथा– १८–२४ | –७ |
| —— | | दैत्यगुरूशी दशरथाचे युद्ध १।८१–९६ | –१६ | दैत्यगुरूशी दशरथाचे युद्ध२५–३० कैकयीस वरप्रदान | –६ |
| —— | | बृहस्पतीचा कैकयीस वर, अयोध्याप्रवेश १।९७–११९ | –२३ | बृहस्पती मंत्र ३१–३२ | –२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| यज्ञसंकल्प ८।१–२५ | –२५ | —— | | —— | |
| ऋष्यशृंगकथा सर्ग ९, १० व ११, श्लोक | –८५ | ऋष्यशृंगकथा २।१–६५ | –६५ | ऋष्यशृंगानयन ३३–३५ | –३ |
| ऋष्यशृंगाकडून अश्वमेघयज्ञ सर्ग१२, १३ व १४, श्लोक | –१२५ | —— | | —— | |
| पुत्रकामेष्टीयज्ञ व पायसविभागणी सर्ग १५ व १६, श्लोक | –६६ | यज्ञ व पायसविभाग २।६६–९२ | –२७ | यज्ञ व पायसविभाग ३६–३९ | –४ |
| —— | | कैकयीचा हट्ट, धारीची झडप व पूर्ववृत्त २।९३–१२८ | –३६ | विहंगाची कैकयीच्या प्रसादावर झडप ४० | –१ |
| —— | | कौसल्या-सुमित्रा अर्धाअर्धा प्रसाद कैकयीस देतात. प्रसाद सेवन ३।१–६२ | –६२ | कौसल्या-सुमित्रा अर्धाअर्धा प्रसाद कैकयीस देतात. प्रसाद सेवन. धारीच्या प्रसाद भागाने रुद्रावतारी हनुमंत-जन्म ४१ | –१ |
| —— | | राण्यांचे डोहाळे अध्याय ४ व ५ ओव्या | –१७२ | राण्यांचे डोहाळे ४२–४६ | –५ |
| देवतांकडून वानरोत्पत्ती १७।१–३८ | –३८ | —— | | —— | |
| रामजन्म १८।१–१२ | –१२ | रामजन्म ६।१–९३ | –९३ | रामजन्म ४७–५४ | –८ |
| अन्य पुत्रांचा जन्म १८।१३–२३ | –११ | अन्य पुत्रांचा जन्म ६।९४–१२९ | –३६ | अन्य पुत्रांचा जन्म ५५–५६ | –२ |
| —— | | रामजन्मामुळे लंकेत अनर्थ ७।१–१० | –१० | लंकेत अनर्थ – देवांना आनंद ५७–५९ | –३ |
| अध्ययन १८।२४–३७ | –१४ | अध्ययन ७।११–२१ | –११ | अध्ययन ६०–६२ | –३ |
| —— | | तीर्थयात्रा लोकसंग्रह ७।२२–६४ | –४३ | —— | |

| वाल्मीकिरामायण सातवळकर – प्रत | | एकनाथकृत भावार्थरामायण पणशीकर प्रत | | मुक्तेश्वरकृत संक्षेप-रामायण परांजपे प्रत | |
|---|---|---|---|---|---|
| वाल्मीकिमुनींच्या प्रश्नावर नारदाचे रामचरित्रकथन- १।१–१०० | –१०० | —— | | —— | |
| श्लोकोत्पत्ती व ब्रह्मदेवाची रामचरित्र रचण्याची आज्ञा–२।१–४३ | –४३ | —— | | —— | |
| रामायणाचे संक्षिप्त निरूपण ३।१–४० | –४० | —— | | —— | |
| लवकुशांचे रामायणगायन-४।१–३६ | –३६ | —— | | —— | |
| अयोध्यावर्णन सर्ग ५, ६ व ७ श्लोक | –७९ | —— | | —— | |
| —— | | मंगलचरण १।१–३७ | –३७ | मंगलाचरण १–१७ | –१७ |
| —— | | दशरथवृत्त व श्रावणकथा १।३८–८० | –४३ | दशरथवृत्त व श्रावण कथा– १८–२४ | –७ |
| —— | | दैत्यगुरूशी दशरथाचे युद्ध १।८१–९६ | –१६ | दैत्यगुरूशी दशरथाचे युद्ध२५–३० कैकयीस वरप्रदान | –६ |
| —— | | बृहस्पतीचा कैकयीस वर, अयोध्याप्रवेश १।९७–११९ | –२३ | बृहस्पती मंत्र ३१–३२ | –२ |

यज्ञसंकल्प ८।१–२५ –२५

ऋष्यशृंगकथा सर्ग ९, १० व ११, श्लोक –८५

ऋष्यशृंगाकडून अश्वमेघयज्ञ सर्ग १२, १३ व १४, श्लोक –१२५

पुत्रकामेष्टीयज्ञ व पायसविभागणी सर्ग १५ व १६, श्लोक –६६

——

——

देवतांकडून वानरोत्पत्ती १७।१–३८ –३८

रामजन्म १८।१–१२ –१२

अन्य पुत्रांचा जन्म १८।१३–२३ –११

——

अध्ययन १८।२४–३७ –१४

——

——

ऋष्यशृंगकथा २।१–६५ –६५

——

यज्ञ व पायसविभाग २।६६–९२ –२७

कैकयीचा हट्ट, घारीची झडप व पूर्ववृत्त २।९३–१२८ –३६

कौसल्या-सुमित्रा अर्धाअर्धा प्रसाद कैकयीस देतात. प्रसाद सेवन ३।१–६२ –६२

राण्यांचे डोहाळे अध्याय ४ व ५ ओव्या –१७२

——

रामजन्म ६।१–९३ –९३

अन्य पुत्रांचा जन्म ६।९४–१२९ –३६

रामजन्मामुळे लंकेत अनर्थ ७।१–१० –१०

अध्ययन ७।११–२१ –११

तीर्थयात्रा लोकसंग्रह ७।२२–६४ –४३

——

ऋष्यशृंगानयन ३३–३५ –३

——

यज्ञ व पायसविभाग ३६–३९ –४

विहंगाची कैकयीच्या प्रसादावर झडप ४० –१

कौसल्या-सुमित्रा अर्धाअर्धा प्रसाद कैकयीस देतात. प्रसाद सेवन. घारीच्या प्रसाद भागाने रुद्रावतारी हनुमंत-जन्म ४१ –१

राण्यांचे डोहाळे ४२–४६ –५

——

रामजन्म ४७–५४ –८

अन्य पुत्रांचा जन्म ५५–५६ –२

लंकेत अनर्थ – देवांना आनंद ५७–५९ –३

अध्ययन ६०–६२ –३

——

| वाल्मीकिरामायण<br>सातवळेकर – प्रत | | एकनाथकृत भावार्थरामायण<br>पणशीकर –प्रत | | मुक्तेश्वरकृत संक्षेपरामायण<br>परांजपे - प्रत. | |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्राचे मागणे सर्ग १८, १९,<br>२० व २१, श्लोक | –९४ | विश्वामित्राचे मागणे ८।१–७४ | –७४ | विश्वामित्राचे मागणे ६३–६४ | –२ |
| —— | | श्रीरामाचे वैराग्यनिरूपण<br>९।१–१०५ | –१०५ | —— | |
| —— | | जनक व शुक्राचार्य संवाद<br>१०।१–१३६ | –१३६ | | |
| —— | | वसिष्ठ-श्रीराम संवाद ११।१–३१३ | ३१३ | | |
| विश्वामित्रासह रामाचे गमन-<br>–२२।१–५ | –५ | विश्वामित्रासह रामाचे गमन-<br>–१२।१–४० | –४० | विश्वामित्रासह रामाचे गमन–<br>–६५–६६ | –२ |
| शरयूतीरी बला - अतिबला विद्याप्राप्ती<br>२२।६–२४ | –१९ | कामाश्रमात सिद्धमंत्राची प्राप्ती<br>१२।४१–६९ | –२९ | शरयूतीरी मंत्रबीज प्राप्ती ६७ | –१ |
| कामदहन करणाऱ्या शंकराच्या<br>आश्रमात मुक्काम २३।१–२३ | –२३ | —— | | —— | |
| मलद व करुष प्रदेशाची उत्पत्ती<br>–२४।१–२० | –२० | —— | | —— | |
| ताटका कथा व वध सर्ग २४, २५<br>व २६, श्लोक | –७१ | ताटिका वध १२।७०–१३६ | –६७ | ताटकाकथा व वध ६८–७३ | –६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्राने रामास दिलेली शस्त्रास्त्रे सर्ग २७ व २८, श्लोक | –५१ | ——— | | ——— | |
| सिद्धाश्रमात वामनावतार कथा २९।१–३३ | –३३ | ——— | | ——— | |
| मारीच निक्षेप व सुबाहुवध ३०।१–२७ | –२७ | मारीच निक्षेप व सुबाहुवध १३।१–१४१ | –१४१ | मारीच निक्षेप व सुबाहुवध ७४–७७ | –४ |
| यज्ञासाठी मिथिलेकडे गमन –३१।१–२४ | –२४ | स्वयंवरासाठी मिथिलेकडे गमन १४।१–१६ | –१६ | सीतास्वयंवरासाठी मिथिलेकडे गमन ७८ | –१ |
| विश्वामित्र वंशकथा सर्ग ३२, ३३ व ३४, श्लोक | –७७ | ——— | | ——— | |
| गंगावतरणकथा सर्ग ३५ते४४, श्लोक | –२८० | ——— | | ——— | |
| समुद्रमंथनकथा सर्ग ४५ ते४७, श्लोक | –९० | ——— | | ——— | |
| अहल्योद्धार सर्ग ४८ व ४९, श्लोक | –५६ | अहल्योद्धार १४।१७–८५ | –६९ | अहल्योद्धार ७९–८७ | –९ |
| विश्वामित्रादिकांचे जनकाकडून स्वागत ५०।१–२५ | –२५ | ——— | | ——— | |
| विश्वामित्र वंश-कथा सर्ग ५१ ते ६४ | –३५६ | ——— | | ——— | |
| शिवधनुष्य पूर्ववृत्त व सीता जन्मकथा. पणात हरलेल्या राजांचे आक्रमण व निराकरण ६६।१–२६ | –२६ | सीतेची पूर्वजन्मकथा १५।१–१४३ (पद्मावतीची कथा) | –१४३ | ——— | |
| ——— | | परशुराम व शिवधनुष्याची पूर्व-कथा अध्याय १६ व १७, ओव्या | ३१९ | ——— | |

| वाल्मीकिरामायण<br>सातवळेकर - प्रत | | एकनाथकृत भावार्थरामाणय<br>पणशीकर - प्रत | | मुक्तेश्वरकृत संक्षेपरामायण<br>परांजपे - प्रत | |
|---|---|---|---|---|---|
| —— | | स्वयंवराचा पण १८।१–९६ | –९६ | स्वयंवराचा पण ८८–९१ | –४ |
| —— | | रावणाची फजिती १८।९७–१४१ | –४५ | रावणाची फजिती ९२ | –१ |
| रामाकडून शिवधनुर्भंग ६७।१–२८ | –२८ | रामाकडून शिवधनुर्भंग १९।१–१०६<br>२०।१–८८ | –१९४ | रामाकडून शिवधनुर्भंग ९३–१०० | –८ |
| —— | | सीता रामास माळ घालते<br>२०।८९–११९ | –३१ | सीता रामास माळ घालते १०१–१०२ | –२ |
| दशरथास आमंत्रण व त्याचे आगमन<br>सर्ग ६८ व ६९, श्लोक | –३७ | दशरथास निमंत्रण २१।१–७३ | –७३ | दशरथास कूटपत्र व वसिष्ठकृत<br>उलगडा १०३–१०६ | –४ |
| परस्परवंशपरिचय व विवाहवर्णन सर्ग<br>७० ते ७३, श्लोक | –१३३ | सूर्यवंशवर्णन व विवाहवर्णन<br>अध्याय २२ ते २५, ओव्या | –४४० | विवाहवर्णन १०७–१०८ | –२ |
| परशुरामाशी संघर्ष सर्ग ७४ ते ७६,श्लोक | –७७ | परशुरामाशी संघर्ष २६।१–१०१ | –१०१ | परशुरामाशी संघर्ष १०९–११९ | –११ |
| रामाचा अयोध्याप्रवेश व भरत शत्रुघ्नाचे<br>मातुलगृही गमन ७७।१–२९ | –२९ | श्रीराम अयोध्येत बंधूसह सेवा-<br>तत्पर २७।१–९५ | –९५ | रामाचा अयोध्याप्रवेश १२० | –१ |
| —— | | बालकांडाचा उपसंहार २७।९६–<br>११४ | –१९ | बालकांडाचा उपसंहार १२१–१२२ | –२ |
| सत्त्याहत्तर सर्गात विभक्त.<br>अनुष्टुभ छंद, श्लोक संख्या. | २२७९ | सत्तावीस अध्यायात विभक्त ओवीबंध.<br>ओवी संख्या. | ३२२० | सलग ओवीबंध ओवी संख्या | १२२ |

## चार ॥ संक्षेपरामायण : हस्तलिखित प्रती

१. मुक्तेश्वरकृत कौतुहलरामायण, क्र. ११ पृ. ४९ × २ = ९८. दासविश्राम-धामकारांचा संग्रह–१४८, बाडांक १६५(१५०), श्रीसमर्थ वाग्देवतामंदिर, धुळे

२. मुक्तेश्वरकृत रामायण, पृ. ९६ × २ = १९२. पृ. ६५ व ९६ नष्ट. पांघरी मठातील संग्रह–६१, बाडांक ३००(२००), श्रीसमर्थ वाग देवतामंदिर, धुळे.

३. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण, व. क्र. १४१ अ.अरा. ३४. पृ. १ ते ११६ अपूर्ण. बालकांडापासून युद्धकांडापर्यंत, ठो. क्र. १०११, जीर्ण प्रत. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर

४. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : बालकांड, व. क्र. १३७, अरा ३४, पृ. १ ते ९ ग्रंथ २००. ठो.क्र. १००५. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर. समाप्ति-मुद्रा–

"इति श्रीकौतूहल नाटक रामायणे विश्वंभरानुचर मुक्तीश्वर
विरचितं बालकांड संपूर्णम् !"

५. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटक रामायण, बालकांड, व. क्र. १३१, अरा ३४ पृ. १ ते १६ ग्रंथ २०० ठो. क्र. ९९९, सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर

"इति श्री कौतूहल नाटक रामायणे अवधूतानुचर मुक्तीश्वर विरचित
बालकांड –(प्रमोदूत )नाम संवत्सरे चैत्रवदि सप्तमी भृगुवासरे
उत्तरायणे समाप्त ॥"

६. मुक्तेश्वरकृत कौतुहल रामायण : बालकांड, क्र. ९९/८४, पाठक संग्रह, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, अहमदनगर.

७. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : अयोध्याकांड, व. क्र. १३८, अरा ३४, पृ. १ ते १२

"इति श्री हनुमंत नाटक रामायण मुक्तेश्वरविरचित अयोध्याकांड सं. ॥"

८. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : अयोध्याकांड, व. क्र. १३२, अरा ३४, पृ. १ ते २०. ग्रंथ २३०. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"प्रमोदूत नाम सवंत्सरे आदिक शुद्ध चतुर्दशी मंदवासरे उत्तरायणे संपूर्ण"

९. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : आरण्यकांड, व. क्र. १३९, अरा ३४, पृ. १ ते १३. ग्रंथ १८७ ठो. क्र. १००७. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर .

"इति श्री हनुमंत नाटक रामायण मुक्तेश्वर विरचित आरण्यकांड सं. ॥"

१०. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : अरण्यकांड व. क्र. १३३ अरा ३४, पृ. १ ते १८. ग्रंथ २०० ठो. क्र. १००१ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"प्रमोदूत संवत्सर आदिक वदि १ गुरुवार उत्तरायण तास ६ स संपूर्ण ॥"

११. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : किष्किधाकांड, व.क्र. १४०, अरा ३४

पृ. १ ते १२. ग्रंथ १६८ ठो. क्र. १००८ सरस्वतीमहाल. ग्रंथसंग्रहालय, तंजा

"इति श्रीरामायण मुक्तेश्वरविरचित किष्किधाकांड समाप्त ।।"

१२. मुक्तीश्वरकृत कौतूहल नाटक रामायण : किष्किधाकांड, व. क्र. १३४,

पृ. १ ते १५. ग्रंथ १९५ ठो. क्र. १००२ सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"प्रमोदूतनाम संवत्सर आदिक मास कृष्णपक्षे अष्टमी इंदुवार
दक्षिणायन तास ११ स संपूर्ण"

१३. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : सुंदरकांड, व. क्र. १४१,

पृ. १ ते १२ ग्रंथ १५७. ठो. क्र. १००९ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"इति श्री कौतूहल श्रीरामायण मुक्तेश्वर विरचिते सुंदरकांडं संपूर्णम्

१४. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण सुंदरकांड, व. क्र. १३५, अ

पृ. १ ते १८.

"(प्रमोदूत नाम संवत्सरे) दक्षिणायने आदिकवदि अमावास्या इ
तास ८ संपूर्ण।।"

१५. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटकरामायणे सुंदरकांड, क्र. ५५, २३२
इतिहास संशोधक मंडळ, पुणे. आकार ४" × ६" प्रत्येक पृष्ठावर ओळी ८
ओळीतील शब्द ५–६. एकूण श्लोक ११६. पृष्ठे २४ × २. नक्षीदार
"सुंदरकांड प्रारंभ श्लोक नाटकि" असे शीर्षक.

"इति श्री कौतुहलनाटक रामायणे सुंदरकांड मुक्तेश्वरकवी संपू
श्री दत्तात्रेय प्रसन्न।।"

१६. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १३६,
पृ. १ ते ७६. ग्रंथ ८०० ठो. क्र. १००४ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजाव
श्री. मुक्तेश्वर विरचितं युद्धकांडं समाप्तं।।" अक्षर व कागद पोथीच्या जुनेपणा
देतात.

१७. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १४२, अ
पृ. १ ते २९. ग्रंथ ७३५. ठो. क्र. १०१०. सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजा

।। इति श्रीकौतूहलनाटक रामायण अवधूतानुचर मुक्तेश्वरविरचित
समाप्त ।। लेखन भास्करात्मज नृसिंह विष्णुवर्ध (न) गोत्री ।।
कुंभकोण युवनाम संवत्सर ।।"

सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहातील प्रतींपैकी ठो. क्र. १००५ आणि १०१० एका सा
पोथ्या आहेत. ठो. क्र. १००६ ते १००९ यातही एक साचा आहे. १००५ व १
पाने जीर्ण आहेत. त्यातील श्लोकसंख्या ४०७ आहे. ठो. क्र. १००४ मधील
संख्या ४५७ आहे.

१८. मुक्तेश्वरकृत रामायण, क्र. १२, पंडितराव संग्रह, ग्रंथालय,
विद्यापीठ, कोल्हापूर.

# फ ॥ संदर्भ सूची

## अ ॥ साधनग्रंथ

### १. हस्तलिखित मुक्तेश्वरी रचना

१. मुक्तेश्वरकृत रामायण, पृ. ९६ × २ = १९२. पृ. ६५ व ९६ नष्ट. पांघरी मठातील संग्रह–६१. बाडांक ३०० (२००), श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

२. मुक्तेश्वरकृत कौतुहलरामायण, क्र. ११ पृ. ४९ × २ = ९८. दासविश्राम-धामकारांचा संग्रह–१४८. बाडांक १६५ (१५०). श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

### २. प्रकाशित मुक्तेश्वरी रचना

३. "महाभारत–आदिपर्व" खंड १–४, (सं) अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंहालय, मुंबई, १९५१–१९५९.

४. "महाभारत––"(सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई. आदिपर्व (१८९३), सभापर्व (१८९४) वनपर्व (१८९८) विराटपर्व (१८९९).

५. "महाभारत-विराटपर्व", (सं.) दा. के. ओक, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९३९.

६. "महाभारत-विराटपर्व" (सं.) द. सी. पंगु, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुनर्मुद्रण, १९६५ (प्रथम प्रकाशन १९५३).

७. "(कौतुहलनाटक) रामायण", (सं.) माधव चंद्रोबा, मुंबई, १८६४.

८. "रामायण" (सं.) ज. वा. मोडक-वा. दा. ओक, निर्णयसागर, मुंबई, १८९१.

९. "रामायण" (सं.) भा. श्री. परांजपे, सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, १९६९.

१०. "स्फुट काव्यें" (सं.) दा. के. ओक, परिशुद्धी न. चिं. केळकर–बा. अ. भिडे, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १९०६.

### ३. विवाद्य मुक्तेश्वरी रचना

११. "ओवी-रामायण", (सं.) भा. पं. बहिरट, पंढरपूर संशोधन मंडळ, पंढरपूर, १९५६.

१२. "भावार्थरामायणाचे उत्तरकांड", (सं.) व. स. जोशी, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६३.

## ब ।। साहाय्यक ग्रंथ


### ४. प्राचीन मराठी कविता

१३. अवचितसुत काशी, "द्रौपदीस्वयंवर" (सं.)वा. दा. गोखले, म. सा. प., पुणे.

१४. एकनाथ, "भावार्थरामायण", (सं.) न. वि. पणशीकर, अ. स. वैद्य, यशवंत प्रकाशन, पुणे, १९६८.

१५. माधवस्वामी, "आख्यानक कविता", (सं.) व. वि. पारखे, सुधा पारखे, सुनीता प्रकाशन, अलिबाग-कुलाबा-डोंबिवली, १९७४.

१६. रंगनाथस्वामी निगडीकर, "कवितासंग्रह", (सं.) वि. ल. भावे, "महाराष्ट्र-कवी", मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे, श. १८२७.

१७. रामदास "समग्र ग्रंथ", चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२.

१८. विठ्ठल, "कवितासंग्रह", (सं.) वा. दा. ओक, पांडुरंग जावजी, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९२४.

१९. श्रीधर, "रामविजय" (पोथी).

### ५. आधुनिक मराठी ग्रंथ

२०. आजगावकर ज. र. "महाराष्ट्र कविचरित्र" भाग १, दा. सा. आणि मंडळी, मुंबई, १९०७.

२१. आजगावकर ज. र. "प्राचीन मराठी संतकवी", खंड १, सौ. क. भा. आजगावकर, मुंबई १९५७.

२२. आवळीकर पंडित, "वाङ्मयदर्शन", अंजली मेहता, युनिव्हर्सल प्रकाशन, सातारा-कोल्हापूर, १९७५.

२३. कुलकर्णी द. भि., "महाकाव्य : स्वरूप आणि समीक्षा", जयश्री उपाध्याय, विजय प्रकाशन, नागपूर, १९७५.

२४. कुलकर्णी पां. ना., "संशोधन-धारा", स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६७.

२५. जोग रा. श्रीः, "मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन", व. ह. गोळे पुणे विद्यापीठ, पुणे, १९५९.

२६. जोग रा. श्री. (सं.), "मराठी वाङ्मयाचा इतिहास" खंड तिसरा, भीमराव कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९७३.

२७. देशपांडे अ. ना., "प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास" भाग चौथा, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे-नागपूर, १९७७.

२८. परांजपे भा. श्री., "रामदासांचे साहित्यशास्त्र", छाया परांजपे, पद्मश्री प्रकाशन, नागपूर, १९७३.

२९. पांगारकर ल. रा., "कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन", ल. रा. पांगारकर, पुणे, १९२२.

३०. पोहनेरकर न. शें. (सं.), "श्री एकनाथ दर्शन" खंड १, न. शें. पोहनेरकर, श्री एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद-हैद्राबाद, १९५२.

३१. भावे वि. ल., "महाराष्ट्र-सारस्वत", भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, दु. आ. १९१९ (प. आ. १८९९). शं. गो. तुळपुळे यांच्या पुरवणीसह चौथी आवृत्ती, वि. ग. माटे, पुणे, शके १८७६.

३२. भिडे बा. अ.., "मुक्तेश्वर" के. भि. ढवळे, मुंबई, दु. आ. १९२६.

३३. वाटवे के. ना., "प्राचीन मराठी पंडिती काव्य", जोशी-लोखंडे प्रकाशन पुणे, १९६४.

**६. टंकलिखित पदवी प्रबंध**

३४. उपाध्ये त. पा., "मराठीतील रामायणे आणि प्राकृतातील रामायणे यांचा तुलनात्मक अभ्यास", शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३५. करंदीकर शैलजा, "वाल्मीकिरामायणाचे छंदोबद्ध मराठी अवतार", मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६०.

**७. नियतकालिके**

३६. इतिहास-संशोधन-प्रदीप, अहमदनगर, मे–ऑ. १९७७. (गोविलकर लीला, "मुक्तेश्वराचे संक्षेपरामायण" पृ. २६–३२).

३७. इंद्रायणी, पुणे, जून १९६३. (बडवे अनिल, "मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड", पृ. ३७–४२.)

३८. निबंधचंद्रिका, अंक ४०, पुणे १८८६. (मुक्तेश्वर, पृ. १–२१).)

३९. युगवाणी, नोव्हें-डिसें. १९७१.

**८. संस्कृत**

४०. "(सार्थ श्री) अध्यात्मरामायण", के. भि. ढवळे, मुंबई, १९२८.

४१. "आनंदरामायण", म्हैसूर, १९४८.

४२. कालिदास, "कुमारसंभव".

४३. कालिदास, "रघुवंश".

४४. कालिदास, "विक्रमोर्वशीय".

४५. जगन्नाथ, "भामिनीविलास"

४६. जयदेव, "प्रसन्नराघव"

४७. "जैमिनी अश्वमेध", (सं.) वि. वा. बापट, वाई, १९१३.

पृ. १ ते १२. ग्रंथ १९८ ठो. क्र. १००८ सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"इति श्रीरामायण मुक्तेश्वरविरचित किष्किधाकांड समाप्त ।।"

१२. मुक्तीश्वरकृत कौतूहल नाटक रामायण : किष्किधाकांड, व. क्र. १३४, अरा ३४ पृ. १ ते १५. ग्रंथ १९५ ठो. क्र. १००२ सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"प्रमोदूतनाम संवत्सर आदिक मास कृष्णपक्षे अष्टमी इंदुवार दक्षिणायन तास ११ स संपूर्ण"

१३. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : सुंदरकांड, व. क्र. १४१, अरा३४ पृ. १ ते १२ ग्रंथ १५७. ठो. क्र. १००९ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"इति श्री कौतूहल श्रीरामायण मुक्तेश्वर विरचिते सुंदरकांडं संपूर्णम् ।।"

१४. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण सुंदरकांड, व. क्र. १३५, अरा ३४ पृ. १ ते १८.

"(प्रमोदूत नाम संवत्सरे) दक्षिणायने आदिकवदि अमावास्या इंटुवासरे तास ८ संपूर्ण।।"

१५. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटकरामायणे सुंदरकांड, क्र. ५५, २३२ भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. आकार ४" × ६" प्रत्येक पृष्ठावर ओळी ८. प्रत्येक ओळीतील शब्द ५–६. एकूण श्लोक ११६. पृष्ठे २४ × २. नक्षीदार मुखपृष्ठ. "सुंदरकांड प्रारंभ श्लोक नाटकि" असे शीर्षक.

"इति श्री कौतुहलनाटक रामायणे सुंदरकांड मुक्तेश्वरकवी संपूर्णमस्तु" श्री दत्तात्रेय प्रसन्न।।"

१६. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १३६, अरा ३४ पृ. १ ते ७६. ग्रंथ ८०० ठो. क्र. १००४ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर. "इति श्री. मुक्तेश्वर विरचितं युद्धकांडं समाप्तं।।" अक्षर व कागद पोथीच्या जुनेपणाची साक्ष देतात.

१७. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १४२, अरा. ३४ पृ. १ ते २९. ग्रंथ ७३५. ठो. क्र. १०१०. सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

।। इति श्रीकौतूहलनाटक रामायण अवधूतानुचर मुक्तेश्वरविरचित युद्धकांड समाप्त ।। लेखन भास्करात्मज नृसिंह विष्णुवर्ध (न) गोत्री ।। वास्तव्य कुंभकोण युवनाम संवत्सर ।।"

सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहातील प्रतींपैकी ठो. क्र. १००५ आणि १०१० एका साच्याच्या पोथ्या आहेत. ठो. क्र. १००६ ते १००९ यातही एक साचा आहे. १००५ व १०१० ची पाने जीर्ण आहेत. त्यातील श्लोकसंख्या ४०७ आहे. ठो. क्र. १००४ मधील श्लोक-संख्या ४५७ आहे.

१८. मुक्तेश्वरकृत रामायण, क्र. १२, पंडितराव संग्रह, ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# फ ॥ संदर्भ सूची

## अ ॥ साधनग्रंथ

### १. हस्तलिखित मुक्तेश्वरी रचना

१. मुक्तेश्वरकृत रामायण, पृ. ९६ × २ = १९२. पृ. ६५ व ९६ नष्ट. पांघरी मठातील संग्रह–६१. बाडांक ३०० (२००), श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

२. मुक्तेश्वरकृत कौतुहलरामायण, क्र. ११ पृ. ४९ × २ = ९८. दासविश्राम-धामकारांचा संग्रह–१४८. बाडांक १६५ (१५०). श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

### २. प्रकाशित मुक्तेश्वरी रचना

३. "महाभारत–आदिपर्व" खंड १–४, (सं) अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंहालय, मुंबई, १९५१–१९५९.

४. "महाभारत—"(सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई. आदिपर्व (१८९३), सभापर्व (१८९४) वनपर्व (१८९८) विराटपर्व (१८९९).

५. "महाभारत-विराटपर्व", (सं.) दा. के. ओक, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९३९.

६. "महाभारत-विराटपर्व" (सं.) द. सी. पंगु, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुनर्मुद्रण, १९६५ (प्रथम प्रकाशन १९५३).

७. "(कौतुहलनाटक) रामायण", (सं.) माधव चंद्रोबा, मुंबई, १८६४.

८. "रामायण" (सं.) ज. वा. मोडक-वा. दा. ओक, निर्णयसागर, मुंबई, १८९१.

९. "रामायण" (सं.) भा. श्री. परांजपे, सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, १९६९.

१०. "स्फुट काव्यें" (सं.) दा. के. ओक, परिशुद्धी न. चिं. केळकर–बा. अ. भिडे, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १९०६.

### ३. विवाद्य मुक्तेश्वरी रचना

११. "ओवी-रामायण", (सं.) भा. पं. बहिरट, पंढरपूर संशोधन मंडळ, पंढरपूर, १९५६.

१२. "भावार्थरामायणाचे उत्तरकांड", (सं.) व. स. जोशी, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६३.

पृ. १ ते १२. ग्रंथ १६८ ठो. क्र. १००८ सरस्वतीमहाल. ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"इति श्रीरामायण मुक्तेश्वरविरचित किष्किधाकांड समाप्त ।।"

१२. मुक्तीश्वरकृत कौतूहल नाटक रामायण : किष्किधाकांड, व. क्र. १३४, अरा ३४

पृ. १ ते १५. ग्रंथ १९५ ठो. क्र. १००२ सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"प्रमोदूतनाम संवत्सर आदिक मास कृष्णपक्षे अष्टमी इंदुवार
दक्षिणायन तास ११ स संपूर्ण"

१३. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : सुंदरकांड, व. क्र. १४१, अरा३४

पृ. १ ते १२ ग्रंथ १५७. ठो. क्र. १००९ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

"इति श्री कौतूहल श्रीरामायण मुक्तेश्वर विरचिते सुंदरकांडं संपूर्णम् ।।"

१४. मुक्तीश्वरकृत कौतूहलनाटक रामायण सुंदरकांड, व. क्र. १३५, अरा ३४

पृ. १ ते १८.

"(प्रमोदूत नाम संवत्सरे) दक्षिणायने आदिकवदि अमावास्या इंदुवासरे तास ८ संपूर्ण।।"

१५. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटकरामायणे सुंदरकांड, क्र. ५५, २३२ भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. आकार ४" × ६" प्रत्येक पृष्ठावर ओळी ८. प्रत्येक ओळीतील शब्द ५–६. एकूण श्लोक ११६. पृष्ठे २४ × २. नक्षीदार मुखपृष्ठ. "सुंदरकांड प्रारंभ श्लोक नाटकि" असे शीर्षक.

"इति श्री कौतुहलनाटक रामायणे सुंदरकांड मुक्तेश्वरकवी संपूर्णमस्तु" श्री दत्तात्रेय प्रसन्न।।"

१६. मुक्तेश्वरकृत कौतुहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १३६, अरा ३४ पृ. १ ते ७६. ग्रंथ ८०० ठो. क्र. १००४ सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर. "इति श्री. मुक्तेश्वर विरचितं युद्धकांडं समाप्तं।।" अक्षर व कागद पोथीच्या जुनेपणाची साक्ष देतात.

१७. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटक रामायण : युद्धकांड, व. क्र. १४२, अरा. ३४ पृ. १ ते २९. ग्रंथ ७३५. ठो. क्र. १०१०. सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालय, तंजावर.

।। इति श्रीकौतूहलनाटक रामायण अवधूतानुचर मुक्तेश्वरविरचित युद्धकांड समाप्त ।। लेखन भास्करात्मज नृसिंह विष्णुवर्ध (न) गोत्री ।। वास्तव्य कुंभकोण युवनाम संवत्सर ।।"

सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहातील प्रतींपैकी ठो. क्र. १००५ आणि १०१० एका साच्याच्या पोथ्या आहेत. ठो. क्र. १००६ ते १००९ यातही एक साचा आहे. १००५ व १०१० ची पाने जीर्ण आहेत. त्यातील श्लोकसंख्या ४०७ आहे. ठो. क्र. १००४ मधील श्लोक-संख्या ४५७ आहे.

१८. मुक्तेश्वरकृत रामायण, क्र. १२, पंडितराव संग्रह, ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# फ ॥ संदर्भ सूची

## अ ॥ साधनग्रंथ

### १. हस्तलिखित मुक्तेश्वरी रचना

१. मुक्तेश्वरकृत रामायण, पृ. ९६ × २ = १९२. पृ. ६५ व ९६ नष्ट. पांधरी मठातील संग्रह–६१. बाडांक ३०० (२००), श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

२. मुक्तेश्वरकृत कौतुहलरामायण, क्र. ११ पृ. ४९ × २ = ९८. दासविश्राम-धामकारांचा संग्रह–१४८. बाडांक १६५ (१५०). श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळे.

### २. प्रकाशित मुक्तेश्वरी रचना

३. "महाभारत–आदिपर्व" खंड १–४, (सं) अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंहालय, मुंबई, १९५१–१९५९.

४. "महाभारत––"(सं.) वा. दा. ओक, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई. आदिपर्व (१८९३), सभापर्व (१८९४) वनपर्व (१८९८) विराटपर्व (१८९९).

५. "महाभारत-विराटपर्व", (सं.) दा. के. ओक, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९३९.

६. "महाभारत-विराटपर्व" (सं.) द. सी. पंगु, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुनर्मुद्रण, १९६५ (प्रथम प्रकाशन १९५३).

७. "(कौतुहलनाटक) रामायण", (सं.) माधव चंद्रोबा, मुंबई, १८६४.

८. "रामायण" (सं.) ज. वा. मोडक-वा. दा. ओक, निर्णयसागर, मुंबई, १८९१.

९. "रामायण" (सं.) भा. श्री. परांजपे, सुविचार प्रकाशन, नागपूर–पुणे, १९६९.

१०. "स्फुट काव्यें" (सं.) दा. के. ओक, परिशुद्धी न. चि. केळकर–बा. अ. भिडे, तुकाराम जावजी, निर्णयसागर, मुंबई, १९०६.

### ३. विवाद्य मुक्तेश्वरी रचना

११. "ओवी-रामायण", (सं.) भा. पं. बहिरट, पंढरपूर संशोधन मंडळ, पंढरपूर, १९५६.

१२. "भावार्थरामायणाचे उत्तरकांड", (सं.) व. स. जोशी, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६३.

## ब ।। साहाय्यक ग्रंथ


### ४. प्राचीन मराठी कविता

१३. अवचितसुत काशी, "द्रौपदीस्वयंवर" (सं.)वा. दा. गोखले, म. सा. प., पुणे.

१४. एकनाथ, "भावार्थरामायण", (सं.) न. वि. पणशीकर, अ. स. वैद्य, यशवंत प्रकाशन, पुणे, १९६८.

१५. माधवस्वामी, "आख्यानक कविता", (सं.) व. वि. पारखे, सुधा पारखे, सुनीता प्रकाशन, अलिबाग-कुलाबा-डोंबिवली, १९७४.

१६. रंगनाथस्वामी निगडीकर, "कवितासंग्रह", (सं.) वि. ल. भावे, "महाराष्ट्र-कवी", मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे, श. १८२७.

१७. रामदास "समग्र ग्रंथ", चित्रशाळा, द्वितीय संस्करण, पुणे, १९३२.

१८. विठ्ठल, "कवितासंग्रह", (सं.) वा. दा. ओक, पांडुरंग जावजी, निर्णयसागर, मुंबई, दु. आ. १९२४.

१९. श्रीधर, "रामविजय" (पोथी).

### ५. आधुनिक मराठी ग्रंथ

२०. आजगावकर ज. र. "महाराष्ट्र कविचरित्र" भाग १, दा. सा. आणि मंडळी, मुंबई, १९०७.

२१. आजगावकर ज. र. "प्राचीन मराठी संतकवी", खंड १, सौ. क. भा. आजगावकर, मुंबई १९५७.

२२. आवळीकर पंडित, "वाङ्मयदर्शन", अंजली मेहता, युनिव्हर्सल प्रकाशन, सातारा-कोल्हापूर, १९७५.

२३. कुलकर्णी द. भि., "महाकाव्य : स्वरूप आणि समीक्षा", जयश्री उपाध्याय, विजय प्रकाशन, नागपूर, १९७५.

२४. कुलकर्णी पां. ना., "संशोधन-धारा", स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६७.

२५. जोग रा. श्रीः, "मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन", व. ह. गोळे पुणे विद्यापीठ, पुणे, १९५९.

२६. जोग रा. श्री. (सं.), "मराठी वाङ्मयाचा इतिहास" खंड तिसरा, भीमराव कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९७३.

२७. देशपांडे अ. ना., "प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास" भाग चौथा, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे-नागपूर, १९७७.

२८. परांजपे भा. श्री., "रामदासांचे साहित्यशास्त्र", छाया परांजपे, पद्मश्री प्रकाशन, नागपूर, १९७३.

२९. पांगारकर ल. रा., "कविवर्य मुक्तेश्वर : चरित्र आणि काव्यविवेचन", ल. रा. पांगारकर, पुणे, १९२२.

३०. पोहनेरकर न. शें. (सं.), "श्री एकनाथ दर्शन" खंड १, न. शें. पोहनेरकर, श्री एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद-हैद्राबाद, १९५२.

३१. भावे वि. ल., "महाराष्ट्र-सारस्वत", भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, दु. आ. १९१९ (प. आ. १८९९). शं. गो. तुळपुळे यांच्या पुरवणीसह चौथी आवृत्ती, वि. ग. माटे, पुणे, शके १८७६.

३२. भिडे बा. अ.., "मुक्तेश्वर" के. भि. ढवळे, मुंबई, दु. आ. १९२६.

३३. वाटवे के. ना., "प्राचीन मराठी पंडिती काव्य", जोशी-लोखंडे प्रकाशन पुणे, १९६४.

**६. टंकलिखित पदवी प्रबंध**

३४. उपाध्ये त. पा., "मराठीतील रामायणे आणि प्राकृतातील रामायणे यांचा तुलनात्मक अभ्यास", शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३५. करंदीकर शैलजा, "वाल्मीकिरामायणाचे छंदोबद्ध मराठी अवतार", मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६०.

**७. नियतकालिके**

३६. इतिहास-संशोधन-प्रदीप, अहमदनगर, मे–ऑ. १९७७. (गोविलकर लीला, "मुक्तेश्वराचे संक्षेपरामायण" पृ. २६–३२).

३७. इंद्रायणी, पुणे, जून १९६३. (बडवे अनिल, "मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड", पृ. ३७–४२.)

३८. निबंधचंद्रिका, अंक ४०, पुणे १८८६. (मुक्तेश्वर, पृ. १–२१).)

३९. युगवाणी, नोव्हें-डिसें. १९७१.

**८. संस्कृत**

४०. "(सार्थ श्री) अध्यात्मरामायण", के. भि. ढवळे, मुंबई, १९२८.

४१. "आनंदरामायण", म्हैसूर, १९४८.

४२. कालिदास, "कुमारसंभव".

४३. कालिदास, "रघुवंश".

४४. कालिदास, "विक्रमोर्वशीय".

४५. जगन्नाथ, "भामिनीविलास"

४६. जयदेव, "प्रसन्नराघव"

४७. "जैमिनी अश्वमेध", (सं.) वि. वा. बापट, वाई, १९१३.

४८. भर्तृहरी, "शतकत्रय".

४९. भवभूती, "महावीरचरित"

५०. "महाभारत" (चिकित्सक आवृत्ती), (सं.) व्ही. एस्. सुखटणकर (१९२५–४३), एस. के. बेलवलकर (१९४३– ), भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटचूट, मुंबई–पुणे.

५१. मुरारी, "अनर्घराघव"

५२. "महामुनी आदिकवी वाल्मीकिप्रणीत रामायण," बालकांड-उत्तरकांड, (सं.) श्री. दा. सातवळेकर, वि. दा. पंडित, स्वाध्यायमंडळ, पारडी, दु. आ. १९६५–

५३. विश्वनाथ, "साहित्यदर्पण", निर्णयसागर, मुंबई, १९०२.

५४. "हनुमन्नाटक," (पश्चिम-भारतीय प्रत), संकलक मिश्र दामोदर, दीपिका मिश्रमोहन, गुजराथी मुद्रणालय, मुंबई, शके १८३३.

**९. हिंदी**

५५. बुल्के कामिल, "रामकथा (उत्पत्ति और विकास)," हिंदी परिषद प्रकाशन, हिंदी विभाग, प्रयाग विश्वविद्यालय, प्रयाग, तृतीय संशोधित संस्करण, १९७१.

**१०. इंग्रजी**

५६. कृष्णम्माचारीयर ए., "ए हिस्ट्री ऑफ क्लासिकल संस्कृत लिटरेचर", मद्रास, १९३७.

५७. मॅकडोनल ए., "ए हिस्ट्री ऑफ संस्कृत लिटरेचर", मुन्शीराम मनोहरलाल, दिल्ली, दु. आ. १९६१.

* * *

REFBK-0025644

